

हसऱ्या गॅलरीतून....

वासंतिक विशेषांक मालिका: तीन / किंमत: पाच रुपये

साप्ताहिक

# माणूस

¤

वर्ष : बाविसावे

अंक : एक्कावन्नावा

[ वासंतिक विशेषांक मालिका अंक तिसरा ]

¤

२१ मे १९८३

किंमत : पाच रुपये

¤

संपादक

श्री. ग. माजगावकर

¤

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

¤

वार्षिक वर्गणी

पन्नास रुपये

¤

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

¤

: पत्ता :

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ३०

दूरध्वनी : ४४३४५९

¤

मुखपृष्ठ व आतील चित्रे :

संजय पवार

## चवथ्या वासंतिक विशेषांकात

वर्धा जिल्हा ग्रामोदयासाठी निवडावा अशी सूचना विनोबांनी नानाजी देशमुखांना केली. नानाजी बोलल्याप्रमाणे साठाव्या वर्षी सत्ताकारणातून निवृत्त झाले होते व उत्तर प्रदेशातील गोंडा जिल्ह्याच्या विकासाकडे त्यांनी आपले सर्व लक्ष केंद्रित केले होते.

पण नानाजींनी व दिल्लीच्या दीनदयाळ संस्थेने वर्ध्याऐवजी, त्याहून अधिक मागासलेला, अधिक दुष्काळी असा मराठवाड्यातील बीड जिल्हा निवडून आपल्या महाराष्ट्रातील कामास सुरुवात केलेली आहे.

या कामातल्या अडचणी कोणत्या ? अडथळे कोणते ?

बीड जिल्ह्याची सद्य:स्थिती कशी आहे ?

दीनदयाळ संस्थेचे कार्यकर्ते ही स्थिती कशी व कोणत्या प्रकारे बदलू पहात आहेत ?

नियोजनामागील त्यांचा दृष्टिकोन कोणता ?

संस्थेच्या कार्यकर्त्यांना स्थानिक जनतेचा, पुढाऱ्यांचा विरोध किती ? कसा ? सहकार्य आहे की नाही ?

दत्तप्रसाद दाभोळकरांचे, नानाजींच्या संस्थेने उभ्या केलेल्या गोंडा जिल्ह्यातील मूळ कार्याबद्दलचे तीन लेखांक चालू व मागील दोन वासंतिक विशेषांकात दिले.

याला जोडूनच आता पुढील अंकात, चवथ्या वासंतिक विशेषांकात बीड जिल्ह्याच्या प्रत्यक्ष दौऱ्यावर आधारित –

# गोंडा ते बीड । ...माणूस प्रतिनिधी

## शिवाय

वेगळ्या विषयांवरील दोन स्वतंत्र कथा–'देणगी', 'माझा घटस्फोट' / 'ब्लड कॅन्सर' कादंबरीचा पुढील भाग आणि 'पाया हादरलेली घरं' या विषयावरील दोन विशेष लेख – 'आपण आणि आपली मुलं' व 'एक फुलबाग फुलवायची आहे!'

# हसऱ्या गॅलरीतले शि. द. फडणीस

मुलाखत : मेधा राजहंस


फडणिसांचं नाव घेतलं की लगेच हसऱ्या गॅलरीतली रंगीबेरंगी, खेळकर चित्रं डोळ्यांसमोर फेर धरतात. त्यातला गालातल्या गालात हसवणारा विनोद, डोळ्यांना सुखवणारे रंग, चित्रातल्या व्यक्तिरेखांमधील गोडवा आणि यातून त्या संपूर्ण चित्रालाच येणारी एक प्रसन्नता एकाच वेळी आकर्षून घेतात. फडणिसांनी आपल्या या शैलीचा मराठी व्यंगचित्रकलाक्षेत्रात एक वेगळाच ठसा उमटवला आहे. या शैलीचा उपयोग करून गणितापासून तत्त्वज्ञानापर्यंत त्यांनी अनेक क्षेत्रांत केलेला मुक्त यशस्वी संचार हे व्यंगचित्रकला क्षेत्रातलं त्यांचं महत्त्वाचं contribution आहे.

जवळजवळ चाळीस वर्षं फडणीस या क्षेत्रात स्वतंत्रपणे काम करत आहेत. फडणिसांशी बोलताना जाणवलं की, व्यंगचित्रकला आणि व्यंगचित्रकार यांच्याबद्दलच्या अनेक बारीक-सारीक प्रश्नांचा, समज-गैरसमजांचा त्यांनी अतिशय हळुवार, तरीही रोकठोक विचार केला आहे. कलानिर्मिती आणि व्यावसायिकता या दोन्हींची प्रामाणिक सांगड घालून आज यशस्वी झालेल्या फडणिसांचे विचार म्हणूनच कलाक्षेत्रातल्या सर्वांनाच मार्गदर्शक आहेत.

हसऱ्या गॅलरीचं पहिलं प्रदर्शन ६५ साली मुंबईच्या जहांगीर आर्ट गॅलरीत भरलं होतं. त्यानंतर सतरा वर्षांनी पुन्हा एकदा पुण्याच्या बालगंधर्व रंगमंदिरात हे प्रदर्शन २१ मे पासून भरवलं जात आहे.

त्यानिमित्तानं या लोकप्रिय मराठी व्यंगचित्रकाराची शब्दबद्ध केलेली जडण–घडण . . . .





**: आता पहिलाच प्रश्न म्हणजे तुम्ही मूळचे कुठले? तुमचं शिक्षण वगैरे कुठं झालं?**

माझं गाव म्हणजे बेळगाव जिल्ह्यातलं भोजगाव; पण माझं शिक्षण झालं कोल्हापूरला. मॅट्रिकपर्यंतच्या शिक्षणासाठी मी कोल्हापूरला गेलो. शाळेत असतानाच मी चित्रकलेच्या परीक्षांना वगैरे बसलो होतो आणि मला बक्षिसंही मिळायची.

**: म्हणजे चित्रकलेची आणि तुमची ओळख शाळेपासूनची आहे...**

: हो. माझ्या बाकीच्या भावांनी जनरल एज्युकेशन घेतलं होतं; पण मी मात्र मॅट्रिकला जाण्यापूर्वीच ठरवलं की, आपण नेहमीचा अभ्यासक्रम घ्यायचा नाही. आपण जे. जे. मधे जायचं. त्या वेळी जे. जे. स्कूल ऑफ आर्टसला एक मोठंच ग्लॅमर होतं. भारतातली सगळयात मोठी जुनी संस्था. तेव्हा तिथे जायचं हे नक्की ठरवलं. तिथं कोणते अभ्यासक्रम आहेत हे सुद्धा मला माहीत नव्हतं. फक्त चित्रकला शिकायला मिळेल एवढंच माहीत होतं. माझा जे. जे. ला जायचा हट्ट माझ्या काकांनी पुरवला. कारण वडील लहानपणीच गेले होते.

**: तुमच्या घरच्या लोकांना, विशेषतः काकांना तुम्ही चित्रं काढता ते माहीत होतं का?**

: साधारण माहीत होतं; पण त्यांनी जे. जे. ला पाठवलं ते अशा भावनेतून की, पूर्वीच्या काळी एकत्र कुटुंबात एकमेकांच्या शिक्षणाविषयी आस्थेनं जबाबदारी घेतली जात असे. त्याला मुंबईला शिकायला जायचं आहे ना, जाऊ दे असं म्हणूनच काकांनी मला मुंबईला पाठवलं. तेव्हा सध्याचे सुप्रसिद्ध गायक सुधीर फडके यांचे भाऊ लक्ष्मण फडके यांनी मार्गदर्शन केलं. त्यांनी जे. जे. चा कोर्स पूर्ण केला होता. ते म्हणाले, 'तू कमर्शिअल आर्टला जा, म्हणजे उपजीविकेचं साधन शोधायला नको आणि क्रिएटिव्हिटीचं समाधानही मिळेल!' तेव्हा अप्लाईड आर्ट हा प्रकारच नव्हता!


**: शाळेत असतानाच तुम्हाला चित्रकलेसाठी बक्षिसं वगैरे मिळत होती. तेव्हाही तुम्ही व्यंगचित्रंच काढत होता का?**

: नाही. तेव्हा लँडस्केप काढत होतो. लँडस्केप काढायलाच मला आवडत होतं. कोल्हापूर परिसरातल्या अनेक लोकांना तेव्हा चित्रं काढण्यासाठी बाहेर हिंडायला जाण्याचा शौक होता. चंद्रकांत मांढरे वगैरेंसारखे लोक हमखास बाहेर पडायचे. तेव्हा लँडस्केप हा माझा आवडीचा भाग होता.

**: तुम्ही शाळेत असतानाच ठरवलंत की, आपण चित्रकला शिकायला जायचं. चित्रकला–स्पर्धांतही तुम्ही भाग घेत होतात. आपण पेंटिंगमधेच पुढं शिकायचं हेही तुम्हीच ठरवलंत. तर तेव्हा घरात असं अनुकूल वातावरण होतं का?**

: हे वातावरण जाणीवपूर्वक होतं असं म्हणता येणार नाही. कुटुंबातील घटकांच्या शिक्षणाची आस्थेवाईकपणे तरतूद करायला हवी किंवा तशी आस्था बाळगायला हवी या भूमिकेतून मला काकांनी शिकवलं. माझ्या वडलांचं, काकांचं आयुष्य शेतीत गेलं. शहरी जीवनातले शिक्षणक्रम त्यांना माहीत नव्हते. तुला या बाजूला जायचं आहे ना? जा, अशा प्रेमाखातरच त्यांनी मला परवानगी दिली.

**: किती साली तुम्ही आर्टस्कूलला गेलात? तेव्हा व्यंगचित्रं तुमच्या बघण्यात येत होती का?**



लँडस्केपची ओढ पुढे व्यंगचित्रात अशी दिसली.

¤

: ४४–४५ साली मी कॉलेजमध्ये गेलो. त्या वेळी राहण्याची काहीही सोय नव्हती. माझा थोरला भाऊ मुंबईत होता. त्याच्या contact मधून राहण्याची वगैरे सोय झाली. कॉलेज चालू असताना अनेक लोकांना जे काही छंद असतात, त्यातला माझा छंद म्हणजे बाहेर स्केचिंगसाठी जायचं. त्या काळातसुद्धा आम्ही चौपाटीवर स्केचिंगसाठी जायचो; पण ती सगळी चित्रं वास्तवशैलीतच असायची. अधूनमधून व्यंगचित्रं त्या वेळी माझ्या पहाण्यात येत होती.

म्हणजे त्या वेळची इंग्रजी साप्ताहिकं Saturday Evening Post वगैरेतून व्यंगचित्रं पहाण्यात यायची. आपणही काही तरी करून पहावं या कुतूहलापोटी मी व्यंगचित्र काढायला बघत होतो.

**: तुमचं पहिलं व्यंगचित्र कुठं आणि कसं प्रसिद्ध झालं ?**

: १९४६ साली माझं पहिलं व्यंगचित्र 'मनोहर' मध्ये प्रसिद्ध झालं. नंतर मनोहरमध्ये माझा परिचय छापून आला, त्या वेळी त्यांनी मुद्दाम ते व्यंगचित्रं छापलं होतं. 'सध्याचे मुंबइतले बिऱ्हाड' असा काही तरी विषय होता. मुंबईच्या जागेच्या टंचाईत एकाच रूममध्ये सबंध संसार मांडलेल्या घरात एक नवीन बिऱ्हाड सहकुटुंब सहपरिवार रहायला आलं आहे असं मी चित्र काढलं होतं. तेव्हा माझं शिक्षण चालू होतं. मी पहिल्या-दुसऱ्या बर्षाला असेन. एक चित्र छापून आल्यावर माझी हौस वाढीला लागली. सुरुवातीला वसंत, मग हंस, उद्यम वगैरे मासिकांसाठी मी चित्रं द्यायला लागलो. उद्यम हे फक्त उद्योगधंद्यांसाठी वाहिलेलं नागपूरचं जुनं मासिक होतं; पण व्यंगचित्रांसाठी त्यात विशेष जागा राखून ठेवलेली असे. लचक्यांची फार जुनी चित्रं उद्यममध्ये आहेत.

**: तुम्ही तुमचा बराच प्रवास 'हंस' बरोबर केला आहे. या प्रवासाची सुरुवात कशी झाली ?**


: १९४७ च्या सुमाराला आंतरकरांनी व्यंगचित्रस्पर्धा जाहीर केली होती. विद्यार्थीदशेत स्पर्धा म्हटलं की, आपण धावतो तसंच मीही त्या स्पर्धेसाठी चित्रं पाठवली. तोपर्यंत हंस मासिक काय आहे, कुठून निघतं वगैरे मला काही माहिती नव्हती. त्या स्पर्धेत मला दुसरं पारितोषिक मिळालं. त्यानंतर आंतरकरांचं उत्साहवर्धक एक पत्रही मला आलं होतं. त्या वेळी मला प्रथम वाटलं की, व्यंगचित्रकलेचा एखादा धागा, रंग आपल्याजवळही असेल की काय ? कॉलेजमध्ये असताना 'वीकएंड टिट्लिटस्' नावाचं एक साप्ताहिक होतं. त्यात मी नियमित व्यंगचित्रं काढत होतो. एक छोटीशी पार्टटाइम नोक-रीही करत होतो. दरम्यान आंतरकरांची संपादकीय चिकाटीनं सारखी पत्रंही येत होती की, तुम्ही चित्र काढा, चित्र काढा; पण करियर म्हणून व्यंगचित्रकला माझ्या अजिबात डोक्यात नव्हती. मी माझा चार वर्षांचा अभ्यासक्रम पूर्ण केला आणि कोल्हापूरला आलो.

**: व्यवसाय म्हणून व्यंगचित्रकलेकडे तुमचं अजिबात लक्ष गेलं नव्हतं. मग पुढं काय करायचं तेव्हा तुम्ही ठरवलं होतंत ?**

: जो अभ्यासक्रम मी पूर्ण केला होता त्याला सोईची अशी सुस्थिर नोकरी म्हणून ॲडव्हरटायझिंग एजन्सी माझ्या डोळ्यांसमोर होती. अजूनही ॲड. एजन्सी हाच अधिक सुस्थिर व्यवसाय आहे. मला त्या वेळी वाटत होतं की, व्यंगचित्रांना स्कोप किती, त्यातून मिळणार ते काय ? ज्या वेळी व्यंगचित्र काढावीशी वाटतील त्या वेळी स्वतःच्या आवडीसाठी काढायची असं मी ठरवलं होतं. माझ्याबरोबरचे कित्येक लोक आज आर्ट-डिरेक्टर वगैरे आहेत किंवा काहींची स्वतःची एजन्सी आहे. मलाही असंच वाटत होतं की, आपण फिगर-आर्टिस्ट, व्हिजुअलायझर वगैरे व्हावं. कारण त्यांना मिळणारा स्कोप, त्यांचे पगार मी जवळून पाहिले आहेत.

**: तुम्ही या वातावरणातून मग व्यंगचित्रांकडे कसे वळलात ?**

: आंतरकरांनी यासाठी मला सतत प्रोत्साहन दिलं. त्यांची सतत





निरोगी डोळ्यासाठी
'अ' जीवनसत्वाची
गरज असते.
टी.व्ही. वरच्या
निरोगी चित्र प्रतिमेसाठी
टॉनिकची गरज असते...
'सुचित्रा' बूस्टर म्हणजे
टी.व्ही. वरच्या
स्वच्छ चित्रासाठी
अप्रतिम टॉनिक...
अेकदाच वापरा
टी.व्ही. च्या चित्रप्रतिमेची
तब्येत कशी
ठणठणीत सुधारते पहा!

सुचित्रा
बूस्टर

'सुचित्रा' बूस्टर
चित्रामधला फरक पहा तर!

NAKHI ENTERPRISES
FROM THE
MAKERS OF
Volt guard
FAMOUS FOR DECADE




‘ ज्या चित्रात
कल्पना चमकदार असते
ते चित्र चांगलं ’
असं माझं स्पष्ट मत आहे. ’

—फडणीस

पत्रं येत की, तुमची चित्रं मला हवी आहेत. तुम्ही हे सोडू नका! तुमचं एखादं चित्र कव्हरवरसुद्धा घेण्याची माझी कल्पना आहे. तुम्ही एखादं चित्र कव्हरसाठी म्हणून काढा! आंतरकरांच्यासाठी म्हणून मी प्रयोगादाखल दोन–तीन चित्रं काढली. मी दोन रंगात काढलं; पण त्यांनी ते चित्र तीन रंगात छापलं. पहिलं कव्हर मी ५१ साली केलं. दुसरं कव्हर ५२ साली केलं. त्यात खूपच फरक पडलेला दिसला. त्या अंकाच्या रिव्ह्यूमध्ये त्या चित्राचा उल्लेख केला गेला. वाचकांची तशी पत्रंही आली. सकाळमध्ये आलेल्या review मध्ये माझ्या मुखपृष्ठाच्या चित्राचा ब्लॉक करून छापला होता. मला तेव्हा डिप्रेशन आलं होतं आणि कोणी तरी मी बेडवर असतानाच पेपर फडफडत आणला की, तुमचं चित्र पेपरमध्ये आलंय म्हणून! ते सगळंच फार उत्साहजनक होतं. तेव्हा माध्यम म्हणून व्यंगचित्रकला माझ्या डोक्यात शिरली. मुखपृष्ठांची सुरुवात अशी झाली; पण त्याचं श्रेय आंतरकरांना आहे. आंतरकरांना मी मोठा संपादक मानतो. कारण ज्या काळात मला माझ्या करिअरचा कोणताही प्रकाश माहीत नव्हता त्या काळात त्यांनी माझ्यातले गुण ओळखून मला प्रोत्साहन दिलं. एकदा मान्यता मिळाल्यावर कोणत्याही प्रकाशकाला ते जाणवेल; पण मी जेव्हा कोणीही नव्हतो तेव्हा त्यांना जाणवलं होतं की, याच्यात काही तरी आहे.

: तुमच्या करिअरमधील महत्त्वाचा टप्पा म्हणजे ‘ हसऱ्या गॅलरीचं प्रदर्शन. ’ ही कल्पना कशी सुचली ?

: ही कल्पना माझी नाहीच. आमचे एक रसिक मित्र आणि ग्राहक आहेत—रत्नाकर आजगेकर त्यांचं नाव—त्यांनी प्रथम ही प्रदर्शनाची कल्पना माझ्या मनात भरवली. मी माझी चित्रं फार जवळून पाहिल्यामुळं आणि बहुतेक चित्रं आधी प्रसिद्ध झालेली असल्यामुळं मला तरी त्या चित्रात प्रदर्शनाच्या दृष्टीनं काही विशेष वाटलं नाही; पण आजगेकरांना काय वाटलं कुणास ठाऊक? ते म्हणाले, ‘ जरी चित्रं प्रसिद्ध झालेली असली तरी ती पुन्हा बघण्यात एक आनंद असतो. तुम्ही काढून तर ठेवा!’ मी माझ्या नेह-

*With Best Compliments*

*From*

# The All India Federation of Cooperative Spinning Mills Ltd.,

14, Murzban Road, 2nd Floor,
BOMBAY - 400 001

**Shri D. R. Patil**
President

**Shri V. G. Puranik**
Managing Director

मोच्या पद्धतीनं म्हटलं की, 'बघू या तर! करून तरी पाह्यला काही हरकत नाही?' थोडक्यात सांगायचं म्हणजे प्रत्येक वेळी मला कोणी तरी तयार करायला लागतं!'

**: हे पहिलं प्रदर्शन किती साली लावलं होतं? प्रवेशमूल्य ठेवून की फुकटच?**

: प्रदर्शन भरवलं ते ६५ साली. जहांगीर आर्ट गॅलरीमध्ये. फक्त तीन दिवस. प्रवेशमूल्य ठेवावं की नाही असा विचार करत होतो. कारण फुकट ठेवलं तरी माणसं यायची मारामार तर प्रवेशमूल्य ठेवल्यावर आनंदच! पण मी विचार केला की, मी कोणत्या तरी स्वरूपात काही तरी आनंद तुम्हाला देतोय, मग त्याचं मूल्य का नको? म्हणून त्या वेळच्या सरकारी नियमाप्रमाणे अगदी माफक दहा पैसे तिकीट ठेवलं होतं आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे तीन दिवसांतलं reading सांगायचं तर दहा हजार तिकिटं फाडली! तिकिटं संपली म्हणून शेवटी काउंटरफाइल्स फाडाव्या लागल्या. त्या वेळी परीक्षणं वगैरे खूप छापून आली. तो प्रतिसाद खरं सांगायचं तर मला अनपेक्षितच होता.

**: त्या वेळी तुमचं नाव लोकांना माहीत झालं असलं पाहिजे?**

: हो चांगलंच!

**: या प्रदर्शनानं तुम्हाला काय दिलं?**

: आत्तापर्यंत माझी चित्रं बघण्यात लोकांना खरोखरच आनंद मिळतो की नाही हे कळायला मला मार्गच नव्हता. नेहमीची छापून आलेली चित्रं आणि प्रदर्शनातली चित्रं यातही खूप फरक असतो. प्रदर्शनाच्या निमित्तानं मला प्रथमच साक्षात रसिकांच्या सान्निध्यात जाऊन त्यांना झालेला आनंद पाह्यला मिळाला. नाही तर आम्ही खरे पडद्यामागचेच! क्वचित कुठे तरी कधी तरी पडद्यावर येणार! एवढंच कळणार की, कोणत्या तरी गावी कोणत्या तरी रसिकांनी चित्रं पाहिली आणि दुसरी गोष्ट या प्रदर्शनात एक वेगळाच रसिक प्रेक्षकवर्ग मिळतो. त्यांच्यात सुशिक्षित, साक्षेपी, संपादक–वाचकवर्ग असणार नाही; पण हा वर्ग वेगळाच असतो. ज्याला खऱ्या अर्थानं 'जनता' म्हणतात त्यांना 'मोहिनी'ही माहीत नसतं, हंसही माहीत नसतं आणि फडणीसही माहीत नसतात. ते आपले सहज कोणाबरोबर तरी आलेले असतात आणि म्हणतात, 'अरेच्या! ही गंमत बरी दिसतेय!' समाजाचा हा एक क्रॉससेक्शन वेगळाच असतो.

**: आता मला विचारायचं आहे ते नावाबद्दल. 'हसरी गॅलरी' हे नावच फार आकर्षक आहे. हे नाव तुम्हाला कसं सुचलं?**

: हे नाव सुचवलं बाळ गाडगिळांनी. आमच्या तरुण रसिक लेखक–वाचकांच्या ग्रुपमधले गाडगीळ एक होते. त्यांना मी कोणत्या तरी कारणानं माझ्या चित्रांचा संग्रह बघायला दिला होता. ह्या अभिप्रायात त्यांनी त्याचा उल्लेख laughing galary म्हणून केला होता. मग पुण्याच्या प्रदर्शनाच्या वेळी मी त्याचं बारसं करून टाकलं–हसरी गॅलरी!

**: मुंबईच्या प्रदर्शनाच्या वेळी तुम्ही त्याला काही नाव दिलं नव्हतं?**

: नाही. तेव्हा फक्त humorsus paintings असं म्हटलं होतं.

**: जेव्हा हसऱ्या गॅलरीचं पहिलं प्रदर्शन तुम्ही ६५ साली मुंबईला प्रथम लावलंत तेव्हा तुम्ही किती वर्षांचे होतात?**

: माझा २५ सालचा जन्म. म्हणजे मी एकोणचाळीस वर्षांचा होतो.

**: म्हणजे तुमचं कॉलेजचं शिक्षण संपलं तेव्हापासून जवळजवळ १६ वर्षं मध्ये गेली.**

: त्यातली पहिली दोन वर्षं–एक मुंबईत नोकरी आणि प्रत्यक्ष कामात गेलं आणि एक वर्ष कोल्हापुरात अस्थिर मनोवृत्तीत गेलं.

**: नाही, मला विचारायचं आहे की, तुमचं शिक्षण चालू असतानाच तुम्हाला व्यंगचित्रं काढता येतात हे तुमच्या लक्षात आलं होतं. तुमची चित्रं लोकांना आवडतही होती आणि आतासुद्धा नवीन चित्रकारात थोडा संग्रह जमला की, प्रदर्शनं भरवण्याची आवड असते. मग तुम्ही एवढी सोळा वर्षं का थांबलात?**

: आजगावकरांनी जर मला विचारलं नसतं तर मी कदाचित अजूनही थांबलो असतो. कारण माझं असंच आहे की, दुसऱ्यांनी मला भरीला घालायचं आणि मगच माझं पाऊल पुढं सरकायचं. माझ्यासमोर जे चित्र येईल ते मात्र मी प्रामाणिकपणे फक्त स्वत:चाच विचार करून मला जसं काढायचं आहे तसंच काढतो. बाकी Presentation च्या बाबतीत दर वेळी असंच झालं आहे की, दुसऱ्यांनीच पुढं येऊन माझा आत्मविश्वास वाढवला आहे.

**: एखाद्या निर्मितिक्षम कलाकाराला (creative artist) आपल्या कलानिर्मितीबद्दल जो आत्मविश्वास असावा लागतो की, माझी**


*With Best Compliments From :*

**Bharat Varnish Manufacturing Company**

Lal Bahadur Shastri Marg, Ghatkopar,
Bombay–400 086

चित्रं लोकांसमोर ठेवून मला पसंतीची दाद घ्यायची आहे. तो आत्मविश्वास तुमच्यात आज आहे का? की आता दुसऱ्या गॅलरीच्या प्रदर्शनाच्या वेळीही तुम्हाला कोणी तरी भरीला घालायला लागलं?

: नाही. आता नाही तसं वाटत आणि तसा आत्मविश्वास मला ५२ पासून होता. दुसरी गोष्ट, पसंतीची दाद माझ्या कल्हसंना आपोआप मिळत गेली; पण त्या चित्रांचं पेंटिंग आणि त्याचं exibition ही कल्पनाच त्या काळात एवढी नवीन होती! लॅंडस्केपसची प्रदर्शनं भरत; पण व्यंगचित्रांचं प्रदर्शन ही कल्पना तेव्हाच्या form मध्ये बसतच नव्हती. परत ही एकदा प्रसिद्ध झालेली चित्रं होती. त्यामुळं प्रदर्शनाच्या बाबतीत मला इतरांनी भरीला घातलं.

: तुमच्यात तो आत्मविश्वास नाही असं मला म्हणायचं नाही; पण लोकांसमोर एकदम प्रकाशझोतात यावं असं तुम्हाला कधी वाटलं नाही का?

: नाही. तशी माझी वृत्तीच नाही. प्रसिद्धीसाठी म्हणून मी कोणत्याच तडजोडी किंवा खटपटी केल्या नाहीत. उलट फार प्रकाशात मला uncomfortable, गुदमरल्यासारखं वाटतं. दुसरं म्हणजे प्रेझेंटेशन करायचं ते पब्लिसिटीसाठी अशी माझी पहिल्यापासूनच वृत्ती नव्हती. हवी होती ती प्रसिद्धी आपोआप मिळत होती आणि चांगल्या कामाला हवी ती मान्यता मिळतेच अशी माझी स्वतःची धारणा आहे!

*With Best Compliments From :*

**CLIMATE ENGINEERS**

**Sales and Services in**
**Air-Conditioning and refrigeration**
33/41, Karve Road
Opp. Garware College
Pune–411 004
*
Phone : 50877

: आता थोडं तुमच्या स्टाइलबद्दल. तुमची व्यंगचित्रं काढायची शैली पटकन उचलता येईल अशी नाही. त्याच्यात एक मूळची प्रसन्नता किंवा गोडवा आहे. ही तुमची style कशी बनत गेली?

: प्रामाणिकपणे आपल्याला जे वाटतं तेच काढायचं. दुसऱ्याचं काहीही न बघता किंवा प्रभाव पडू न देता आपल्याला हवं तेच काढायचं, हे मी पहिल्यापासूनच ठरवलं होतं. हे जर पक्कं ठरवलं तर individuality, शैली आपोआपच येते. कोणासारखं तरी करण्याचा पहिल्यापासून प्रयत्न केला तर माझी शैली निर्माण झाली नसती!

: तुमची चित्रं आता खाली तुमची सही नसली तरी आम्ही ओळखू शकू एवढी तुमची शैली पक्की झाली आहे. ही होण्यासाठी एक २०। २५ वर्षं गेली: तरीही तुमच्या जुन्या आणि आताच्या चित्रात एक समान धागा दिसतो. ती जी लिंक आहे ती तुम्ही प्रयत्नपूर्वक कायम ठेवलीत का?

: नाही. तसा प्रयत्न मी केला नाही आणि तसा करताही येत नाही. शैलीमध्ये बदल मात्र होत गेले. उदाहरणार्थ पूर्वीची चित्रं weak, गुळगुळीत वाटतात. त्या मानानं अलीकडची चित्रं विषयानुरूप स्ट्रेटलाइनमध्ये बोल्ड पद्धतीनं पूर्ण केली आहेत. जसं आपण काम करत जातो तसा boldness आपोआपच येत जातो. म्हणजे हे चित्र, कल्पना-ग्राहकांना, प्रकाशकांना आवडेल की नाही, त्याच्यात गोडपणा, गुळगुळीतपणा पाहिजे हे दडपण कमी होत जातं आणि प्रकाशकांमध्येही हा विश्वास निर्माण होतो की, हे काम तुमच्यावर सोपवायचं आहे. आम्हाला रफ चित्रं वगैरे काही पहायचं नाही. त्यामुळं माझ्यातला मी आता पहिल्यापेक्षा खूप मोकळा झालो आहे. मी, मला आवडेल त्याप्रमाणे चित्राला आकार द्यायचा आणि चित्र पूर्ण करून टाकायचं. त्याच्यात कोणतेही बदल आता करता येणार नाहीत.

: आता हा तुमचा खास कलाकाराचा ego झाला...

: हो; पण तो मिळवण्यासाठी मला बराच अवधी, श्रम खर्ची घालायला लागले. प्रामाणिकपणे आपल्याला दिलेलं काम करायचं. यातूनच हा विश्वास तयार होतो की, फडणिसांना दिलेलं चित्र फडणीस जबाबदारीनं करतील. आपण त्यांच्यावर सोपवलंय याचा ते गैरफायदा घेणार नाहीत.

तुमच्या Style बद्दलचा पुढचा प्रश्न म्हणजे तुमच्या एकूण चित्रात जो गोडवा, फ्रेशनेस आहे. कुठेही हार्श लाईन नाही. व्यंगचित्रांच्या क्षेत्रातलं तुमचं हे contribution मान्य करावंच लागेल. कुठेही विसंवादी सूर नाही. चित्रात एक नितळपणा आहे.

म्हणूनच मी काही चित्रात रमत नाही. मला काही लोक विचारतात की, तुम्ही राजकीय टीकाचित्रं का काढत नाही?

: मी तुम्हाला तोच प्रश्न विचारणार होते.

: दोन कारणांसाठी मी राजकीय टीकाचित्रं काढत नाही. एक तर माझा तो जात्या पिंड नाही. राजकारणात किंवा राजकारणावरची टीका समजून घेण्यात मला जरूर रस आहे, एक नागरिक म्हणून; पण राजकारणातलं जे वातावरण आहे त्यात कलाकृती निर्माण करण्यासाठी विशेष स्कोप नाही. त्यात मारामाऱ्या विसंगती आहेत; पण त्या चटकन कालबाह्य होतात. दुसरं म्हणजे राजकारण

राइटबद्दल बोललो, तेव्हा त्यांना ही कल्पना नवीन वाटली. ते म्हणाले, म्हणजे आता दरवेळी तुमचं चित्र छापताना आम्हाला तुमची परवानगी घ्यावी लागणार किंवा दरवेळी पेमेंट करावं लागणार. मी या हक्कासाठी विशेष प्रयत्न केला. कारण काही धंदेवाईक प्रकाशकांची अशी वृत्ती होती की,एकदा प्रसिद्ध झालेल्या चित्रांचे ब्लॉक कसे तरी मिळवून अतिशय हीन अभिरुचीनं आपल्या अंकात छापायचे. तेव्हा मी विचार केला की, माझी कलाकृती कुठे प्रसिद्ध व्हावी याचा निर्णय घेण्याचा मला हक्क आहे. म्हणून चौकशी करता कॉपी-राइट मुळात आहेच, फक्त त्याचा उपयोग केला जात नाही, हे माझ्या लक्षात आलं आणि मी तो हक्क घालून घेतला !

**: आज व्यंगचित्रांमध्ये अश्लीलतेची आणि भडकपणाची एक नवी लाट यायला लागली आहे. त्याबद्दल तुमचं काय म्हणणं आहे ?**

: खपासाठी म्हणून शृंगाराचा भडक वापर मी कधी केला नाही. अशा तऱ्हेनं एखाद्या गोष्टीचं exploitation करण्याच्या मी पूर्ण विरोधी आहे. माझ्याकडे अशा चित्रांची मागणी असूनही मी कधी त्या मोहाला बळी पडलो नाही. ज्यात चित्रकाराच्या कल्पनेची चमक आहे ते चांगलं चित्र असं माझं स्वच्छ मत आहे आणि सध्याची अश्लील व्यंगचित्रं ही मला एक विकृतीच वाटते.

**: स्वतःचा स्वतंत्र स्टुडिओ काढायचा, असं तुम्ही कधी ठरवलंत?**

: अमुक अशी वेळ सांगता येणार नाही; पण मुळातच प्रत्येक व्यक्तीला स्वतंत्रपणे काम करायलाच आवडतं. मी हा निर्णय घेतला कारण परिस्थिती आणि आवड. मला स्वतःला आठ तास नोकरी करायला आवडत नाही. मला स्कोप फक्त मुंबईत आणि शिकत असताना मुंबईचं जीवन जवळून पाहिल्यामुळं माझं नोकरीबद्दलचं मत अगदी प्रतिकूल झालं. की काय म्हणून आपण एवढी किंमत द्यायची ? पुढे संधीही तशी मिळत गेली; पण अगतिकपणे नोकरीच करायला लागली असती तर नाइलाज होता.

**: व्यंगचित्रकलेसाठी अभ्यासक्रमातच विशेष स्थान ठेवायला पाहिजे असं तुम्हाला वाटत नाही का ?**

: आज तरी असा कोणताही अधिकृत विशेष अभ्यासक्रम या क्षेत्रात नाही. परदेशात व्यंगचित्रांची शंभर-दीडशे वर्षांची परंपरा आहे तर आपल्याकडे जेमतेम ३०–४० वर्षांची आपल्याकडे व्यंगचित्र रुजायला थोडा वेळ जायला पाहिजे. एक वेळ अशी येईल की, या कलेलाही शिक्षणक्रमात स्थान मिळेल. चांगल्या व्यंगचित्रांची सखोल समीक्षा व्हायला पाहिजेत. आज तरी अशी कोणतीही समीक्षा होत नाही.

**: तुम्ही कधी समीक्षात्मक लिहिण्याचा प्रयत्न केला आहे का ?**

: नाही. अगदी क्वचित एखाद्या मित्राच्या पुस्तकावर किंवा प्रदर्शनाच्या निमित्तानं थोडं फार लिहिलं-बोललो आहे तेच.

**: तुम्ही आता जवळजवळ १७ वर्षांनी हसऱ्या गॅलरीचे प्रदर्शन ठेवत आहात. सुरवातीच्या काळात तुमची चित्रं नवीन असल्यामुळे कोणत्याही गोष्टीचे जास्त कौतुक झालं असेल. आजच्या प्रेक्षकांनी वेगवेगळ्या चित्रकारांची बरीच व्यंगचित्रं पाहिलेली आहेत. तर आता या स्पर्धेत टिकून रहाण्यासाठी तुम्ही तुमच्या शैलीत काही**


*With Best Compliments From :*

**SHREEPAD INDUSTRIES**

**Mfrs of Kamaun Brand**
**Magnetic and Engineering Tools**

*Add* : Parvati Industrial Estate
Pune 411 009 (INDIA)
Ph. No. (0212) 441765



With Best Compliments from :

**NANAP & CO.**

**Mfg. of Transformers**

*Works* : 5 Electronic Co-op. Estate
Satara Road, Pune - 9
*Office* : 414 Narayan Peth, Pune - 30
*Phone* : Works – 32896 Office – 440711

बदल केलेत का ?

: हो. काही कल्पना नवीन आहेत; पण त्या नवीन प्रेक्षकांसाठी म्हणून बदललेल्या नाहीत. माझ्या काही गंभीर कल्पना मी आजपर्यंत प्रदर्शनात मांडल्या नव्हत्या. या प्रदर्शनात मी त्या चित्रांचा स्वतंत्र विभाग ठेवणार आहे. शैलीमध्ये radical बदल करताच येत नाही. कलाकारातला 'मी' सतत नवनवीन प्रयोग करतच असतो. ती त्याची स्वाभाविक ओढ असते. माझी ५२ सालची चित्रंही मला अजून तितकीच फ्रेश वाटतात. त्यामुळं प्रेक्षकांसाठी म्हणून चित्रात बदल करण्याचा कधीच प्रश्न आला नाही.

**: तुमच्या कलेची मर्यादा ओलांडण्यासाठी म्हणून कार्टून फिल्म्स किंवा जाहिरातींकडे वळावं असं तुम्हाला कधी वाटलं नाही का ?**

: असं पूर्वी वाटायचं. डिस्नेच्या सुंदर फिल्मस् पाहून आपणही अशा फिल्म्स काढाव्यात असं फार वाटायचं; पण लहानपणी स्वप्न रंगवणं वेगळं आणि मोठेपणी त्या वास्तवात उतरणं वेगळं. आज मला माहीत आहे की, त्याच्या पाठीमागे किती कष्ट, संघटन आणि आर्थिक बळ आहे. हे आपल्या कक्षेत नाही हे यावरून सहज लक्षात येतं. हे अशक्य नाही; पण त्यासाठी लागणारा धीर माझ्यांकडे नाही. हे प्रयोग करण्यासाठी वेळ, कष्ट, पैसा यांची किंमत द्यायची तयारी पाहिजे. आज ती किंमत देण्याची ताकद माझ्यात नाही.

**: कलाकार आणि त्यांचे आर्थिक व्यवहार याबद्दल लोकांचे अनेक गैरसमज असतात...**

: हो. चित्रकार किंवा कलाकाराची म्हणून एक इमेज लोकांनी तयार केलेली असते की, तो स्वतंत्र, gifted असतो, गबाळा असतो आणि भोंगळ असतो. कलाकार कधी पैशाकडे बघतच नाही. तो फक्त कलानंदासाठी निर्मिती करतो. ही सगळी illusions आपल्या समाजाने तयार केली आहेत. खरं तर व्यवहाराच्याबाबत कलाकाराने अतिशय चोख असायला पाहिजे निर्मितीचा आनंद हा खास त्याचा, पूर्णपणे व्यक्तिगत असतो. ते चित्र पूर्ण होऊन वापरायला दिलं की, पूर्णपणे व्यवहाराचा भाग सुरू होतो. त्यात आपण स्पष्ट पाहिजे.

**: त्याबद्दलचे काही अनुभव ?**

: असे खूप अनुभव आहेत. 'अहो हे असंच असतं' हे मी कधी गृहीत धरलं नाही. माझ्या कलाकृतीबद्दल मला कोणी इतर ग्राहकांची उदाहरणं देऊ नयेत. त्याबद्दल माझा स्वतःचा एक स्टँड आहे आणि त्यासाठी I will face the consequences मी असं अनुभवातून सांगतो की, प्रामाणिकपणे केलेल्या कोणत्याही गोष्टीला मरण नसतं. सुरुवातीला मला वाटायचं माझ्या या व्यावहारिक अटी कोण पाळणार को एवढे पैसे, येवढा अॅडव्हान्स पाहिजे; पण अटी पाळल्या गेल्या, सवलतीसुद्धा मिळत गेल्या. काही जण म्हणतात, मागच्या कव्हरसारखं हे चित्र व्हायला पाहिजे. मी सांगतो गुणवत्तेच्या दृष्टीनं मी हमी देऊ शकत नाही. हमी एकच, मनापासून प्रयत्न करण्याची. मग ते चित्र मास्टरपीस ठरेल किंवा अगदी सामान्य सुद्धा होईल !

**: प्रकाशकांचा व्यंगचित्रांकडे बघण्याचा दृष्टिकोन काय असतो ?**


## दि ठाणे जनता सहकारी बँक लि.

( स्थापना : ५-२-१९७२ )

**" दीनदयाळभवन ", जांभळी नाका, ठाणे-४०१ ६०१**

**बचत ठेवीदारांची अधिक सुविधा**
**नौपाडा शाखेतील बचत व ठेव खाते विभाग**
**सम्राट अपार्टमेंटमधील प्रशस्त जागेत हलविण्यात आले आहेत.**

**शाखा विस्तार**

**नौपाडा शाखा**-संजीवनी, गोखले पथ, नौपाडा, ठाणे-४०० ६०२
**मुख्य शाखा**-दीनदयाळभवन, जांभळी नाका, ठाणे-४०० ६०१
**औद्योगिक परिसर शाखा**-टी. एम्. ए. हाउस, वागळे इस्टेट, ठाणे-४०० ६०४

| | | |
|---|---|---|
| **भ. कृ. पटवर्धन** | **वि. कृ. केळकर** | **स. वा. आगाशे** |
| अध्यक्ष | उपाध्यक्ष | कार्यकारी संचालक |





' व्यंगचित्र हे कोणत्याही तळटीपांशिवाय आणि खुलाश्याशिवाय जावं '–
उजवीकडे छापलेल्या चित्राला CAG चं पहिलं पारितोषिक मिळालं.

¤

**स्वतंत्र चित्र म्हणून त्याला किंमत दिली जाते का ?**

: मजकूर सचित्र करण्यासाठी चित्राची गरज असते असं मला वाटतं. चित्रासाठी मजकूर फार क्वचित वापरला जातो आणि ते तसंच असलं पाहिजे. फक्त माध्यम म्हणून त्या चित्राकडे स्वतंत्रपणे पाहिला पाहिजे.

**: समाजासाठी म्हणून चित्रं देणाऱ्या चित्रकारांची आत्मकेंद्रित वृत्ती मात्र कधी कधी खटकते.**

: कलाकाराची वृत्तीच समाजात मिसळण्याची नाही माझ्यापुरतं सांगायचं तर चार लोकात मला at ease वाटत नाही. चित्रं आणि त्यातल्या कल्पना यात मी जितका रमतो तितका माणसात रमत नाही; पण यामुळेसुद्धा विषयाला मर्यादा येऊ शकते.

**: कोल्हापूरच्या व्यंगचित्रकारांच्या हसऱ्या संमेलनाबद्दल तुमचं काय मत ?**


: संमेलन यशस्वी झालं. पण याहीपेक्षा ते अधिक चांगलं करता आलं असतं. लोकांचा उत्साह प्रचंड होता. त्यामानानं आम्हा चित्रकारांची उपस्थितीच शंभर टक्के नव्हती. अनेक चित्रकारांनी एकमेकांना त्या दिवशी प्रथमच पाहिलं. व्यंगचित्रकारांची म्हणून कोणतीही संघटना अस्तित्वात नसल्यामुळं संयोजकांना सगळ्या चित्रकारांना भेटणं अवघड गेलं; पण अशा तऱ्हेचं हे पहिलंच संमेलन झालं आणि त्याची नोंद घ्यायलाच पाहिजे.

**: मान्यता, पैसा, लोकांचं प्रेम तुम्ही एका मर्यादेपर्यंत खूप मिळवलं आहे. अजून काही मिळवायचं राहिलं असं वाटतं का ?**

: वेगवेगळ्या प्रांतात हसरी गॅलरी नेऊन ठेवावी असं वाटतं. मराठीचे बंध या चित्रांभोवती पडू नयेत असं वाटतं; पण त्याबद्दल मी फार अपेक्षा ठेवू शकत नाही.

**: या क्षेत्रात अजून किती दिवस रहाणार ? की काही बदल करणार ?**

: काही जण म्हणतात आता तुम्ही हे आमच्यावर सोपवा; पण मला ते पटत नाही. रसिकांमध्ये मिसळायला मला आवडतं. माझ्या क्षेत्रात काही बदल होतील, फाटे फुटतील; पण मी हे बाजूला नक्कीच ठेवणार नाही.



# घरं हादरताहेत!

**बाईनं तिला गृहिणीपदापुरतं मर्यादित न करता, त्यापलीकडचा विचार केला, कृती केली की, घरं जर डळमळणार असतील तर मग हा घरबांधणीतलाच दोष नाही का ? घर जर सर्वांना हवं तर मग ते टिकविण्याची जबाबदारीही सर्वांची हवी !**


**विद्या बाळ**


आपण माणस गुहांमधून, झोपडयांमधून, मातीच्या घरांमधून, प्रवास करीत करीत आता सिमेंटच्या मजबूत घरात राहायला लागलो आहोत. बांधणीच्या दृष्टीनं घरं पक्की झाली आणि गाभ्यामधून घरं हादरू लागली. घरांचं बांधकाम मजबूत असूनही घराचं घरपण ढासळायला लागलं अशी आजची अवस्था आहे.

आजवरच्या या माणसाच्या घर-प्रवासात घरबांधणीच्या साधनांमध्ये फरक पडला. घरातल्या सुखसोयींमध्ये भर पडली. घरातल्या राहणीमानाच्या पद्धतीत बदल झाला..

अतिशय फसवं आहे आणि alert आहे हे माझ्या प्रकृतीशी विसंगत आहे की, दररोजचा पेपर वाचा आणि चटकन बारा तासांच्या आत चित्र पुरं करा.

**पण राजकीय टीकाचित्रांना जो जिवंतपणा आहे त्याचं तुम्हाला कधी आकर्षण वाटलं नाही का ?**

: वाटलं ना ! तसं खळबळजनक राजकारण घडत असताना तसं वाटत असे. तशी मी राजकीय टीकाचित्रं माणूस–सोबतमध्ये काढलीही आहेत. क्वचित तरुणभारतमध्येही काढली आहेत; पण नेहमीसाठी म्हणून मी त्या क्षेत्रात रमलो नाही. ज्या वेळी घटनाच अशा थरारक घडतात त्या वेळी मोह होतो की, आपण यावर चित्र काढावं; पण हे क्षेत्र असं आहे की, यात तात्पुरतं डोकावता येत नाही त्यात नेहमीसाठीच गुंतावं लागतं. म्हणून मी वेळोवेळी त्यातून बाजूला राहिलो !

**तुम्ही आतापर्यंत काढलेली मुखपृष्ठ-चित्रं पाहिली की, घरातल्या कौटुंबिक वातावरणातील विसंगतीवर तुमचं लक्ष केन्द्रित झालेलं दिसतं आणि त्यातल्या त्यात बाईला जास्त विनोदी दाखवण्याचा तुम्ही प्रयत्न केलाय...**

: एक तर बायकांच्या विनोदबुद्धीवर माझा विश्वास आहे. कारण बायकांवर एवढी चित्रं काढूनही बायकांची भरपूर गर्दी माझ्या प्रदर्शनाला होते. आपल्यावरचे विनोद त्या accept करतात. दुसरा भाग असा आहे की, कव्हरसाठी म्हणून सुरुवातीला काही compromises (तडजोडी) कराव्या लागल्या आहेत आणि यशस्वी संपादकाला ते अतिशय आवश्यक आहे. अतिशय एकांडेपणाने कोणतीही गोष्ट रुजवता येत नाही. म्हणजे त्या काळात जिकडे तिकडे नट्यांचे आणि बायकांचे फोटो कव्हरवर छापण्याची परंपरा होती त्या वेळी जर तुम्ही एकदम दूर जाऊन abstract painting कडे वळलात तर ते टिकूच शकत नाही. म्हणून आंतरकरांनी माझ्यावर सोपवलं की, कव्हर प्रसन्न असावं, लोकाभिमुख असावं. त्यात तुम्ही वेगवेगळे प्रयत्न करा; पण सावकाश करा. नाही तर तुम्ही आणि मी दोघांनाही एकदम शांत बसावं लागेल ! माझी डेकोरेटिव्ह स्टाइल आहे ती त्यातूनच तयार झाली. मी कल्पना ठरवत गेलो; पण त्याची जी मांडणी केली त्यात शृंगाराचा संयमपूर्वकच वापर केला आणि या चित्रातली स्त्री लोकांनी नटी, हिरॉइनसारखी accept केली की ती फार लांबची वाटली नाही. त्यातली स्त्री-पुरुषांची कॅरेक्टर्स लोकांना हिरो–हिरॉइनसारखी वाटली आणि नंतर मी प्रयोग केला की, कित्येक चित्रात बाईच नाही; पण हे प्रयोग तुम्ही settlement नंतर केलेत.

: हो जेव्हा माझं विनोदी मुखपृष्ठ लोकांच्या मनात रुजलं, रुळलं. इतरांचीही चित्रं येऊ लागली. व्यंगचित्र हा form रुजला आणि हा form सुरक्षित आहे हे जेव्हा लक्षात आलं तेव्हा मी नवीन प्रयोग करायला लागलो.

**या क्षेत्रात आपण settle झालो, स्थिरावलो असं तुम्हाला नेमकं कधी वाटलं ? म्हणजे सुरुवातीला हे क्षेत्र तुमच्या मनातही नव्हतं. मग नंतरचा अस्थिर काळ आणि नंतरचा तुमचा या क्षेत्रातला विशिष्ट स्टँड हे स्थित्यंतर कसं झालं ?**

: जेव्हा मला CAG चं पारितोषिक मिळालं तेव्हा माझ्या लक्षात आलं की, या क्षेत्रात scope आहे. नंतर scope वाढत गेला आणि अगदी अलीकडे Outstanding cover disigner of the year हे पारितोषिक माझ्या चित्राला मिळालं.

**: हे चित्र कोणतं होतं ?**


: तो आणि ती बोटीतून चालले आहेत. तिचा पदर शिडासारखा फडकतो आहे. ती फँटसी आहे आणि रोमँटिक मूड आहे. खो खो हसण्यासारखं ते चित्र नाही. त्या वेळी अनेक पेपरमध्ये त्याबद्दल छापून आलं. त्या वेळी मला स्पष्ट दिसायला लागलं की, या क्षेत्रात भरपूर स्कोप आहे. ५२–५४ चा काळ असेल. त्यानंतरचा दुसरा टप्पा म्हणजे गंभीर विषयावरची चित्रं काढून घेण्यासाठी जेव्हा माझ्याकडे लोक आले आणि मी नेहमीच्या पद्धतीनं बघू या, करून पाहू या असं म्हणून ते स्वीकारलं आणि करून पाहिलं तेव्हा माझ्या लक्षात आलं की, ते फार चांगल्या पद्धतीनं स्वीकारलं जात आहे. पाठ्यपुस्तक-मंडळाकडून गणितासारखा रुक्ष विषय जेव्हा माझ्याकडे सचित्र करण्यासाठी आला, तसंच इंजिनिअरिंगसारखा विषय, बँकिंगचा विषय, 'पॉझिटिव्ह लिव्हिंग' सारखा फिलॉसॉफीवरचा विषय जेव्हा व्यंगचित्रांसाठी माझ्याकडे आला तेव्हा माझ्या लक्षात आलं की, अगदी गंभीर विषयसुद्धा या क्षेत्रात वर्ज्य नाही. या क्षेत्राला मर्यादा आहेत हा माझा समज तेव्हा दूर झाला.

**नवोदित कलाकाराला घडवण्यात संपादकाचा वाटा खूपच असतो. तुम्ही आता आंतरकरांचं उदाहरण त्यासाठी दिलं. चांगल्या संपादकाचे म्हणून काही गुण सांगता येतील का ? की जो कलाकाराच्या**

*With Best Compliments From :*

**PRECISION PRODUCTS**

32 TMV Colony,
Poona 411 037



काही चित्रं काढली ती फक्त स्वत:साठीच.

¤

निर्मितिक्षमतेला घडवत जातो. संपादकाकडून कशी वागणूक मिळायला हवी? तशी मिळते का?

: क्वचित मिळते. कधीकधी प्रकाशक–संपादकांकडून सूचना यायच्या–मुखपृष्ठावर बाई असावी. या या पानावर चित्र असावं म्हणजे फक्त draftsmanship चित्रकाराला करायला लागायची. चित्रकारही काही विचार करत असतो हे अजिबात गृहीत धरलेलं नसायचं. चित्रकार मजकूर वाचत असताना काही जागा चित्रासाठी डोळ्यांसमोर ठेवत असतो. काही वेळा मजकूर जिथे पोचत नाही तिथे चित्र गेलं पाहिजे. कधीकधी चित्रकार त्याच्या चित्रातून एका वेगळ्याच उंचीवर मजकूर नेऊन ठेवतो. यासाठी चित्रकाराला विचाराची शक्ती हवी. म्हणजे शब्दांची नाही. scribbling मधून विचार करण्याची शक्ती पाहिजे. यातून साक्षात्कार होतो असं नाही; पण scribbling मधून विचार करण्याची चित्रकाराची कुवत पाहिजे. ज्याला आपण visual thinking म्हणू म्हणजे दृश्य स्वरूपात विचार. आकृतीमधून मजकुराचा विचार व्हायला पाहिजे. चित्रकाराची ही कुवत असेल तर संपादक–प्रकाशकांनी ती ओळखली पाहिजे. हे ओळखण्याची जाण सगळ्या संपादक–प्रकाशकांमध्ये असतेच असं नाही. या वेळी कलाकृतीतला उत्स्फूर्तपणा कमी होतो.

**: आता एक महत्त्वाचा प्रश्न म्हणजे तुमच्या व्यंगचित्रांच्या निर्मितीची प्रक्रिया नेमकी कशी आहे? किती वेळखाऊ आहे आणि कल्पना मनात नेमकी कधी उतरते?**

: हा प्रश्न खूप गोंधळात टाकणारा आहे. याबद्दल या क्षेत्रातल्या इतरांनी लिहिलेली पुस्तकं मी वाचलेली आहेत. म्हणजे creative thinking बद्दलची किंवा मीसुद्धा जेव्हा माझ्या निर्मितीबद्दल विचार करतो की, मला कल्पना कशी सुचते ते मला सांगता येईल का? तर त्यातला काही भागच सांगता येईल. जागृत अवस्थेतला (conscious) विचार सांगता येईल; पण subconscious पातळीवरचा विचार आणि त्याचं दृश्य स्वरूप नेमकं कसं येतं ते मला सांगता येत नाही. या निर्मितीमध्ये काही तरी शोधण्याची प्रक्रिया आहे. ते मी कसं शोधतो हे जर मला कळलं असतं किंवा कोणालाच कळलं असतं तर त्याचा फॉर्म्युला तयार झाला असता; पण दरवेळी हे शोधताना मला धडपड करावी लागते. I have to struggle it. ती प्रक्रिया नेमकी काय आहे ते मला माहीत नाही; पण या struggle मध्येच आनंद आहे.

**: तुम्ही शेवटचं तयार चित्र एक देता; पण त्याआधी तुम्ही किती चित्रांवर मनात काट मारलेली असते?**

: किती तरी! आता दोन प्रकारचं scribbling होत रहातं. पहिलं पेपरवरचं आणि त्याअगोदर मेंटल स्क्रिबलिंग! मजकूर वाचल्यानंतर अनेक चित्रं डोक्यात येतात. त्यापैकी काही स्थिर होतात, ज्याच्यातून खरोखर काही चांगली कल्पना निर्माण होईल आणि दुसरं महत्त्वाचं म्हणजे दुसऱ्या कोणी तरी वापरलेली कल्पना डोक्यात येते ती महत्प्रयासानं बाजूला करायला लागते. हे जर जमलं तर माझं चांगलं चित्र तयार होतं.

**: तुमची चांगली चित्रं कशी तयार झाली आहेत?**

: आता उदाहरणादाखल मला आवडलेलं माझं एक चित्र कसं तयार झालं ते सांगतो. रेल्वेमध्ये वरच्या बर्थवर बसलेल्या माणसाचा स्वेटर उसवला आहे आणि त्याच लोकरीतून खालच्या बर्थवर बसून बाई मफलर विणते आहे. मला आवडलेलं हे माझं चित्र. आता अशी situation प्रत्यक्ष बघायला मिळणं जवळजवळ अशक्यच आहे; पण मला आठवतं की, कोल्हापूरला गेलो असताना एक स्वेटरचा तुकडा पडला होता आणि माझी बहीण तो तुकडा उसवत होती. माझ्या डोक्यात शिरलं की, या उसवलेल्या दोऱ्यातून सारखीच लोकर बाहेर येतेय. आता ही कल्पना डोक्यात शिरली. मग चित्राच्या दृष्टीनं त्याचं composition डोळ्यांसमोर आलं. एकदा चित्रकल्पना समोर आली की राहते ती कारागिरी–draftsmanship! माझी कारागिरी मग कसोटीला लागते की, चित्र अधिक परिणामकारक कसं दिसेल, contrast कसा चांगला येईल हा विचार मग सुरू होतो.

**: तुमच्या सगळ्या चित्रांमध्ये बायका नखरेल, स्मार्ट आणि चटपटीत दिसतात. त्याउलट पुरुष सगळे गबाळे दिसतात. मग हे तुमच्याच मनातलं चित्र समजायचं का?**

: मला असं वाटतं की, आपल्याला contrast बघायला आवडतो. म्हणजे कोणी तरी कोणावर तरी मात केलेली असल्याशिवाय बघायला गंमत वाटत नाही. हा चित्रांचा खेळ असाच रंगवत न्यावा लागतो आणि यात कोणी तरी जिंकणारच; पण दर वेळी यात बायकाच जिंकतात असं मात्र नाही. कधीकधी माझा 'हिरो' ही

स्मार्ट आहे !

: तुम्ही तुमचं चित्र तयार झाल्यावर प्रथम कोणाला दाखवता ?

: अर्थातच बायकोला; पण हे चित्र रफ असतं. कोणतीही बाजूची माहिती न देता मी तिला फक्त चित्र दाखवतो. त्याचं तयार चित्र कसं दिसेल हे तिला सरावानं माहीत झालंय.

**: तुमची चित्रं त्यांनी पहिल्याच वेळी मोडीत काढलीत असं कधी झालंय का ?**

: खूप वेळा ! समजा मी तिला चित्र दाखवलं आणि कोणत्याही कारणानं का असेना तिला ते कळलंच नाही किंवा तितकं आकर्षक वाटलं नाही तर कोणतेही खुलासे न मागता मी ती कल्पना बाजूला ठेवतो. कोणतंही व्यंगचित्र असं खुलाश्यांनी किंवा तळटीपांनी पुढं जावं असं मला वाटत नाही. ते चित्राबरोबरच पुढं जायला पाहिजे आणि तसं जर झालं नाही, तिनं काही जरी खुसपटं काढली तरी मी ते चित्र बाजूला ठेवतो.

**: तुमची चित्रं पाहिली की एक मर्यादा जाणवते की तुमच्या चित्रांमधल्या व्यक्तिरेखा फक्त कौटुंबिक परिस्थितीभोवतीच फिरत राहातात. मग तुम्हाला फक्त याच विषयाचं appeal आहे असं समजायचं का ?**

: हे बरोबर आहे. मलाही हे जाणवतं; पण 'हसऱ्या गॅलरी'-साठी म्हणून मी स्वतंत्र चित्रं फारशी काढली नाहीत जी आहेत ती बहुतेक दिवाळी अंकांच्या मुखपृष्ठांवर येऊन गेलेली आहेत. त्यामुळं चित्रं घरातल्या सगळ्यांना आवडतील आणि प्रसन्न राहतील इकडे मी विशेष कल ठेवला. त्यामुळं ही विषयाची मर्यादा आली असावी. नंतर मात्र मी काही चित्रं काढली ती फक्त माझ्याचसाठी काढली. लोकांसाठी नाही. उदाहरणार्थ हाताच्या पाच बोटांपैकी एकाच बोटात अंगठी घातली जात आहे, त्यामुळे त्या बोटाचा फुललेला चेहरा आणि त्याउलट बाकीच्या बोटांचे पडलेले चेहरे. रसिकच्या दिवाळी अंकात हे चित्र प्रसिद्ध झालं

**: आता या टप्प्यापर्यंत येऊन पोचल्यावर जेव्हा तुम्ही तुमच्यातल्या व्यंगचित्रकाराकडे बघता तेव्हा तुम्हाला तुमच्यातले गुण–दोष काय दिसतात ?**

: आता जे plus points आहेत त्याच्याबद्दल फारसा विचार करायला लागत नाही. वाचकांच्या प्रतिसादातून ते आपोआप लक्षात येत रहातात. तुम्ही एखादी चांगली गोष्ट केलीत की लोक तिचं कौतुक करतातच. तो आनंद पोचतच असतो. प्रश्न येतो तो तुमच्या दोषांबद्दल जेव्हा तुम्ही विचार करता तेव्हा. आता त्याबद्दल असं वाटतं की काही चित्रं फार धिटाईनं पूर्ण करायला हवी होती.




काही चित्रं
फार धिटाईनं
पूर्ण करायला
हवी होती...

**: म्हणजे असंच ना की, चित्रकल्पना बोल्ड असूनसुद्धा जेव्हा दृश्य स्वरूपात ती कागदावर येते तेव्हा ती तितकीशी धीट रहात नाही**

: किंवा कधीकधी रफ स्केचिंगमध्ये जो उत्स्फूर्तता असते ती एनलार्जड् डिझाइनमध्ये बऱ्याच प्रमाणात कमी होते. ही उत्स्फूर्तता (spontanity) का जाते असं कधीकधी वाटतं. असं होऊ नये; पण हे फक्त चित्रकार आणि त्याच्या चित्रांबद्दलच आहे. दुसरी गोष्ट कधीकधी असं वाटतं की, विषयाच्या मर्यादा पडतात. समजा आणखी काही क्षेत्रं माझ्या बघण्यात आली असती, निरनिराळे प्रांत अधिक बघण्यात आले असते तर ही विषयाची, व्यक्तिरेखांची मर्यादा बरीच कमी झाली असती.

**: तुमच्या चित्रांच्या प्रसन्नशैलीबद्दल विचारायचं आहे की, हा मूड तुम्ही वाढवलात की तो तुमचाच मूड आहे? म्हणजे उदाहरणार्थ सरवटेंच्या रेषेमध्ये जी प्रखरता आहे किंवा करकरीतपणा आहे तो तुमच्या रेषेत कुठेही नाही याबद्दल तुम्हाला काय म्हणायचं आहे?**

' कधी कधी
रफ स्केचिंग मधली उत्फूर्तता
मोठ्या चित्रात कमी होते.
हे असं का व्हावं ?'



या सर्व बदलाचं कारण, माणसाच्या बुद्धीनं घडवलेल्या प्रगतीमध्ये आणि सुधारणांमध्ये आहे. या बाह्य बदलाबरोबरच या घरात राहणाऱ्या माणसांमध्येही कमी-अधिक बदल झाले. जिथे या बदलाचे सांधे व्यवस्थित जुळले तिथे सांधेबदलाचा खडखडाट लवकर थांबला जिथे सांधा साधलाच नाही तिथे खडखडाट आजही चालूच आहे. ही बदलाची प्रक्रिया शेकडो वर्षं चाललेली एक सततची प्रक्रिया आहे. तरीसुद्धा एकेका टप्प्यावर या सांधेबदलाचा खडखडाट तीव्र झाल्याचा अनुभव आपण घेतला आहे, ऐकला आहे. घर बदललं की घरातल्या वस्तूही बदलाव्या लागतात. कधीकधी जीवनपद्धतीही बदलाव्या लागतात. जुन्याच गोष्टी नव्या घरात वापरण्याचा किंवा न वापरण्याचा अट्टाहास करण्यापेक्षा खुल्या मनानं नव्या घरातलं जगणं सुखासमाधानाचं होण्यासाठी, काय टाकायचं, काय घ्यायचं याचा विवेक करावा लागतो. नाही तर आजच्या प्रश्नांची उत्तरं शोधण्यासाठी, वर्तमान आणि भविष्यकाळ नाकारून भूतकाळाचा शोध घ्यावा तसा वेडेपणा होण्याची शक्यता असते.

आज हादरलेल्या घरांचा संदर्भ मुख्यतः मध्यमवर्गीय कुटुंबजीवनाशी असतो. घरं हादरण्याची त्या त्या घरातली कारणं एका परीनं व्यक्तिगत स्वरूपाची आणि वेगवेगळी असू शकतात. व्यसनी नवरा, बिघडलेली मुलं, सासू-सुनांचा संघर्ष, बेजबाबदार पालक, आर्थिक संकट यासारखी कारणं काही प्रमाणात व्यक्तिगत असली तरी शेवटी त्यांची मुळं सामाजिक परिस्थितीतूनच पाणी शोधत आहेत हे सुजाणाच्या लक्षात येतं; पण आज मोडून पडणाऱ्या किंवा फुटणाऱ्या घरांचं मुख्य खापर घरातील शिकलेल्या, सजग होऊ बघणाऱ्या, नोकरी करणाऱ्या किंवा न करणाऱ्या स्त्रीच्या डोक्यावर ठेवलं जातं. हादरलेल्या घरांचा या संदर्भातच विचार करायचा अशी मर्यादा या लेखापुरती मी स्वीकारली आहे.

पारंपारिक श्रमविभागणीमध्ये घराच्या संदर्भात, घराचा उंबरठा ही सीमारेषा होती. स्त्रीनं उंबरठ्याच्या आतल्या कामाचा वाटा उचलायचा आणि पुरुषानं घराबाहेरच्या कामाचा व्याप सांभाळायचा ही आजवरची कामाची समाजमान्य वाटणी होती. गुहेपासून ओनरशिप अपार्टमेंटच्या आपल्या घर–प्रवासात घरातल्या माणसांचा झालेला प्रवास कित्येकदा आपल्या नजरेतून निसटला आहे. त्यामुळे आपल्या समोरच्या परिस्थितीचा मुळातून विचार न करताच, घरातल्या स्त्रीला मुख्य आरोपी केलं जात आहे. या संदर्भात अल्वा मिर्दाल आणि व्हायोला क्वेन या दोन समाजशास्त्रज्ञांनी लिहिलेल्या ' वुइमेन्स टू रोल्स, होम अँड वर्क ' या पुस्तकातील विचार महत्त्वाचा म्हणून समजून घ्यायला हवा.

यापुढच्या काळात, स्त्रियांनी मिळवतं असणं हे सामाजिक आणि वैयक्तिकदृष्टचा किती स्वाभाविक आणि परिहार्य आहे याचं शास्त्रशुद्ध विवेचन या पुस्तकात आहे. त्यातले दोन महत्त्वाचे मुद्दे असे– नव्या जमान्यात कुटुंबाचा आकार लहान झाला आहे आणि त्याच वेळी स्त्रीची आयुर्मर्यादा वाढली आहे. त्यामुळे स्त्रीच्या वाटचाला अधिक अवधी आला आहे. अगदी छोट्या कुटुंबात जन्मलेल्या एक, दोन किंवा तीन मुलांसाठी स्त्रीला जवळजवळ तीस ते चाळीस वर्षांचा वैवाहिक जीवनाचा काळ लाभतो. यापैकी दहा वर्षं मुलांसाठी दिली तरी त्याखेरीज पंचवीस ते पस्तीस वर्षं तिच्या वाटचाला येणं हा बदल महत्त्वाचा आहे. जुन्या जमान्यात खंडीभर बाळंतपणं आणि विज्ञानशोधांच्या मर्यादा यामुळे चाळिशीच्या आतच मरून जाणाऱ्या स्त्रियांच्या तुलनेत आजची स्त्रियांची आयुर्मर्यादा वाढली आहे.

उत्पादनप्रक्रियेतील स्त्रियांचा सहभाग हा दुसरा महत्त्वाचा मुद्दा आहे. औद्योगिक क्रांतीपूर्वीच्या काळात उत्पादनप्रक्रियेत सारं कुटुंबच सहभागी होत असे. शेती करणं, फळं, भाज्या पिकवणं पिकवलेलं उत्पादन टिकवणं, सूत काढणं, कापड विणणं इ. सर्व प्रक्रिया घराच्या, कुटुंबाच्या पातळीवर होत असत. त्यामुळं संपूर्ण घरच्या घर यात सामावलं जाई. घरातील पुरुष आणि स्त्रियाच नव्हे तर मुलंही त्यात वाटा उचलत; पण औद्योगिक क्रांतीनंतर औद्योगीकरण सुरू झालं. उत्पादनप्रक्रिया घराबाहेर आणि घरापासून दूर गेली. त्यापाठोपाठ कामासाठी पुरुष घराबाहेर पडले आणि स्त्रिया घरातच राहिल्या. अशा प्रकारे उत्पादनप्रक्रियेतून बाहेर फेकल्या गेलेल्या स्त्रिया, आज पुन्हा त्यात परत येऊ बघत आहेत. त्या पुरुषांच्या क्षेत्रावर आक्रमण करीत नसून आपलीच जुन्या काळातली जागा त्या परत एकदा मिळवत आहेत. यातच आणखी एक विचार असा आहे की, मध्यमवर्गीय प्रतिष्ठेच्या कल्पनेतूनच स्त्रीनं नोकरी करणं कमीपणाचं मानलं गेलं होतं. आता स्त्रिया म्हणताहेत– 'आमचे पुरुष घराबाहेरच्या धकाधकीत एकाकीपणे झगडत असताना आम्हाला रिकामपणाच्या राणीपदाचा (लेडी ऑफ द वीझर) मोह बिलकुल नाही. त्यांच्या खांद्याला खांदा लावून आम्हीही उत्पादनात सहभागी होऊ इच्छितो.' यात पुरुषांची केवळ बरोबरी करण्याचा मूर्ख अट्टाहास नाही. उलट समतेच्या भूमिकेतील हा स्त्रियांचा जबाबदार सहभाग आहे. अल्वा मिर्दाल आणि व्हायोला क्वेन यांनी काही पाश्चात्य देशांच्या संदर्भात केलेली ही मांडणी २५–३० वर्षांपूर्वीची आहे; पण आज आपल्यासमोरच्या मध्यमवर्गीय स्त्रियांच्या बाबतीत ती लागू पडणारी म्हणून महत्त्वाची आहे.

घरं एकेकटी बदलत नाहीत. समाजात घडणाऱ्या बदलातला तो एक छोटा पण अविभाज्य भाग असतो. या सामाजिक आणि आर्थिक परिवर्तनात आता स्त्रिया स्वतःला घरकामात आणि उंबरठ्याच्या आत अडकवून न ठेवता आर्थिक किंवा बौद्धिक गरज म्हणून उंबरठ्याबाहेर पडत आहेत आणि म्हणूनच संसाराची आजवरची घडी बिघडली आहे, असं समजातल्या काही पुरुषांनाच नाही तर स्त्रियांनाही वाटू लागलं आहे त्याचं प्रतिबिंब गणपतिउत्सवातल्या परिसंवादातही पडलेलं दिसतं. स्त्रियांनी नोकरी करावी की करू नये या विषयावरून परिसंवादाची गाडी–स्त्रिया नोकरी करू लागल्यामुळं कुटुंबसंस्था ढासळली आहे का–इथपर्यंत आली आहे! मुख्यतः आर्थिक रेट्यातून भरडल्या जाणाऱ्या स्त्रिया कुणाच्या परवानगीची वाट न बघता मिळवत्या झाल्याच आहेत. त्यांनी मिळवलेला पैसा घरात वापरला जात असला तरी त्याबद्दलची पुरेशी जाण आणि प्रतिष्ठा त्यांना अद्यापही मिळालेली नाही. यापलीकडे काही स्त्रिया आहेत. गेल्या शंभर वर्षांत म. फुले, डॉ. आंबेडकर यांच्यासारख्या

: मला मुळातच प्रसन्नतेची आवड आहे. म्हणजे हे applied art नंतर आलं; पण कार्टून काढत असतानासुद्धा मला मुळात पेंटिंगची जी ओढ आहे ती माझ्या व्यंगचित्रातसुद्धा येते. विनोदी विषय असूनसुद्धा त्याचं जे चित्र होतं त्याचा मला फार मोह पडतो. म्हणजे त्याची कलरस्कीम किंवा मांडणी यांचा मी विचार करतो तेव्हा एक चित्र म्हणून ते माझ्या डोळ्यांसमोर येतं. त्या रंगांमध्ये मी रमतो. म्हणजे समजा रोमँटिक चित्रकल्पना आहे–तो–ती आणि प्रसन्न वातावरण तर मी गुलाबी, जांभळा, ऑरेंज वगैरे रंग देणार. वास्तविक विनोदी चित्राला रंगांची फारशी गरज नाही; पण मला मात्र त्याचं decoration करायला आवडतं. माझ्या या डेकोरेटिव शैलीमुळंसुद्धा लोकांना ती चित्रं प्रसन्न वाटत असावीत. एक चित्र म्हणून लोकांना ते आवडतं.

**: सध्या व्यंगचित्रकला हा प्रकार तसा बराच रुजला आहे. मुळात व्यंगचित्रकार फार थोडे असल्यामुळे प्रत्येकाला कुठे ना कुठे संधी मिळतेच पण काही अपवाद सोडता; शैलीच्या दृष्टीने त्यांची गुणवत्ता विशेष आहे असं नाही. या परिस्थितीमुळे या क्षेत्रात एक मरगळ आली आहे असं तुम्हाला वाटत नाही का ?**

: असं फक्त याच क्षेत्राबद्दल म्हणता येणार नाही. मराठी संगीत काय, नाटक काय, एकूण कलाप्रकार पाहिलेत तर व्यंगचित्र अगदी अलीकडचं. तरीसुद्धा खूप चांगले प्रयोग या क्षेत्रात सरवटे, गवाणकर, पराडकर वगैरे मंडळी करत आहेत. त्यांनी यापेक्षा किती develope व्हावं हा त्यांचा प्रश्न आहे; पण म्हणून या क्षेत्राला मरगळ आली आहे असं मला वाटत नाही. उलट अनेक नवीन कलाकार इकडे वळताहेत. त्यांची संख्या मात्र कमी आहे.

**: आर. के. लक्ष्मण म्हणतात त्याप्रमाणे व्यंगचित्रकार जन्मालाच यावा लागतो या त्यांच्या म्हणण्याशी तुम्ही किती सहमत आहात ?**

याबद्दलचं माझं मत असं आहे की, एखादा साहित्यिक, कवी, नाटककार, लेखक यांच्याबद्दल हे जितकं खरं आहे तितकंच ते व्यंगचित्राकाराबद्दल खरं आहे. हा वेगळा कलाप्रकार म्हणून तुम्ही एकदा मान्य केल्यावर कलेचे सगळे नियम याला लागू आहेत आणि उपजत गुण मात्र मुळात असावेच लागतात !

**: ते ' उपजत ' गुण कोणते ?**

: मला वाटतं व्यंगचित्रकाराचा संबंध विद्वत्तेपेक्षा एका शहाणपणाशी wisdom शी आहे. तो माणूस शहाणा पाहिजे. अमुक एखाद्या घटनेचा सुसंगत मोठा अर्थ काय आहे हे समजण्याची त्याच्या अंगात कुवत पाहिजे. विनोदबुद्धी पाहिजे, स्वतंत्रपणे विचार करण्याची क्षमता पाहिजे आणि सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे चित्रकलेचं अंग पाहिजे. कधीकधी लोक सांगतात, अहो, आम्हाला फार मजेशीर कल्पना सुचली आहे. तुम्ही त्याचं चित्र काढा. याचा अर्थच असा की, कल्पना तिथे उतरली आहे; पण कल्पनेला form मात्र देता येत नाही.

**: चित्रकारांना उपलब्ध असलेल्या कॉपी–राइट हक्काची तुम्ही पुन्हा मागणी केलीत. त्या वेळी तुम्हाला काही मानसिक त्रास झाला का ?**

एक चांगले स्थिर प्रकाशक आहेत. त्यांच्याशी जेव्हा मी कॉपी-


## मे. हिंदुस्थान इंडस्ट्रियल वर्क्स

**प्लॉट नं. बी–३७, एम. आय. डी. सी.**
**शिरोली, कोल्हापूर. दूरध्वनी**

**उत्पादक :**

- स्पन पाइप मशिनरी,
- सर्व क्लासमधील पाइप मोल्डस,
- पोलचे मोल्डस व
- कोणतेही स्टील फॅब्रिकेशनकरिता
  लिहा अगर भेटा.

## मे. भारत इंजिनियरिंग कंपनी

**प्लॉट नं. बी–३९, एम. आय. डी. सी. शिरोली,**
**कोल्हापूर ४१६ १२२**

**उत्पादक :–** सिमेंट पाइप मशिनरी, सर्व साईजमधील पाइप व कॉलर मोल्डस् आणि स्टील फॅब्रिकेशन करिता भेटा अगर लिहा !

या सर्व बदलाचं कारण, माणसाच्या बद्धीनं घडवलेल्या प्रगतीमध्ये आणि सुधारणांमध्ये आहे. या बाह्य बदलाबरोबरच या घरात राहणाऱ्या माणसांमध्येही कमी-अधिक बदल झाले. जिथे या बदलाचे सांधे व्यवस्थित जुळले तिथे सांधेबदलाचा खडखडाट लवकर थांबला जिथे सांधा साधलाच नाही तिथे खडखडाट आजही चालूच आहे. ही बदलाची प्रक्रिया शेकडो वर्ष चाललेली एक सततची प्रक्रिया आहे. तरीमुद्धा एकेका टप्प्यावर या सांधेबदलाचा खडखडाट तीव्र झाल्याचा अनुभव आपण घेतला आहे, ऐकला आहे. घर बदललं की घरातल्या वस्तूही बदलाव्या लागतात. कधीकधी जीवनपद्धतीही बदलाव्या लागतात. जुन्याच गोष्टी नव्या घरात वापरण्याचा किंवा न वापरण्याचा अट्टाहास करण्यापेक्षा खुल्या मनानं नव्या घरातलं जगणं सुखासमाधानाचं होण्यासाठी, काय टाकायचं, काय घ्यायचं याचा विवेक करावा लागतो. नाही तर आजच्या प्रश्नांची उत्तरं शोधण्यासाठी, वर्तमान आणि भविष्यकाळ नाकारून भूतकाळाचा शोध घ्यावा तसा वेडेपणा होण्याची शक्यता असते.

आज हादरलेल्या घरांचा संदर्भ मुख्यत: मध्यमवर्गीय कुटुंबजीवनाशी असतो. घरं हादरण्याची त्या त्या घरातली कारणं एका परीनं व्यक्तिगत स्वरूपाची आणि वेगवेगळी असू शकतात. व्यसनी नवरा, बिघडलेली मुलं, सासू-सुनांचा संघर्ष, बेजबाबदार पालक, आर्थिक संकट यासारखी कारणं काही प्रमाणात व्यक्तिगत असली तरी शेवटी त्यांची मुळं सामाजिक परिस्थितीतूनच पाणी शोधत आहेत हे सुजाणाच्या लक्षात येतं; पण आज मोडून पडणाऱ्या किंवा फुटणाऱ्या घरांचं मुख्य खापर घरातील शिकलेल्या, सजग होऊ बघणाऱ्या, नोकरी करणाऱ्या किंवा न करणाऱ्या स्त्रीच्या डोक्यावर ठेवलं जातं. हादरलेल्या घरांचा या संदर्भातच विचार करायचा अशी मर्यादा या लेखापुरती मी स्वीकारली आहे.

पारंपारिक श्रमविभागणीमध्ये घराच्या संदर्भात, घराचा उंबरठा ही सीमारेषा होती. स्त्रीनं उंबरठ्याच्या आतल्या कामाचा वाटा उचलायचा आणि पुरुषानं घराबाहेरच्या कामाचा व्याप सांभाळायचा ही आजवरची कामाची समाजमान्य वाटणी होती. गुहेपासून ओनरशिप अपार्टमेंटच्या आपल्या घर–प्रवासात घरातल्या माणसांचा झालेला प्रवास कित्येकदा आपल्या नजरेतून निसटला आहे. त्यामुळे आपल्या समोरच्या परिस्थितीचा मुळातून विचार न करताच, घरातल्या स्त्रीला मुख्य आरोपी केलं जात आहे. या संदर्भात अल्वा मिर्दाल आणि व्हायोला क्लेन या दोन समाजशास्त्रज्ञांनी लिहिलेल्या 'वुइमेन्स टू रोल्स, होम अँड वर्क' या पुस्तकातील विचार महत्त्वाचा म्हणून समजून घ्यायला हवा.

यापुढच्या काळात, स्त्रियांनी मिळवतं असणं हे सामाजिक आणि वैयक्तिकदृष्ट्या किती स्वाभाविक आणि परिहार्य आहे याचं शास्त्रशुद्ध विवेचन या पुस्तकात आहे. त्यातले दोन महत्त्वाचे मुद्दे असे– नव्या जमान्यात कुटुंबाचा आकार लहान झाला आहे आणि त्याच वेळी स्त्रीची आयुर्मर्यादा वाढली आहे. त्यामुळे स्त्रीच्या वाट्याला अधिक अवधी आला आहे. अगदी छोट्या कुटुंबात जन्मलेल्या एक, दोन किंवा तीन मुलांसाठी स्त्रीला जवळजवळ तीस ते चाळीस वर्षांचा वैवाहिक जीवनाचा काळ लाभतो. यापैकी दहा वर्ष मुलांसाठी दिली तरी त्याखेरीज पंचवीस ते पस्तीस वर्ष तिच्या वाट्याला येणं हा बदल महत्त्वाचा आहे. जुन्या जमान्यात खंडीभर बाळंतपणं आणि विज्ञानशोधांच्या मर्यादा यामुळे चाळिशीच्या आतच मरून जाणाऱ्या स्त्रियांच्या तुलनेत आजची स्त्रियांची आयुर्मर्यादा वाढली आहे.

उत्पादनप्रक्रियेतील स्त्रियांचा सहभाग हा दुसरा महत्त्वाचा मुद्दा आहे. औद्योगिक क्रांतीपूर्वीच्या काळात उत्पादनप्रक्रियेत सारं कुटुंबच सहभागी होत असे. शेती करणं, फळं, भाज्या पिकवणं पिकवलेलं उत्पादन टिकवणं, सूत काढणं, कापड विणणं इ. सर्व प्रक्रिया घराच्या, कुटुंबाच्या पातळीवर होत असत. त्यामुळं संपूर्ण घरच्या घर यात सामावलं जाई. घरातील पुरुष आणि स्त्रियाच नव्हे तर मुलंही त्यात वाटा उचलत; पण औद्योगिक क्रांतीनंतर औद्योगीकरण सुरू झालं. उत्पादनप्रक्रिया घराबाहेर आणि घरापासून दूर गेली. त्यापाठोपाठ कामासाठी पुरुष घराबाहेर पडले आणि स्त्रिया घरातच राहिल्या. अशा प्रकारे उत्पादनप्रक्रियेतून बाहेर फेकल्या गेलेल्या स्त्रिया, आज पुन्हा त्यात परत येऊ बघत आहेत. त्या पुरुषांच्या क्षेत्रावर आक्रमण करीत नसून आपलीच जुन्या काळातली जागा त्या परत एकदा मिळवत आहेत. यातच आणखी एक विचार असा आहे की, मध्यमवर्गीय प्रतिष्ठेच्या कल्पनेतूनच स्त्रीनं नोकरी करणं कमीपणाचं मानलं गेलं होतं. आता स्त्रिया म्हणताहेत– 'आमचे पुरुष घराबाहेरच्या धकाधकीत एकाकीपणे झगडत असताना आम्हाला रिकामपणच्या राणीपदाचा (लेडी ऑफ द लीझर) मोह बिलकुल नाही. त्यांच्या खांद्याला खांदा लावून आम्हीही उत्पादनात सहभागी होऊ इच्छितो.' यात पुरुषांची केवळ बरोबरी करण्याचा मूर्ख अट्टाहास नाही. उलट समतेच्या भूमिकेतील हा स्त्रियांचा जबाबदार सहभाग आहे. अल्वा मिर्दाल आणि व्हायोला क्लेन यांनी काही पाश्चात्य देशांच्या संदर्भात केलेली ही मांडणी २५–३० वर्षांपूर्वीची आहे; पण आज आपल्यासमोरच्या मध्यमवर्गीय स्त्रियांच्या बाबतीत ती लागू पडणारी म्हणून महत्त्वाची आहे.

घरं एकेकटी बदलत नाहीत. समाजात घडणाऱ्या बदलातला तो एक छोटा पण अविभाज्य भाग असतो. या सामाजिक आणि आर्थिक परिवर्तनात आता स्त्रिया स्वत:ला घरकामात आणि उंबरठ्याच्या आत अडकवून न ठेवता आर्थिक किंवा बौद्धिक गरज म्हणून उंबरठ्याबाहेर पडत आहेत आणि म्हणूनच संसाराची आजवरची घडी बिघडली आहे, असं समजातल्या काही पुरुषांनाच नाही तर स्त्रियांनाही वाटू लागलं आहे त्याचं प्रतिबिंब गणपतिउत्सवातल्या परिसंवादातही पडलेलं दिसतं. स्त्रियांनी नोकरी करावी की करू नये या विषयावरुन परिसंवादाची गाडी–स्त्रिया नोकरी करू लागल्यामुळं कुटुंबसंस्था ढासळली आहे का–इथपर्यंत आली आहे! मुख्यत: आर्थिक रेट्यातून भरडल्या जाणाऱ्या स्त्रिया कुणाच्या परवानगीची वाट न बघता मिळवत्या झालाच आहेत. त्यांनी मिळवलेला पैसा घरात वापरला जात असला तरी त्याबद्दलची पुरेशी जाण आणि प्रतिष्ठा त्यांना अद्यापही मिळालेली नाही. यापलीकडे काही स्त्रिया आहेत. गेल्या शंभर वर्षांत म. फुले, डॉ. आंबेडकर यांच्यासारख्या

द्रष्टया सुधारकांचे विचार विचारात घेणाऱ्या आणि आपल्या अस्मितेचा शोध घेऊ बघणाऱ्या अगदी नगण्य संख्येच्या स्त्रिया केवळ आर्थिक गरजेचा विचार न करता, आपल्याला रास्त वाटतं, 'अन्य' कारणांनी गरजेचं वाटतं म्हणून नोकरी । व्यवसाय करीत आहेत. घरकामाची, परंपरेनं गौरवलेली जबाबदारी त्यांनी अजूनही पूर्णपणे तर सोडाच, जवळजवळ अजिबातच नाकारलेली नाही. तरीसुद्धा घरची आणि बाहेरची अशा दोन पूर्ण वेळ जबाबदाऱ्या 'चोवीस तासांच्याच दिवसात' पार पाडताना केवळ गृहिणीकडून होणाऱ्या सेवेपेक्षा त्यांची सेवा निश्चितच अपुरी पडते. घराच्या हादऱ्यांना सुरुवात होते आहे ती सर्वस्वी नाही तरी प्रामुख्यानं या कारणानं होते आहे.

एक स्त्री घरात राहिली तर घरातल्या माणसांचं खाणंपिणं, त्यांची सेवाशुश्रूषा, त्यांचं आगतस्वागत, त्यांची भावनिक, शारीरिक गरज या सर्व जबाबदाऱ्या सामान्यत: व्यवस्थित पार पडतात हे खरं आहे. ज्या स्त्रिया यात पूर्णत: समाधानी आहेत त्यांचा प्रश्न तूर्त बाजूला ठेवू या. 'तूर्त' म्हणण्याचं कारण असं की, या जबाबदाऱ्या निभावून नेणं आणि त्यात समाधानी असणं हे स्त्रीत्वाला साजेसं आहे. त्यात स्त्रीत्वाची प्रतिष्ठा आहे इ. कल्पना लहानचं मोठं होतानाच स्त्रियांच्या मनोवृत्तीत खोलवर रुजवल्या जातात. यामुळं यापलीकडचा वेगळा विचार न सुचल्यामुळं, न ऐकल्यामुळंही कित्येक स्त्रियांना त्यात समाधान वाटतं किंवा कित्येकदा आत्मनिर्भर असण्यासाठी चुकती करायची किंमत भरण्याची कुवत नसल्यामुळंही पतीच्या खांद्यावर विसावून निदानपक्षी पारंपारिक गौरव तरी मिळवावा असं वाटूनही काही स्त्रिया गृहिणीपदात समाधानी असतात. काही मात्र खऱ्याखऱ्याही समाधानी असतील हेही मी मान्य करते; पण या काही जणी जितक्या प्रामाणिकपणे समाधानी असतील तितक्याच प्रामाणिकपणे काही स्त्रिया केवळ गृहिणीपणात समाधानी नसतात हीही एक वस्तुस्थितीच आहे. छोटा संसार, पुष्कळ वेळ आणि स्वत:च्या कुवतीचं भान यामुळंही काही स्त्रिया संसाराखेरीज आणखी काही करू बघत असतील. काही स्त्रियांना अस्वस्थ करणारी ही मानसिकता त्यांच्या भोवतीच्या स्त्रीपुरुषांनी समजून घेण्याची खरी गरज आहे. त्यांना संसाराखेरीज आणखी काही करावंसं वाटणं ही त्यांच्या जिवंतपणाची खूण आहे. स्त्रिया या माणसं आहेत, त्या केवळ माद्या नाहीत. म्हणूनच कावळा–चिमणीच्या पातळीवरचं, वंशसातत्याचं, उदरभरणाचं जीवन न जगता त्या अधिक गुणवत्तापूर्ण जीवन जगू बघताहेत. म्हणूनच केवळ नवरा, मुलं आणि घरातली इतर माणसं यांच्यासाठी न जगता त्या स्वत:साठीही थोडं जगू बघताहेत. घरातली भूमिका तर त्यांनी अजून पुरतेपणानं नाकारलेली नाही. तरी पण त्यांच्याच जिवावर उभी राहिलेली घरं. (हा एक खांबी तंबू) अशा प्रकारे त्यांच्या विकासाच्या हालचालींनी दोलाचल झाली आहेत.

गृहिणीपद भूषवणाऱ्या स्त्रियांच्याबाबतीत 'तिला काय कमी आहे? घरात आराम करावा, घर सांभाळायचं सोडून ही विकतची गुलामगिरी कशासाठी?' घराबाहेर असा प्रश्न अनेकदा विचारला जातो. मला वाटतं तिला काय कमी आहे, काय हवं आहे हे सांगण्यासाठी आपण तिला एक प्रौढ माणूस म्हणून तोंड उघडून बोलू द्यायला हवं. जॉन स्टुअर्ट मिलनं म्हटल्याप्रमाणं—बाई काय चीज आहे, तिला काय वाटतं, यासंबंधी आजवर बहुतेक सारं पुरुषानंच लिहिलं आहे. ती स्वत: जेव्हा तोंड उघडून बोलेल तेव्हा तिला खरं काय वाटतं हे नव्यानंच पुरुषांना आणि स्त्रियांना कळेल. म्हणूनच स्त्री जेव्हा गृहिणीची पारंपारिक भूमिका बजावता–बजावताच आणखी काही करू बघते तेव्हा गृहिणीपदातलं तिचं असमाधान हे ती म्हणेल त्यानुसारच जोखायला हवं. 'तुला तुझी चप्पल कशी बुवा लागते?' असं म्हणायचा अधिकार ती चप्पल न घालणाऱ्याला अजिबात नाही हे आपण कधी तरी मान्य करणार आहोत की नाही?

आपल्या सांस्कृतिक संचिताचा गौरव करताना, आपल्या कुटुंबातील स्त्रीच्या स्थानाविषयी आपण गौरवानं बोलतो ती गृहस्वामिनी आहे, देवी आहे इ. इ.! मला वाटतं आजच्या स्त्रिया म्हणताहेत-आम्हाला समता हवी. आम्हाला देवत्व नको आणि दासीपदही नको! आम्हाला तुमच्यासारखं, तुमच्याबरोबरीचं माणूसपण हवं आहे. लिऑन ट्रॉटस्कीनं एके ठिकाणी म्हटलं आहे की, नवरा आणि बायको यांच्यामध्ये शाब्दिक नव्हे, व्यावहारिक पातळीवर जोवर समता प्रस्थापित होत नाही तोवर सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील समतेचा विचारही करता येणार नाही. याच अर्थानं आपण हुकूमशाही–लोकशाहीचा विचार केला तर असं दिसतं की, बहुसंख्य घरात नवरा हा बायकोवर आणि नवराबायको मिळून आपल्या मुलांवर हुकूमशाही गाजवीत असतात. यातून लोकशाहीचे पायीक कसे निर्माण


**दि जनलक्ष्मी को-ऑपरेटिव्ह बँक लि.**

**" शिरीन ", शिवाजी रोड, नासिक.**


**बँकेच्या अभिनव व आकर्षक ठेव योजनेत**
**रक्कम ठेवा**
**व**
**त्वरित भेट वस्तू घ्या.**

शिवाय द. सा. द. शे. १२% प्रमाणे व्याज मिळवा.
अधिक माहितीसाठी बँकेस भेट द्या.

| माधव पाटील | वा. स्वा. पटेल | वसंत अग्निहोत्री | घन. बी. पटेल |
|---|---|---|---|
| अध्यक्ष | उपाध्यक्ष | जनरल मॅनेजर | ऑ. मॅने. डायरेक्टर |

होणार ? घरातल्या गृहिणीचा विकास कशात आहे हे आपण तिला ठरवू देणार की नाही ? एक प्रौढ माणूस म्हणून तिचं तिनं विचार करून, चुका करीत करीत शिकावं ही संधी तिला दिली जाणार की नाही ? तिनं गृहिणीपदापुरतं स्वतःला मर्यादित न करता, त्यापलीकडचा विचार केला, कृती केली की, घरं जर डळमळणार असतील तर हा घरबांधणीतला तर दोष नाही ना याचाच विचार आधी व्हायला हवा. समजा यामुळं घर खरोखरीच कोसळणार असेल तर घर कोसळू नये म्हणून 'तू इतरांसाठी घरातच जगत राहा.' असं म्हणणं न्यायाचं होईल का ? याउलट, 'या तुझ्या नव्या विचारानंतरही घर उभं राहायला हवं असेल तर आपण 'घर' या संकल्पनेचाच फेरविचार करू या' असं आपण म्हणणार आहोत का ?

घर सर्वांना हवं तर मग ते टिकवण्याची जबाबदारीही सर्वांची हवी. आजवरच्या कुटुंबव्यवस्थेत पुरुषानं हव्या त्या क्षेत्रात जावं, सामर्थ्याचा शोध घेत प्रयोग करावे आणि यातले सारे चढउतार त्याच्यातला. अर्धा वाटा पत्करून समरसून आपलेपणानं त्याच्या पत्नीनं स्वीकारावे हे आजवर आपण गृहीत धरलं. अश्मयुगापासून इथवर वाटचाल करताना, लाख गोष्टी आपण बदलल्या मग स्त्रीला वाटतं म्हणून तिच्या भूमिकेचा फेरविचार करायचं आपण का नाकारतो आहोत ? पुरुषाच्या स्वातंत्र्यालाही 'पुरुष' असण्याच्या मर्यादा आहेत आणि एक व्यक्ती म्हणून, माणूस म्हणून जगायला तोही पुरेसा स्वतंत्र नाही हे मला मान्य आहे; पण म्हणूनच त्याला स्वतःला हव्या असलेल्या विकासाच्या, स्वातंत्र्याच्या संधीच्या संदर्भातच त्यानं स्त्रीचं म्हणणं अधिक खुलेपणानं समजून घ्यायला हवं. कारण पुरुषप्रधान समाजरचनेत स्त्रीच्या तुलनेत त्यानं अधिक स्वातंत्र्य उपभोगलं आहे. लहान बाळाचं 'स्त्री'मध्ये रूपांतर घडवताना, तिला तयार केलं जातं केवळ 'गृहिणी' नामक व्यवसायासाठी. तो तिच्या उपजीविकेचा खरा व्यवसाय. बाकी शिकून करावयाचे व्यवसाय मुळात उपलब्ध नाहीत आणि असतील तर ते दुय्यम स्वरूपात. पुरुषाला मात्र अर्थार्जन करण्यासाठी कोणताही



व्यवसाय तात्त्विक पातळीवर तरी खुला आहे. पुरुषाला अधिक स्वातंत्र्य आहे, म्हणूनच स्त्रीच्या स्वतंत्र माणूस म्हणून जगण्याच्या प्रयत्नाचा त्यानं सन्मान करायला हवा. स्वतःसारखंच तिचं स्वातंत्र्य त्यानं मानलं तर दोघांनी उभारलेल्या घरात तिनं स्वतःचा शोध घ्यावा यात त्याला गैर किंवा गैरसोयीचं वाटणार नाही. तिचे प्रयोग तो आपलेपणानं बघू शकेल जसे आजवर तिने पाहिले समजा प्रयोगशीलतेचं स्वातंत्र्य त्यानं घेतलं नसेल तरीही ते त्यानं तिला का नाकारावं ? पुरुषानं केलेल्या दिग्विजयाचं, पराक्रमाचं कौतुक आजवर स्त्रीनं केलं आहे. आपलं मानलेल्या आपल्या बायकोच्या पराक्रमात, प्रतिष्ठेत नवरा का सहभागी होऊ शकत नाही ? तिच्या घराबाहेरच्या कामानं घरं ढासळतात म्हणण्यापेक्षा ती बाहेर जाण्याची शक्यता नसलेल्या काळात बांधलेली 'घरं' आहेत आणि म्हणून नव्या परिस्थितीचा नवा विचार व्हायला हवा.

एक महत्त्वाची गोष्ट अशीही आहे की, मानवीसंबंधापलीकडच्या जगात आपण सर्वांनी अनेक बदल सहजपणे स्वीकारले. विज्ञानाच्या शोधातून झालेले बदल–कपडयातून, भांडयाकुंडयांतून, वाहनांतून, विद्युत्–उपकरणांतून आल्यासमोर आले तेव्हा फारशी खळखळ न करता आपण त्यांचा स्वीकार केला. कारण या शोधांसाठी चुकती करायची किंमत त्या त्या संशोधकांनी चुकती केली. आपण फक्त बाजारातलं तयार उत्पादन घेतलं त्यासाठी पैसे दिले; पण प्रयोग करतानाच्या चढउतारांची किंमत आपण चुकती केली नाही. याउलट स्त्रीनं व्यवसायासाठी घराबाहेर पडणं यासारखा सामाजिक बदल सुरू होतो तेव्हा तो प्रयोग घराघरात सुरू होतो आणि त्याची झळ घरातल्या माणसांना लागते. ते त्यात सहभागी झाले तर ते त्या प्रयोगाचाच एक भाग बनतील; पण न झाले तर त्यांना फक्त झळ लागेल. वास्तविक या प्रयोगातून व्यावहारिक पातळीवर बाई कदाचित पैसा मिळवीत असेल; पण दुसऱ्या एका पातळीवर ती शहाणपण आणि व्यक्तिमत्त्वाची समृद्धी मिळवते आहे. अगदी बाकी काही नाही तरी आजवर न घेतलेला एक अनुभव ती घेते आहे. तिच्या या प्रयोगात सामील होणाऱ्यांना ती जे मिळवते आहे त्याचा लाभ मिळू शकेल. न होणाऱ्यांना मात्र फक्त 'कटकट' होईल !

आपल्या सर्वांच्या घरात मुलीची घडणच अशी होते की, नेहमी ती स्वतःची किंमत कमीतकमी समजते. कुठे गेलं तर, जागा असेल तर इतरांना द्यायची. आपण कोपऱ्यात निमूट उभं राहायचं. पुढं व्हायचं नाही, पुढाकार घ्यायचा नाही. 'आधी इतरांना, मग उरलं तर मला' हा तिचा मंत्र. प्रत्येक संधी घेताना रांगेत सर्वांत शेवटी उभं राहून न कुरकुरता वाट बघण्याची, कष्ट सोसायची, हक्कासाठी न भांडण्याची तिची मानसिक घडणच असते आणि हे तिचे 'गुण' सामाजिक नसून स्वाभाविक आहेत असंही तिला शिकवलेलं आहे आणि तिच्याबरोबरच इतरांनीही ते एकदम मान्य केलं आहे. सामान्यतः तिच्या या त्यागावर आणि सोशिकपणावर घरं आजवर ठामपणे उभी राहिलेली दिसली. कुणासाठी काही करणं हा गुण वस्तुनिष्ठपणे पाहता चांगला आहे असंच मी मानते. फक्त मला एवढाच एक छोटासा प्रश्न पडला की, ही त्यागाची वृत्ती इतकी चांगली आहे ती तिच्याखेरीज इतरांना ऐच्छिक आणि तिला 'स्वाभाविकपणे सक्तीची' का ? यातली गफलत उमगल्यामुळं ती थोडी जागी होऊन विचार करू लागली आहे. म्हणूनच आत्ता–आत्ता कुठे मिळवती व्हायला लागलेली स्त्री घर आणि दार ही दोन–दोन पूर्ण वेळाची कामं करताना क्वचित घरकामातली काही कामं कमी करते आहे, काहींना मुरड घालते आहे, काहीत घरातल्या इतरांचं सहकार्य मागते आहे......तर एवढयातच आपल्याला असं वाटू लागलं की, हे काय भयंकर चाललंय ? घडी विस्कटते आहे ! घरं हादर-

ताहेत ! तात्कालिक प्रतिक्रिया म्हणून मला ते समजूही शकतं; पण काही काळानंतर थांबून याचा विचार मुळातून आपण करणार की नाही ?

स्त्रिया स्वतःचा विचार करून विकासाच्या वाटा शोधू लागल्यानंतर आता घर या कल्पनेचा आपण वास्तवात पाय रोवून नीट विचार करायला हवा. घर हवं. कुटुंबसंस्था हवी. त्यातलं प्रेम हवं. भावनेचा ओलावा हवा. व्यक्तिगत देखभाल हवी. चांगलं जीवनमान हवं. त्याला पुन्हा गुणवत्ता हवी. मग या सगळ्यासाठी घरातली सगळीजणं काय काय करणार ? घरातल्या बाईवरची जबाबदारी घराबाहेरच्या किंवा तिनं शोधलेल्या घरातल्या कामानं वाढली आहे. अशा वेळी मुलं आणि त्यांचे वडील घरकामात कसा वाटा उचलणार ? कोणत्या अपेक्षा, सवयी यांना मुरड घालणार ? काय कामं, जबाबदाऱ्या अंगावर घेणार ? घराचं घरपण राखण्यासाठी ते काहीच वाटा उचलणार नसतील तर घर हादरत आहे असं कुणी, कुणाजवळ का म्हणायचं ?

घराचं एक नवं रूपच मिळवल्या जोडप्यांच्या संदर्भात वास्तवात येण्याची गरज आता निर्माण झाली आहे. घरकामातल्या सुविधांचं सामाजिकरण व्हायचं तेव्हा होईल; पण तोपर्यंत निदान घरकामापैकी नावडती कामं, कष्टाची कामं, विचारपूर्वक विभागून घ्यायला हवीत. नवरा आणि बायको यांच्या नातेसंबंधात या कामांच्या न्याय्य वाटपाची कल्पना रुजायला हवी. ही समजदारी आजवर एकमार्गी वाहतुकीसारखी स्त्रीकडून इतरांना मिळत होती. आता घरातली सारीच मंडळी आपल्याइतकेच दुसऱ्याचे कष्ट, दुसऱ्याचं स्वातंत्र्य, दुसऱ्याचा विकास यांचा विचार करू लागतील तर घराचा नवा एक आकृतिबंध तयार होईल. घरातल्या प्रत्येकानं स्वतःसाठी आणि इतरांसाठी एकाच वेळी जगण्याचा प्रयत्न हे नव्या आकृतिबंधाचं वैशिष्ट्य ठरेल. राजकारणात, समाजकारणात हे दिसत नाही; पण कुटुंबातून याची सुरुवात झाली तर त्याचा प्रसार दूरवर होण्याची अधिक शक्यता आहे.

चाळीस-पंचेचाळीस वर्षांपूर्वी विभावरी शिरूरकरांनी 'कळ्यांचे निश्वास' लिहिले. त्यात मिळवत-मिळवत आईवडिलांच्या घरालाच आधार देत प्रौढ कुमारिका होत चाललेल्या एका तरुणीनं काळजाला भिडणारा प्रश्न विचारला आहे; पण बाबांचा संसार माझा कसा होईल ? ती स्त्री अविवाहित आहे. तिला तिचा संसारच नाही; पण आज घडीला ज्यांच्या जाणिवा जाग्या होताहेत, ज्यांच्या अंगात अर्थार्जनाची, संसाराला हातभार लावण्याची हिंमत आहे अशा काहीजणी आहेत. त्यांची चाल पारंपारिक गृहिणीपेक्षा वेगळी झाली आहे. ही चाल नवऱ्याला आणि मुलांना नापसंत आहे. कारण त्यापायी त्यांची गैरसोय होते आहे. तरी उलट तिच्यावरच स्वार्थीपणाचा आरोप होतो आहे. तिची तडफड, धडपड समजून न घेतल्यामुळं दुराव्याची दरी वाढते आहे. स्वतःच्याच घरात ती परकी आणि उपरी होते आणि ती आपल्याच संसारात उभी राहून प्रश्न विचारते– माझा संसार माझा कसा होईल? तिला पुन्हा एकदा 'कळ्यांचे निश्वास' आठवतात ! तिला वाटतं, 'पण लक्षात कोण घेतो ?' मधल्या यमूला शिकवणाऱ्या केशवाचं कौतुक करणारे आणि आपापल्या यमूला शिकवणारे सारे

*With Best Compliments From :*

**THE GLOBE STORES CO.**

18–C, sitaram Building,
Dr. D. N. Road,
BOMBAY 400 001

पुरुष तिला शिकवून, तिच्या मनाची दारं उघडून आणि तिच्या घराची दारं बंद करून कुठे गेले आहेत ? 'तू शीक; पण विचार करू नको. तुझा पतंग आकाशात हवा तेवढा उंच जाऊ दे; पण दोरी माझ्या हातात असेल' असं जणू प्रत्येक नवरा म्हणत। वागत असतो. टेकडीच्या माथ्यावर गार मोकळा आहे असं म्हणून तिला वर चढायला मदत करायची आणि सर्वदूर पसरलेल्या, वरवर जाताना व्यापक होत जाणाऱ्या क्षितिजदूर पसरलेल्या जगाविषयी तिनं काही म्हणू नये असं बजावायचं, हे कसं ?

हे सगळे प्रश्न माझ्या मनात येतात; पण म्हणून ते केवळ माझ्याच मनात येतात असं नाही. एक संपादक म्हणून माझ्या व्यवसायातून मला एकाच वेळी अनेक माणसांशी निकोपपणे बोलता येतं. प्रत्यक्ष ओळख नसल्यामुळं संपादक पुरेसा दूरचा वाटतो आणि त्यानं संपादित केलेल्या नियतकालिकाच्या माध्यमातून त्याची एक वेगळीच ओळख पटून तो जवळचाही वाटतो. आपल्या वाचकांच्या आपल्यावरच्या विश्वासाची पावती मला अनेक पत्रांतून किंवा समक्ष भेटीतून मिळते. या साऱ्या अनुभवांच्या निरीक्षणातूनही स्त्रीमनाची कोंडी जाणवते. नमुन्यादाखल एकाच पत्राचा दाखला द्यावासा वाटतो—

माझा अनुभव असा आहे की, मिळवती स्त्री असेल तर तिच्या संसारातल्या हादऱ्यांना एक नेमकं कारण तरी असतं। दिसतं. मिळवतेपणातून क्वचित–क्वचित येणारी एक शक्ती तिच्यात दिसते; पण बाई मिळवत नसेल आणि तरी स्वतःसाठी विचार करणारी, स्वतःच्या स्थानाबाबतची जाणीव जागी झालेली असेल, तरीही तिच्या घराला हादरे बसतातच. घरातल्या सर्वांसाठी जगताजगताच आपल्या स्वतःसाठी एक वेळाचा तुकडा आणि पैशाचा छोटासा हिस्सा वेगळा ठेवू बघणारी स्त्री स्वीकारायला घरातल्यांना कष्ट पडतात. गंमत अशी की, घरातल्या विद्यार्थीदशेतल्या आपल्या मुलामुलींना पॉकेटमनी आणि वेळाची सुविधा देणारी आई हा विचार स्वतःसाठी करू शकत नाही आणि ती हा विचार करते तेव्हा तिचा नवरा आणि तिची मुलं कित्येकदा एकाच वेळी अडखळतात ! लग्न झाल्या दिवसापासून सासरची माणसं, मुलं यांच्यासाठी आपलं सारं काही देणारी स्त्री वयाच्या पस्तिशीनंतर एका पोकळीत पाकोळीसारखी भिरभिरू लागते. हे बेटी फ्रीडनचं अमेरिकेतील स्त्रीबाबतचं निरीक्षण आज भारतातील मध्यमवर्गीय सुशिक्षित स्त्रियांमध्येही प्रत्ययाला येऊ लागलं आहे. आपल्या स्त्रिया अमेरिकेतील प्रमाणानुसार घटस्फोट घेत नाहीत आणि तशी कुणाची इच्छाही नाही. आपणच निर्माण केलेलं घर असो, मूळ असो की, निर्जीव वस्तू असो— आपल्या हातानं तिचा नाश करणं अवघडच. तरीसुद्धा प्रतिकूल वातावरण, असमंजसपणा यातून अटळ आणि असह्य म्हणून घटस्फोट घेतला तर ती एक केवळ सुटका असू शकते. सतत थरथरत्या आणि घुसमटत्या वातावरणात घराचं घरपण तरी जिवंत कुठं असतं ? तिथली मनं रोज मरत असतात, मारत असतात. हे न व्हावं यासाठी पुन्हा सर्वांच्याच समजदारीला आवाहन करावं लागतं. घरं पडायला झालेली असताना, महानगरपालिकेनं त्यांचा धोका जाहीर

*With Best Compliments From :*

**SPARKONIX INDIA**

A-82, H-Block, MIDC Industrial Estate,
Pipmri, Pune 411 018

Phone : 83236

केलेला असतानाही ती पाडली नाहीत तर काय होतं हे आपल्याला माहीत आहे. म्हणूनच घराची अवस्था काय आहे, त्याची कारणं काय आहेत, ती तंदुरुस्त करण्यासाठी काय करता येईल याचा विचार प्रामाणिकपणानं करायला हवा. त्याला सामोरं जायला हवं. नुसता आरडाओरडा करूनही भागणार नाही. तसंच ती दणकट आहेत, त्यांना चीरसुद्धा गेलेली नाही म्हणत वास्तवाकडे पाठ फिरवूनही चालणार नाही.

स्वीडनमधल्या एका पुस्तिकेत घराच्या घरपणासाठी एक चांगला उपाय सुचवला होता. कष्टाच्या घराबाहेरच्या बाजारपेठेत पुरुष वाजवीपेक्षा अधिक प्रभावी झाला आहे. आणि घराच्या आत पुरुषापेक्षा स्त्रीचा

---

**स्त्रियांसाठी असलेल्या आणि प्रागतिक विचारसरणीच्या एका मासिकाच्या संपादकाला आलेलं हे बोलकं पत्र !**

## अंतर वाढतच गेलं !

लवकरच एका मोठ्या सामाजिक प्रतिष्ठेच्या व कीर्तीच्या पदावरून मी निवृत्त होईन. (माझ्या यजमानांचा स्वतंत्र धंदा आहे) घरच्या मंडळींचा विरोध पत्करून आमचा प्रेमविवाह झाला. त्या वेळी त्यांचे जे स्वभावविशेष मला 'गुण' वाटले ते आपल्या संस्कृतीच्या पारंपारिक पद्धतीनुसार 'गुण' होते. माणसाच्या वाढीच्या दृष्टीने खरे तर ते फार मोठे दोष आहेत; पण माझ्यावरील परंपरेच्या पगडयामुळे तेव्हा ते मला गुण वाटले हे निःसंशय खरे आहे. लग्नानंतर माझे शिक्षण पूर्ण झाले व आर्थिक गरजेमुळे मी नोकरी करू लागले. लग्नानंतरच्या पहिल्या दहा वर्षांत आर्थिक ओढाताण, मुले लहान असणे या सान्या गोष्टीत बौद्धिक वाढीसंबंधीचे कोणतेही विचार आम्हाला शिवले नाहीत. नंतर थोडासा स्थैर्याचा काल आला. माझ्या वैयक्तिक आवडी-निवडी, विचारातील खुलेपणा, बुद्धी व इतर स्वभावविशेष यांमुळे मी माझ्या नोकरीत वर चढले. तेथे अनेक विचारी मंडळींशी परिचय झाला व माझे जग मोठे होऊ लागले. माझ्या यजमानांचाही धंद्यात जम बसला; पण त्यांचा धंदा अशा प्रकारचा होता की, खुल्या जगातले प्रागतिक विचारांचे वारे त्यांच्यापर्यंत पोचणे कठीण होते. शिवाय भयानक पुरुषी अहंकार, विचारातील पारंपारिक सोवळेपणा, ह्यातूनच जन्मलेली नव्या विचारांना दूर ठेवण्याची वृत्ती यामुळे त्यांचे जग अतिशय मर्यादित राहिले. त्यामुळे त्या थोडयाशा स्थैर्याच्या काळात आमच्यातील कम्युनिकेशन वाढण्याऐवजी कमी होऊ लागले. दोन माणसात या प्रकारचे अंतर पडत गेले की, त्याचे मूळ कारण न शोधत वरवर मलमपट्टया करण्याचे प्रयत्न होतात व हे अंतर वाढत जाते. माझ्या नोकरीमुळे आधुनिक विचारांशी माझा परिचय होणे अपरिहार्य होते व जुन्या विचारांचा फोलपणा परत गेल्याने नव्या विचारांचा स्वीकार करण्याचा खुलेपणा माझ्यात होता. आमच्या दोघांतील वैचारिक अंतर जेव्हा वाढत गेले तेव्हा सुरुवातीला हे मान्य करणे मलाही कठीण गेले. (आपल्या पारंपारिक विचारपद्धतीचा, कुटुंबव्यवस्थेचा तो मोठा पराभव होता.) सुदैवाने व्यवसायामुळे घराबाहेर माझी ही वैचारिक संवादाची गरज भागत होती; पण घरातील प्रश्न त्यामुळे अधिकाधिक बिकट झाले. भारतीय पुरुषात अशा प्रकारचा पराभव मान्य करण्यास लागणारा प्रामाणिकपणा जवळजवळ नसतोच त्यामुळे तो अनेक मार्गांनी पत्नीचा मानसिक छळ करतो, अनेक प्रकारची भावनिक दडपणे आणतो. जेव्हा पुरुषाच्या वैचारिक गरजा वाढत जातात तेव्हा त्या घराबाहेर पूर्ण करण्यात परंपरेने कोणताही प्रत्यवाय येत नाही. स्त्रीच्या बाबतीत मात्र याच्या अगदी उलट घडते. (मुळात उच्च अभिरुचीच्या वैचारिक व मानसिक गरजा असलेली माणसेच कमी असतात. त्यामुळे त्या गरजांचे महत्त्व समाजाला पटत नसते. त्यातून स्त्री जेव्हा या मागण्या करते तेव्हा तर फारच कमी लोकांना ती मागणी खऱ्या अर्थाने समजू शकते.) माझ्या गरजा जोवर आर्थिक किंवा material गोष्टींच्याच होत्या तोवर माझे यजमान त्या भागवू शकत होते. त्यात त्यांचा अहंकार सुखावला जात होता; पण जेव्हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या पलीकडल्या गोष्टींची गरज निर्माण झाली तेव्हा आपला अपुरेपणा त्यांना मान्य करता आला नाही, हा केवळ पुरुषी अहंकाराचा परिणाम आहे. Material गोष्टींपलीकडच्या बौद्धिक, वैचारिक व मानसिक गरजा share करता येणे ही नवरा-बायकोसारख्या जवळच्या नात्यातील सर्वांत महत्त्वाची गोष्ट आहे, याचे शिक्षण भारतीय समाजाला जवळजवळ मिळालेच नाही. त्यामुळे ज्या थोडया माणसांना हे महत्त्व समजते त्यांच्याबद्दल नातेवाईक, आजूबाजूचा इतर समाज यांचे अनेक गैरसमज होतात हा सारा inveritable असा घटनांचा sequence आहे. त्यातून निर्माण होणारे मानसिक छळ व torture सहन करणे फार अवघड आहे. (अशा वेळी आपल्याच विचाराचे इतरही काही लोक आहेत ही जाणीव थोडीफार आशादायक आहे.) वैचारिक अंतर वाढत जाण्याने निर्माण होणाऱ्या अशा प्रकारच्या प्रश्नांना आपल्या मासिकात जर आपण प्रसिद्धी दिली व त्यावर वाचकांच्या प्रतिक्रिया मागवल्या तर अशा प्रसंगातून गेलेल्या किंवा जात असलेल्या आणखी काही स्त्रियांना आपली दुःखे वाचकांसमोर मांडण्याचा धीर येईल. दुसरे असे की, बहुतेक स्त्रियांचे प्रश्नही अद्याप फार पारंपारिक आहेत. त्यातल्या ढोबळपणापलीकडची स्त्रीची अशा प्रकारची subtle दुःखे जर सर्वच स्त्रियांना थोडीफार समजू शकली तर त्यांच्याही विचारांचे क्षेत्र वाढेल.

या सर्व प्रश्नांची आणखी एक नमूद करण्याजोगी बाजूही आहे. आमच्या conflict-च्या सुरुवातीच्या काळात आमच्या मुलांच्या reactions बाबत मी साशंक होते; पण ती वयात आली तेव्हा त्यांना इतर अनेक मुलांपेक्षा फार लवकर, जवळच्या माणसांमधील कम्युनिकेशनची गरज व ते नसल्यास उद्भवणारे प्रश्न या गोष्टींची जाणीव झाली. त्यामुळे माझे मुलांशी कम्युनिकेशन वाढले व प्रागतिक विचारांच्या parent कडे मुले ओढ घेतात हे मला दिसून आले. आपल्याच आई-वडिलांबाबतच्या अनुभवातून मुलांना फार मोठा फायदा झाला. ◻

प्रभाव नको तेवढा वाढला आहे हे तिथल्या घरं हादरण्याचं एक कारण शोधाअंती हाती आलं. त्या वेळी असं सुचवण्यात आलं की, घराचं दार अशासाठी उघडा की, फार वेळ घराबाहेर असणारा पुरुष थोडा घरात येईल आणि फार वेळ घरात राहाणारी बाई थोडी घराबाहेर पडेल ... घपाबाहेर पडणं म्हणजे लक्ष्मणरेषा ओलांडणं आणि आपणहून रावणाला निमंत्रण देणं असंही काहींना वाटतं; पण रावणांच्या भीतीनं लक्ष्मणरेषेच्या आत राहाण्यापेक्षा रावणांना सरळ करणारी समाजव्यवस्था आणण्याच्या दिशेनं प्रयत्न व्हायला हवा

घरांचे हादरे नवराबायकोइतकेच त्यांच्या मुलांमुळेही बसू शकतात. कधीकधी चाकोरीबद्ध संस्कार केल्यानंतर कित्येक वर्षांनी स्त्रीला रितेपण येतं. त्यातून शोध घेताना तिला जाग येते नव्यानंच. आपल्या आणि आपल्या मुलांच्या वाटचालीबाबत ती डोळस होते. आपल्या चुका, खाचखळगे मुलांबरोबरच्या संवादात मोकळेपणानं बोलते. कधीकधी मुलांकडूनही हा संवाद खुला होतो. मुलीनं स्वतःच्या निर्णयानं शिक्षणक्रम निवडणं, त्यात लग्न हा लक्ष्यवेध न ठरवता, आपली आवड, आपली कुवत यांचा विचार करणं, आपल्या लग्नाबाबतही रूढ कल्पनांच्या पलीकडचा पण आयुष्याची वाटचाल कसदार करायला साथ देणारा जोडीदार निवडणं, त्यासाठी आग्रह धरणं, हुंड्याला नकार देणं, एखाद्या सामाजिक चळवळीत जाण्याचा निर्णय घेणं हे सारं किंवा यातलं काही काही तिला मुलांकडून पुढ्यात येतं. कधीकधी हे आईलाही समजून घेता येत नाही, वडिलांनाही येत नाही. वाट मोडायला अवघड होतं आणि पुन्हा एकदा घरं हादरतात. दोन पिढ्या तशा रूढ अर्थानं एकाच विचाराच्या असूनही त्यात थोडीफार दरी असतेच. त्यातून तरुणपिढी कमीअधिक बंडखोर निघाली तर पुन्हा एकदा घरात खळबळ ! राजा बोले – दळ हाले असं न होता प्रजाच बोलायला लागते आणि मग बिचाऱ्या घराची पंचाईतच होते !

स्त्रियांना मतं आणि शिंगं फुटल्यामुळं घरं हादरताहेत म्हणणारी मंडळी आणि दलितांना सवलती दिल्यामुळं आमची संधी हिरावून घेतली जाते असा दावा करणारी मंडळी यांच्यात एकसारखेपणा आहे. माणसासारखी माणसं असूनही दलितांना आजवर नाकारलेली संधी मिळणं हा त्यांचा हक्क आहे. त्यात कुणी उपकाराची भावना ठेवण्याचं कारण नाही. तसंच स्त्रियांना नाकारलेली खुल्या जगात वावरण्याची संधी दिल्यानं घराची घडी बिघडते हे तात्कालिक वास्तव खरं असलं तरी त्याचा दूरगामी परिणाम घरं अधिक निकोप आणि मजबूत होण्यात होणार आहे हे समजून घ्यायला हवं. त्यासाठी घरात दलितांप्रमाणेच दडपलेल्या, मागास, अविकसित अशा मध्यमवर्गीय सुशिक्षित स्त्रियांना संधी देताना होणारी गैरसोय सहन करायला हवी. ती लवकरात लवकर दूर करण्यासाठी ‘घर’ या संकल्पनेचाच फेरविचार करायला हवा. स्त्रियांचे प्रतिक्रियात्मक उद्रेकही दडपून न टाकता बाहेर पडू द्यायला हवेत. म्हणजेच निकोप माणूसपण सर्वांना देणारी घरं उभी राहतील. ○


*With Best Compliments From :*

## M/s. S. N. GHARPURE

Unit No. 8 C – Block MIDC
Telco Road, Chinchwad, Pune 411 019

Phone : 82726

# घर चॉकलेटसारखं चघळायचं असतं काऽ

**या घरातले मोठ्यात मोठे प्रश्न म्हणजे आज पुडिंग बिघडलं, चंदेरी साडीचा रंग, फलाण्याची वसुली नि दारू...**

●

**अमरजा पवार**



जेव्हा आईवडील घरात ' तुम्ही मुली काय, दुसऱ्याची धन ' वगैरे बोलायला लागतात नि उरलेली तमाम मंडळी या म्हणण्याला जीऽजीऽ करतात तेव्हा साधारणपणे ते दुसरं घर कसं असावं याबद्दल अस्पष्ट, धूसर चित्रे डोळ्यापुढे साकारू लागतात. अर्थातच त्या वयात हे दुसरं घर म्हणजे नवरोबाचंच अशी कल्पना भरभक्कम असतेच. एरवी कोल्हापूरचा बंगला बारा–चौदा खोल्यांचा. बंगल्याभोवती एकरभराची मोकळी जागा आणि नंतर कडेकोट बंदोबस्ताचं काटेरी कुंपण. नाशि..च्या आजोबांचा बंगलाही असाच भला मोठा नि चहूबाजूंनी उभारलेल्या भिंती नि तडसरला काय. भला बंदिस्त वाडा नि गावच्या इनामदाराच्या वाड्याबद्दल गावात प्रचंड दरारा. दसऱ्याला आख्खं गाव आजोबांच्या, पपांच्या पाया पडायला यायचं तेव्हा आम्हा छोट्या मुलींच्याही पायावर डोकं ठेवून जायचं !


थोडक्यात रहातं घर मस्तपैकी संरक्षक, ऊबदार असं लुशलुशीत हिरवळ आणि कोवळ्या सूर्यप्रकाशानं बनलेलं. या घरातले मोठ्यात मोठे प्रश्न म्हणजे आज पुडिंग बिघडलं, चंदेरी साडीचा रंग आणखी लाईट हवा होता, फलाण्याची वसूली झाली नाही नि दारू. आजोबा, पणजोबांनी ठेवलेल्या बायका ' प्रश्न ' बनलेल्या नसल्यानं त्यांच्याबद्दल मला अलीकडेच समजलेलं. शिवाय पपा काका, चुलत–आते–मामेभाऊ असे भले सरळमार्गी की अनदर वुमनचा प्रश्न कोठेच नाही. तर घर असं स्थिर नि सुबक. त्यामुळे त्या दुसऱ्या स्वप्नातल्या घराचंही सुबकपणा नि स्थिरपणा हे वैशिष्ठ्य होतंच. त्या भल्या मोठ्या स्वप्नातल्या घरात वेळोवेळी बदल केले ते इंग्लीश मासिके पाहून, म्हणजे घरातील अॅरेंजमेंट नि कलरस्कीम मी वेळोवेळी बदलायचे. गार्डनमध्ये माळी असावा की मीच झाडं जोपासावीत याबद्दलही मी द्विधा होते. थोडक्यात काय तर घर म्हणजे दगड भिंतीचं सुबक बांधकाम नि घरातलं काय सगळं सुरळीतच असतं हीच माझी मुख्य कल्पना.

या दगडा-विटांच्या भिंती व्यावहारिक सुरक्षितता देत असल्या तरी चॉकलेटसारख्या खाता येत नाहीत की चघळता येत नाहीत

घर बनतं ते त्यात राहणाऱ्या माणसांच्यातील परस्पर संबंधानं. हे बंध जितके दृढ, जितके प्रामाणिक,समजदार तितकं घर अगदी जिवंत खरंखुरं, हे मला तुकड्या तुकड्यांनी जाणवत गेलं, उमजत गेलं. एरवी परक्या, सहज म्हणून आलेल्या स्त्री-पुरुषांच्या वाऱ्यानंही ही दगड-विटांची घरं हादरायला लागतात. वातावरण सुन्न बनवतात. आक्रमक बनतात, धास्तावतात. हा वाराही वादळी असला पाहिजे असं नाही. कधीकधी तर नुसत्या कल्पनेनेही अशा घरातले स्त्री-पुरुष घाबरे-घुबरे होतात नि पुढं सुरू होते ती अनंत घुसफुशींची, भांडणांची मालिका. या प्रकारचा धसका घरातली मुलं घेतात, इतर घेतात. हळूहळू मनानं, कणाकणानं मरतात नि व्यवहार असा असतो म्हणत म्हणत मनाला समजवतात. पायवाटा धुंडण्याचे तर सोडाच; पण राजमार्गानं चालतानाही खांदे झुकवून, मान तुकवून चालतात.

घरांचा मतलबी थंडपणा, हव्यासी आक्रमकपणा, तिडीक आणणारा अहं किंवा ऊबदारपणा माझ्या कधी लक्षात आला ? घरातली साधीसुधी वागणारी माणसं अशी जंगली पिसाळल्यासारखी का वागायला लागतात याचा मागोवा मी कधी घ्यायला लागले ? युनेस्कोच्या स्त्रियांच्या प्रश्नांसंबंधीच्या आंतरराष्ट्रीय परिषदेस आलेल्या ' आय अॅम निलिमा ' म्हणून ओळख करून देणाऱ्या पंचविशीतल्या तरुणीनं यू सी म्हणत म्हणत हातावरची भाजल्याची जखम दाखवली नि हे नवऱ्याचं कर्तृत्व म्हणून सांगितले तेव्हा ? की, निरेहून पळून आलेल्या त्या गोठपाटल्यावाल्या मारवाडी बाईनं नवऱ्याच्या नि सासूच्या छळाचं दुःख असह्य होऊन आत्महत्येचा निर्णय सांगितला तेव्हा ? की रोज वर्तमानपत्रात बायकोला पेटवली, गळा दाबला, पाटा डोक्यात घातला, भोसकलं अशा बातम्या वाचताना ? इंजिनिअर असलेल्या निताचा दुसऱ्या जातीच्या मुलाशी लग्न करण्याचा निर्णय ऐकून काय करावं ? घरातच आयसोलेशन कॅंपची शिक्षा, कसलीशी विभूती पाण्यातून द्यायचे नि रोज ब्रेनवॉशिंग. आम्ही तुझे शत्रू का आहोत ? आईवडील तुझे हितच करणार असे म्हणत म्हणतच त्यांनी निताला कणाकणाने मारली नव्हती काय ? तिची उमेद, तिच्या आकांक्षा निराशेत विरघळून जाताना घरचे सुखावले नव्हते काय ? क्लेवियाने विवाहित स्त्रियांना होणाऱ्या मारहाणीचा अभ्यास करून अहवाल प्रसिद्ध केला तो वाचताना किंवा वसुधाचा प्रकल्प चालू असताना सॅडिस्ट नवऱ्यांची मिळालेली माहिती ऐकून शहारले होते. ' ह्ये बघ सुमीताताई, मला नवऱ्यानेच चळवळीत आणलं आणि आता त्योच जर म्हणाया लागला की ह्ये काम सोड, तर मी काय म्हून ऐकून घेऊ ? मी पाड्यापाड्यावरच्या बायांची मीटिंग घेतली नि विचारलं,बायांनो, काम सोडू की नवरा सोडू ? साऱ्या म्हणाल्या आता चळवळ करू नको म्हणणारा नवरा काय कामाचा ? त्याला सोड अन् मी नवऱ्याला सोडला. आयुष्यातला अविभाज्य भाग बनलेल्या ठगीबाईने असा निर्णय घेतला होता. ठगीबाईला दाद देतानाच एकीकडे तिचा नवरा कसा बदलला असेल हा विचार मनात येत होता. विमल, राहीबाई, लक्ष्मीबाई अशा अनेक जणी घर कसं विचित्र क्रूर होऊ शकतं ते मी यांच्या अनुभवातून पाहिलं.

स्वतःच्या मनाजोगं जगायचं म्हटलं की, घराचा ऊबदारपणा, आपोआप मांडीवर टपकणारी रिस्पेक्टेबिलिटी हे अर्थातच सुंदर बनातल्या जोगिणींसारखं मागं ठेवावं लागतं. अर्थात हे आपल्याला करावं लागत नाही. बेदर्द जमानाच ही पिसं उपटून टाकतो, नि मग लक्षात येतं की, डोक्यावर सण्ण् ऊन्ह तळपतय नि पिवळधम्म उंच गवतात आपण उभ्या आहोत. आता भेटणारे समुदाय हे भिन्न थरातील आहेत. ते मला स्वीकारताहेत ती पद्धतही पूर्वीपेक्षा वेगळी आहे. मग रहाण्यासाठी चार भिंतींची शोधाशोध सुरू झाली. प्रथम होस्टेल. हे लोक तुम्हाला सुरक्षितता देतो म्हणत म्हणत इतके वैताग आणतात नि आपलं सार्वजनिकीकरण करून टाकतात की बस्स ! नंतर मग भाड्याच्या चार भिंतींचो शोधाधोध सुरू झाली. आपली भाडं देण्याची कुवत शे–दोनशेपलीकडे नाही हे लोकांना समजले की आपोआपच अशी एकही खोली पृथ्वीतलावर नाही अशा निष्कर्षाला येण्याइतपत जोरदार नकार घ्यावे लागतात. अर्थात प्रत्येक घर नकार देताना वेगवेगळ्या प्रकारे द्यायचे, वेगवेगळी कारणे सांगायचे. त्यांच्या खुळचट सावधगिरीने मेंदू बंद पडणे वगैरे स्वाभाविक



क्रिया व्हायच्याच.

या प्रकारातही माझी कुतरओढ व्हायची. घरी, आजोळी गेलं की, तिथे भाडेकरू ठेवलेले, त्यांच्याबद्दल किंवा कंपाउंडमध्ये येऊन कैऱ्या, गुलाब पळवणाऱ्यांविरुद्ध आमची चिडचिड असायची नि पुण्यात आले की, लोक भाडेकरूंना असं हाडहाड का करतात वगैरे प्रश्न पडायचे.

एकीकडे असे नकार घेत असतानाच खुल्या दिलाने, आभाळाचे बाहू करून मला बोलावणारी घरंही भेटली. ही घरं खुल्या दिलाची होती, प्रामाणिक होती. आपलं–आपलं करत घरातला वाराही कुबट बनवणारी नव्हती. ही घरं मध्यमवर्गीय जशी होती तशीच झोपडपट्टीतलीही होती. या घरातल्या स्त्री-पुरुषांचा परस्परांवर विश्वास होता. आत्मसन्मान नावाची चीज असते हे त्यांना मान्य होते. यातली काही घरं चळवळीची होती. थोडक्यात काय तर पंधरा लाख लोकवस्तीच्या पुण्यात मला आढळलेली ही घरं अत्यंत संवेदनाक्षम होती. किती बाय कितीची जागा नि मंथली इन्कम ह्या बाबी तिथे गौण होत्या. आश्चर्याची गोष्ट अशी की, घरातलं वातावरण असं ऊबदार हवंहवंसं बनवण्यात त्या घरातल्या स्त्रीचा पुढाकार होता.

नि माझ्या घराबद्दलच्या स्वतःच्या कल्पना यातून नि अशा स्पष्ट होत गेल्या. मधल्या काळातल्या अस्थिरतेनं त्या इतक्या बदलल्या की, गृहिणींना किंवा अकरा ते पाच करणाऱ्यांना ज्या पद्धतीनं नि ज्या तीव्रतेनं घर हवं असतं, तशा पद्धतीनं सध्याच्या गतिमान आयुष्यात मला हवंसं वाटेल काय असा प्रश्न पडला. कामामुळं आंघोळ एका घरी, जेवण दुसरीकडे, झोपायला तिसऱ्याच घरी नि चर्चेला चौथ्या घरी असं घडत गेलं. बरं, ही सर्व घरं सारख्याच तीव्रतेनं ओढ लावणारी. थोडक्यात काय, तर चार भिंतीत रहाणाऱ्यांना नि त्या भोवतालच्यांना महत्त्व

असतं हे जाणवू लागलं. दुसऱ्याच्या घरीही मला घरच्यासारखं वाटू लागलं!

अठरा–वीस वर्षांची अनु नोकरी नसतानाही घटस्फोट घेण्याचा निर्णय लग्नानंतर सहा महिन्यांतच घेते. इतकंच नाही तर आई वडिलांचा पाठिंबा नसताना आपला निर्णय पेलून दोन महिन्यात चारदा रक्तदान करून पैसे मिळवते. व्रशचे फटकारे ओढत असताना आयुष्यातल्या या उलथापालथीचं, नैराश्याचा एकही फटकारा कॅनवासवर उतरत नाही. हे सारं तो माणूस, ते घर नको हे तिला कुठल्या तीव्रतेनं वाटलं असेल त्याची अंधुक कल्पना आपल्याला येऊ शकते. विमलनं गळ्यातली काळी पोत फेकून नांदायला नकार दिला तेव्हा ती किती त्रासलेली असेल इत्यादी इत्यादींची कल्पना हळूहळू भिनत गेली. घर नि संसारप्रकरणाची नशा, त्या जुगारातली जिद्द नि आशावाद तुकड्यातुकड्यांनी मला कळत गेला.

झोपडपट्टीत मोलकरणींच्यात, स्त्री–अत्याचारविरोधी मंचाचे काम करताना एक बाब ठळकपणे जाणवली. झोपडपट्टीतील अनेक स्त्रियांच्या गळ्यातली नवऱ्याच्या नावाची काळी पोत, नि त्या घराचे घरपण टिकले आहे ते केवळ त्यांच्याच निर्धारावर! एरवी, त्यांना जो त्रास होतोय, जी वागणूक मिळतेय ती पहाता या घरांना फार दिवस भवितव्य नाही. पिणाऱ्या नि कमीत कमी जबाबदारी उचलणाऱ्या नवऱ्याचा संसार स्वतःच्या ताकतीवर रेटणाऱ्या या स्त्रिया कोणत्याही क्षणी नकाराचा निर्णय घेतील आणि या किंवा दुसऱ्या झोपडपट्टीत सिंगल पेरेंट फॅमिली उभी राहील. घटस्फोट, काडीमोड, नांदायला न जाणं, माहेरी पाठवणं, आत्महत्या हे सर्व पाया हादरलेल्या घरांचे दृश्य परिणाम. पोटगीसाठी करावी लागणारी वणवण, खर्च, यातायात पहाता आजकाल कष्टकरीवर्गातील फारच थोड्या स्त्रिया कायद्याने दिलेला हा हक्क वापरताना दिसतात अखेरचं भांडण करावं, ढेंगकन उठून त्या साऱ्यावर लाथ मारणे आणि बायको / नवऱ्याने आपल्याला हवे तसे घर उभारणे असा आजचा घटनाक्रम आहे. आपला अहं संभाळत दुसऱ्या व्यक्तीला ते भकास घर संभाळत, आपणच घोष केलेल्या मूल्यांना जपत, आपली सत्ता जाणवून देत बसावे लागते.

तरटांच्या, कच्च्या विटांच्या भिंतींच्या आड हे जे काही घडत असतं त्याला घरातील स्त्री–पुरुषच केवळ जबाबदार असतात असं नाही. समाजातील इतर प्रवाहही त्यावर परिणाम घडवत असतात. पुरुषी वर्चस्व, कल्पनांचा बुजबुजाट, पत्नीच्या चारित्र्यावद्दलचा संशयकल्लोळ, माझी वस्तू माझीच राहिली पाहिजे, ही बाईला वस्तू समजणारी कल्पना नि ती वस्तू दुसऱ्याची तर झाली नसेल ना हा संशय शिवाय समाजातील आर्थिकदृष्ट्या खालच्या स्तरातील असल्याने वाट्यास आलेल्या जीवनमानामुळे आलेले वैफल्य. आज मुलगा पळून गेला, उद्या एकाला ट्रकने धडक दिली, कुणाला पोलिसांनी पकडलं, रोजच्या जीवन झगड्याखेरीजचे असे मोडून टाकणारे विविध अनुभव. तरीही उद्याचा दिवस काढायचाच ही जिद्द या कच्च्या भिंतींना असतेच. हक्काची वस्तू पत्नी वा मुले समजल्यामुळे राग व्यक्त करण्याची तीही हक्काची जागा होऊन बसते. झोपडपट्टीतल्या घरांचे घरपण हे असे मुलांप्रमाणेच आर्थिक परिस्थितीवर अवलंबून असते.

*With Best Compliments From :*

**DEVAL UTENSILS FACTORY**

15/5 Karve Road,
Pune 411 004

Tel. : 30091

घरं हादरवून टाकणारा आणखी महत्वाचा घटक म्हणजे 'अनदर वुमन.' हा घटक मध्यमवर्गीय सुबक ठेंगण्या घरातही दिसतो. उच्च वर्गात तर हटकून आढळतोच. झोपडपट्टीतल्या बहुतेक घरात या घटकाचे अस्तित्व अपरिहार्य बनले आहे. सुबक, टिकाऊ मध्यमवर्गीय घरातील या घटकांचे अस्तित्व हे बरेचसे काल्पनिक आहे. या बायकांना, आपल्या नवऱ्याचं दुसऱ्या बाईशी कम्युनिअन आहे ही कल्पना म्हणजे रेचकच ठरते! त्यावरून सतत खिचखिच चालूच असते. घटस्फोटांच्या कारणांची छाननी केली तर असे आढळेल की, जितके घटस्फोट दुसऱ्या स्त्रीच्या अस्तित्वामुळे झाले आहेत त्यापेक्षा किती तरी अधिक संख्येने घरात त्या संदर्भात कडाडून भांडणे झाली आहेत, त्या बाबतीत अनेक घरांनी मनाचे कप्पे बंद केले आहेत. ह्युमिलिएशन सहन केले आहे. मध्यमवर्गीय घरातील घटस्फोटांचे सर्वे–बिव्हें होतात; परंतु आपले असे झाले हे लाजिरवाणेच किंवा कशाला सांगायचं या खुळचट कल्पनांनी लपवालपवीच करण्याकडे कल दिसतो. मात्र तरुण मुलंमुली बऱ्याच बिनधास्तपणे आपल्याला न आवडणारी व्यक्ती नि चार भितींची सुरक्षितता सोडल्याचे बोलून दाखवतात.

'घरं टिकतात ती स्त्रीच्या परमपवित्र त्यागामुळं' वगैरे वगैरे सुविचार अनेक थोर लोक सांगत असतात. दुसऱ्यावर जबाबदारी ढकलण्याची ही परंपरा जुनीच आहे; परंतु आजच्या गतिमान जगात स्त्रियांनाही बऱ्यापैकी जाणिवा होत असताना त्या त्याग फार काळ करतील अशी शक्यता नाही. ज्या सुरक्षिततेसाठी त्या त्याग करून गप्प बसायच्या ती सुरक्षितता बरीच फसवी आहे हे त्यांनाही उमगू लागले आहे. त्यांनी सेटस ऑफ वुमन संबंधीचा अहवाल वाचला नसला तरी घरात आपल्याला सासू, सासरा, दीर, मुलगा, नवरा हे काय किंमत देतात ते त्या जाणत आहेत. घरातले काम नि रोजगार असा दुप्पट ताण सहन करत असताना घरात जर त्यांच्या वाट्याला मारहाण, अपशब्द येणार असतील तर या स्त्रिया काळी पोत गळ्यात नसण्याचे दुःख नि एरवी सारे जग आपल्याला खाऊन टाकेल अशी भीती फारशी मनाला लावून घेतील असा गैरसमज बाळगण्याचेही कारण नाही.

पुरुषांच्या मीच स्वामी या अहंवृत्तीच्या ताठर भूमिकेमुळे नि स्त्रियांना मिळणाऱ्या वागणुकीमुळे झोपडपट्टीत यापुढील काळात सिंगल पेरेंट फॅमिलीज उभ्या रहाण्याची शक्यता आहे. अर्थात हे सर्व स्वेच्छेनं स्वीकारलेलं नसेलही; अपरिहार्यतेतून आलेलं असू शकेल. एकत्र कुटुंबपद्धती नामशेष होऊ लागली नि कुटुंबव्यवस्था धोक्यात आल्याची हाकाटी सुरू झाली होती. त्या काळाची ती धास्ती होती. काळ आणखी पुढे गेलाय. मुलांना किंवा आईभावंडांसह राहून कुटुंबाची जबाबदारी स्वीकारणाऱ्या नि वैताग देणाऱ्या नवऱ्याचं घर नाकारणाऱ्या स्त्रियांची संख्या वाढत आहे. यातही गुंतागुंत आहे. लग्न केलं म्हणजे जबाबदाऱ्या आल्या. एका नव्या स्त्रीच्या स्वप्नांची मग मुलांबाळांच्या आकांक्षा पूर्ण करणे आले. तुटपुंज्या मजुरीत हे सारे जमवणे झोपडपट्टीवासियांना कठीण जाते. लग्नाची बायको जास्त डिमांडिंग असते. ते आज अनेकांना परवडत नाही. त्यामुळे लग्न न करताच पती–पत्नी म्हणून रहाणाऱ्यांची संख्या वाढत आहे. ते मुलं होऊ देत नाहीत असं नाही; पण लग्नाची बायको नसली की, हा प्रश्न व इतर प्रश्न पुरुषाच्या मर्जीवर अवलंबून रहातात. मग प्रकरण हँडल करणे अधिक सोपे जाते; परंतु असे रहाणाऱ्या अनेकांचे संसार सुरळीत चालू आहेत. जमाना आपला ठेवलेली। ठेवलेला वगैरे विशेषणे लावत असला तरी हेच त्यांचे कुटुंब आहे. असे संसार उभारणाऱ्यांपैकी अनेक स्त्री–पुरुष विवाहित असतात. पहिली जबाबदारी त्यांनी झटकलेली असते हा याचा आणखी एक पैलू. रूढार्थाने याचं विश्लेषण करायचं म्हटलं तर घरं हादरतच नाहीत तर ती ढासळत आहेत. कारण त्यांचा पायाच इतका भुसभुशीत आहे की, तेच त्यांचे भवितव्य आहे. यात अर्थातच आर्थिक स्थितीचा वाटा मोठा आहे. परिणामी मानसिकतेवरही त्याचा प्रभाव आहे.

तसं पहायला गेलं तर ओल्या। कोरड्या दुष्काळानं घरणग्रस्त म्हणून, रोजगारासाठी किंवा दलित म्हणून किंवा इतर कारणांनी गावं सोडून स्थलांतरित होण्याची पाळी ग्रामीण दुर्बल घटकातील स्त्री–पुरुषांवर येत आहे. असं असताना त्या थरातील स्त्री गळ्यातील काळी पोत अथवा सर्वार्थानं दुर्बल ठरणाऱ्या नवऱ्याकडून मानसिक वा शारीरिक सुरक्षिततेची कसली अपेक्षा ठेवणार?

एक मात्र खरं की, चार भिंती उभारल्यानंतर त्याही एक राजकारण खेळतात. फॅमिली पॉलिटिक्स. नवरा, दीर, सासू-नणंदाचीही गेम असते. या प्रकारात स्त्री बऱ्याचदा मोडते; पण घरातच रहाते. पर्याय कुठे ठाऊक असतात? आई, वडील, भाऊ, बहिणींचंही राजकारण असतं. मुलांच्या बाबतीत हे फारसं वापरलं जात नाही. मुलींच्या बाबतीत मात्र आमच्या म्हणण्याप्रमाणे वाग नाही तर ..असं म्हणत सर्व सुखसोई, प्रेमळ छत्र वगैरे काढून घेतात आणि नव्या पिढीला हे उमगू लागलं आहे! हे आहे सुरक्षिततेचं आमिष दाखवून केलेलं राजकारण! ○


*With Best Compliments From*

**MARATHE TRADING AGENCY**

**Printed Polyester & Cotton Dress Material, Dhoti and Long Cloth : MARATHE FABRICS**

*Head Office :*
Post Box No. 85,
Narayan Peth.
ICHALKARANJI.
( Dist. Kolhapur )
PIN : 416 115.
Phone : 3 4 8 4
Gram : " MARATHE "

*Sales Office :*
Shop No. 3,
12, Champa Galli,
Cross Lane,
BOMBAY–400 002.

Phone : 295387

# कृष्णा सहकारी बँक लि., रेठरे बुद्रुक

पो. शिवनगर, ता. कराड, जि. सातारा

**कृष्णा सहकारी साखर कारखान्याच्या परिसरात**
**हरितक्रांती व धवलक्रांती घडवून आणून**
**शेतीविकासाबरोबरच गोपालन व कुक्कुटपालन तसेच**
**लघुउद्योगधंद्यांसाठी सढळ हाताने आर्थिक सहाय्य करणारी**

**एकमेव बँक**

प्रगतिपथावरील अकराव्या वर्षातील वाटचाल

| | | |
|---|---|---|
| (१) भागभांडवल | रु. | ४,०१,००० |
| (२) गंगाजळी व इतर निधी | रु. | १,०२,८३,००० |
| (३) ठेवी | रु. | ६,७३,६५,००० |
| (४) कर्जे | रु. | ३,१२,५५,००० |
| (५) गुंतवणूक | रु. | ४,७३,०५,००० |
| (६) नफा | रु. | २८,००,००० |
| (७) खेळते भांडवल | रु. | ८,७७,०५,००० |

सर्व प्रकारचे बँकिंग व्यवहार
प्रधान कार्यालयाकडे लॉकरची सोय

इस्लामपूर, कराड, काले व वांगी
शाखातून सेवेची संधी

प्रभाकर रामचंद्र महाजन
व्यवस्थापक

लक्ष्मणराव नारायणराव कुलकर्णी
व्हा. चेअरमन


संपतराव बहिरु मोरे
चेअरमन

# माझं होणारं घर

**लग्न म्हटल्यावर 'अय्या', 'इश्श' म्हणून अंगठ्यानं माती उकरायची नाही तर पदर सावरण्याची वेळ आता निघून गेली आहे...**

●

**मेधा टेंगशे**



आम्हा 'हॉस्टेलवासियां'च्या आयुष्यात एखादा दिवस मोठा मजेशीर येतो. संध्याकाळची वेळ असते – कधी नव्हे ते आमचा ग्रुपचा ग्रुप घरी असतो – संध्याकाळची कातरवेळ, घरच्यांपासून लांब राहिल्याबद्दल ('हॉस्टेल–लाइफ'ची सवय होऊनही) तीव्रतेने वाटणारी खंत, भविष्याबद्दलची एकाच वेळी वाटणारी उत्सुकता आणि असुरक्षितता या साऱ्या भावभावनांचं चमत्कारिक मिश्रण झाल्यामुळे एरवीच्या उत्साही, आनंदी वातावरणाची जागा गांभीर्याने घेतलेली असते ... वर्षानुवर्षे एकत्र राहिल्याने गुपितं फारशी लपविता येत नाहीत – यामुळे असेल पण एखादीचा 'दाखविण्याचा' कार्यक्रम – आई–वडिलांच्या जावयाबाबतच्या लौकिक गोष्टींवर भर देणाऱ्या अपेक्षा आणि त्याहून वेगळ्या अपेक्षा असल्यामुळे एखाद्या मैत्रिणीची होणारी कोंडी त्या गांभीर्यात अधिकच भर घालते–कारण अशा स्वरूपाची कोंडी तिचीच नसते – 'परीकथेतल्या राजकुमारा'चं स्वप्न पहाण्याचं वय सरलं आहे– आयुष्यात अनेक टक्केटोणपे खाल्ल्यामुळे पाय 'जमिनीवर स्थिरावले आहेत – त्यामुळेही असेल पण 'लग्न', संसार' म्हटल्यावर 'अय्या', 'इश्श' म्हणून अंगठ्यानं माती उकरण्याची अगर पदर सावरण्याची वेळ निघून गेलेली आहे. उलट या दोन्हीही गोष्टी आपल्या आयुष्यातील अटळ टप्पा आहेत आणि त्या दृष्टीनं विचार करणं, निर्णय घेणं फार काळ टाळता येणार नाही– याचंही भान आलेलं आहे आणि म्हणूनच या साऱ्या गोष्टींची एकाच वेळी जाणीव करून देणारी ही संध्याकाळ मनाला मोठी अस्वस्थ करणारी असते ... अर्थात या गप्पा फारच गंभीर होऊ लागल्या की, आम्ही विषयांतर करतो आणि 'आपण त्या प्रश्नाला कशी बगल दिली' या समाधानात नेहमीच्या आनंदी वातावरणात बुडून जातो ...

परवाही तसंच झालं; पण विषयांतर करूनही माझ्या मनातला तो विषय जाईना. आतापर्यंत आपण मैत्रिणींशी लग्न, संसार या विषयावर खूप गप्पा मारल्या; पण प्रत्येकीचं आपल्या 'भावी' संसाराबद्दल, जोडीदाराबद्दल, मुलांबद्दल किंबहुना एकूणच कुटुंबव्यवस्थेबद्दल काय अपेक्षा असतील – या मुळापर्यंत आपण फारशा गेलोच नाही ...

असं वाटत राहिलं.

म्हणूनच त्याबाबत प्रत्येकीशी स्वतंत्रपणे गप्पा मारायचं ठरवलं आणि त्यातूनच हा लेख तयार झाला.

'मला नवऱ्यानं त्याच्या 'बिझिनेस'च्या बाबतीत विचारलं नाही तरी चालेल; पण माझ्या दवाखान्याबाबत मात्र मीच निर्णय घेणार. कारण 'बिझिनेस'च्या बाबतीत घरातल्या बायकांना पुरुष विचारत नाहीत. आमच्याकडेही तीच पद्धत. त्यामुळे मला त्याने त्याबद्दल विचारले नाही तरी फारसं काहीच वाटणार नाही ...'

भावना बोलत होती. 'होमिओपथी'च्या अखेरच्या वर्षाला असलेली ही जैन समाजातील तरुणी. वर्गात पहिली येणारी 'भावना' लग्नानंतरही वैद्यकीय व्यवसाय चालू ठेवावा या मताची; परंतु 'करिअर'च्या बाबतीत ते पुढे वाढवायचे की नाही याबाबतीत एकूणच त्या वेळच्या परिस्थितीवर अवलंबून आहे पण आता तरी मोठे हॉस्पिटल काढावे, असे वाटते – असे प्रांजळपणे सांगणारी.

'जोडीदाराची निवड हा कुटुंब-व्यवस्था सुरळीत रहाण्याचा महत्त्वाचा भाग मग त्याबाबतीत तुला काय वाटते?' या प्रश्नाला उत्तर देताना ती म्हणाली – माझे आई-वडील जे स्थळ पाहतील ते चांगलेच असणार. त्यामुळे ते जो मुलगा सुचवतील त्याच्याशी लग्न करेन. तो जातीतलाच हवा. मात्र पुढे दवाखाना चालवावा की नाही वगैरेबाबत मी त्याच्याशी लग्नापूर्वीच बोलेन.

लग्नानंतर एकत्र कुटुंबपद्धत अधिक आवडेल पण व्यवसाय संसार या धावपळीत सर्वांचेच (सासरच्यांचे) सहकार्य मिळायला हवे, अशी अपेक्षा तिने व्यक्त केली. मुलांना वळण लावणे, त्यांच्या भवितव्याबाबत निर्णय घेणे यात आपल्याबरोबरीने नवऱ्याचाही सहभाग असायला हवा, असे तिचे म्हणणे होते.

बोलता बोलता विषय लग्नानंतरच्या माहेरच्या लोकांशी संबंध ठेवण्याबाबतचा निघाला. तो म्हणाली – आमच्या घरचे लोक इतके चांगले आहेत की, माझा नवरा त्यांच्यात लगेच सामावला जाईल. त्यातूनही माहेरच्यांच्याबाबत तो फारसा अनुकूल नसला तर त्याला माहेरच्यांची बाजू पटवून देण्याचा प्रयत्न करेन; पण माहेरच्यांच्या निमित्ताने आमच्या दोघांच्यात अगदी अटीतटीची वेळ आली, घर तुटण्याची पाळी आली तर मात्र मी माहेरचे संबंध तोडेन...'

जैनधर्मीय समाजाचे ठाशीव संस्कार घेऊन आलेल्या भावनेला प्रेमविवाह आणि आंतरजातीय विवाह अमान्य होता आणि संसाराच्या तुलनेत 'करिअर' ही गौण गोष्ट वाटत होती. लग्नानंतर बाहेर वावरणे, पुरुषांशी संपर्क ठेवणे यावर येणाऱ्या मर्यादा विनातक्रार स्वीकारताना ती म्हणाली – मला पद्धतीच्या बाहेर जायला आवडत नाही. उलट 'जेन्टशी' जास्त न बोलण्याची आमच्या समाजातील पद्धतही मला मान्य आहे ... ' गप्पांच्या अखेरीस – महत्त्वाच्या निर्णयाबाबतीत माझे मत अखेरीस कुठल्याही बाबतीतील (विशेषत: डिस्पेन्सरी, करिअर) हे त्या त्या परिस्थितीवर अवलंबून राहील असेही तिने सांगितले.

वसुधा! भावनाच्याच वयाची; पण पूर्णपणे वेगळ्या वातावरणात वाढलेली. महाराष्ट्रीय समाजातील एका पुरोगामी वातावरणात वाढलेली, विद्यार्थीसंघटनेची कार्यकर्ती असलेली ही वसुधा अर्थशास्त्राची विद्यार्थिनी आहे. त्या दोघांच्या दृष्टिकोनाबाबतीतील साधर्म्य, फरक जाणून घेण्याची उत्सुकता होती...

तिच्याशी बोलता, बोलता– 'एकत्र कुटुंबपद्धतीमुळे सुनांची मुस्कटदाबी होते, असे नाही का तुला वाटत?' असा प्रश्न निघाला. कारण तिला एकत्र कुटुंबपद्धती अधिक पसंत होती. ती ठामपणे म्हणाली– 'ज्याला 'स्वत्व' आहे आणि ते टिकवायचे आहे, तो ते कुठेही टिकवेल. मला त्याबाबतीत एक उपाय सुचतो तो हा की, एकत्र कुटुंबात जो निर्णय संपूर्ण कुटुंबासंबंधी घ्यायचा तो निर्णय 'सामूहिक' रीतीने घ्यावा; पण जो निर्णय कधी माझ्याशी अगर माझ्या नवऱ्याशी निगडित आहे तो पूर्णपणे व्यक्तिगत असावा. हे स्वातंत्र्य आम्हाला दोघांना जसे हवे तसे आमच्या सासुसासऱ्यांनाही असावे. म्हणजे कुणीच कुणाच्या आयुष्यात ढवळाढवळ करण्याचा प्रश्नच येणार नाही '

तिने उपस्थित केलेल्या स्वत्वाच्या मुद्द्यावरून मी तिला आर्थिक स्वावलंबनाबाबत विचारले. ती म्हणाली– 'मला आठ–आठ तास करावी लागणारी चाकोरीबद्ध नोकरी नको. त्याऐवजी मला एखादा व्यवसाय करायला आवडेल ' घरगुती कामातील नवऱ्याच्या सहभागाबाबतचा प्रश्न त्यामुळे आपोआपच निघाला. ती म्हणाली– 'मी नोकरी अगर व्यवसाय करीत असेन तर त्याने मदत करावी. एरवी अपेक्षा नाही...' मी तिला अडवत म्हटले– 'पण संसार तुझ्याप्रमाणेच नवऱ्याचाही आहे ना मग त्याने नको का त्यात सहभागी व्हायला?' ...तिनं आपल्या मुद्द्याचं स्पष्टीकरण करताना म्हटलं– 'संसाराची आर्थिक बाजू तो सांभाळणारच की. ती कामाची विभागणीच म्हणायला हवी–त्यानं आर्थिक बाजू सांभाळावी आणि मी घरकामाची. निर्णय वगैरेच्याबाबतीत आम्ही दोघे मिळूनच निर्णय घेऊ. बाहेर जाऊन मी आर्थिक कमाई केली नाही तर त्याने मला घरगुती मदत करावी, अशी अपेक्षा मी नाही बाळगणार...नाही तर त्याच्यावर कामाचा ताण पडेल, त्याच्यावर अन्याय होईल आणि तिथे मग 'पुरुष–मुक्ती'ची गरज लागेल...' वसुधा मिष्किलपणे हसत म्हणाली.


'माझ्या आईवडिलांनी जसं आम्हा मुलांना खूप 'प्रोटेक्ट' लंय केसं मी माझ्या मुलांना करणार नाही. ठेचकाळत का होईना; पण त्यांचं त्यांनी अनुभवातून शहाणं व्हावं...' 'सीमा' आपल्या मुलांबाबतच्या अपेक्षा व्यक्त करताना म्हणाली. वयाच्या वीस–वीस वर्षांपर्यंत मुलांना आई–वडिलांनी संरक्षित करणे ही कल्पनाच तिला पटत नव्हती. असे वाटण्याला कारणही तसेच होते तिने आपली वाट आपणच शोधून काढली होती घरी राहूनही स्वतंत्रपणे जगणारी–कमी पगारापासून सुरुवात करून आता आता स्थिरावलेली ही सीमा जर्मन घेऊन बी. ए. झाली आहे. त्यानंतर ग्रंथपालाचा कोर्स केला. आता मुंबई विद्यापीठाचा पत्रकारितेचा डिप्लोमा करते आहे तिच्याशी मारलेल्या संपूर्ण गप्पात– आपली वाट आपणच शोधायला हवी–ती शोधताना, एखादा निर्णय घेताना त्याबरोबर त्यासाठी किंमतही मोजायला तयार हवं, या विचाराबाबत ती ठाम होती.

प्रचलित समाजव्यवस्था, लग्न, कुटुंब या संकल्पनांबाबत ती बंडखोर वाटली. ती म्हणाली– 'खरं तर, आता अगदी

स्वतंत्रपणे जगताना लग्न, कुटुंब यांची गरजच वाटत नाही. अर्थात या माझ्या आताच्या भावना आहेत. जर मी लग्न करायचं ठरवलं तर ते माझ्या आवडी–निवडीनुसार करेन–आईवडिलांच्या नव्हे... आणि हो, माहेर अगर लग्नानंतरचं आपलं घर यावद्दलच्या आजच्या कल्पना मला मान्य नाहीत. लग्नानंतरही प्रतिकूल परिस्थिती माझ्यावर आली तर आई–वडिलांकडे जायला मला आवडणार नाही–मी माझं स्वतःचं घर तयार ठेवेन, त्यासाठी आवश्यक तरतुदी करेन आणि लग्नानंतरही (संसार सुरळीत असताना) त्या घराची देखभाल करेन...'

तिने, 'लग्नानंतरचं मूल' ही कल्पनाही नाकारली. ती म्हणाली– 'याबाबतीत सतत समाज काय म्हणेल ? याचा बाऊ केला जातो; पण समाज म्हणजे तरी कोण ?–जर लोक स्वतःचा निर्णय घेताना माझा विचार करत नाहीत तर मी का करावा ?' या तिच्या प्रश्नावर पण 'तुझ्या मुलाचे भवितव्य काय ?' कारण अजूनही कुमारी माता ही संकल्पना फारशी रुळली नाही–अशा वेळी आपल्या इच्छा, तत्त्वांसाठी आपल्या मुलांचा बळी द्यायचा का ?' असे स्पष्टच विचारले. ती म्हणाली– 'मेधा, मी त्याला वेगळ्या पद्धतीने वाढवणार म्हटल्यावर त्यातच सर्व आले की !'

तिने अशी भूमिका घेतल्यावर विवाह–व्यतिरिक्त संबंध ('विवाहबाह्य संबंधा'त विवाहानंतरचा संबंध ही कल्पना गृहीत धरलेली असते. इथे विवाहव्यतिरिक्त संबंध म्हणूनच हेतुपुरस्सरपणे वापरला आहे. 'विवाह–व्यतिरिक्त संबंध' या शब्दात



'विवाहविना (एकनिष्ठ) संबंध' असा अर्थ अभिप्रेत आहे.) निर्माण होण्याच्या शक्यते-बाबत मी तिला विचारलं. ती म्हणाली, 'यात कदाचित विवाहित पुरुषाशी संबंध येण्याची शक्यता आहे. तसा संबंध आला तरी मी त्याच्या कौटुंबिक आयुष्यात ढवळा-ढवळ करणार नाही. त्याचं आयुष्य तो जगेल आणि माझं मी... असा विचार कर-ण्याचे कारण कदाचित माझ्यावर झालेले संस्कार हे असेल आणि दुसरं म्हणजे माझा 'सेल्फ–कॉन्शस' दुसऱ्याच्या सुखाला, हिताला बाधा येऊन मला सुखी व्हायचे नाही...' ती पुटपुटली.

सीमाचा लग्न, कुटुंब एकूणच संसारा-विषयीचा दृष्टिकोन मला धाडसी, बंडखोर वाटला; पण अविवेकी वाटला नाही. तिची ती मते कुणाला पटोत न पटोत; पण तिच्या बऱ्याच सहवासातून जाणवले ते हे की–पाश्चात्य संस्कृतीच्या आकर्षणातून केवळ नाविन्याच्या ओढीने तिने ही भूमिका स्वीकारलेली नाही. स्वतःशी प्रामाणिक राहून विचारपूर्वक, ठामपणे स्वीकारलेल्या या मतासाठी किंमत देण्याचीही तिची तयारी दिसली.

सध्याच्या कुटुंबव्यवस्थेबाबत इतक्या टोकाची भूमिका तिने का घ्यावी ? हा प्रश्न मला होताच. ती एवढंच म्हणाली– 'मला घरात लहानपणी मिळालेली वागणूक–दुसार लहान भावंडांमुळे माझी केलेली किंवा घरच्यांकडून झालेली उपेक्षा यामुळे माझी अशी मते बनली असावीत– असे मला वाटते .? सीमाने स्पष्टीकरण दिले. मला यावर काहीच प्रत्युत्तर देता आले नाही !

'माझ्या मुलामुलींना समान वागवेन हे खरं; पण त्याबरोबर मुलीचा सासरी उद्धार होता कामा नये म्हणून तिला थोडं वेगळं वळण लावेन. माझी आई जे मला पूर्वी म्हणायची किंवा आताही म्हणते की, 'चार-चौघात जास्त वावरायचं नाही, तुझं लग्न व्हायचंय ? हे मलाही पटतं– माझ्या मुलीला मी हेच सांगेन...' सुजाता मला सांगत होती. परिचारिकेचा व्यवसाय करणारी ही सुजाता घरापासून व्यवसायासाठी दूर राहू-नही कौटुंबिक जबाबदाऱ्या संपूर्णपणे पार पाडते आहे. किंबहुना तिच्याच मिळकतीवर घर चालले आहे. असे असूनही दुसरीकडे स्वतःच्या प्रगतीसाठी महाविद्यालयीन शिक्षण, पेंटिंगसारखे छंद जोपासण्याचा तिचा प्रयत्न चालू आहे. कौटुंबिक जबाबदारी पेलण्याच्या तिच्या यशस्वी प्रयत्नाचा धागा पकडून मी म्हटलं–'सुजाता, लग्नानंतर तुला एवढी मदत करता येईल का ? लग्नानंतर नवऱ्याने नको म्हटलं तर आणि यातून अटीतटीच्या संघ-र्षाची वेळ आली तर काय करशील ?' सुजाता निश्चयाने म्हणाली– 'या बाबतीत माझी भूमिका ठाम आहे. अग मेधा, माझ्या भावंडांचं अजून काही स्थिरस्थावर झालेलं


कोऱ्या कापडावर उत्तम प्रकारे सर्व प्रकारची प्रक्रिया करणारी
कै. दत्ताजीराव कदम यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेली
दक्षिण महाराष्ट्रातील एकमेव सहकारी संस्था

**दि यशवंत को-ऑपरेटिव्ह प्रोसेसर्स लिमिटेड**

इचलकरंजी–४१६ ११५ (कोल्हापूर)

फोन नं. २०८१ ते २०८४ तार–यशवंत

**मुकुंद शस्त्रकार** (मॅनेजर) **अशोकराव हजारे** (व्हा. चेअरमन) **गंगाधर महाजन** (चेअरमन)



**आयुर्वेदाच्या अभ्यासासाठी सर्वोत्तम पुस्तके**

१. उद्भिज्यांग–प्रत्यंग विज्ञान रु. तीस
२. आसव अरिष्ट काढे रु. बारा
३. विषतंत्र रु. दहा
४. रसशास्त्र रु. पंधरा
५. वनस्पती वर्ग रु. पाच

**सागर प्रकाशन**

१२९३, सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०

नसताना मी त्यांना अर्ध्यावर कसं सोडून देऊ ? शिवाय आता वडीलही नाहीत आणि मुख्य म्हणजे त्याच्या आईवडीलांचं जर मी व्यवस्थित करत असेन तर त्याने मला माझ्या माहेरच्यासाठी एवढे करायला का देऊ नये ?' सुजाताने मला बिनतोड प्रश्न विचारला. त्यापुढे जाऊन वेळ पडल्यास आपण नवऱ्याशी अटीतटीचा संघर्ष करू नाही तर भावंडांना मदत करूनही त्यांचे तेच करताहेत असा 'आभास' निर्माण करू, असेही ती म्हणाली. घरकामाबाबत मात्र तिचे मत थोडे वेगळे होते– ती म्हणाली– मी जर नोकरी अगर व्यवसाय करत असेन तर त्याने मदत करावी.' नवऱ्याने मुलांवर दाब ठेवण्यासाठी लक्ष ठेवावे, संसार सांभाळून मी 'करिअर' करेन अशी अपेक्षा अखेरीस तिने व्यक्त केल्या.

'मी काही बाबतीत सनातनी आहे. लग्नाआधीचे माझे मित्र मी तोडणार नाही; पण माझ्या मीच मर्यादा घालून घेऊन त्यांच्याशी अंतर ठेवून वागेन; पण म्हणून नवऱ्याने या बाबतीत सक्ती केली तर मात्र मी ऐकणार नाही ! मानसी निश्चयाने बोलत होती. आकर्षक व्यक्तिमत्त्व, एस्. एस्. सी. ला बोर्डात आलेली आणि आता इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअर असणारी ही मानसी संयमपणे पण ठामपणे बोलत होती. स्वतःच्या पगारावर माझ्या आईवडिलांचा लग्नानंतरही हक्क आहेच. कौटुंबिक निर्णय आम्हा दोघांचा राहील; पण माझ्या खाजगी निर्णयाचा अधिकार माझा, अर्थात त्याबावत त्यालाही स्वातंत्र्य असेल. हे स्वातंत्र्य दोघेही एकमेकांवर अन्याय न करता घेऊ ही अपेक्षा आहेच. हे मत मांडल्यानंतर एकत्र कुटुंब कायम नको, सणवार केले पाहिजेतच अशी सक्ती स्वतःवर करून घेणार नाही, मुलांच्या काळजी, संस्काराबाबत उभयतांना असणारा वेळ, सोय महत्त्वाची अशी भूमिका तिने मांडली. आपण पाहिलेले संसार आणि आपल्या 'भावी' संसारातील फरक तिने पुढील वाक्यात आवर्जून सांगितला–'साधारणतः कुटुंबात पुरुष (वडिलांचे) वर्चस्व असते. माझ्या घरात दोघांना समान स्थान असेल. त्यामुळे कुणी कुणावर वर्चस्व गाजवणार नाही...' मानसीच्या एकूण भूमिकेशी जुळणारी भूमिका प्रतिमाची. ती म्हणाली 'दोन मिनिटात नमस्कार करून, चहा देऊन, 'पहाण्या'चा कार्यक्रम होऊन जुळलेले लग्न मला मुळीच पसंत नाही. तसंच लग्न झाले की, घरी बसणे हेही पटत नाही. मला तर नोकरी करण्यापेक्षा 'फोटो स्टुडिओ' कढायला आवडेल आणि त्यात नवऱ्याचा सहभाग संमती देण्यापुरताच हवा.' वनस्पतिशास्त्रात 'रिसर्च फेलो' म्हणून काम करणाऱ्या प्रतिमेने लग्नापूर्वीच्या कुठल्याही गोष्टी सोडण्यास नकार दिला. त्यासाठी आपण कोणतीही किंमत मोजण्यास तयार आहोत, असेही ती म्हणाली. कमला महानगरपालिकेतील प्राथमिक शिक्षिका. खेड्यातून येऊन शहरी संस्कृतीशी साधलेली जवळीक, टापटीप, स्वयंपाक, प्रत्येकाचे अगत्य, असं तिचं व्यक्तिमत्त्व. पुरुषांनी शक्यतो बाहेरची कामं सांभाळावी, मुलांना पित्याचा आदरयुक्त धाक असावा, संसारात पडल्यानंतर बंधने ही येतातच; त्याबद्दल तक्रार नाही; पण माहेरच्यांचे संबंध मात्र तोडणार नाही ही तिची भूमिका. एकत्र कुटुंबपद्धत आपल्याला योग्य वाटते, हे सांगून ती म्हणाली–' सासू सासऱ्यांच्या मार्गदर्शनाचा फायदा मला


महाराष्ट्रात अत्यंत नावाजलेली

**हर्डीकर्स**

**शॉर्टहॅंड ॲन्ड टाइपरायटिंग इन्स्टिटय़ूट**

: वैशिष्टये :

**वैयक्तिक लक्ष ※ उत्तम मशिन्स ※ स्त्रियांसाठी स्वतंत्र वेळ ※ प्रशस्त जागा**

व्यापारी विभाग

इंग्लिश–मराठी–हिन्दी टायपिंग व सायक्लोस्टायलिंगची कामे त्वरित व सुबक करून मिळतील.

तसेच झेरॉक्स फोटो कॉपीज व अमोनिया प्रिंटस् इत्यादी कामे सुबक करून मिळतील.

सर्व प्रकारचे नवे–जुने टाइपरायटर्स, डुप्लिकेटर्स खरेदी–विक्री व दुरुस्तीचे अत्यंत विश्वसनीय ठिकाण.

**मुख्य ऑफिस :** १२२९/१ फर्ग्युसन कॉलेज रोड, डेक्कन जिमखाना, पुणे ४. फोन : ५६७८६

**शाखा :** 'गणेश चेंबर्स' पेट्रोल पंपाशेजारी कर्वे रोड, पुणे ४. फोन : ३०३३४

**निवास :** 'पितृ–इच्छा' शांति शिला को-ऑप. हौसिंग सोसायटी, फिल्म इन्स्टिटय़ूटजवळ, एरंडवणा, पुणे ४. * फोन : ५३०८७

होईल की, आपण ठेचा खाऊनच शहाणपणा शिकायला हवा, असे होणार नाही आणि स्वातंत्र्याबाबत म्हणशील तर प्रत्येकाचा फायदा–तोटा आहेच.'

'मुलांच्यापुढं माझ्या नवऱ्यानं स्वतःचं काम दुय्यम मानलं पाहिजे–नाही तर शिवाजी–संभाजीचं उदाहरण आपण ऐकतो आहोतच की! थोडक्यात, त्यानं स्वतःच्या विकासासाठी, प्रामाणिकपणं काम करण्यासाठी कुटुंबात एरवी मदत केली नाही तरी चालेल; पण याबाबतीत तसे चालणार नाही...!' सविता सांगत होती. अनेक अडचणींवर मात करून, प्रसंगी घरच्यांना विरोध करून स्वतंत्रपणे आयुष्य जगणाऱ्या या सविताने पत्रकारितेचा कोर्स केला आहे. ती नोकरी करते आहे. 'करिअर की संसार' या पर्यायाबाबत तिला विचारलं तर ती म्हणाली–' मेघा, मुळातच मला लग्न ही दुय्यम गोष्ट वाटते केवळ लग्न केल्यानं समाधान मिळेल असं मुळीच वाटत नाही आणि त्यामुळं करिअर कधीच सोडणार नाही!' लैंगिक गरज व मानसिक आधार यासाठी लग्नाची आवश्यकता प्रतिपादताना जोडीदारास त्याच्या विकासासाठी अधिक स्वातंत्र्य देण्याची तिची इच्छा तिनं व्यक्त केली व यात आपल्या करिअरला तडा जात नसल्याचे तिने सांगितले.

'मला कुटुंब–व्यवस्था मोडायची नाही; परंतु ती टिकविण्यासाठी मला माझं अस्तित्व नाकारणं पटणार नाही–जमणार नाही...!' अस्मिता आवेशानं बोलत होती. कायद्याची पदवीधर असल्यामुळं मुळातच असलेल्या सामाजिक जाणिवेला आलेलं 'डोळस' भान, त्याबाबत केवळ विचार करून न थांबता स्वतः (आणि इतरांनी) प्रत्यक्ष कृती करण्याची तयारी हे तिचे विशेष. तिनं कडाडून हल्ला केला तो 'एकत्र कुटुंबपद्धती'वर. ती म्हणाली–'दोन पिढ्यांतील अंतर, आतापर्यंत अनेक जबाबदाऱ्या पेलल्यामुळं सासू–सासऱ्यांना थकवा आला असताना पुन्हा आपल्या–आपल्या मुलांच्या जबाबदाऱ्या त्यांच्यावर का ढकलायच्या? त्यांनाही त्यांच्या पद्धतीनं आयुष्य जगू दे की! मुख्य म्हणजे जवळ राहूनच एकमेकांबद्दल प्रेम, जिव्हाळा राहतो, असं कुठं आहे? मी त्यांच्याबाबतीत सर्व तऱ्हेच्या आर्थिक जबाबदाऱ्या स्वीकारेन; पण वेगळं राहून...!'


'माझ्या जोडीदाराबद्दलची अपेक्षा हीच की, मला 'माणूस' म्हणून त्यानं वागवावं. एकमेकांनी एकमेकांना स्वातंत्र्य देऊन सामंजस्य टिकवावं! अस्मितानं हे सांगता–सांगता–परंपरेनं आलेल्या कुटुंबापेक्षा वेगळं कुटुंब हवं, विवाहाव्यतिरिक्त दुसरा पर्याय नाही, तसंच कुटुंबसंस्था हवीच; पण दुय्यमत्व पत्करून ती नको, वेळ पडल्यास आपण ती मोडायलाही तयार आहोत. त्या वेळी मुलांनी कुठं रहायचं हे त्यांचं त्यांनी ठरवावं इत्यादी अपेक्षा व्यक्त केल्या. अखेरीस ती म्हणाली–'पण म्हणून विवाहाशिवाय एकत्र राहाण्यावर माझा फारसा विश्वास नाही कारण तिथेही दुय्यमत्व असण्याची शक्यता आहेच दुय्यमत्व जायला समाजात, पुरुषांच्या दृष्टिकोनात बदल होण्याची गरज आहे...!' गप्पा संपता–संपता ती म्हणाली–'आम्हा सर्वांना तू विचारलंस; पण तुझं काय मत आहे...?' मी तिला उत्तर देण्याचं कसंबसं टाळलं.

पण त्याच क्षणी हेही जाणवलं की, याचं उत्तर आपल्याला कधी ना कधी द्यायला हवंय. एकीकडे–जवळच्या अनेक नातेवाइकांचे विवाह पाहून त्यातील सुखाबाबतचा फोलपणा जाणवतो आहे–दुसरीकडे विवाह–व्यतिरिक्त संबंधातील अनिश्चितता, असुरक्षितता जाणवते आहे; पण ही असुरक्षितता विवाहसंस्थेत तरी कुठे पूर्णपणे संपते--शिबिरात भेटलेल्या एका बाईंची या संदर्भात नेहमीच आठवण होते. त्या म्हणाल्या होत्या–'काय सांगायचं बाई, मला मूल होईना म्हणून नवऱ्याने, सक्तीने माझ्याकडून लिहून घेतले की, मी त्याला दुसऱ्या लग्नाची खुषीने परवानगी देतेय म्हणून. आता त्याचं लग्न होऊन मुलं झालीयत. मी माझ्या माहेरच्या गावी स्वतःच्या पायावर उभी राहिलेय–शिक्षिका म्हणून. त्याला एरवी कधीच आठवण येत नाही–पण प्रत्येक महिन्याच्या एक तारखेला पगार न्यायला तो येतो...!' त्या बाईंची ती अगतिकता नेहमीच आठवत रहाते......

अशा वेळी वाटतं–परस्परांना पूरक ठरणारा जोडीदार मिळवण्याचा हमखास मार्ग कोणता? मातृत्वासाठी विवाह स्वतःवर लादून घ्यायचा? सीमा म्हणते त्याप्रमाणे विवाह हा स्त्रीचा 'जन्मसिद्ध' हक्क का असू नये?...' असे किती तरी प्रश्न. त्यामुळे खूपच गोंधळ. या साऱ्यांची कसोटी ऐन निर्णयाच्या वेळी लागेल–हे खरं असलं तरी माझ्यापुरतं मी हे निश्चित ठरवलंय की, काही झालं तरी आतापर्यंत आपल्या कुवतीनुसार जपलेल्या निष्ठांची किंमत देऊन काहीच मिळवायचं नाही–अगदी लग्न-संसारसुखसुद्धा नाही!

तर, अशा या गप्पा. आमच्यातली प्रत्येक जण आपापल्या कुवतीनुसार आपल्या आयुष्याला आकार देऊ पहाणारी, आपल्या कुटुंबाची स्वप्ने पहाणारी, आपले 'भावी' कुटुंब ढासळू नये, संसार उध्वस्त होऊ नये म्हणून लग्नाआधीच तसा निश्चित दृष्टिकोन ठेवावा, त्याला जुळता–मिळता जोडीदार निवडावा ही बहुतेकींची इच्छा. स्वतःचे व्यक्तिमत्त्व मारायचे तर नाही आणि शिरावर पडलेली जबाबदारीही नाकारायची नाही असे दुहेरी आव्हान स्वीकारण्याची तयारी. काहींची प्राप्त परिस्थितीशी तडजोड, 'अस्मिता' चा तिला आकार देण्याचा प्रयत्न तर सीमाने 'बंडा'चे आव्हान! इतकी वर्षे हॉस्टेलवर राहूनही प्रत्येक जण आपापल्या कुटुंबातील संस्कारांनुरूप अपेक्षा बाळगते आहे. प्रत्येक जणीचा कुटुंब–व्यवस्थेसंबंधीचा 'ट्रेंड' पहाताना त्यांच्या अपेक्षा प्रातिनिधिक वाटतात.

महत्त्वाचे फक्त एकच– 'आजची तरुण-पिढी बेजबाबदार झालीय–मुलींना तर स्वैराचार हवाय·कुठलीही जबाबदारी स्वीकारायल नको! असा आरोप करणाऱ्या मागच्या पिढीतील लोकांना वरील गप्पा या एक ठोस उत्तर म्हणता येईल आणि तसंच कुटुंब–संस्था, विवाहसंस्था याबद्दलच्या नवीन पिढीच्या अपेक्षा, स्वप्नं ही मागच्या पिढीनं दिलेल्या सांस्कारिक वारशातून, वागणुकीतून साकारतात–हाही विचार असा आरोप करताना ध्यानात घ्यायला हवा आणि म्हणूनच 'पेरावे तसे उगवते' याचे भान जरी आरोप करणाऱ्यांना आले तरी या लेखाचे सार्थक होईल. ○



# जॉन बोर्ग
## दि मोस्ट सक्सेसफुल ॲथलेट ऑफ एनी टाइम

डॉ. श्रीकांत मुंदरगी

जॉन बोर्ग व्यावसायिक टेनिसमधून निवृत्त झाला ही बातमी ऐकताच जगातल्या यच्चयावत टेनिसप्रेमिकांच्या काळजाचा ठाव सुटला असेल ! जगप्रसिद्ध मुष्टियोद्धा महमद अली यानं निवृत्तीची घोषणा केली, त्या वेळीही मुष्टियुद्ध–शौकिनांच्यात अशीच खळबळ माजली होती; पण हिंदी सिनेसृष्टीतल्या नटनट्यांप्रमाणं आपला निवृत्तीचा हा निर्णय महमद अलीनं किमान तीन वेळा मोडला ! जॉन बोर्गच्या बाबतीत असंच घडलं तर मात्र त्याच्या चाहत्यांना नक्कीच अतिशय आनंद होईल; परंतु बोलल्याप्रमाणं वागणाऱ्या बोर्गच्याबाबतीत हे शक्य होईलसं दिसत नाही. बोर्गची निवृत्ती ही टेनिसजगतावरची आपत्तीच म्हणावी लागेल ! या अद्वितीय खेळाडूचा अलौकिक खेळ पुन्हा पहायला मिळणार नाही, ही कल्पनाच किती क्लेशदायक आहे, हे केवळ टेनिसचे रसिकच जाणतील. लागोपाठ सतत पाच वेळा विम्बल्डन टेनिसचं एकेरी विजेतेपद जिंकून त्यानं टेनिसच्या क्षेत्रात एक नेत्रदीपक आणि रोमहर्षक उच्चांक प्रस्थापित केला आहे. एवढंच नव्हे, तर असा अद्भुत इतिहास निर्माण करणाऱ्या या विलक्षण विक्रमामुळं, या असामान्य क्रीडापटूला जगातील सर्व क्रीडासमीक्षकांनी, 'दि मोस्ट सक्सेसफुल ॲथलेट ऑफ एनी स्पोर्ट, एनी टाइम, एनी व्हेअर' अशा मोजक्या पण अचूक शब्दांत गौरवलं आहे.

वयाच्या पंधराव्या वर्षी व्यावसायिक टेनिसमध्ये आपला झेंडा फडकवून सव्विसाव्या वर्षी निवृत्तीची घोषणा करणारा हा एकमेव खेळाडू आहे ! या दहा वर्षांच्या काळात जगातल्या सर्वांत मोठ्या टेनिसस्पर्धा अनेकदा जिंकून (यू. एस. ओपन वगळता) बोर्गनं या क्षेत्रात स्वतःच आगळंवेगळं स्थान निर्माण केलं आहे. बोर्गच्या अविश्वसनीय अन् अद्भुत पराक्रमाचं सामर्थ्य सामावलं आहे ते वेग, वळण आणि विजिगीषुवृत्ती या त्रिसूत्रीत !

टेनिसस्पर्धांचं काशी–रामेश्वर समजल्या जाणाऱ्या विम्बल्डनच्या मैदानात जॉन बोर्ग एखाद्या सम्राटासारखा सिंहाच्या धीम्या गतीनं प्रवेश करायचा; पण खेळ सुरू झाला की, त्याच्या अंगी चित्त्याची चपळाई संचारायची ! टेनिसकोर्टवर चाललेला त्याचा पदन्यास एखाद्या निष्णात नर्तकीच्या पदन्यासाला मागं सारील इतका प्रेक्षणीय असायचा ! विजेचा स्पर्श झालेले त्याचे पाय 'मनासी टाकिले मागे गतीसी तुलना नसे' असे धावायचे. गुलेर्मो विलास तर म्हणतो 'आम्ही चेंडू कोठेही टाकला तरी त्यापूर्वीच बोर्ग तिथं हजर असा-

यचा !' हा वेग अबाधित राखण्यासाठी बोर्ग वेगळा व्यायाम घेण्याच्या भानगडीत न पडता सहा–सहा तास टेनिसचाच सराव करीत असे. आहार आणि विश्रांतीच्या बाबतीत तर तो भलताच जागरूक होता. प्रत्येक स्पर्धेनंतर सरळ आपल्या सूटवर जाऊन चौदा-चौदा तास ताणून देणं हा त्याचा नेहमीचा परिपाठ ! प्रचंड पैसा अन् प्रसिद्धीचं वलय लाभूनही त्यानं आपल्या मनाचा तोल थोडासुद्धा ढळू दिलेला नव्हता. मद्य अन् मदिराक्षी या दोन मोहांवर मात करण्यातही हा पुरुषोत्तम निश्चितच यशस्वी झाला होता, असं म्हणावं लागेल. मनाचा समतोल राखून शारीरिक तोल ढळू न देण्याची किमया त्याला साधली होती. 'यश मिळण्यापेक्षा मिळालेलं यश पचवणं कठीण असतं,' असं म्हणतात. बोर्गनं यश सर्वार्थानं पचवून टाकलं होतं !

## विनिंग विल ॲन्ड किलिंग इन्स्टिंक्ट

बोर्गचा स्वभाव म्हणजे समीक्षकांना पडलेलं एक कोडंच आहे. बर्फासारख्या थंडगार वृत्तीच्या या माणसाला धावपळ, धडपड वा घसमुसळेपणा पूर्णपणे वर्ज्य होतं. खेळताना हातून एखादी चूक झाली तर रॅकेट फेकणे, पंचानं चुकीचा निर्णय दिला अशी शंका आली तर त्याला शिवीगाळ करणं आणि प्रेक्षकांनी विरोधी सूर काढला तर संतापानं बेभान होणं त्याच्या स्वभावात बसत नव्हतं. इली नेस्तासेनं खेळात नॅस्टी (आचरट) स्पिरिट आणलं, कॉनर्सनं आपल्या कडक स्वभावामुळं खेळात कडवटपणा आणला तर उतावळ्या अन् मस्तवाल मॅकेन्रोनं टेनिसमध्ये तमाशा आणला ! बोर्गनं खेळात काय आणलं असेल तर ते म्हणजे असीम शांतता आणि धीरोदात्तता ! अशाच एका मोठ्या मॅचच्या वेळी लाइनमनने चुकीचा कौल दिला अन् वैतागलेल्या बोर्गचे ओठ क्षणभर उघडले. आता काय भलतंच ऐकावं लागणार, या भावनेनं प्रेक्षकांत स्मशानशांतता पसरली. अतीव उत्सुकतेनं जिवाचा कान करून ऐकणाऱ्या प्रेक्षकांच्या कानांवर पडली ती बोर्गच्या ओठातून बाहेर पडलेली स्वीडिश भाषेतील परमेश्वराची प्रार्थना ! दहा हजार प्रेक्षकांनी उभं राहून बोर्गच्या सहनशीलतेचं टाळ्या वाजवून अभिनंदन केलं. बोर्गच्या या शांततेमागं तशीच एक गमतीदार कहाणी आहे. लहानपणी कोर्टवर खेळत असताना एकदा बोर्गनं रागाच्या भरात रॅकेट फेकून दिली. त्याच्या आईनं मॅचनंतर ती रॅकेट छोट्या जॉनकडून काढून घेऊन कपाटात ठेवून दिली. तब्बल पाच महिन्यांनंतर त्यानं क्षमा मागितल्यानंतरच त्याची रॅकेट त्याला परत मिळाली. 'त्या प्रसंगानंतर कधीही मनाचा तोल ढळू द्यायचा नाही अशी मी प्रतिज्ञा केली,' असं बोर्ग अभिमानानं सांगतो. त्याचा हा स्थितप्रज्ञपणा इतका थक्क करणारा आहे की, त्यामुळंच विरोधकांची शांती कित्येक वेळेला नष्ट होते.

'चुकलेल्या चेंडूचा त्रास करून घेऊ नका, अजून खूप चेंडू खेळायचे आहेत,' हे त्याच्या धीमेपणाचे सूत्र ! त्याच्या चुकांची वाट पाहणारे विरोधक त्याच्या शांतीला वैतागून अखेरीस आपणच चुका करू लागायचे. तसंच प्रत्येक चेंडू जिंकण्यासाठीच खेळायचं अन् प्रतिस्पर्ध्याला नेस्तनाबूत करायचं, याला 'विनिंग विल ॲंड किलिंग इन्स्टिंक्ट' असं म्हणतात. बोर्गच्या अणूरेणूत ही वृत्ती भिनली होती.

## टॉप स्पिन आणि डबल हॅन्डेड बॅक स्ट्रोक

बोर्गच्या भात्यातील महत्त्वाचा बाण म्हणजे त्याची फिरकी वा टॉप स्पिन. बोर्ग आपल्या रॅकेटची अशी काही मजेशीर हालचाल करायचा की, त्यानं फटकारलेला चेंडू तीव्र फिरकी घेऊन अनपेक्षित ठिकाणी आपटून विलक्षण वेगानं वर उसळायचा. वास्तविक रॉड-लेव्हरनं चेंडूला फिरकी देण्याचं तंत्र चांगलंच आत्मसात केलं होतं. कॉनर्स आणि लेंडलदेखील या फिरकीचा वापर करतात; पण बोर्गची ही गुगली फलंदाजी (?) इतकी अवघड, असाध्य अन् अनोखी आहे की, प्रयत्न करूनही तिच्यावर प्रभुत्व मिळवणं इतरांना जमलेलं नाही ! बोर्गच्या या अफलातून अस्त्रामुळंच तो परवा–परवापर्यंत अजिंक्य ठरला होता.

बोर्ग स्वीडनच्या राष्ट्रीय सामान्यात चमकू लागला तेव्हा दोन्ही हातांनी बॅकहॅंड स्ट्रोक फटकावण्याच्या त्याच्या पद्धतीला समीक्षकांनी नावं ठेवली, अनेक तज्ज्ञांनी या विचित्र आणि किचकट शैलीमुळं, हे गुणी पोर वाया जाणार, असं भाकित केलं. १९३० पर्यंत फक्त मॅग्रॅथ हा ऑस्ट्रेलियन खेळाडू या पद्धतीचा वापर करी. नंतर मात्र ती कालबाह्य ठरली; पण बोर्गनं या फटक्याला उजाळा दिला अन् आधुनिक टेनिसमध्ये या पद्धतीचं स्थान पक्कं करून टाकलं. कॉनर्स, ख्रिस इव्हर्ट आणि ट्रेसी ऑस्टिन यांनीही बोर्गचं अनुकरण करून या विचित्र शैलीला जगन्मान्यता मिळवून दिली. मोठेपणा प्राप्त झाला की अवगुणही (?) गुण ठरतात, हे काही खोटं नाही !

## प्रलयंकारी मनःसामर्थ्य

बोर्गच्या आंतरराष्ट्रीय स्पर्धाप्रवेशाच्या आरंभाच्या काळात विम्बल्डनवर त्याला पराभूत करणारा इजिप्तचा एल. शफी म्हणतो, 'बोर्गवर मात करणं नंतरच्या काळात मला कधीही जमलं नाही. कारण चेंडू कुठंही टाका, बोर्ग तिथं हजर असायचा, जणू चेंडूला बांधलेल्या अदृश्य दोरीची गाठ त्याच्या रॅकेटला बांधलेली असावी.'

हॅरॉल्ड सॉलोमनचं मत यापेक्षाही गमतीशीर आहे, बेसलाइन मागं सहा व पुढं चार फूट या भागात बोर्ग हा कॉम्प्युटरपेक्षा श्रेष्ठ आहे. आम्हा इतर खेळाडूंना जी जागा सर्वात अवघड वाटावी त्या जागेचा हा प्रत्यक्ष परमेश्वरच !'

१९७८ मध्ये विम्बल्डनवर बोर्ग साडेसहा फूट उंचीच्या व्हिक्टर अमाया विरुद्ध खेळत होता. अमायानं सुंदर खेळ करून ३–० चं

*With Best Compliments From :*

**मेटाफीन प्रोसेसर्स**

**१०६ ए, शिवाजीनगर**

**पुणे ४११ ००५**

लीड घेतलं. आधी दोन वर्षं विम्बल्डनचं विजेतेपद पटकावलेला बोर्ग आता संपला...त्याच्या मॅजिक शॉटस्‌ची जादू आता संपली...असंच साऱ्यांना वाटलं. चित्त विचलित झालेल्या बोर्गनं आकाशाकडे नजर टाकली अन्‌ काही क्षण हरवल्यासारखा अंतराळात पहात तो स्तब्ध उभा राहिला. त्यानंतर लागलीच साऱ्या भावनांवर काबू मिळविलेल्या बोर्गनं त्याच्या टॉप स्पिन फटक्यांचा आणि बेसलाइन व्हॉलीजचा असा काही हल्ला चढवला की, अमाया अक्षरशः हतबल होऊन गेला. त्या वेळचा त्याचा विजय म्हणजे त्याच्या विलक्षण मनःसामर्थ्यांचा प्रलयंकारी आविष्कार होता.

विटास गेरुलायटिस हा बोर्गचा खास मित्र अन्‌ त्याच्या नेहमीच्या सरावातला पार्टनर. त्याचा अनुभव निराळाच आहे, 'नेहमीच्या सरावात मी बोर्गला अनेक वेळा हरवलं आहे. सरावात काही वेळा त्याची एकाग्रता भंग पावलेली मी पाहिलेली आहे; पण प्रत्यक्ष स्पर्धेत उतल्यानंतर बोर्ग सर्वस्वी बदलून जायचा. प्रेक्षकांची प्रचंड गर्दी अन्‌ जयापराजयाची भीती या दडपणामुळं मी मी म्हणणारे खेळाडू लटपटून जातात. याउलट अशा वातावरणात बोर्गचा आत्मविश्वास आकाशाएवढा व्हायचा. प्रचंड वादळ समुद्रात खळबळ माजवू शकेल; पण शेजारीच चाललेला ज्वालामुखीचा उद्रेक बोर्गच्या मनाची एकाग्रता भंग करू शकणार नाही!'

आज कोट्याधीश असलेल्या जॉन बोर्गचा जन्म एका सामान्य कुटुंबात झाला आहे. टेनिसचा खेळ हा केवळ श्रीमंतांचीच मक्तेदारी अशी आपली सर्वसाधारण समजूत. पैशाचं पाठबळ असल्याशिवाय टेनिसमध्ये प्रचंड प्रगती करणं शक्यच नाही, असं आम्हा भारतीयांना वाटतं. त्या दृष्टीनं बोर्गचा इतिहास आपल्या कल्पना बदलू शकणारा आहे.

## सुरवंटाचं फुलपाखरू

स्टॉकहोमच्या उपनगरात (सोदेरतात्येह) राहणाऱ्या रुने बोर्ग; या एका कापडदुकानातील विक्रेत्याचा जॉन हा मुलगा. रुने स्वतः एक चांगला टेनिस-खेळाडू; पण मुलानं त्यात लक्ष घालावं, असा प्रयत्न त्यानं कधीच केला नाही. मुलानं खूप शिकावं अन्‌ बड्या पगाराची नोकरी धरावी, अशी त्या मध्यमवर्गीय मातापित्यांची इच्छा; पण नियतीच्या मनात निराळंच असावं! जॉन नऊ वर्षांचा असताना एकदा स्थानिक टेनिस सामने पाहण्यास गेला. कारण अंतिम लढतीत त्याचे वडील खेळणार होते. कोर्टाच्या कोपऱ्यातील टेबलावर निरनिराळी सुंदर बक्षिसं ओळीनं मांडून ठेवली होती. त्यात एक अत्यंत देखणी अशी टेनिसची रॅकेटही होती. प्रथमदर्शनीच जॉन तिच्या प्रेमात पडलाय हे त्याच्या नजरेवरूनच रुनेला समजलं. टेबल-टेनिस आणि आइसहॉकी बऱ्यापैकी खेळणाऱ्या आपल्या पोराला टेनिस-रॅकेट एवढी आवडावी, याची रुनेला गंमतच वाटली. अतिशय आनंदलेल्या छोट्या जॉनला घेऊन रुने त्या टेबलाकडं बक्षिसाच्या निवडीसाठी गेला. तेथील एक फिशिंग रॉड उचलून 'हे बक्षीस आपण घ्यायचं का?' अशा प्रश्नार्थक नजरेनं त्यानं जॉनकडे पाहिलं.जॉनचा चेहरा असा काही पडला त्यामुळं रुनेला वाटलं की, पोरगा आता भोकाड पसरूनच रडणार! रुनेनं चटकन रॉड ठेवून ती देखणी रॅकेट उचलली अन तो म्हणाला, 'हे माझं बक्षीस!' जॉन खुदकन्‌ हसला ...जणू नियतीच हसली! एका सामान्य मुलाचं रूपांतर असामान्य टेनिसपटूत होणार, हे नियतीनं जाणलं... सुरवंटाचं फुलपाखरू व्हावं तसं आइसहॉकीचा नॅशनल चॅम्पियन व्हावं अशी महत्त्वाकांक्षा मनात बाळगणाऱ्या जॉन बोर्गनं टेनिसच्या खेळाची वाटचाल सुरू केली.

## ऑगळी-वेगळी स्वतंत्र शैली

हॉकीची स्टिक धरावी, तशी दोन्ही हातांनी ती बोजड टेनिस रॅकेट धरून टेबल टेनिस खेळावं तसे फटके जॉन मारू लागला. या अजब तंत्राच्या आड पुढे पाच वर्षं कुणी आलं नाही, हे नशीबच म्हणायचं. नाही तर जॉन बोर्गची 'टू हँड टॉप स्पिन' ही स्वतःची अशी खास शैली जन्मालाच आली नसती.

'कोणी खेळायला घेत नाही, या पोरांच्या नेहमीच्या तक्रारीनुसार साथीदाराविना जॉन गॅरेजच्या भिंतीवर चेंडू मारून सराव करू लागला. सतत वीस वेळा न चुकता जेव्हा त्याला चेंडू परतवता येऊ लागला, तेव्हा प्रथमच वडिलांनी त्याच्याबरोबर खेळायचं मान्य केलं; पण इतर चांगले खेळाडू मात्र त्याला खड्यासारखं बाजूला वगळत! दुखावलेला जॉन तासनतास तो राग चेंडू जोराने फटकारून व्यक्त करत असे. वाइटातून चांगलं निघतं ते असं. त्याचे फटके इतके जबरदस्त बसू लागले की, ते परतवणं रुनेला जमेना. म्हणून त्याने दादा-पुता करून एका स्थानिक ज्युनिअर टीममध्ये जॉनला राखीव खेळाडू म्हणून घुसविलं; पण दैवयोग असा की, एक मुख्य खेळाडू ऐनवेळी न आल्यामुळे जॉनला खेळण्याची संधी देण्यात आली, अन गंमत अशी की, त्याने या स्पर्धेत साऱ्या ज्युनियर्सना तर पराभूत केलंच, शिवाय आपल्या सिनियर्सनादेखील हरवून साऱ्यांनाच अवाक्


With Best Compliments From :

Navalakha Transport

**Specialist in O. D. C. transportation**

H. O. Krishi Bhavan, 1379, Bhavani Peth,
Workshop : Navyug Studio,
Shankarshet Road, Pune 411 002

करून टाकलं. यानंतर मात्र त्याची लागलीच नॅशनल टीममध्ये निवड झाली.

त्याची गावंढळ अन गचाळ शैली बदलावी नाही तर तो वाया जाईल, असं टेनिसतज्ज्ञ म्हणू लागले; पण लेनॉर्ट बर्जेलिन या १९७० सालच्या स्वीडिश डेव्हिस कप टीमच्या कप्तानाने व त्यानन्तर राष्ट्रीय कोचचं काम करणाऱ्या मार्गदर्शकाने जॉनच्या या विचित्र अन वेगळ्या शैलीला प्रोत्साहन दिलं. एवढंच नव्हे तर ती शैली त्यांनी सर्व बाजूंनी फुलवून निर्दोष बनवली. टेनिसचा इतिहास लिहिताना या 'बोर्ग शैली'साठी एक वेगळं प्रकरण राखून ठेवल्याशिवाय तो पूर्णच होऊ शकणार नाही! अमेरिकेतील टेनिसतज्ज्ञांनी बोर्गच्या खेळाचं छायाचित्रण करून या शैलीचा स्वतंत्र अभ्यास सुरू केला आहे हर्क्युलिसच्या केसांप्रमाणे बोर्गचं अजिक्यत्व त्याच्या या शैलीत सामावलं होतं...

वयाच्या पंधराव्या वर्षी न्यू झीलंडच्या ओनी पॅरून या २५ वर्षांच्या ख्यातनाम खेळाडूला हरवून बोर्गने पहिला मोठा विजय संपादन केला. त्यानन्तर वर्षभरात त्याने बऱ्याच रथी महारथींना धूळ चारून लहान-मोठ्या अनेक आंतरराष्ट्रीय स्पर्धा जिंकल्या. सोळाव्या वर्षी शालेय शिक्षणाला रामराम ठोकून त्याने व्यावसायिक टेनिसपटुत्व स्वीकारलं. इतिहास–भूगोलांच्या पुस्तकांशी झुंज घ्यायच्या ऐवजी जेटमध्ये बसून सारा भूगोल तो पालथा घालू लागला अन टेनिसच्या इतिहासाला तो नवं वळण देऊ लागला. सामने जिंकण्यापेक्षा चाहत्यांच्या वह्यात नीट स्वाक्षरी करता येत नाही, याचाच खेद वाटायचा. 'अखेर अनेक रात्री जागून मी सहज अन सुंदर स्वाक्षरी करायला शिकलो; पण या काळात माझा खेळ मात्र बिघडला, असं बोर्ग विनोदाने म्हणतो.

## वधू आणि विक्रम...?

फ्रेंच ओपन खेळण्यासाठी तो पॅरिसला गेला. त्या स्पर्धेबरोबरच रुमानियाची तरुण टेनिसपटू मारियाना सिमॉनस्क्यू या सुंदरीचं प्रेमही त्यानं जिंकलं. ही दोन मोठी बक्षिसं मिळवून तो घरी परतला तो भारलेल्या अवस्थेतच! त्याच्या आई–वडिलांना वाटलं, पोरगा आता कामातून जाणार! पण छे! प्रेम अन् टेनिस या दोन्ही वारूंवर तो तितक्याच सहजतेनं स्वार झाला. मारियानाच्या प्रेमाबरोबरच त्याचं क्रीडा–कौशल्यही सर्वांगानं फुलू लागलं!

१९७४ आणि १९७५ च्या विम्बल्डननं त्याला यश दिलं नाही. जिमी कॉनर्स आणि ऑर्थर ॲश यांनी त्याला पराभूत केलं. त्यामुळं खचून न जाता बर्जेलिनच्या मार्गदर्शनाखाली आपली खराब सर्व्हिस सुधारण्यासाठी तो दररोज चौदा–चौदा तास सराव करू लागला. उत्तम सर्व्हिस, टॉप स्पिन फटके अन् मारियानाचं प्रेम साथीला घेऊन १९७६ मध्ये विम्बल्डनमध्ये तो उतरला ते मोठ्या ईर्षेनंच अन् शेष टेनिस-जगताचं सुदैव त्यानं पुढं पाच वर्षंपर्यंत हिरावून घेतलं! सतत पाच वेळा विम्बल्डन जिंकणारा तो एकुलता एक खेळाडू आहे; पण मध्येच काही अंतर सोडून सहा वेळा विम्बल्डन जिंकणाऱ्या फ्रेड पेरीचा विक्रम मोडण्याच्या आड मारियानाच यावी, या दैवदुर्विलासाला काय म्हणावं? संसारातला विसंवाद त्याच्या क्रीडा–कौशल्याला मारक ठरू पहात आहे असं म्हणतात!



मारियानाच्या प्रेमाबरोबरच त्याचं क्रीडा कौशल्यही सर्वांगानं फुलल.

मध्यंतरीच्या काळात जगातील सर्व पहिल्या दर्जाचे सामने त्यानं अनेकदा जिंकले; पण ग्रँड सर्किटमधल्या पॅरिस, रोम, विम्बल्डन आणि अमेरिकन ओपन या साऱ्या स्पर्धांना खिशात टाकून रॉड लेव्हर आणि विली जीन यांच्याप्रमाणं ग्रँड स्लम करणं मात्र बोर्गला शेवटपर्यंत जमलं नाही. ७६ ते ८० च्या काळात जगातल्या एक नंबरच्या समजल्या जाणाऱ्या या टेनिसपटूला अमेरिकन ओपननं शेवटपर्यंत झुलवत ठवलं. 'यू. एस्. ओपन जिंकणं ही माझ्या आयुष्यातली सर्वात मोठी महत्त्वाकांक्षा होऊन बसलीय!', असं तो गेल्या वर्षापर्यंत म्हणायचा. ७७ व ७८ मध्ये कडक्या कॉनर्सनं, ७९ मध्ये तुफानी सर्व्हिस करणाऱ्या रास्को टॅन्नरनं आणि ८० मध्ये पोरकट पण प्रतिभावंत मॅकेन्रोनं बोर्गला यू. एस्. ओपनच्या अत्युच्चपदी पोहोचू दिलं नाही! ग्रास कोर्ट आणि क्ले कोर्ट या दोन्ही तऱ्हेच्या मैदानांवर सारख्याच सहजतेनं खेळणाऱ्या बोर्गला यू. एस्. ओपनच्या क्ले कोर्टनं आजअखेर दाद दिलेली नाही!




**Offer**
**your guests**
**a lavish Spread of**
**colors,**
**forms**
**and finishes.**

Let them wonder who made this stunning variety possible. Tell them it's Neoluxe.

Neoluxe has changed India's standard of decorative laminates and its commitment continues in creative laminates.

Neoluxe offers you imported designs like wood-grains, marble, natural cane, wood, ivory, cork, fabric etc.

And a wide range of finishes too! Glossy, Satin, Matt, Suell, One or Two tones with three dimensional effect, leather and wood-touch and photo and metal finishes too. You would wonder there could be so many varieties!

Authorised Dealer:
**ARTWOOD**
'Ashapuri', 270/1 Pandit Jawaharlal Nehru Marg
Pune 411 002. Phone : 447775, 447968, 447961

असं असलं तरी जॉन बोर्ग हा टेनिसच्या इतिहासातला सर्वश्रेष्ठ खेळाडू आहे, याबद्दल कुणाचंही दुमत नाही ! सांसारिक कटकटींनी त्याला विचलित केलं नसतं, तर आणखी पाच वर्षं विम्बल्डन जिंकणं त्याला अशक्य ठरलं नसतं, असं तज्ज्ञांचं मत आहे ! प्रसिद्धी आणि पैसा यांच्या तुफान वर्षावातही हा तरुण अविचल राहिला. अहंकाराचा वाराही त्याला लागला नसावा, अशा सहजतेनं तो वावरायचा. प्रसिद्धीचं जसं त्याला वेड नव्हतं, तसंच वावडंही नव्हतं. वार्ताहरांच्या प्रश्नांना उत्तरं देताना तो मोजकं अन् माफक बोलायचा. मद्यपानाची मर्यादा ओलांडताना कुणी त्याला पाहिलेलं नाही. लक्षावधी तरुणींच्या हृदयाची धडकन् बनलेल्या बोर्गला मारियानाशिवाय कोणतीही सुंदरी आपल्या मोहपाशात गुंतवू शकली नाही! ज्या प्रीतिदेवतेच्या प्रेरणेमुळं जॉन बोर्ग यशोमंदिराचं एव्हरेस्ट गाठू शकला तिच्याचमुळं त्याच्यासारख्या प्रज्ञावंताचं यश घसरणीला लागावं या अजब दैवगतीला काय म्हणावं ? आपल्यापासून घटस्फोट हवा असेल तर जॉनच्या इस्टेटीतील निम्मा वाटा (सुमारे ५० कोटी रुपये) आपल्याला मिळायला हवा, असा मारियाचा दावा आहे !

## क्रीडाक्षेत्रातला कुबेर

'जगातील एक सर्वांत श्रीमंत खेळाडू' हे बोर्गचं वर्णन मुळीच अतिशयोक्तीचं नाही. अरनॉल्ड पामर या धनाढ्य गोल्फरला आणि महमद अली या श्रीमंत बॉक्सरला त्यानं पैसे मिळवण्याच्या बाबतीत मागं सारलं आहे. पहिल्यांदा फ्रेंच ओपन खेळण्यासाठी जॉन जेव्हा विमानात चढला तेव्हा त्याचा साथीदार फर्स्टक्लासमध्ये जाऊन बसला. कारण तो कुबेरपुत्र होता ! टूरिस्ट क्लासमध्ये बसावं लागलेल्या बोर्गला या गोष्टीचं अतिशय वैषम्य वाटलं आणि त्यानं मनोमन प्रचंड पैसा मिळवण्याची प्रतिज्ञा केली. आज त्याला कुठेही फर्स्टक्लासनंच जाता येतं, असं नव्हे. तर बऱ्याच वेळा स्वतंत्र जेट विमान चार्टर करून तो कुटुंब–कबिल्यासह प्रवास करतो !

पहिल्या दर्जाच्या सामन्यात खेळून तो दरवर्षी साधारण सहा कोटी रुपये मिळवायचा. शिवाय प्रदर्शनीय सामन्याचे त्याला किमान प्रत्येकी आठ लाख रुपये मिळत. असे सामने शेकड्यांनी होत. हे सर्व झालं आपलं कौशल्य पणाला लावून, विलक्षण कसब दाखवून आणि प्रचंड घाम गाळून ! पण त्याच्या उत्कर्षाच्या काळात रॅकेटला बोटही न लावता वर्षाकाठी जॉनला कित्येक कोटी रुपये मिळत. युरोप, लॅटिन, अमेरिकन देश व जगातील इतर अनेक देशांत हजारो वस्तूंची जाहिरात बोर्गच्या नावानं करण्यात यायची. त्यासाठी मिळणाऱ्या मानधनाच्या मोठ्या रकमांचे आकडे सामान्य माणसांचे डोळे फिरवून टाकतील असे आहेत. 'त्याच्या नुसत्या नावावर आमच्या वस्तूंची विक्री शतपटींनी वाढायची' असं त्या कंपन्यांचं म्हणणं होतं. इंग्लंड–अमेरिकेतल्या काही वर्तमानपत्रांनी त्याच्या नावानं स्पोर्ट्स् कॉलम सुरू केले, त्याबद्दल लेखणीही न उचलता त्याला कोट्यवधी रुपयांचा मोबदला मिळायचा ! बोर्गनं आपल्या दंडावर स्कॅनेडेव्हिएन विमान कंपनीच्या मानचिन्हाची फीत लावावी म्हणून त्या कंपनीनं त्याला साठ लाख रुपये देऊ केले. एखाद्या कंपनीला व उद्योगसमूहाला जाहिरातीसाठी त्याचा फोटो वापरायचा असेल तर त्यासाठी त्याला पाच लाख रुपये द्यावे लागत ! त्याच्या या प्रचंड उत्पन्नाची देखरेख अन् गुंतवणूक करण्यासाठी चाळीस माणसं राबतात !

मध्यंतरी टेनिसजगतात सर्वांत जास्ती मागणी असलेल्या या खेळाडूच्या निरनिराळ्या पद्धतीनं उतरवण्यात आलेल्या विम्याची किंमत ३५ कोटींच्या घरात होती. तो जखमी होण्याची शक्यता कितपत आहे,या प्रश्नावर देण्यात आलेलं उत्तर सुपरस्टारच्या दृष्टीनं जितकं मार्मिक, तितकंच मर्मभेदकही आहे. 'जॉन बोर्गसारखा अजातशत्रू, धीमा अन् धीरगंभीर खेळाडू जायबंदी होण्याची शक्यता फारच कमी आहे. रॅकेट वापरताना तो कधी जखमी होईल, असं वाटत नाही. फक्त त्याला मिळणाऱ्या पैशाचं ओझं त्यानं स्वत: वाहायचं ठरवलं तरच तो एखादे वेळी जखमी होऊ शकेल!'

## समृद्ध जीवनगाथा

बोर्गच्या अनपेक्षित निवृत्तीने जगातील टेनिसरसिकांना आश्चर्याचा दु:खद धक्का दिला आहे, तसेच अनेक प्रश्नही उभे केले आहेत. एवढ्या तरुण वयात म्हणजे केवळ सव्विसाव्या वर्षी, ज्या वेळी इतर खेळाडू ऐनउमेदीत असतात त्या वेळी बोर्गनं निवृत्त होणं योग्य होतं का? ७४ मध्ये विम्बल्डन जिंकणाऱ्या कॉनर्सनं तब्बल आठ वर्षांच्या पडत्या काळानंतर ८२ मध्ये वयाची तिशी उलटून गेलेली असतानाही मोठ्या जिद्दीनं आपलं टेनिसमधलं श्रेष्ठत्व सिद्ध केलं. बोर्गला असं करणं अशक्य आहे का? अमाप पैसा अन् अफाट प्रसिद्धी मिळवून आता शांतपणे जीवन कंठणं बोर्गसारख्या अद्वितीय खेळाडूला शोभनीय आहे का? आपल्या अस्सल, अव्वल अन् असामान्य क्रीडाकौशल्याचा लाभ यापुढेही अनेक वर्षं बोर्गनं तरुण पिढीला मिळवून दिला असता तर टेनिसजगत् आणखी समृद्ध आणि संपन्न झालं नसतं का? या साऱ्या प्रश्नांची उत्तरं केवळ काळच देऊ शकेल!

जॉन बोर्गची शेवटची टूर्नामेंट महिन्यापूर्वी मॉंटेकार्लो इथं झाली. १९ वर्षांच्या हेन्री लेकॉन्टे या फ्रेंच टेनिसपटूनं त्याला ४–६, ७–५, ७–६ असं पराभूत केलं. हेन्रीशी हस्तांदोलन करून अन् प्रेक्षकांना अभिवादन करून कोर्टाबाहेर पडताना बोर्गच्या चेहऱ्यावर नेहमीचंच स्मित झळकत होतं. हा त्याचा शेवटचा अधिकृत सामना आहे हे कुणाला सांगूनही न पटावं अशीच त्याची वर्तणूक होती. एरवी त्याच्या जागी दुसरं कुणीही असतं तर त्यानं या गोष्टीचा प्रचंड बाऊ केला असता; पण बोर्गचं सारंच जगावेगळं! म्हणूनच त्याला 'आइस-बोर्ग' असं म्हणतात. त्याच्या यशाचं गमकही हेच असू शकेल. जया-पजयाचं पारडं इकडं-तिकडं झुकतंय असं वाटताच आपला मानसिक तोल अन् खेळाचा ताल गमावून बसणाऱ्या खेळाडूंना आइस-बोर्गकडून शिकण्यासारखं खूप आहे.

अमेरिका वा ऑस्ट्रेलिया या देशांसारखं स्वीडननं आपल्या टेनिसखेळाडूंना विशेष सहाय्य वा उत्तेजन दिलंय असं ऐकिवात नाही. तरी सुद्धा अविश्रांत परिश्रम आणि अन् अपार कष्ट करून वयाच्या १५ व्या वर्षी विम्बल्डनचं ज्युनियरचं अजिंक्यपद अन् १८ व्या वर्षी स्वदेशाला डेव्हिस कप मिळवून देणाऱ्या बोर्गचं कौतुक कोणत्या शब्दात करावं तेच कळत नाही! देश आणि परिस्थिती यांना दोष देणाऱ्या मंडळींना बोर्गचं चरित्र खूप काही शिकवून जाऊ शकेल. अगदी केनेडींच्या शब्दात सांगायचं झालं तर 'देश तुमच्यासाठी काय करू शकेल हे विचारण्यापेक्षा तुम्ह' तुमच्यासाठी अन् देशासाठी काय करू शकाल?'... या प्रश्नाचं उत्तर आपल्याला जॉन बोर्गच्या जीवनगाथेत सापडू शकेल. म्हणूनच असं म्हणण्याचा मोह होतो की,

...झाले बहु, होतील वहु, परंतु यासम हा!... ●


Poona–AHMEDABAD–Poona
Daily 4 p. m.

Poona–INDORE–Poona
Daily 7 p. m.

Conducted Luxury Video Tours
Carriers of Urgent Luggage

*Contact :*

Vijayant Travels
20 Bund Garden Road,
Mobos Hotel,
opp. Wadia College
POONA 411 001

**Phone : 25942**

Luxury Video Coaches are always available for Yatras, Marriage Parties, Picnics.

# सातही रंग प्रकाशाला म्हणाले

● दत्तप्रसाद दाभोळकर ●

( लेखांक तिसरा )

## आठ

जयप्रभा ग्रामच्या मध्यावर एक प्रचंड डेरेदार वृक्ष आहे. पिंपळ आणि वड यांच्या संकरातून निर्माण झालाय असे वाटणाऱ्या त्या वृक्षाला राजस्थानी बोली भाषेत 'भोईदा' का असे काहीसे लोभसवाणे नाव आहे. त्या वृक्षाच्या घनदाट छायेत विशीतील एक आकर्षक तरतरीत मुलगी टेपरेकॉर्डर ऐकत काही तरी लिहीत बसलीये. विरहगीत ऐकत आपल्या दूरवरच्या सख्याला प्रेमपत्र पाठवणारी ही तर फडक्यांच्या कादंबरीतील एखादी नायिका वाटते ! जरा जवळ गेलो आणि कळले ही फडक्यांची नव्हे तर खांडेकरांची नायिका आहे. ही ज्योती देशपांडे. खांडेकरांच्या कोणत्याही कादंबरीची ही नायिका म्हणून सहज शोभून दिसेल. आणखी जवळ गेलो आणि कळले की, नानाजी देशमुखांनी गेल्या भेटीत दिलेल्या भाषणाची टेप ऐकत ते भाषण आपल्या टपोऱ्या अक्षरात लिहून ठेवण्यात ती गढून गेलीये.

ज्योती पदवीधर आहे. शिक्षण संपले आणि ती लगेच दीनदयाळ प्रतिष्ठानच्या कामात उतरली. तिने महाराष्ट्र आणि घर सोडले. प्रथम काही दिवस दिल्लीला दीनदयाळ संस्थेत नानाजींची सचिव म्हणून ती काम बघत होती. त्यानंतर बिहारमध्ये सिंगभूम येथे प्रतिष्ठानने सुरू केलेल्या कामात ती वर्ष–दोन वर्षे होती. त्यानंतर प्रतिष्ठान तर्फे ओरिसात सुंदरगढ विभागात असलेल्या गोविंदपुर आदिवासी आश्रमात तिने काही काळ काम केले. गेल्या सहा महिन्यापासून ती गोंड्याला आहे.

स्त्रीचा सहज सहयोग नसेल तर कोणतीही क्रांती, विशेषतः सामाजिक क्रांती यशस्वी होणार नाही किंवा खरे सांगावयाचे तर सुरूसुद्धा करता येणार नाही हे सर्वप्रथम महात्मा गांधींनी ओळखले आणि प्रत्यक्षात आणले. नानाजींनी पण ते ओळखले आहे. गेल्या भेटीत नानाजींनी मला सांगितले होते – लग्न ही एक सहजसुंदर नैसर्गिक गोष्ट आहे. संसार हा सुंदर आणि आवश्यक आहे. मी माझ्या कार्यकर्त्यांना



¤

माणसे आपल्या त्यागाचा
आणि साधेपणाचा
बडेजाव न माजवता
आपल्याच तंद्रीत, रुबाबात
कशी जगू शकतात हे मला
कळले. रात्री खूप वेळपर्यंत
आम्ही अनेक विषयांवर
बोलत बसलो होतो—मी, सुरेश
आणि सुरेशची बायको.
आणखी असे कितीतरी...
अशांच्या जोरावर गोंड्याचे
काम पुढे सरकते आहे...

¤

सांगतो, 'मी एकटा आहे; पण माझे एकटे-पण मला एकटयाने भोगू दे! या विभागात माझ्याशी स्पर्धा करू नका! इतर कामात माझ्याशी स्पर्धा करा. तुमच्यापेक्षा वेगळा आणि मोठा आहे हे सांगावयास हा एकटा राहावयाचा प्रांत माझ्या एकटयासाठी सोडा! विनोदाचा भाग सोडला तरी नानाजींनी इतर जे सांगितले ते महत्त्वाचे होते. ते म्हणाले, 'गोंडयाचा विकास करावयाचा म्हणजे तेथील स्त्रीचा विकास सर्वप्रथम येतो. त्यांचे शिक्षण, त्यांचे प्रश्न बायाच समज शकतील खेडयातील या बायांना एखादी शहरी मैत्रीण पण हवी असेल. मी आज नवीन १२५ जोडपी तयार केलीत. ती जोडपी गोंडयाला आपली कर्मभूमी बनव-तील. प्रत्येक जोडप्याला प्रतिष्ठान महिना पाचशे रुपये देईल. त्या पैशात खेडयात त्यांना संसार करता येईल. दिवसभर नवरा-बायको दोघेही प्रतिष्ठानच्या कामात गुंतून राहतील. त्यांच्या दोन मुलांच्या संपूर्ण, हव्या त्या शिक्षणाची–उत्कृष्ट शिक्षणाची–सोय प्रतिष्ठान करील. त्या मुलांच्या नावे दरमहा पाचशे रुपये आम्ही बँकेत ठेवू. मी, प्रतिष्ठान, कोणी असेल वा नसेल; पण त्या पैशाच्या व्याजातून त्या मुलांचे उच्च शिक्षण पार पडेल वा त्यांना स्वतःचा छोटा उद्योग सुरू करता येईल.

सध्या तेथे अशी फक्त पाचच जोडपी आहेत; पण एखाद्या कवीसारखे आपले स्वप्न नानाजींनी मला रंगवून, तन्मय होऊन समजावून दिले होते. ज्योती तर अविवाहित असलेली एकच मुलगी आहे मला फार बरे वाटले. गोंडयाचा पहिला पुरुष कार्यकर्ता मराठी आहे लग्न करून आलेली पहिली गृहिणी मराठी आहे आणि ही पहिली मुलगी पण मराठीच आहे. महात्माजींनी महारा-ष्ट्राला कार्यकर्त्यांचे मोहोळ असे म्हटले होते. दीनदयाळ संस्थेचे संचालक प्रो. देवेंद्र स्वरूप मला दोन-तीनदा म्हणाले होते, 'आम्हाला साऱ्या भारतातून कार्यकर्ते मिळतात; पण महाराष्ट्रासारखी कार्यकर्त्यांची परंपरा इत-रत्र आढळत नाही.' आणखी एक सांगतो. गेल्या महिन्यात दिल्लीच्या 'नॅशनल रिसर्च डेव्हलपमेंटच्या' कार्यालयात गेलो होतो. देशातील साऱ्या राष्ट्रीय प्रयोगशाळांमधून होणारे काम यांच्यामार्फत लोकांना दिले जाते. ग्रामीण विभागासाठी झालेले संशोधन लोकांपर्यंत पोचवायचा विभाग डॉ. वेंकटेश हा एक वृद्ध अनुभवी अधिकारी शास्त्रज्ञ बघतो. मी डॉ. वेंकटेशबरोबर बंगलोरच्या व हैद्राबादच्या संस्थांनी, सरकारी मदतीवर केलेल्या बैलगाडयांच्या विकासाबाबतच्या संशोधनाबद्दल बोलत होतो. डॉ. वेंकटेश म्हणाले, 'सर्वांत चांगली बैलगाडी बलवन्त बैलगाडी आहे. ते काम सांगली इंजिनिअरिंग कॉलेजच्या काही प्राध्यापकांनी सरकारी मदत फारशी न घेता आपापल्या नोकऱ्या सांभाळून केलंय. समाजासाठी काही कराव-याची वृत्ती आता भारतात मला वाटते फक्त महाराष्ट्रातच बाकी आहे!' – मी काही बोललो नाही. महाराष्ट्रात नक्की काय परिस्थिती आहे हे मला माहीत आहे! पण उडदामाजी काळे–गोरे ठरवले जाते. साऱ्या भारतात कार्यकर्त्यांची खरोखरच काय चणचण असेल?

कोणत्याही स्वयंसेवी संस्थेच्या कार्याचे मूल्यमापन करताना याचे भान आपण ठेवा-वयास नको का? आणि या देशातील प्रश्न आपण फक्त कार्यकर्त्यांमार्फत खरोखरच कसे काय सोडविणार आहोत? – असो.

ज्योती आणि तिच्या मैत्रिणी आपल्या कार्यात गढून गेल्यात. जवळपासच्या खेडया-तील बायांशी त्यांनी मैत्री केलीये. मुलांच्या-साठी अभिनव स्पर्धा घेतल्यात. एकूण तीन शाळा मोत्रताली उभ्या राहुनाहेत. हे काम प्राथमिक वा जुजबी आहे असे म्हणावयाचा मला खराच काही अधिकार आहे का? जयप्रभाग्रामच्या चिन्मयानंद शाळेत आणि शिशुशिक्षा केंद्रात गेलो. त्या शाळेसाठी ४–५ कि. मीटर अंतरावरून चालून आलेली चिमणी मुले आणि त्यांच्या चेहऱ्यावरचे भाव मी कधीच विसरू शकणार नाही. त्यापैकी एकाही मुलाच्या पायात चप्पल नव्हती! किंबहुना फक्त एका मुलाच्या पायात चप्पल होती आणि त्याला त्याची एवढी अपूर्वाई होती की, तो चप्पल घालूनच वर्गात बसला होता! कोणाच्याच कपडयांना साबण आणि डोक्याला तेल लागलेले नव्हते. वीस-पंचवीस कि. मीटरवर असलेले गोंडा त्यांनी अजून पाहिलेले नव्हते आणि गोंडयासारखे मोठे शहर ही त्यांच्या दृष्टीने परीकथा होती!

मी ज्योतीला म्हणूनच तिच्या न झालेल्या कामाबाबत काही आडवे–तिडवे प्रश्न विचारू शकलो नाही. मी तिला फक्त छेडले. म्हटले, गेल्या भेटीत नानाजींनी मला एक गोष्ट सांगितली आहे. 'मुलींनी, स्त्रियांनी, खेडयात जाऊन हे सेवाभावी काम केले पाहिजे; पण अविवाहित मुलींना मी ते काम करावयास देणार नाही. खेडयातील समाज त्यांना तसे स्वीकारणार नाही. त्यातून बौद्धधर्माच्या



आणि तिथल्या स्त्रियांचे प्रश्न समजून घेणारी
त्यांची शहरी मैत्रीण – ज्योती

उदय-अस्तातील मिश्र भिक्षुणींचा वाटा मला नक्की माहीत आहे !'–नानाजी तुला फार काळ एकटे राहून काम करू देणार नाहीत. ज्योती लाजली नाही. आपले टपोरे डोळे माझ्यावर रोखून प्रसन्नपणे हसली. कामाचे वगैरे राहू देत. या अशा निष्ठेने झपाटलेल्या शिडशिडीत,डौलात हिंडणाऱ्या, तृप्तीत नाहणाऱ्या मुली पाहिल्या की किती बरे वाटते ! बंडू गोरे आणि मृणाल यांचे असिधारा हे पुस्तक पुन्हा एकदा वाचतोय असे वाटते

## नऊ


**मी** विघ्नसंतोषी नाही; पण तरीही ही सारी मंडळी बरोबर असताना जिप वाटेत गचकावी अशी माझी मनापासूनची इच्छा होती ! माझ्या घरची माणसंच काय, माझे मित्रसुद्धा माझ्या बत्तिशीला जाम घाबरतात; पण तरीही आता जिप बंद पडावयास नको होती. विहिरींच्या खालोखाल या लोकांचा महत्त्वाचा कार्यक्रम म्हणजे 'नेत्रदान–शिबिर आत्तापर्यंत यांनी केलेली सोळा शिबिरे संपलीत. या शिबिरात येवढा गाजावाजा करण्यासारखे काय ते मला अजून नीट लक्षात आलेले नाही. महाराष्ट्रातच काय, भारतभर रोटरी क्लब, लायन्स क्लब अशा सेवाभावी संस्था डझनावारी अशी शिबिरे भरवत असतात. आज सतराव्या शिबिराचा गौराचौराहा येथे सांगतासमारंभ आहे. या शिबिराबाबत दिलेली सारी आकडेवारी मी पुन्हा एकदा नजरेखालून घालतो. डॉ. तिवारींशी याबाबत थोडे बोलतो. डॉ. तिवारी शांत, धिमे, मनमिळाऊ वाटतात. लखनौजवळ सीतारामपूर येथे एक नावाजलेले फार मोठे नेत्ररुग्णालय आहे. डॉ. तिवारी तेथे मोठे सर्जन होते. त्यांच्या अनेक परदेशवाऱ्या झाल्यात. निवृत्त झाल्यापासून या मंडळींच्या कार्यात डॉ तिवारी सहयोग देताहेत. प्रत्येक शिबिराचा सांगतासमारंभ त्यांच्या हस्ते असतो. त्यासाठी आज सकाळी डॉ. तिवारी मुद्दाम २००–२५० कि. मीटर वरून आलेत !

□

डॉ. तिवारी आज आलेत आणि मीपण आज सकाळीच टपकलोय. गेले तीन–चार दिवस मी गायब होतो. येथील खासदार अण्णूसिंग, काही डावे तरुण यांचा घरगुती पाहुणचार घेऊन आलोय. अण्णूसिंगला व त्यांच्या लोकांना पाहून माझे मत चांगले झाले नाही. राजवाडा शोभावा असा त्याचा भव्य प्रासाद आहे; पण गडी कमालीचा रोखठोक वाटत होता. महाराष्ट्रातील एका पुढाऱ्याने मागे सांगितले होते. आम्हाला तोंड वाजवता येत नाही; पण तोंडात वाजवता येते या भाषेत अण्णूसिंग बोलत होता. म्हणाला 'जनता सरकारच्या राजवटीत कर्जे वाटून यांनी लोक जोडण्याचा प्रयत्न करून पाहिला आणि तो फसला. काम तर काहीच झाले नाही; पण बोलावे कसे, बोलावे कुठे. फोटो कसे काढावेत, पत्रके कशी वाटावीत याचे ज्ञान या मंडळींना फार चांगले आहे. याच्या जोरावर काम न करता बाजी मारतात आम्ही यांच्यापुढे गावरान माणसे. हे लोक आकड्यांची जादू करतात; पण मुलाला आई कोण आणि दाई कोण हे समजते. जनता शहाणी असते. गांधी सेवाग्रामला असताना तेथे त्यांना न ओळखणारे कोणी नव्हते. नानाजी असतात नागपूरला, गोंड्याला नव्हे ! वर्धा जिल्ह्यात काँग्रेसच्या विरुद्ध निवडणूक लढवावयाची कोणाची हिंमत नव्हती ! तसा हा त्यांचा मतदारसंघ. नानाजी, अटलजी येथून निवडून आले होते; पण येथे ७९साली शारदाप्रसादना आम्ही चारी मुंड्या चीत केलय ! उद्याच्या निवडणुकीत करू. आज निवडणूक झाली तरी करू !

– हाताची खूण करून मी अण्णूसिंगला थांबविण्याचा प्रयत्न केला–हाताची खूण पटल्यावर तो हसला आणि थांबला ! मी म्हटले, 'गड्या, तू मोठा खरा. ते लोक सांगतात ते सारे मला पचते वा पटते असे नव्हे; पण तू सांगतोस ते त्याहूनही पटत नाही ! या मंडळींनी निवडणूक लढवली हे तर खरेच. मला व्यक्तिशः त्यांनी निवडणूक लढविण्यात काही चूक वाटत नाही; पण एक नक्की सांगतो, शारदाप्रसाद या क्षेत्रात पुन्हा उभे राहणार नाहीत. त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे यांच्या कोणत्याच कार्यकर्त्याच्या मनात निवणुकांबद्दल अजिबात प्रेम नाही–नागपूरहून चावी फिरेपर्यंत येणार नाही ! ते असो. या कार्याचे मूल्यमापन करावयाची तुझी पद्धत वेगळी आहे, माझी अपेक्षा वेगळी होती !

माझ्या डाव्या मित्रांना भेटलो आणि



चक्क चकव्यात शिरलो होतो असे वाटले. त्यांच्या मते हा अण्णूसिग चोर आहे. स्वतः काही करत नाही. नुसता राजवाड्यात राहतो. दीनदयाळ प्रतिष्ठानचे लोक चोर वगैरे नाहीत; पण काही न करता गाजावाजा फार करतात ! भूमिहीन शेतमजुरांच्यासाठी यांनी काही केलेले नाही. बापजन्मी कधी काही करू शकणार नाहीत ! मी त्यांना म्हणालो, 'ते राहू दे. त्यांनी काही तरी काम केलंय ते तरी मान्य करता ना ? तळागाळाच्या लोकांचे राहू देत.' तळागाळाच्या जिल्ह्यासाठी तरी काही करताहेत. प्रामाणिकपणे मदत करताहेत. एकच प्रश्न सोडवावयाचे अनेक मार्ग असतात आणि ते परस्पर विरोधी नसतात तर परस्पर पूरक असतात हे तुम्ही का मान्य करत नाही ? वस्तू विक्रय केन्द्र, टायपिंगक्लास, शिवणवर्ग यातून मूठभर लोकांचा तरी फायदा झालाय; पण त्या तरुणांचा खरा राग आहे तो बोअरिंग विहिरी प्रकरणावर. जनता पार्टीच्या वेळी नानाजींनी आपले वजन वापरून बँकेतील आपले ठिकठिकाणचे कार्यकर्ते या जिल्ह्यात हलवले. सरकारी वजन वापरले व मध्यम स्तरावरील लोकांना यांच्यामार्फत कर्ज मिळणे सोपे झाले. तळागाळावरील लोकांना काही फायदा झाला नाही. मध्यम स्तरावरील लोकात आपले जाळे पसरवावयाचे व तळ ठोकावयाचा तो एक धूर्त अक्कलहुशारीने केलेला प्रयत्न झाला. जनता पक्ष गेला आणि यांच्यामार्फत कर्ज मिळणे थांबले. यांचे कामही थांबले. गेल्या वर्षात नव्या किती विहिरी बांधून झाल्या ते सांगा !– त्यापेक्षा महत्त्वाचे म्हणजे पैसे घेतलेल्यापैकी किती जणांनी किती पैसे परत केले याची यादी तपासा ! उत्पादन किती वाढले हे सरकारी आकड्यांच्या मदतीने सांगा !

मी म्हटले, आमच्याकडेही तगाई म्हणून एक प्रकार होता. तगाई म्हणजे परत न देणे असे एक समीकरण होते. जिल्ह्याजिल्ह्यातील चाणाक्ष पुढाऱ्यांनी आपल्या जिल्ह्यात तगाई पेरली होती; पण मला व्यक्तिशः त्यात काही चूक वाटत नाही. आशियाड, अलिप्त राष्ट्र परिषद, दूरदर्शन यावर आपण येवढे पैसे उडवतो. त्यातील चार दाणे खेड्यापाड्यातील लोकांच्या पदरात पडले तर ती खरे पाहता स्वागतार्ह गोष्ट आहे.

पण या डाव्या तरुणांचा खरा आक्षेप आहे तो यांच्या कार्यपद्धतीला. 'हे लोक वरवरची मलमपट्टी करताहेत. खादी ग्रामोद्योगसारखे वरवरचे कार्यक्रम करताहेत, मूळ प्रश्नाला हात न घालता गोल गोल फिरत राहताहेत ! वगैरे वगैरे.' या लोकांबरोबर असलेले शहरातील वा खेड्यातील लोकही तद्दन भांडवलदार व लोकांना पिळणारे आहेत आणि संघर्षाची वेळ येताच हे लोक मागे फिरतील याची या डाव्या तरुणांची खात्री आहे !

◻

या डाव्या तरुणांनी दोन दिवसांत माझे डोके भडकवलंय हे नाकारण्यात काही अर्थ नाही आणि मनाची अशी संभ्रमावस्था असतानाच आमची जिप गोकुळचंद अगरवाल यांच्या बलरामपूरमधील प्रशस्त बंगल्यात शिरली.

गोकुळचंदांना पाहून मला महाराष्ट्राती


*With Best Compliments From :*

# A. V. BHAT & CO.

## Promotors Of Ownership Flats

1347, Sadashiv Peth, Near Chimanya Ganapati
PUNE 411 030

Phone : 44 08 76

गेल्या पिढीतील एखाद्या सधन मारवाड्याच्या पेढीत शिरल्यासारखे वाटले. भल्या मोठ्या तिजोऱ्या, नेटक्या बैठका, बेरक्या नजरा, प्रचंड सुटलेली पोटे आणि त्याहूनही मोठे असे मतलबी हसरे चेहरे! कोणाही माणसाचे असे मूल्यमापन करणं चुकीचेच. संपूर्ण अन्यायकारक; पण पहिले मत तसे कायम राहतेच. गोकुळचंदांची कोठी फार मोठी होती. त्यांचा धंदा सराफाचा; पण अनेक धंद्यांबाबत बारकाईने–सावधपणे बोलणी सुरू होती. गोकुळचंद एल. एल एम. आहेत. स्थानिक लॉ कॉलेजात शिकवत असत. ७१ साली त्यांच्या पेढीजवळ कोणी तरी मोटर-सायकल वरून येऊन त्यांच्या पायाला गोळी मारून गेले. पाय संपूर्ण कामातून गेले ते गेलेच! गोळी कोणी मारली ते कळले नाही; पण राजकीय कारणातून ती घातली गेली असे कोणीच मानत नाही हातांनी चालवावयाच्या बैठ्या तीन चाकी सायकलवर बसून शेटजी हिंडत होते. हिंदी आणि इंग्रजी भाषेवर उत्कृष्ट प्रभुत्व. लाघवी भाषा, मुद्द्याला न कचरता हात घालण्याची तयारी वगैरे शेटजींचे अनेक गुणविशेष थोड्याच वेळात लक्षात आले. शेटजी, नानाजी व यादवराव यांचे जवळचे मित्र असावेत. गोंडा प्रकल्पाचे ते स्थानिक आर्थिक सल्लागार वा संयोजक असे काहीसे आहेत. जयप्रभाग्रामला सध्या जे नानाजींचे घर बांधताहेत त्याचे नियोजन, व्यवस्थापन ते येथे बसून करत असावेत. शारदाजींच्या खोलीत छत फार खाली आहे असे मी सांगतातच ते हळहळतात. मला तसे करावयाचे नव्हते. उद्या वीज आली तर त्यांच्या खोलीत पंखा लावावयाचा होता, आता कसा लावणार, भिंतीवर लावावा लागेल असे काहीसे म्हणतात. शारदाजी, चंद्रशेखर ही माणसे गोकुळचंदांच्या समोर दूर आदराने, संकोचाने हातांची बोटे एकमेकात अडकवून चुळबूळ करत बसली आहेत हे मला आवडले नाही !

□

गोकुळचंदांच्या घरातून बाहेर पडून आम्ही ८–१० किलोमीटर पुढे गेलो आणि माझी बत्तिशी खरी ठरली. जिप वाटेत गचकते. तसे काही फारसे झालेले नाही. पाठचे चाक पंक्चर झालंय. जिपला स्टेपनी लावलेली आहे; पण त्यात हवा नाही. आता ट्रक–बस–मिळेल त्या वाहनाने, गोराचौराहच्या शिबिराला २–३ तास उशीरा पोचावयास होणार! डॉ.तिवारी आपला आत्मसंयम वगैरे वापरून म्हणतात, 'शारदाजी, ही मात्र कमाल आहे. स्टेपनीतसुद्धा हवा नाही,' भेटलो की, नानाजी विचारतात, तुम्हाला त्रास वगैरे तर झाला नाही ना? आम्ही त्यांना सांगतो, 'सगळे ठीक आहे; पण हे नेहमी असे काही तरी असते. तुमचे सगळे कार्यकर्ते तरुण आहेत, उत्साही आहेत, जीव तोडून काम करणारे आहेत; पण हा सगळा अजब कारभार आहे!' मला या साऱ्या प्रकरणाचे आणखीनच नवल वाटते. संघाचे लोक म्हणजे चोख कारभार करणारे, प्रचंड मेळावे आणि प्रचंड शिबिरे, भव्य मिरवणुका यथासांग पार पाडणारे. शारदाजी मात्र शांत आहेत. हळूहळू माझ्या लक्षात सारा प्रकार येतो. बाकीच्या चाकांची पण तीच स्थिती आहे. जिपला पण खूप दुरुस्ती हवी आहे चाके तर बदलावयासच हवीत. थापर आणि डालमिया यांनी दिलेल्या रुग्णवाहिकांची स्थिती पण फारशी वेगळी नाही!

मंडळी पैशाच्या तद्दन अडचणीत आहेत

With Best Compliments From :

**M/s. MIKROTECH**

**( A Kudale Enterprise )**

98A/17, Hadapsar Industrial Estate
Pune 411 013 ( India )

Phone : 70567 * Gram : TESTEQUIP

**Manufacturers of Testing Equipments and Measuring Instruments**

*With Best Compliments From :*

**VIKRAM PRINTERS**

34 PARVATI INDUSTRIAL ESTATE
PUNE 411 009

Tel : 440890

माझ्यासाठी आपत्धर्म म्हणून गेले काही दिवस जिप उडवताहेत. एखाद्या खानदानी बाईने चेहऱ्यावर हसू ठेवून, फाटके पातळ झाकत, टुकीने संसार करून दाखवावा तसा सारा गाडा ओढताहेत. शारदाजींनी खरे पाहता मला अनेकवार सांगितले आहे की, तुम्ही आलाय म्हणून मी हल्ली जिप वापरतोय. आता मोटारसायकल चालवावयाचा त्रास होतो. कोणी तरी कार्यकर्ता मोटारसायकल चालवतो. मी मागे बसतो. जिपमध्ये बसूनही माझे अंग जेथे सतरा ठिकाणी मोडते अशा ठिकाणी हा शेलारमामा सकाळपासून संध्याकाळपर्यंत मोटारसायलवरून हिंडतो. अंदमानातील खोलीची याठवण व्हावी अशा खोलीत एक वेळ जेवून रात्रीची मच्छरदाणी न घेता झोपतो. या लोकांना पैशाचीही मदत न करता, यांनी त्यांच्याकडून काही घ्यावे, यांच्याकडून काही घेऊ नये असे म्हणावयाचा मला काय अधिकार आहे ? गोकुळचंद आणि बिर्ला आवळा देऊन कोहळा काढतात असे तरी मी म्हणू शकतो का ?

□

जिप मोडल्यापासून मी खुष आहे. माझा एक महत्त्वाचा प्रयोग आता अनुमान देणार आहे !

मी पाठीमागे बसलोय. माझ्या समोर बनवारी बसलाय. जवळ देशपांडे, समोरच्या सीटवर डॉ. तिवारी, शारदाजी, डॉ. नंदकिशोर गुप्ता वगैरे मंडळी दाटीदाटीने बसलीत. तीन जणांच्या जागेवर एकूण चार माणसे कोंबलीत. पुढे–मागे आणखी काही कार्यकर्ते बसलेत. जिप मोडल्यापासूनच्या आमच्या प्रवासातील हा शेवटचा अध्याय सुरू आहे. सर्वप्रथम ट्रकचा प्रवास झाला. ड्रायव्हरची विनवणी करून आम्ही डॉ. तिवारींना त्याच्या जवळची सीट मिळवून दिली. सामानाच्या गर्दीत मी, शारदाजी इतर कार्यकर्ते ट्रकच्या मागे तोल सांभाळण्याची सर्कस करत उभे राहिलो. त्यानंतर बस बदलली एका बसस्टेशनवरच्या माशांनी घोंगावणाऱ्या एका कळाहीन हॉटेलात स्पेशल चहा आणि भजी घेतली. या साऱ्या प्रवासात मी, सुरेश आणि बनवारी यांचे बोट धरून आहे. पोटातल्या कोंबडीने माझे आणि सुरेशचे नाते अतूट झालंय; पण मला खरा आवडलाय तो बनवारी. प्रथम मला हा माझ्यासारखाच नुसता बोलणारा, थोडे पोट सुटलेला स्थूल आकाराचा, तद्दन निकामी मध्यमवयीन मध्यमवर्गीय वाटला होता ! पण जवळ गेलो तसे कळले की, हे बेणे वेगळे आहे मी त्याच्या प्रेमात पडलोय. आमची वेव्ह लेंग्थ जुळलीये, आणखी दहा वर्षांनी पुन्हा अचानक भेटलो तरी आम्ही खूप जवळचे मित्र असू इतके आम्ही जवळ आलोय–खरे पाहता मी येण्याच्या आधी चार दिवसच हा येथे आलाय. एकटा नाही बायकोला घेऊन. चक्क घरातून पळून ! बनवारी ही एक वेगळी चीज आहे. हा एम. एस. सी. बी. एड. आहे. दहा वर्षांपूर्वी प्राध्यापक होता. त्यानंतर स्वतःच्या गावी, मध्यप्रदेशात कोरब्याला याने औषधांचे दुकान काढले. दुकान इतके छान चालू लागले की, आणखी एक दुकान टाकले. जिल्ह्याच्या औषधविक्रेता संघाचा अध्यक्ष बनला. भारतीय जनता पार्टीचा विभागीय उपाध्यक्ष झाला. आणखी एक हॉटेल सुरू केले. आयुष्य कसे मघई पानासारखे मस्त जमले असेल ! पण त्याच वेळी त्याच्या डोक्यात


*With Best Compliments From :*

**Blue Star Graphic Industries**

42, Katrak Road, Opp. Wadala Post Office,
Dadar, BOMBAY - 400 031.

*Specialist in :*

**Varnishing, Paper and Board Embossing**
**PVC and Polyster Lamination**

*With Best Compliments*

*From*

**ORGEL**
ELECTRONIC INSTRUMENTS

Plot No. 26, Electronic Co-op. Estate Ltd.
Pune-Satara Road, Pune-411 009.

*Manufacturers of Quality Electronic Items*

- **Automatic Line Voltage Correctors**
- **Invertors**
- **D. C. Power supplies**

चक्क किडा उठला. येथे येऊन एक महिना राहून गेला. आपल्याला हे जमेल असा याला विश्वास आला. वायकोला आणायला हा घरी गेला आणि घरी तुफान उठले. सारा कारभार याने सुरू केलेला, वाढवलेला. आई, वडील, धाकटा भाऊ रडले, जाऊ नको म्हणून गळ घालून बसले. ते राहू दे, मित्रांनी सुद्धा रडून उपोषण करून दाखवले ! याला बाधा झालीये असा निर्णय घरच्यांनी घेतला. हा पूजेला वगैरे बसणार नाही हे माहीत असल्याने याच्या बायकोला पूजेला बसवून शांती वगैरे करण्याचे अनेक प्रयत्न झाले. पूजेचा अंगारा त्याच्या बायकोला याच्या आंघोळीच्या पाण्यात वा दुधात मिसळावा लागे; पण याचा काही परिणाम झाला नाही. बायकोला माहेरी जायचंय असे सांगून एका बॅगेसह स्वारी बाहेर पडली. बायको-सह सरळ येथे आली. त्याची बायको काल रात्री, चांदण्यात भटकावयास बाहेर पडलो त्या वेळी हा किस्सा आपल्या खास मार-वाडी ढंगात सांगत होती. आम्ही सारे मित्र त्या वेळी मनसोक्त हसलो होतो. बनवारीला सांगितले होते, ' महिन्याभरात तुझे आई–वडील आणि मित्र येथे येऊन तुला एखाद्या गाडीत घालून पळवून नेतील याची आम्हाला खात्री आहे !' मजेची गोष्ट अशी की, त्याच्या बायकोला ही कल्पना फार आवड-लेली दिसली. ती येथे एकदम नाखुश आहे. बनवारीला एकूण कठीणच जाणारे !

मी मुद्द्याला हात घालतो. देशपांडे-बनवारींची फिरकी ताणत मी त्यांना म्हटले, ' मंडळी जिप मोडल्यामुळं डॉ. तिवारींना त्रास होतोय याचं मला फार वाईट वाटतंय; पण जिप मोडावी अशी माझी फार इच्छा होती. त्याला एक कारण होते. मला तुमचा जनतासंपर्क पहावयाचा होता ! जिप मोडल्या-पासून आपण दोन-तीन तास हिंडतोय. बस, ट्रक, हॉटेल अशी अनेक ठिकाणे झाली. तुम्हाला, शारदाजींना भेटून, नमस्कार करून चार शब्द बोलणारा अक्षरशः एकही माणूस भेटू नये हा काय प्रकार आहे ? तुमच्या जिपमधून हिंडताना वाटेत तुमची गाडी थांबेल तेथे शारदाजींच्या पायाला हात लावून नमस्कार करणारे लोक असतात; पण ती तुम्ही जोडलेली माणसे असतात. या ना त्या कारणाने; पण सारा विभाग विका-साच्या लाटेवर तरंगतोय, तुमच्या प्रकल्पा-मुळे सारा समाज किमान जागा झालाय, तुमच्याकडे सामाजिक आणि आर्थिक परि-वर्तनाच्या प्रक्रियेतील सहाय्यक (Catalyst) म्हणून पाहतोय असाही अर्थ त्यातून निघत नाही मी महाराष्ट्रातील आणि इतरही प्रांतातील काही कार्यकर्ते पाहिलेले आहेत. राजकारणात फारसे नसलेले; पण लोक त्यांना एकटे बसूच देत नाहीत. ते कोठेही जाण्यापूर्वी गुळाला मुंगी चिकटावी तसे लोक त्यांना येऊन भिडतात ! कदाचित संघर्षा-साठी उतरल्यावर ते होत असावे ! मला वाटते तुमचे कार्य वा तुम्हीही जनमानसा-पर्यंत अजून पोचला नाहीत. ते राहू दे, माझ्याबरोबर गोंडास्टेशनवर ! चला. स्टेशन-बाहेर पाच माणसांना दीनदयाळ संस्था, जयप्रभाग्राम वगैरेबद्दल विचारा. पत्ता मिळवताना अंगाला घाम फुटेल. खेड्यात आजवर हेच होते आहे हे विसरू नका. याचा अर्थ चार-पाच वर्षांनंतरही लोकांना अजून तुम्ही त्यांचे आहात, त्यांचे प्रश्न सोडविण्या-साठी आलेले आहात याची जाणीव झालेली नाही. खूण पटलेली नाही. '

—बनवारी म्हणाला, तू म्हणतोस ते खरे आहे. देशपांडे म्हणाला. ' तुम्हा दोघांचे बोलावयास काय जाते ? शून्यातून काही निर्माण करणे म्हणजे काय हे तुम्हाला माहीत नाही. मी येथे आलो तेव्हा भाषा नवीन होती. अक्षरशः चंद्रमौळी झोपडीत राहिलो. या लोकांच्यात नुसते मिसळणे म्हणजे काय प्रकार असतो ते समजले. मी तशा एखाद्या तुझ्या दृष्टीने सधन असलेल्या घरात जाई अपूर्वाई, पाहुणचार म्हणून चहा बनत असे. मी घरी पायपुसणे म्हणूनही वापरणार नाही अशा कपड्यातून चहा माझ्यासमोर गाळला जात असे. डोळे आलेली दोन मुले, खरूज खाजवणारी एखादी मुलगी जवळपास हिंडत असे. बोटे बुडवलेल्या वाटीतून तो चहा समोर येई. या लोकांच्यात मिसळायचंय म्हणून चेहऱ्यावर विक्रेत्याचे कृत्रिम हास्य ठेवून तो चहा घ्यावा लागे! अशा किती गोष्टी तुम्हाला सांगू ?'

मी म्हटले, ' मंडळी, आपणा कोणालाच अजून न सुटलेले वा न कळलेले हे एक कोडे आहे. अंगावर पंचा, हातात काठी आणि मुठीत मीठ घेऊन एक म्हातारा या देशात बाहेर पडला आणि भाषांचे आणि धर्मांचे बांध फोडून आसेतुहिमाचल आणि आसिंधु-सिंधूपर्यंत तळागाळाच्या लोकांना तो समजला आणि आपला वाटला. हा केवळ चमत्कार नसावा. लोकांचे खरे प्रश्न समजण्याची प्रतिभा आणि त्या प्रश्नांना न कचरता हात घालावयाची हिंमत या गोष्टी पण महत्त्वाच्या आहेत. या देशातील तळागाळाचे वा खेड्या-पाड्यातीलही बहुसंख्य लोक दूरदर्शन, आकाशवाणी इतकेच काय वर्तमानपत्र यांच्याही टप्प्यात येत नाहीत. या माध्यमाचा त्यांच्यावर काडीमात्र परिणाम होत नाही; पण क्षणार्धात साऱ्या देशभर एक लाट पसरते. सत्याहत्तरच्या निवडणुकीत सारा हिंदी भाषिक पंचवीस-तीस कोटींचा समूह एका लाटेवर आरूढ होतो. १८५७ च्या बंडाच्या वेळी कानपूर-मिरतपासून दिल्ली-झाशी-पर्यंतचा सारा जनसमुदाय भडका वाटावा असा पेटून उठतो. या प्रचंड अयांग तळा-गाळाच्या लोकांपर्यंत विचार वा माहिती कोणत्या माध्यमातून फिरते ? मला वाटते मधमाशा वा मुंग्या एकमेकांशी कशा बोलतात याबाबत तरी आपणाला थोडी माहिती आहे. या माध्यमाबाबत आपणाला अजिबात काही माहीत नाही. '


With Best Compliments From :

For Your Requirement of Various
Components of Ptfe-Teflon

*Contact*

**Polymer Industries**

2, Electronic Estate, Poona 411 009.



नानाजी म्हणतात, " I wish to bridge the gap between the people and the government. "

वनवारी म्हणाला, 'तुला नक्की काय म्हणायचय ? नुसता असा गोल गोल फिरू नको !' मी म्हटले, 'हे कोडे मला अजून सुटलेले नाही हे मी प्रथमच सांगितलंय; पण उद्या-परवा केव्हा तरी मला, इतर कुणाला, खुद्द तुलाही हे कोडे कदाचित अचानक सुटेल ! आता तुमच्या कामाबद्दल बोलावयाचे तर तुमचे गणित मला अजून समजलेले नाही. तुम्ही देत असलेली आकडेवारी वरवर पाहिली तर विलोभनीय वाटते. मीपण आकड्यांच्या खूप जादू केलेल्या आहेत. कोणतेच आकडे कधी संपूर्ण बरोबर नसतात, तसेच ते संपूर्ण चुकीचे पण नसतात. तुम्ही देता ती आकडेवारी बरीचशी बरोबर आहे असे माझे व्यक्तिश: प्रामाणिक मत बनलंय; पण ही आकडेवारी डिसेंबर १९८१ ची आहे. त्यानंतर पंधरा महिन्यांत काय काय झाले याची आकडेवारी मला इथेही मिळाली नाही आणि दिल्लीला दीनदयाळ संस्थेत पण ! मंडळी, ही अगदी पेशवाई आहे ! त्यातून जनता सरकारची मदत थांबल्यावर तुमचे काम झपाट्याने कमी झाले असे म्हणणारेही लोक आहेत; पण कामातील चढउतार हे अशा कामातील स्थायी निकष मी मानत नाही. आकड्यांच्या फूटपट्टीने पण असली कामे मोजावयाची नसतात. हिमालयाची उंची व पॅसिफिकची खोली पण फुटात सांगितली जाते; पण म्हणून आपली फूटपट्टी घेऊन आपण त्यांना मापावयास जात नाही. त्यांची उंची ठरवायचे कस, प्रयोग वेगळे असतात.

तुमची आकडेवारी संपूर्ण खरी धरली आणि त्यानंतर त्याच गतीने काम वाढले असे मानले तरी मंडळी, तुम्हाला काय करावयाचे आहे हे मला समजलेले नाही वा तुम्ही समजावून दिलेले नाही. कोंबडीपालन, डुक्कर पाळणे, मधमाशी पाळणे, मासे पाळणे या विभागात झालेले कार्य फारच कमी आहे. सरकारी शेतकीअधिकारी याहून अधिक काम करतो. ग्रामोद्योगाच्या क्षेत्रात तीन वर्षांत तुम्ही साठ हजारांचा कच्चा माल पुरवलात आणि चाळीस हजारांच्या वस्तू विकल्यात. खादी ग्रामोद्योग आयोग आज अस्तित्वात आहे आणि त्याचे कार्य आकडेवारीप्रमाणे अधिक आकर्षक आहे ! तुमचे महत्त्वाचे कार्य म्हणजे एकतीसहजार लोकांना ट्यूबवेल खणण्यासाठी, पंधरा हजार लोकांना डिझेल पंप बसविण्यासाठी, तीनशे लोकांना दोरी वळण्याची यंत्रे बनविण्यासाठी,अडीचशे लोकांना कोंबड्या पाळण्यासाठी, सव्वाशे लोकांना मासे पाळण्यासाठी, शंभर लोकांना डुकरे पाळण्यासाठी बँकेचे कर्ज आणि सरकारी अनुदान मिळवून दिलेत. यात तुमचे काम काय ? एखाद्या सरकारी वा बँकेच्या विकास-अधिकाऱ्याने कर्जे वाटावीत असे हे काम आहे !'

मी वातावरण छान तापवले होते. त्याचा योग्य तो परिणाम झाला. आत्तापर्यंत न बोलणारा तरुणोदय मंडळाचा प्रमुख आशुतोष पाठक म्हणाला, 'आम्हाला काय करावयाचे आहे ते उघड आहे. नानाजींनी आपल्या २५ ऑक्टोबर १९७८ च्या प्राथमिक भाषणात सांगितले होते—

'... The Government have been spending crores of rupees for the poor farmers and farm labourers. But that amount has always been evaporating at the top. It never reaches the person it is meant for. In March 1977 itself I had declined a seat in the Ministry. I wish to bridge the gap between the people and the Government...!'

(सरकार वारेमाप पैसा खर्च करतंय. तो पैसा सर्वसामान्य शेतकरी व शेतमजुरांपर्यंत न पोचता वरच्यावर उडून जातोय. लोक आणि सरकार यांच्यातील हे अंतर मला कमी करायचे आहे...भरून काढायचे आहे...!)

मी म्हटले, 'नानाजींनी त्या भाषणात आणखीही काही मुद्दे सांगितले होते; पण हा एक महत्त्वाचा मुद्दा होता. त्यातून तुमच्यापैकी अनेकांचे असेच प्रामाणिक मत आहे असं मला वाटतंय आणि मंडळी, तसे असेल तर वाट लागली! सरकारी यंत्रणेवर आज जो आरोप येतो तोच उद्या तुमच्यावरही येऊ शकतो! सरकार बदलले वा बँकेला नवा चेअरमन आला तर मदतीचा तो ओघ पण आटतो! स्वतःचे कडवे, निष्ठावान, त्यागी कार्यकर्ते सरकारी यंत्रणेवर ठेवून ती कार्यक्षम ठेवावयाचा प्रयत्न माओने करून पाहिला. काही वर्षांत त्याचे हे कार्यकर्तेच मार्गावरून ढळले! याच लोकांना निकालात काढण्यासाठी त्याला सांस्कृतिक क्रांती करावी लागली आणि 'खुर्चीवर बसणारा माणूस हा या जगातील सर्वांत दगाबाज आणि अविश्वसनीय प्राणी आहे!' हे त्याचे सुभाषित बाहेर आले. स्टॅलिनकडे तर कार्यकर्ते पण नव्हते; पण प्रचंड दहशत आणि परस्परांवर नजर ठेवणाऱ्या अनेक गुप्तहेर खात्यांची निर्मिती करून त्याने तो प्रयत्न केला. त्या वेळची गोष्ट सांगतात. पोलीसअंमलदार वा सरकारी अधिकारी तुमचे काम करावयास अगत्याने तुमच्या घरी येत. घरातून जाण्यापूर्वी कोणी चुकवून आपल्या खिशात एखादे रुबलसचे नाणे टाकलेले नाही ना ते तपासत. बाहेर एखादा गुप्तहेर आपली झडती घेईल आणि उद्या आपल्या घरादारावरून गाढवाचा नांगर फिरेल ही त्याला भीती असे. नंतर ऋश्चेवनेच सांगितल्याप्रमाणे, त्यामुळे खाबूगिरी थोडी कमी होत असतानाच कार्यक्षमता फार कमी झाली आणि सायबेरिआतील तुरुंग फुगत राहिले. मला तरी त्यापेक्षा कैरोंसारख्या माणसाने केलेला पंजाबचा उद्धार अधिक आकर्षक आणि चांगला वाटतो!

मला काय वाटते ते राहू देत. ते पूर्णपणे चूकसुद्धा असेल; पण नानाजी काय म्हणतात एवढेच तुम्हाला अर्धवट माहीत आहे. नानाजी आणि शारदाजी या आदेशावर तुम्ही हालता; पण 'शिवाजी म्हणतो' म्हणून किल्ला बांधता येतो, किल्ला जिंकता पण येतो; पण तुम्ही करताय ते कार्य, तो प्रयोग त्यापेक्षा अनेक पटींनी कठीण आणि अवघड आहे. तुमच्या दीनदयाळ संस्थेच्या मासिकाचे नाव 'मंथन' आहे, एल्गार नव्हे हे तुम्ही ओळखलेले नाही. मंथनचे अंक सुद्धा न वाचता पोथीसारखे जपून ठेवलेत! आणि या सर्वांमुळे खरे नुकसान कामाचे किंवा तुम्हाला पटेल अशा भाषेत सांगायचे तर नानाजींचेच होते आहे! राष्ट्रपतींना साक्षी ठेवून ७८ साली नानाजींनी सांगितले होते, 'नव्वद टक्के कुटुंबांचे वार्षिक उत्पन्न आज चारशे रुपयांहून कमी आहे. आमच्या प्रयत्नाने ते पाच वर्षांत आम्ही वार्षिक पंचवीसशे रुपयांपर्यंत वाढवू! तुम्हाला ते खरेच किती वाढलंय असे वाटते?

– अण्णूसिंग म्हणतो 'सरकारी आकड्यांप्रमाणे उत्पादन व उत्पन्न दोन्ही वाढलेले नाही!' कम्युनिस्ट पार्टीचा गटप्रमुख बिरजूलाल म्हणतो, 'ते काहीही वाढलेले नाही. उरलेल्या वेळात आपले गोकुळचंद आणि इतर श्रीमंत शेतकरी यांची संपत्ती ही मंडळी गरिबांना वाटणार असतील तरच ते शक्य आहे!

'तुम्ही हे उद्दिष्ट अजिबात गाठणार नाही; पण त्याचेही वाईट वाटावयास नको होते. टिळकांनी स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच! म्हणून सांगितले होते. गांधी-विनोबांनी पण अशा काही प्रतिज्ञा केल्या होत्या. कोणाला एका वर्षात स्वातंत्र्य घ्यावयाचे होते, कोणाला आणखी काही. आपण सारे एवढे नादान लोक आहोत की, कोणत्याही मोठ्या मणासाची प्रतिज्ञा पुरी होणार नाही याची आपण काळजी घेतो! त्या प्रतिज्ञा पूर्ण झाल्या नाहीत म्हणून त्या माणसांना वा कार्याला कमीपणा येत नाही; पण आपण नीट मार्गावर आहोत का हे सर्वांनाच पुन्हा पुन्हा तपासावे लागते. मला अगदी खटकलेली गोष्ट सांगतो. सर्वांसाठी सर्वव्यापी आरोग्य (Health for all) ही तुमची घोषणा आहे. त्या दृष्टीने कार्य सुरू आहे आणि जयप्रभाग्राममध्ये झोप येणार नाही असे डास आहेत! तुमच्या सामुदायिक भोजनगृहात एवढ्या माशा आहेत की, पंख्याप्रमाणे हात हालवत जेवला नाहीत तरीही तुम्ही माझ्यासारखे मांसाहारी बनाल!'

बनवारी म्हणाला, 'मला तुझे म्हणणे बरेचसे पटते. मी आता येथे आलोय. मला येथे खूप गोष्टी करावयाच्या आहेत. जयप्रभाग्राम अगदी स्वच्छ असावे. माओने पेकिंग आणि शांघायच्या रस्त्यावरील माशा आणि डास नाहीसे करून दाखविले. आम्हाला ते जयप्रभाग्रामला तरी जमावे. येथे अजिबात वाचनालय नाही. भारतात व जगात ग्रामीण क्षेत्रात होणारे काम, प्रयोग सांगणारे साहित्य येथे असावे. छान संदर्भग्रंथालय मला उभारावयाचे आहे. आणखी म्हणजे येथील घरांच्यावर पत्रे आहेत. उन्हात ती घरे भट्टीचा बनतील! घरांना लाकडाचे, गवताचे छान छप्पर



*With Best Compliments*

*From*

**BUBNA UDYOG**

8, Marine Chambers,
11, New Marine Lines,
BOMBAY - 400 020.

Phone : 291744 Gram : BEEYOU



वांझोटी चर्चा दूरवर उडून जावी !

असावे. जयप्रभाग्राम बांधताना वापरली जाणारी प्रत्येक वस्तू, आमच्या दैनंदिन जीवनात येणारी प्रत्येक गोष्ट येथे वा जवळपासच्या खेड्यात बनलेली असावी. घरे, तलाव बांधताना आम्ही श्रमदान करावे...'


मी मनापासून हसलो. बनवारीला म्हटले, 'मित्रा, तू येथे फार काळ राहशील असे मला वाटत नाही. तू माझ्यापेक्षा खूप अधिक त्यागी व मेहनती आहेस; पण अखेर तू पण माझ्यासारखाच थोडे चिंतन, बऱ्यापैकी वाचन, भरपूर बडबड आणि मामुली काम करणारा एक माणूस आहेस ! सुरेश, बंडू, आशुतोष, चंद्रशेखर, डॉ. शुभनिकेत यांच्यासारखे आजन्म या कुग्रामात स्वत:ला गाडून घेऊन काम करणे तुला अजिबात जमणार नाही ! खाजगीतले सांगतो, फारसे काम न करणारे तू आणि मी हेच अखेर या देशापुढील खरे महत्त्वाचे प्रश्न आहोत ! तू येथे काही दिवस राहशील. नंतर येथूनही पळून जाशील. पुढे–मागे हिंदीमधील एखाद्या 'संकल्प'मध्ये वगैरे स्वत:च्या अनुभवावर एक लेख लिहिशील !'

□

गौराचौराहच्या नेत्रदानशिबिरात आलो आणि पालापाचोळ्याप्रमाणे माझी वांझोटी चर्चा दूरवर उडून गेली. वस्तुस्थितीचे अंगावर शहारे आणणारे, चटके देणारे, जाळणारे भीषण दर्शन घडले की, आपण फक्त विचार करणारी माणसे बधिर होऊन सुन्न बनतो.–गौराचौराह नुसते पाहिले तर रमणीय छान ठिकाण वाटले असते. दूरवर नेपाळची सरहद्द बनलेल्या झेंडावाला येथील टेकड्या दिसतात. वाटेत येताना तुळसीपूरला आम्ही थांबलो होतो. तेथून तीस किलोमीटरवर बढनी आहे. बढनीपासून एक किलोमीटर पुढे गेलात की, नेपाळच्या कपिलवास्तू जिल्ह्यातील झेंडेवाला लागते. तेथून जगातील एकमेव हिंदू राष्ट्र सुरू होते. एक कार्यकर्ता म्हणाला होता, 'जगातील पहिल्या हिंदू राष्ट्रातील एक रुग्ण आज गौराचौराहाला येणारे !' मी म्हणालो होतो, 'जगातील शेवटच्या हिंदू राष्ट्रातील, उपचार तरी करून घ्यावा याची जाणीव झालेला तो पहिला गरीब मला बघावयाचा आहे !'

आता समजतंय, गरीब माणसांना जाण नसते, धर्म नसतो, राष्ट्र नसते, अगदी लिंग-सुद्धा नसते ! ती मुळी तुमच्या-माझ्यासारखी माणसे नसतातच ! केवळ मरता येत नाही म्हणून जगणारे ते प्राणी असतात.–समोरचे लोक मला आता एवढीच संवेदना देताहेत. मी तशी महाराष्ट्रातील काही नेत्रदान-शिबिरे पाहिलीत. राजस्थानातील लोकांच्या डोळे फोडणाऱ्या शिबिरांना पण भेटी दिल्यात; पण तरीही हा मी सहन करू शकणार नाही असा अनुभव आहे. गौरा-चौराहच्या ग्रामीण लघुमहाविद्यालयात हे शिबिर भरलंय. गोठ्याची आठवण व्हावी अशी शाळेची इमारत आहे. शिबिराच्या भोवताली आपल्याकडे असतात तशा बैलगाड्या वगैरे नाहीत. या विभागात एकूण बैलगाड्या पण खूप कमी आहेत. रोग्यांना हाताशी धरून वा पाठीशी घालून १५–२० किलोमीटर एवढ्या अंतरावरून ही माणसे आलीत. चार वर्षांच्या मुलापासून ऐंशी वर्षांच्या जख्खड म्हाताऱ्यापर्यंत सारे रोगी आहेत. एका जिल्ह्यातील या खेड्या-पाड्यात एकूण १७ शिबिरे या मंडळींनी फक्त चार महिन्यांच्या कालावधीत भरव-लीत. आतापर्यंत आठ हजार रोगी तपासून झालेत आणि नऊशे शस्त्रक्रिया झाल्यात. अजूनही रोगी संपावयाची लक्षणे नाहीत. मारुतीच्या शेपटीप्रमाणे ही संख्या दररोज वाढते आहे !

डॉ. नंदकिशोर गुप्त, डॉ. नरेंद्र गुप्त, डॉ. शुभनिकेत सिंग रोग्यांच्या पट्ट्या काढून त्यांना माहिती देत होते. तिघेही तरुण. कामांनी झपाटलेले. डॉ. नंद-किशोर गुप्त आगऱ्याला विश्वहिंदूपरिषदेचे काम पहात होता. आता जयप्रभाग्रामचा दवाखाना चालवतो. पूर्वी पिथोरागडला विश्वहिंदू परिषदेचे काम पहावयाचा. आता नरेंद्र इटियाथोप विभागात 'सर्वांसाठी आरोग्य' या महत्त्वाकांक्षी योजनेचे काम पाहतो. डॉ. शुकनिकेत सिंग हा यांच्यातील नेत्रतज्ज्ञ. पूर्वी शाखेत वगैरे न जाणारा; पण दोन–तीन वर्षांपूर्वीपासून या कामात सामील झालाय. सारेच कार्यकर्ते कामात गुंतलेले. शारदाजींचे छोटे पण छान भाषण होते. संघ, देवरस कशाचाही उल्लेख नाही. जयप्रकाश नानाजी, दीनदयाळ संस्था एवढीच माहिती त्यांनी दिली. डॉ. तिवारींनी आपल्या सोप्या गावरान हिंदीत रोग्यांनी नंतर घ्यावयाची काळजी सांगितली. एका आठ वर्षांच्या मुलाच्या डोळ्याची पट्टी सोडली जाते. त्याला अजूनही दिसत नाही. डॉ. तिवारी बाईंना म्हणतात. 'आधी का आला नाहीत ?' बाई सांगते, 'तुमच्या डिसेंबरमधील रेहरा बाजा-रच्या कँपला यावयाचे होते; पण भांगल-णीची वेळ. मुलाला पाठीवरून घेऊन मला कोण त्या वेळी यावयास देणार ?' तिवारी म्हणतात, 'आणखी एक ऑपरेशन करीन; पण तुझ्या मुलाला डोळे आणीन !' बाई डॉ. तिवारींचे पाय आपल्या अश्रूंनी भिजवून टाकते. साऱ्या रोग्यांना चष्मे आणि औषधे



¤
नेत्रशिबिर संपल्यावर
बनवारी पति-पत्नी
लेखक,
डॉ. तिवारी व कार्यकर्ते
¤

**नेत्रदानशिबिर**

| क्रमांक | दिनांक | जागा | विभाग | तपासलेले रोगी | कॅटरेक्ट, ग्लुकोमा व इतर शस्त्रक्रिया |
|---|---|---|---|---|---|
| १. | २१-११-८२ | किशनदारपूर | नबाबगंज | २०७ | २६ |
| २. | २५-११-८२ | मसकनवा | छपिया | ३५४ | ३१ |
| ३. | ७-१२-८२ | इटियाथोक | हटियाथोप | ६१५ | ४२ |
| ४. | २१-१२-८२ | अमदही | बेलसर | ६०२ | ५२ |
| ५. | २५-१२-८२ | रेहराबाजार | रेहरा | ५०७ | ५३ |
| ६. | २--१-८३ | थानेपुर | थानेपर | ३४८ | ५६ |
| ७. | १२--१-८३ | कटरॉबाजार | कटरा | २४० | २७ |
| ८. | २०—१-८३ | दरगरपूर | रुपादिह | ३०५ | ७० |
| ९. | २२—१-८३ | उतरौला | उतरौला | ५५२ | ७८ |
| १०. | ३--२-८३ | श्रीदत्तगंज | श्रीदत्तगंज | ।८३५ | ९४ |
| ११. | १७--२-८३ | निपनिया | तादुल्लानगर | ३७५ | ४६ |
| १२. | २२--२-८३ | करनेलगंज | करनेलगंज | ५३६ | ३७ |
| १३. | २७—२-८३ | गोण्डागिर्दे | गोण्डा | ६४० | ८१ |
| १४. | ४—३-८३ | तरबगंज | तरबगंज | ५३५ | ५० |
| १५. | ८—३-८३ | ललिया | शिवपुरा | ६२२ | ६८ |
| १६. | ११—३-८३ | महाराजगंज | तुलसीपूर | ४०२ | ३२ |
| १७. | १७—३-८३ | गौराचौराह | गॅसडी | ४४० | ४२ |
| | | | एकूण | ८,११५ | ८८५ |

वाटावयाचा कार्यक्रम होतो. एखादा गुप्त खजिना हातात मिळाल्यासारखा त्यांना आनंद होत असतो. कार्यकर्त्यांनी हे चष्मे वाटावयाचे काम बनवारीच्या बायकोवर सोपवले होते. बनवारीच्या बायकोला खुश करून त्याला येथे कायमचे ठेवण्याचा कार्यक्रम मला आवडला. त्या तरुण, सडपातळ, काटक कार्यकर्त्यांच्यात स्थूल आणि पोटे सुटायला लागलेले मी आणि बनवारी फक्त बेढबच नाही तर लिलिपुटियन्ससुद्धा दिसतोय अशी शरमिंदी करणारी एक जाणीव मनाला व्यापून उरली! – एका गोष्टीचे तर राहून राहून नवल वाटत होते. निपनियाच्या केन्द्रात एका आंधळ्याला दिसावयास लागले होते. आलेल्या सर्वांना ही घटना त्या माण साच्या नावासकट माहिती होती. लोकांना आपले प्रश्न माहीत असतात. ते सोडवणारे लोक त्यांना समजतात. तुम्हाला, मला न कळलेल्या एका माध्यमातून लगेच समजतात.

## दहा

मला गणेश पाठक ऊर्फ बंडू पाठकला भेटायचंय. या माळरानाचे नंदनवनात रूपांतर करण्यासाठी आलेला तो पहिला स्वयंसेवक. मी आलो त्याच दिवशी धावता भेटून तो

लखनौला गेलाय. मला यांचा अजिबात न समजलेला वा न पटलेला कार्यक्रम म्हणजे 'गोविकास' बंडू त्या विभागाचे काम बघतो. गोपाळग्रामचे काम पाहणाऱ्या नंदकुमार पांडेशी पण गप्पा मारतो. नंतर बंडू पण भेटतो. मामला एकूणच फार कठीण दिसतो.

गाय हा या देशातील एक फार विवाद्य प्रश्न आहे. विनोबा, गुरुजींनी गाईला आई मानले. तिच्या रक्षणाची मागणी केली. विज्ञाननिष्ठ सावरकरांनी गाय हा फक्त एक उपयुक्त पशू आहे म्हणून ठणकावून सांगितले. भाकड गाइना न कचरता कापण्याचा सल्ला दिला. दिल्लीत दीनदयाळ संस्थेच्या गाईवर प्रसिद्ध झालेल्या पुस्तिका मी पाहिल्या होत्या. यांनीच निर्माण केलेल्या मंगळूरकर समितीचा अहवाल वाचला होता. मला तो तद्दन विनोदी प्रकार वाटला होता. ताकाला जाऊन भांडे लपवावे तसा ! यांना गाईचे गाय म्हणूनच संरक्षण करावयाचे आहे; पण त्यासाठी ते तत्त्वज्ञानाचे आणि विज्ञानाचे एक मायाजाळ उभे करताहेत असे वाटते. भगवतगीतेत एका टोकापासून सुरुवात करत 'म्हणजे सर्वनाशाची' अशी परंपरेची एक साखळी निर्माण करून दाखवलीय. हे लोक या देशाची अधोगती व भाग्यकाळ असा गोरक्षणाला जोडतात—परदेशी गाईंमुळे शेतकऱ्याचे नुकसान होते. परदेशी गाईंचे बैल शेतीला हानिकारक असतात. परकीय बैलांचे रेत वापरल्याने देशात नवे रोग येतात असे अनेक शोध यांच्या पुस्तिकेत आहेत.

शारदाजी व नंदकुमार पांडे दोघेही गाय ही माता आहे असे समजतात. भाकड गाईंना कापणार म्हणजे म्हाताऱ्या आईबाबांना कापणार का म्हणून लगेच विचारतात; पण त्यांचे येथे सुरू असलेले प्रयोग महत्त्वाचे आहेत हे मान्य करावेच लागेल. खुद्द जयप्रभाग्राममध्ये गीरच्या चांगल्या गाई आहेत. हरियाणा, राठी, थारपारकर हे चांगल्या जातींचे बैल आहेत. यात आठच जनावरे आहेत. गोंड्यापासून ११ कि. मीटरवर तुळसीपूरमध्ये गोपाळग्राम उभे राहतंय. त्रेपन्न एकर पडीक वालुकामय जमीन घेऊन तिथे त्यांनी तीन बोअरिंग विहिरी खणल्यात. दोन पवनचक्क्या बसविल्यात. केन्द्रप्रमुख नंदकुमार पांडे हा कृषिविषयातील अलाहाबाद विद्यापीठाचा एम. एस. सी. आहे. अवध विश्वविद्यालयातून अर्थशास्त्र घेऊन एम. ए. झालाय. कृषिविषयातीलच डॉक्टरेट दिल्लीच्या डॉ. चतुर्वेदींच्या हाताखाली करतोय. इतका साधा शेतकरी तरुण वाटतो की. हे सारे खरेच वाटत नाही.

गोपाळग्रामजवळ अफाट कल्पना आहेत. या वर्षापासून त्यांनी पहिलीपासून सातवीपर्यंतची एक शाळा तिथे स्थापन केलेली आहे. दोन शिक्षक येतात. तो स्वत: शिकवतो. विद्यार्थी देतील त्या गुरुदक्षिणेतून शाळा चालवतो. त्यांना ती शाळा वाढवावयाची आहे तेथे शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी या शेतात काम करावे व त्यांना त्याच्या मोबदल्यात मोफत जेवण—खाण, शिक्षण देता यावे असा यांचा प्रयत्न आहे. त्याने भाऊराव पाटलांचे वा रयत शिक्षण संस्थेचे नाव पण ऐकलेले नाही; पण पुढील वर्षापासून या तत्त्वावर शाळा वाढविण्याचे त्याने ठरवलंय. शेती—मालाचे भाव त्याला अस्वस्थ करतात; पण या देशात कोणीच याबाबत काहीही केलेले नाही असे तो म्हणतो. शेतमजुरांच्याबद्दल त्याला सहानुभूती वाटते; पण त्यांच्यासाठी नक्की काय करावे हे त्याला समजलेले नाही. मात्र आपल्या गोपाळग्रामात शेतमजुरांना रोजगाराबरोबरच उत्पन्नात वाटा (share) देण्याची कल्पना त्याने शारदाप्रसादांच्याकडे बोलून दाखवलेली आहे.

पण प्रथमच सांगितल्याप्रमाणे सर्वांत महत्त्वाचे म्हणजे येथे वा जयप्रभाग्राममध्ये सुरू असलेले वा सुरू होणारे प्रयोग ! भारतात अनेक चांगल्या जातींचे बैल मिळतात, चांगल्या जातींच्या गाई मिळतात; पण खूप दूध देणाऱ्या गाईंच्या घराण्यातील बैल फारसे कामाचे नसतात. कामाला उपयुक्त ठरणाऱ्या बैलांच्या कुळातील गायी दूध खूप कमी देतात. भारतातील या साहीवाल, हरियाणा, राठी, थारपाखर, लालसिंधी, कांकरेज, गीर या जातींचा आपापसात संकर घडवून आणून दूध देणाऱ्या गाई व काम करणारे बैल त्यांना एकाच कुळात निर्माण करावयाचे आहेत. पैदाशीसाठी हे वळू शेतकऱ्यांना द्यावयाचेत. गरीब शेतकऱ्यांना वासरे द्यावयाचीत. हे सारे करत असतानाच गाईचे शेण हे सर्वोत्तम खत आहे आणि शेण वापरून गोबरगॅस निर्माण करून त्यानंतर उरणारा चोथा खत म्हणून उपयोगी आहे, हे अनुमान पडताळून पहावयाचंय. म्हातारे गाय-बैल शेण व गोबरगॅस यासाठी पाळणेसुद्धा किफायतशीर असते हे सिद्ध करायचंय. सध्या गोपाळग्रामात फक्त तीनच गाई आहेत; पण लवकरच हा आकडा वाढेल !

स्वत:ला पटते ते सारेच बरोबर असा दावा आपल्यापैकी कोणीच करू नये. या मंडळींचे हे प्रयोग यशस्वी झाले तर तुमच्याप्रमाणेच मलाही मनापासून आनंद होईल; पण आपले प्रयोग फसले तर व्यवहारासाठी ही मंडळी भावनेशी तडजोड करतील असे आज तरी वाटत नाही !

## अकरा

मी तसा हाडाचा मराठी माणूस आहे. माणसे जोडण्यापेक्षा माणसे तोडणेच मला अधिक जमते आणि खरे सांगावयाचे तर आवडत ! एखादा तात्त्विक मुद्दा पुढे करून, समोरच्या माणसाच्या वर्मावर बोट ठेवून त्याला कायमचे दुखावले की, मला वाघ मारल्याचा आनंद होतो ! ऑफिसात साहेब, सहकारी वा कनिष्ठ यापैकी कोणालाही धडा शिकवून सरळ केले की, मी फार खुशीत येतो. घरी येऊन बायको मुलीला ही गोष्ट सांगताना मला फार समाधान वाटते आणि मग खुशीत येऊन मी त्यांना चहापोहे बनवावयास सांगतो !

—हा असा मी या सर्वांचा जवळचा मित्र बनलोय. त्याचे सारे श्रेय या मित्रांनाच द्यावयास हवे. फारसा विचार न करता या मित्रांनी वादळात आपली होडी बाहेर काढली आहे. किमान काही लोकांना तरी वाचवावे म्हणून. त्या मित्रांनी होकायंत्र बरोबर ठेवावे असे मला मनापासून वाटते. वादळात आपले होडके बाहेर काढलेल्या नावाड्यांच्या होडक्यात कारण नसताना शिरून, स्वत:ला पोहावयास न येणाऱ्या पढिक विद्वानाने, आडवे—तिडवे प्रश्न विचारू नयेत हे तर खरेच ! मी तसे प्रश्न विचारत राहिलो. मित्रांनी मला व माझ्या प्रश्नांना सांभाळून घेतले. आज जाण्याच्या दिवशी हे सारे फार जवळ आलेत ते जाणवलंय. होळीचा सण हा

उत्तरेतील एक अपूर्वाईचा सण. त्यातून मला गोंडास्टेशनवर पोचवावयास येणार म्हणजे वाटेतील धुळवडीत त्यांची कपड्यांसकट व जिपसकट वाट लागणार; पण ते अगत्याने मला निरोप द्यावयास येताहेत. अगदी हट्ट धरून.

झालेले काम फार थोडे आहे आणि सर्वत्र विखुरलेले आहे. पावसाची पहिली सर यावी आणि रुक्ष उजाड माळरानावर तुरळक तुरळक हिरवळ वर यावी असे वाटतेय! जमिनीचे कवच फोडून बाहेर येणारे ते इवले इवले अंकुर फार मोठा दिलासा देतात. या वैराण वाळवंटाची हिरवळीने न्हाऊन निघण्याची क्षमता त्यातून समजते. ही जमीन जीवनदान करणाऱ्या पावसाची फक्त आतुरतेने वाट पाहात उभी आहे हे जाणवते!

मंडळी निष्ठावान आहेत. स्वतःचे सुख बाजूला सारून कष्ट उपसावयाची, संकटे भोगावयाची त्यांची तयारी आहे. स्वतःला दिलेल्या कामात स्वतःला झोकून द्यावयाची वृत्ती आहे. महत्वाचे म्हणजे, संघटना उभारावयाची त्यांची कुवत आहे. ग्रामीण भागातून या कामात स्वतःला वाहून घेणारी, कामाशी मनापासून जोडलेली तरुण मुले हेरून ती तयार करण्यात यांनी फार मोठे यश मिळवलंय. सर्वांत महत्वाचे म्हणजे, पददलितांचे भले व्हावे, काही नवे निर्माण व्हावे, भोवतालची सारी अन्याय्य रचना बदलावी हे त्यांना जाणवलेले आहे.

—जवळजवळ एक तपापूर्वी कनु सन्याल आणि त्याच्या साथीदारांच्या पुस्तकांनी आणि काडतुसांनी खचाखच भरलेल्या एका गुहेत सात-आठ दिवस राहून बाहेर पडताना मी जसा अस्वस्थ होऊन भारावलो होतो तसाच मी भारावलो आहे. त्या वेळी मी कनु सन्याल आणि त्याच्या कॉम्रेडसना निरोप देताना 'लाल सलाम' केला होता. आज या मित्रमंडळींनी दिलेल्या

> 'जिन आँखोंसे देखेंगे हम
> गोंडा दुनियामें लहराया ..'


या सुरात मी माझे सूर मिसळले आणि त्या मित्रांना 'भगवा रामराम' करून मी गाडीत चढलो.

## बारा

यादवराव मराठी आहेत, हा माझ्या मराठी मनाला एक सुखद धक्का होता. उत्तरेत संघप्रेमी लोकांच्याबरोबर हिंडताना यादवरावांच्याबद्दल खूप काही ऐकले होते. हे सारे भाऊ, सारे काही सोडून 'हे काय बंधू असतो जरी सात आम्ही' अशा तळमळीने संघकार्यात उतरले. त्यांचे बाकीचे दोन भाऊ प्रांतप्रचारक होते. काशीचे यादवराव ५८ साली 'पांचजन्य'चे संपादक म्हणून आले. हे साप्ताहिक त्यांनी नावारूपाला आणले. प्रबुद्ध भारत दैनिक आणि युगविवेक साप्ताहिक यांचा व्यापही सहजपणे सांभाळला.

परतीच्या प्रवासात मला यादवराव भेटले. मला भेटण्यासाठी ते खास आले आहेत असे वाटून माझा अहंकारही थोडासा सुखावला. यादवराव प्रसन्न, मनमोकळे, भारदस्त वाटले. मराठी सडेतोडपणा आणि उत्तरी गोडवा याचा एक विलोभनीय संगम त्यांच्या बोलण्यात आहे. यादवराव म्हणाले, 'नानाजी चलाख आहेत. माझे बोट धरून मला येथे आणले आणि मला येथे सोडून गेले! आता या वयात गोंडा-लखनौ असा चारशे-पाचशे किलोमीटर्सचा जाण्या-येण्याचा दर आठवड्याला फेरा असतो. तुम्हाला काय वाटते ते मोकळेपणाने लिहा. आम्हा संघाच्या लोकांना हे सारे काम संपूर्ण नवे आहे. आम्ही आमची पहिली मूळाक्षरे शिकतोय आणि गिरवतोय. इतर कोणी मदत करावयास फारसे पुढे आलेले नाही. कोणी आमचा हात धरून आमची मूळाक्षरे सुधारली तर बरे वाटेल. मात्र आमचे कार्यकर्ते आणि आमचे काम ठरविताना तुमची बाकीच्या भारताबद्दल जी कल्पना आहे ती निकष म्हणून वापरू नका. प्रगत आणि अप्रगत देशात जेवढी दरी आहे तेवढी किंबहुना त्याहूनही अधिक दरी आपल्या देशात वेगवेगळ्या विभागात आणि वेगवेगळ्या विभागातील खेड्यापाड्यात आणि भूमिहीन मजुरातसुद्धा आहे. येथे आम्हाला प्रत्येक ठिकाणी सरकारी मदत राहू दे, सरकारी विरोध सहन करावा लागतो. रोटरी, लायन्स यांची नेत्रदानशिबिरे शहर'त भरतात. एका जिल्ह्यात, खेड्यात येवढ्या आतवर तीन महिन्यात सतरा नेत्रदान-शिबिरे आम्ही भरवलीत. येथे आम्हाला शिबिरे भरावावयास जागा मिळत नव्हती. आसाममध्ये आम्ही हेच कार्य करावयास गेलो. तेथे कॉंग्रेसचेच सरकार असून काही लाखांचे अनुदान मिळाले. महाराष्ट्रात आम्ही बीडला काम सुरू करतोय. महाराष्ट्रात कॉंग्रेसचेच सरकार आहे. तुम्हाला आश्चर्य वाटेल. सरकारचा एक फार मोठा अधिकारी मंत्रिमंडळाच्या सांगण्यावरून आमच्या कृष्णा जोशींना घरी भेटावयास गेला. म्हणाला, 'तुम्ही एका मागासलेल्या जिल्ह्यात काम करणार आहात याचा आम्हाला आनंद आहे, तुम्हाला काय मदत हवी ते सांगा!'

'सामाजिक परिस्थिती पण राजकीय परिस्थितीहून वेगळी नाही. किंबहुना या सामाजिक परिस्थितीतूनच शेवटी राजकीय परिस्थिती निर्माण होते हे विसरू नका. येथील नव्वद टक्क्याहून अधिक विवाह आठ—दहा वर्षाखालील मुलामुलींचे आहेत. खेड्यातील आणि शहरातील सारे एम. एस. सी., पीएच. डी. तरुण नोकरी नाही म्हणून घरी आहेत. महाराष्ट्रात सर्वसामान्य वाचकसुद्धा जागरूक असतो आणि जिल्हापातळीवरील वर्तमानपत्रे, साप्ताहिकेसुद्धा ज्ञान देण्यात पुढे असतात. गोंडा जिल्ह्याचे विसरा; साऱ्या उत्तरभारतातच याबाबत आनंद आहे! आमचे कार्य अनेकविध आहे. उच्च शिक्षण देऊन फारसा उपयोग नाही. गोपाळग्रामच्या शाळेत आम्ही देणार आहोत तसे सुतारकामाचे, धातुकामाचे, गाई पाळण्याचे शिक्षण द्यावे लागेल. अकरावी झाल्यावर मुलाला नोकरीची जरुरी पडणार नाही, असा हरहुन्नरी त्याला बनविण्याची योजना आहे. नुसते हरहुन्नरी बनवून पण चालणार नाही. काश्मिरचे गालिचे आणि लखनौचे कुडते बनविण्याचे शिक्षण देणे आम्ही सुरू केले. त्याचा काय उपयोग आहे? कापडासकट लखनौचा कुडता दुकानदार दहा रुपयाला विकतो. त्यात दुकानदाराची कमाई सर्वांत अधिक असते.—कारागिराला दाम वगैरे काही मिळत नाही मिळते ती फक्त अमानुष पिळवणूक! कारागिरांच्या सहकारी संस्था काढून हा प्रश्न थोडा सुटू शकतो; पण यात असलेल्या त्रुटी पण आता समजल्या आहेत. दोरखंड वळून प्रत्येकाला दिवसाला वीस-



नानाजींच्या घरचेच कार्य वाटावे इतकी इथल्या कार्यक्रमावर त्यांची छाप उमटलेली आहे.

¤

तीस रुपये मिळतात. अशी तीनशे यंत्रे आम्ही बसवली. दोरखंड विकण्याची सोय केली. काही दिवस आम्ही खुशीत होतो. नंतर समजले या पैशांनी हे 'नवे श्रीमंत' दारू पितात, इतरांशी उर्मट वागतात आणि बायकोला मारतात ! प्रश्न सोडविण्यासाठी आपणाला आणखी खोल जावे लागते. राजकारण आणि संघर्ष यापासून समाजकारण संपूर्णपणे वेगळे करता येणार नाही हे मला तरी आता जाणवले आहे.—नानाजींना पण कदाचित जाणवले असेल '

—नानाजींच्या घरचेच कार्य आहे असे वाटावे अशी नानाजींची छाप या साऱ्या कार्यक्रमावर उमटलेली आहे. पहिल्याच भेटीत नानाजींची एक विलक्षण गुंतागुंतीची प्रतिमा माझ्या मनात तयार झाली होती. नानाजींना डॉक्टरांनी वाचावयास मनाई केली होती. एका स्वयंसेवकाकडून ते समग्र सावरकर—वाङमय पुन्हा एकदा वाचवून ऐकत होते. नानाजी म्हणाले, 'हमीद दलवाई माझा जवळचा दोस्त. त्याची बायको दिल्लीला आली तर दीनदयाळ केंद्रात उतरते. त्याच्या मुलीचे लग्न मी माझ्या एका स्वयंसेवकाशी केलंय !' नानाजींचा गोरक्षणाबाबतचा अशास्त्रीय आग्रह मला जाणवला होता. नानाजी म्हणाले, 'मी तीनदा अमरनाथयात्रेला गेलो. पहिल्या दोन भेटीत पिंडीवर अक्षता टाकणारे ते पक्षी मला आढळले नाहीत. त्यांनी दर्शन देईपर्यंत मी परत परत जावयाचे ठरवले होते !'

हमीदच्या मुलीच्या लग्नात पुढाकार घेणारे नानाजी शंकर हरिजन तरुण तरुणी आणि उच्चवर्णीय स्वयंसेवक यांची लग्ने करण्यात रस का घेत नाहीत आणि सावरकर वाङमय पुन्हा पुन्हा वाचणारा माणूस एक उपयुक्त पशु आणि एक नगण्य पक्षी यांना भावनात्मक महत्त्व कसे काय देतो, हे माझ्या विज्ञाननिष्ठ समाजवादी मनाला समजले नाही. आपण सारेच जण तसे 'बनचुके' आहोत ! पण नानाजींचे मोठेपण मला पटण्या न पटण्यावर अवलंबून नाही. आणि आज ते जे काम करताहेत त्याच्याशी या विचारांचा काहीही संबंध नाही असे हा सारा कार्यक्रम पाहिल्यावर मला वाटले. ते स्वत: जयप्रकाशांना मनापासून मानतात असे नव्हे तर तेथे असलेला प्रत्येक कार्यकर्ता जयप्रकाशांच्याबद्दल समाजवादी वा सर्वोदयवादी मंडळींपेक्षा अधिक भारावून बोलतो असे मला वाटले. माणसे पारखण्याचे, जोडण्याचे आणि त्यांना कामाला लावण्याचे त्यांचे कौशल्य वादातीत आहे. नानाजी सांगत होते, 'बनवारीचे मला दोन महिन्यांपूर्वी पत्र आले होते. मला जयप्रभाग्रामला जावयाचे आहे. मी तुम्हाला त्याबाबत भेटलो होतो; पण आई-वडील भाऊ यांना मी दुखवू शकत नाही. मी तिकडे जाणार नाही !' मी त्या दिवशी माझ्या दैनंदिनीत नोंद केली. 'बनवारी अस्वस्थ आहे! आणि ही अस्वस्थता हीच माझ्या कामाची पावती आहे बनवारी नाहीम्हणतो; पण सारे सोडून तो उद्या जयप्रभाग्रामला जाईल. तोच नव्हे तर त्याची बायको एक फार चांगली कार्यकर्ती बनेल !' चंद्रशेखरला पोटाचा अल्सर झाला होता. नानाजींनी दिल्लीतील उत्कृष्ट रुग्णालयात दोन महिने त्याला ठेवला आणि त्याच्या उशाशी जागत बसले. बैलगाडीवर पंप चालविणाऱ्या हरिशंकरच्या प्रतिभेला नानाजींनीच हेरले. त्याला गावकऱ्यांच्या मदतीने अलहाबादला उच्च शिक्षणाला पाठविले. कार्यकर्ते सांगतात त्याला ८३ टक्के मार्क मिळून तो पहिला आला हे नानाजींना ज्या दिवशी कळले त्या दिवशी ते मुलासारखे नाचले ! त्यांनी अलहाबाद व गोंडयाला दूरध्वनी केला, माझ्या खर्चाने आज सर्वांना भरपूर मिठाई वाटा !

¤

नानाजी खूप कामात असतात; पण त्यांनी मला परत आल्यावर भेटावयास सांगितले होते; पण मला नानाजींना अजिबात भेटावयाचे नव्हते. मला त्याची आता काहीच जरुरी वाटत नव्हती; पण एखाद्या आईच्या परगावी असलेल्या मुलाला तुम्ही भेटून आलात तर ती आईच तुम्हाला शोधत येते. दोन एप्रिल १९८३ ची गोष्ट. दुपारची वेळ. मी काही आकडेवारी मिळाली तर बघावी म्हणून दीनदयाळ केन्द्रात गेलो होतो. नानांनी मला नेमके हेरले. मला काय वाटते ते आवर्जून विचारले म्हणाले, आमचा प्रयोग नवा आहे. आम्हाला शिकायचंय, सुधारायचंय हे समजावून घ्या. डॉक्टरांनी बंदी केलेली असतानाही आपल्याच तंद्रीत मग्न आणि मस्त असलेल्या एखाद्या कवी वा शास्त्रज्ञासारखे ते बोलू लागले, 'संघर्षाशिवाय आमची वाटचाल नाही हे मला समजलंय. मी पण गरिबीतून वर आलेला मध्यमवर्गीय माणूस आहे. स्वत: जमीन न कसता दुसऱ्याकडून करवून घेणे व जगणे हे मी सर्वांत मोठे पाप समजतो. ती समाजाला लागलेली कीड आहे; पण थोडे थांबा, 'एल्गार' कसा आणि कधी द्यावयाचा हा एक युद्धशास्त्रीय डावपेच आहे. कदाचित माझी—माझ्या कार्यकर्त्यांची ताकद येवढी वाढेल की, आमच्या इच्छेनुसार हे लोक आपोआप बदलतील. आणखी एक सांगतो. आजच मी तेथील जमीनदार, श्रीमंतांचा शत्रू ठरलोय. ते मजुरांना दोन—अडीच रुपयांवर राबवीत. आमच्या कामाच्या साखळी-

मुळे आजच त्यांना पाच रुपये मजुरी द्यावी लागते. माझ्या संघर्षाला तोंड लागलंय. तो आता अधिक तीव्र होणारे...'

नानाजी बोलत होते.मी विचारात होतो. एखाद्या साम्यवादी, सर्वोदयवादी, समाजवादी कार्यकर्त्यांची तळमळ यापेक्षा काय वेगळी असते ते मला समजत नव्हते. साऱ्याच पक्षात धूर्तपणे घुसलेल्या बनियांना आपण क्षणभर विसरू. मी साऱ्याच पक्षांच्या नेत्यांना आणि तळागाळाच्या कार्यकर्त्यांना भेटलोय.या साऱ्या लोकांच्यामधील मूलभूत फरक मला अजून सापडलेला नाही. स्वतःचे सारे काही सोडून-विसरून समाजाचे भले करण्याच्या विचारांनी हे सारेच झपाटलेले असतात. ही सारीच मंडळी एकाच मातीची बनलेली आहेत.

**कबीर खडा बाजारमे**
**लिए कटोरा हात**
**जो कोई जलाए घर अपना**
**चले हमारे साथ......**

असे ठणकावून सांगणारे हे सारेच कबीर-पंथी फकीर आहेत !

## तेरा

खरी गोष्ट अशी आहे की, तळागाळातील दारिद्र्यरेषेखालील साऱ्याच लोकांना आपण सारेचजण आज अगदी सहजपणे विसरून गेलोय. शहरात झोपडपट्टीत राहणारा माणूसही त्यांच्यापुढे स्वर्गातील जीवन जगतो आहे असे वाटावे असे जिवंत नरक आज ठिकठिकाणी उभे आहेत. हे लोक या देशात बहुसंख्य आहेत आणि आपली कोणतीही योजना त्यांना कधी चुकूनही स्पर्श करीत नाही. आपले खेळ, आपली करमणूक, आपली भाषा, आपले कपडे, आपले राहणे, आपले खाणे या सर्वांशी या लोकांचा चुकूनही कधी काही संबंध येत नाही.–घृणा यावी अशी गोष्ट ही की, आपले सारे जीवन आपण त्यांची जी कळत–नकळत पिळवणूक करतो त्यावर आणि फक्त त्यावरच अवलंबून आहे. मार्क्स–एंजल्स यांना या लोकांचा पत्ता असता तर कॅपिटलचे आणखी काही खंड लिहिले गेले असते !

या जगात देव जर खरोखरच असेल आणि मरणोत्तर आकाशातील न्याय जर होत असेल तर जगातील कोणत्याही धर्मग्रंथाला, तुम्ही–मी केलेली प्रत्येक गोष्ट आणि जगलेला प्रत्येक क्षण 'पाप' या शब्दानेच निकालात काढावा लागेल ! आपण बेरके आहोत. तळागाळाच्या लोकांना विचारात न घेऊन आणि त्यांच्यासाठी काहीही न करून चालते हे आपणा सर्वांच्या सुप्त मनाला पुरते समजलेले आहे ! आपण या लोकांना विसरलो आहोत ही फारशी भयावह गोष्ट नाही. या लोकांना इतकी शतके आपण इतक्या सफाईने फसवलंय की, आपणावरील त्यांचा विश्वास पार उडून गेलाय. तळागाळाच्या लोकांनी अनेक शतकांपूर्वीच आपणाला ओळखलंय आणि त्यांच्या खाती आपल्याला निकालात काढलंय ही खरी भयावह गोष्ट आहे !


रामायणात एक सुंदर गोष्ट आहे.–आई-वडिलांना कावडीत घालून तीर्थयात्रेला निघालेला श्रावण एके ठिकाणी थांबला. आपण खूप दमलो आहो हे त्याला जाणवले. आई–वडिलांच्या सेवेत आयुष्य फुकट जाते आहे हे समजून तो अस्वस्थ झाला. या म्हाताऱ्यांनी दूर कोठे तरी आपण होऊन जाऊन रहावे आणि आपल्याला मोकळे करावे असे त्याला वाटले. हे आपणाला न सांगता, आपल्यालाच त्रास दिला म्हणून तो वडिलांच्यावर चिडला. आई–वडिलांना कावडीतून उतरवून तो जाऊ लागला. त्याची आई रडत होती. वडील शहाणे होते. ते म्हणाले, 'बाळा, माझी चूक झाली. फक्त एक दया कर. येवढे केलेस आणखी थोडे भोग. पुढच्या सराईत नेऊन आम्हाला सोड!' शिव्या घालत, पुटपुटत श्रावणाने त्यांना कावडीत बसवले आणि पुढील सराईत घेऊन गेला. तेथे गेल्यावर श्रावण रडू लागला. आपणाला काय झाले होते हे न समजून आई–वडिलांची क्षमा मागू लागला. वडील म्हणाले, 'बाळा, तुझी काही चूक नाही. त्या वेळी आपण इंद्रप्रस्थाच्या जवळ होतो. तेथे राहणारा, जाणारा कोणीही माणूस स्वतः सोडून इतर काही ओळखत नाही ! इंद्रप्रस्थ सोडून दूर खेड्यात आलास आणि तुला आपल्या बांधिलकीची जाणीव झाली !'


या तळागाळातील लोकांचा आपल्यावर पुसटसा तरी विश्वास बसावा आणि त्यांचे प्रश्न आपल्याला थोडे तरी समजावेत ही आजची एक निकडीची प्राथमिक गरज आहे. आपले विचार आणि आपले रंग यांच्याशी या सर्वांचा खरोखरच दुरून तरी काही संबंध आहे का ?

–सातीही रंग प्रकाशाला म्हणाले
तुझा रंग कोणता ... ?
प्रकाश म्हणाला मी का म्हणून सांगू?
तुम्हीच काय ते ठरवा.
सातीही रंगांनी पुन्हा एकदा नीटपणे
प्रकाशाकडे पाहिले.
आपापल्या संवादी समलहरी
त्यांना सहजपणे प्रकाशात आढळल्या.
समन्वयासाठी त्यांचे हात पुढे झाले !

–प्रकाशाचा पहिला किरण तळागाळांच्या लोकांपर्यंत आता तरी पडावा असे अस्वस्थ होऊन मनापासून वाटणाऱ्या आपण सर्वांनीच हे ओळखले तर किती बरे होईल !

[ **समाप्त** ]





# ब्लड कॅन्सर



**पूर्वसूत्र :** मिचेलीच्या अंगातला ताप हटत नव्हता. दिवसेंदिवस ती फिक्कट बनत चालली होती. कॅथरीन मिचेलीला डॉ. विलींच्या हॉस्पिटलमधे घेऊन गेली. कॅथरीनला एकच शंका होती – शेजारच्या टेडला झाला तसा अप्लास्टिक अनेमिया तर मिचेलीला झाला नाही ना ? चार्लसला तिनं हॉस्पिटलमधे बोलावून घेतलं. डॉक्टरांनी सांगितलेलं निदान ऐकून चार्लस कोसळलाच ...ल्यूकेमिया – मायलोब्लास्टिक ल्यूकेमिया. स्वत च्या भावनांवरचा चार्लसचा ताबा सुटत चालला होता. आता त्याच्यापुढे एकच ध्यास होता मिचेलीला यातून वाचवायचं. मिचेलीवरचे उपचार सुरू झाले होते; पण त्या औषधांचे दुष्परिणाम मिचेलीवर होताहेत हे चार्लसच्या लक्षात आलं होतं. चार्लसच्या डोक्यात एकच विचार होता – मिचेलीला ल्यूकेमिया कशामुळे झाला ? नक्कीच ते डोहातलं विषारी बेंझिन – त्याची खात्री झाली आणि संशोधनाला सुरवातही झाली.

¤

अगदी वेगळया व नवीन विषयावरील ही हृदयस्पर्शी कादंबरी.

मागील अंकात प्रकरणे ५ ते ७ दिली. पुढे....

**मूळ लेखक : डॉ. रॉबिन कुक : मूळ कादंबरीचे नाव ' फीव्हर. '**

**मुक्त अनुवाद : प्रा. म. रा. राईलकर**

# आठ

चार्लसनं इन्स्टिटयूटच्या आवारात गाडी लावली आणि पाण्याची बाटली घेऊन तो झपाटयानं इमारतीत शिरला विश्लेषण-प्रयोग शाळेत जाऊन त्यानं तिथल्या तंत्रज्ञाला सांगितलं की, ह्या पाण्याचं विश्लेषण करून त्यात इतर कोणकोणती द्रव्यं आहेत ते शोधून द्या.

'अगदी ताबडतोब पाहिजे का ?' चार्लसला धाप लागलेली पाहून त्यानं विचारलं.

'जवळजवळ; पण मुख्यत: ह्याच्यात सेंद्रिय द्रव्यं कोणती आहेत हे मला हवंय. आणखी त्याशिवाय जे काही करता येईल ते पाह्यचंच.

तंत्रज्ञानं झाकण उघडून वास घेतला. नि तोंड वाकडं करून म्हणाला, 'स्कॉचमध्ये घालण्याकरता तर तुम्ही हे वापरीत नाही, ना ?'

चार्लस आपल्या प्रयोगशाळेकडे निघाला. मिचेलीच्या उपचाराच्या बाबतीत रीतसर काही करता येण्यासारखं दिसत नव्हतं; पण आता स्वत:चंच काम जोरदारपणे चालू ठेवायचं त्यानं ठरवलं. त्यामुळं वेळीच मिचेलीला योग्य ते उपचार देता येतील अशी आशा वाटली त्याला. रीसायकल कंपनी तर बंद करायचीच. चिडलेल्या स्थितीतच तो प्रयोगशाळेच्या दाराशी आला; पण चिडण्यापेक्षा हुशारीनं काम केलं पाहिजे असा विचार करून त्यानं शांतपणं दार उघडलं.

'उंदरांच्या नव्या तुकडीत स्तनाच्या कर्कपेशी सापडल्या का ?' त्यानं आल्या आल्या एलनला विचारलं.

'सापडल्या, पण...'

'छान,' मध्येच तो म्हणाला. आणि फळयापाशी जाऊन आपली नवी योजना त्यानं समजावून सांगितली. 'त्यांची प्रतिकारशक्ती चाचपण्यासाठी इंजेक्शन दिलेल्या उंदरांचा टी-लिम्फोसाइट्सना मिळणारा प्रतिसाद अजमावून पाहू. शिवाय आणखी एक करू. कर्कपेशींच्या निरनिराळया तीव्रतेची द्रावणं करू. नि एकाच उंदराला ती टोचू. अर्थात एकावरून निश्चित निदान करता येणार नाही; पण कदाचित त्याचा उपयोग होईलही. बरं तू कालच्या तुकडीला दुसरं इंजेक्शन देईतो मी काही फोन करतो.' कपडयावरची खडूची धूळ झटकीत तो फोनकडे गेला.

'बरं मी काही बोलू का ?'

'बोल की !' रिसीवर उचलून यांत्रिकपणं तो म्हणाला,

'कॅन्सरानचा पहिला डोस दिलेल्या तुकडीची मी तपासणी केली,' असं म्हणून ती थांबली.

'मग ?' उत्कंठेनं त्यानं विचारलं.

'बहुतेक सगळे उंदीर रात्रीच मेलेले आढळले.'

'म्हणजे ?' फोन खाली ठेवीत तो ओरडला.

'काही कळत नाही. कॅन्सरानपेक्षा दुसरं काही कारण दिसत नाहीये,'

'डोसाच्या तीव्रतेचं प्रमाण पाहिलंस का ?' ते चुकलं नाही ना. LD 50 च्या एकसोळांशच घेतलं होतंस ना ?'

'ते अगदी बरोबर आहे.'

'दुसरा कसला संसर्ग ?'

'कसलाही नाही. मी प्राणीतज्ज्ञालाही विचारलं. त्यानं अजून शवचिकित्सा केली नाही; पण त्याच्या मते हृदयाच्या झटक्यानं ते मेले असावेत.'

'कॅन्सरानचा विषारच भोवलाय !'

'मलाही तसंच वाटतं.'

'कॅन्सरानचे मूळचे तक्ते कुठायत ?' त्यानं काळजीच्या सुरात विचारलं.

'तुझ्या टेबलावरच आहेत. मी तेच पहात होते आत्ता.'

त्यानं जुने तक्ते पाहिले आणि स्वत: केलेले नवे तक्तेही पाहिले.

'लुच्चा, हरामखोर ! औषधाच्या विषारामुळं होणाऱ्या दुष्परिणामांची नोंद करतानाही ब्रिग्टननं बनवाबनवी केलेली दिसतेय. तो म्हणतोय त्यापेक्षाही कॅन्सरानचा विषार जास्त प्रमाणात असला पाहिजे. या कामावर नॅशनल कॅन्सर इन्स्टिटयूट किती पैसे खर्च करतेय माहीताय ?'

'अंदाज करता येईल.'

'कोटयवधी !' कपाळावर हात मारीत तो म्हणाला.

'आता काय करायचं. आपण.'

'आपण ? आता ते काय करणाराहेत हे महत्त्वाचं आहे. पण सगळं काम पहिल्यापासून करावं लागणार आहे आपल्याला. त्याला आणखी तीन वर्षं तरी लागतील.'

कॅन्सरानच्या केवळ परिणामांचा अभ्यास ही गोष्ट वेगळी नि श्रीग-पासून सुरुवात करायची गोष्ट वेगळी. मिचेलीच्या आजाराचा विचार करता तर ते शक्यच नव्हतं.

'त्यांच्या मते आपण कॅन्सरान करायलाच हवं.'

'छोड दो,' त्यानं फटकारलं. आता कॅन्सरान बंद. मॉरिसन आणि इबॅनेननी आपल्याला जर त्रास दिलाच तर ही भानगड आपण वृत्तपत्रांना देऊ. नॅशनल कॅन्सर इन्स्टिटयूटला जर हे कळलं ना तर त्यांचा पैसा तडकाफडकी बंद होईल.'

'असं काही आपण करू नये. आपण...'

'पुरे ! पहिल्या तुकडीच्या रक्तातल्या अँटिबॉडीज तपास आणि त्यांना पुन्हा टोच. त्या लोकांशी कसं बोलायचं ते मी पाहतो.'

एलन रागानंच कामाकडे वळली. तेवढयात फोन वाजला. पलीकडून तंत्रज्ञ म्हणाला, 'तुम्हाला प्राथमिक अहवाल हवाय ?'.

'ताबडतोब !' चार्लस म्हणाला.

'मुख्य द्रव्य म्हणजे बेन्झीन, तेही भरपूर प्रमाणात. शिवाय टोल्वीन ट्रायक्लोरोथायलीन आणि कार्बन–टेट्राक्लोराईड. संपूर्ण अहवाल दुपारपर्यंत देतो.'

तंत्रज्ञाला धन्यवाद देऊन त्यानं फोन ठेवला. त्यानं सांगितलं त्यात नवल काहीच नव्हतं; पण आता कागदोपत्री पुरावा तयार झाला होता. तेवढयात त्याचं मन मिचेलीकडे गेलं. त्यानं डिरेक्टरी उचलली आणि परिसर–संरक्षक मंडळाचा फोन फिरवला. कचेरी ९ वाजता उघडते असं कळलं !

नंतर मॅसाच्युसेट्सच्या मंडळाला फोन केला नि, पॉटोमॅक नदीच्या काठी ल्युकेमिया आणि लिम्फोसाईट्च्या किती केसेस झाल्या हे विचारलं; पण त्यांच्याकडे टयूमर किंवा कर्करोग यांची वेगळी नोंद

नसल्याचं कळलं. मग त्यानं जन्म-मृत्यु विभागाच्या सांख्यिकी विभागाला फोन केला, तेव्हा त्यांची कचेरीही ९ वाजताच उघडते असं कळलं !

नंतर तो एलनकडे गेला आणि स्तनातील कर्कपेशींचं इंजेक्शन दिलेल्या उंदरांची प्रतिकारशक्ती वाढली आहे का हे तपासायला तिला मदत करू लागला. ती रागावली आहे हे त्याला जाणवलं; पण तो बोलला नाही.

' ह्या उंदरांत कर्कपेशींविरुद्ध जाणीव निर्माण होऊनं अँटीबॉडीज निर्माण झाल्या तर त्या कर्कग्रस्त उंदरांना देता येतील. मग हे उंदीर आपण स्वतःच त्या विशिष्ट प्रकारच्या कर्करोगाविरुद्ध लढा देतील. किती सोपं... अर्थात असं झालं तरच ! छे:, मिचेलीकरता तरी हे झटपट व्हायला हवं '

पुन्हा त्यानं घड्याळाकडे पाहिलं. ९ वाजून बराच वेळ झाला होता. पुन्हा त्यानं परिसर संरक्षक मंडळाच्या माहिती विभागाला फोन केला. फोनवर कुणी बाई होती. चार्लसनं परिचय दिला आणि नदीमध्ये विषारी पदार्थ टाकले जात असल्याची तक्रार दिली. तिला त्याचं काहीच वाटलं नाही. तिनं त्याला दुसरा विभाग जोडून दिला. पुन्हा त्या नव्या बाईला चार्लसने सगळं समजावून दिलं.

' तुम्हाला चुकीचं कनेक्शन दिलं. हा पाणीविभाग आहे कचरा विभाग नव्हे. मिनिटभर थांबा. तुम्हाला मी विषारी-रसायन विभाग जोडून देते. ' चार्लस पुन्हा फोन धरून थांबला. तितक्यात फोनच बंद झाला.

पुन्हा त्याने डिरेक्टरी उचलली. विषारी-रसायन विभागाचा नंबर काढून त्याने फोन फिरवला. तिथं त्याला असं सांगण्यात आलं की, ' आमच्या विभागाचा यात काही संबंध येत नाही. हे काम धोकादायक विभागाचं आहे. ' आणि चार्लसने पुढं काही म्हणण्यापूर्वीच फोन बंद झाला.

त्याने पुढचे नंबर इतक्या जोरात दाबायला सुरुवात केली की, त्याचं बोट दुखू लागलं. फोन लागला. पुन्हा एक बाई ! आपला राग दाबून न ठेवता त्यानं तक्रार सांगितली.

' सांडपाणी केव्हा सोडलं ! ' तिने विचारलं.

' अहो हे नेहमीचंच आहे. कारखान्याचा सर्व कचरा नि बाकीचं सगळं नदीतच सोडतात ! '

' पण कचऱ्याचं काम आम्ही पाहात नाही ! '

' एक मिनिट थांबा. तुमचे वरिष्ठ कोण आहेत त्यांना विचारू का ?'

' थोडं थांबा हं. '

चार्लस घामाघूम झाला. डाव्या हाताने फोन धरून उजव्या हाताच्या बाहीने त्यानं कपाळ पुसलं.

' बोला, काय हवंय ! ' पलीकडून दुसऱ्याच बाईचा आवाज आला.

' एका कारखान्यातून रोज गॅलनच्या गॅलन बेंझिन नदीत सोडलं जातंय आणि बेंझिन हे विष आहे...'

' हे पहा, ही कामं आमच्या विभागाची नाहीत. तुम्हाला एखाद्या सरकारी खात्याकडे विचारावं लागेल. '

' मग तुमचं हे, परिसर-संरक्षक-मंडळ करतं करी काय ? वैतागून त्यानं विचारलं.

' परिसर स्वच्छ आणि नीटनेटका कसा राहील या दृष्टीनं आम्ही व्यवस्था पहातो. '

' मग नदीत विषारी पदार्थ सोडले जातात यावर तुम्हीच काही तरी करायला हवं. '

' ते खरं हो; पण सरकारकडून आधी पहाणी झाल्याशिवाय आम्हाला लक्ष घालता येत नाही. तुम्हाला त्या खात्याचा नंबर देऊ का ?'

' द्या वाटलं तर ! ' त्यानं फोन आपटला.

चार्लसनं एलनकडे पाहिलं. ती त्याच्याकडेच पाहात होती. त्याचं लक्ष जाताच तिने पुन्हा कामात गढल्याचं सोंग केलं.

चार्लसने पुन्हा एक नंबर फिरविला. त्याची सगळी तक्रार ऐकून घेतल्यावर त्या बाईने विचारलं, ' ही नदी कोणती म्हणालात ?'

' पॉटोमॅक. ' चार्लसने सुटकेचा निश्वास टाकला. ' चला म्हणजे आता तरी बरोबर जागी फोन केलाय मी. '

' होय, होय ! आणि हा कारखाना कुठंशी आला ?'

' शाफ्ट्सबरीमध्ये. '

' शाफ्ट्सबरी ? म्हणजे न्यू हॅम्पशायर होय ना ?'

' होय; पण...'

' हे पहा. न्यू हॅम्पशायर आमच्या अखत्यारीत येत नाही.

' पण नदी जवळजवळ सगळीच मॅसाच्युसेट्समध्येच आहे. '

' असेल; पण तिचा उगम न्यू हॅम्पशायरमधेच आहे. तुम्ही त्यांच्याशीच बोला. '

' देवा देवा, आता काय करू ?'

' काय म्हणालात ?'

' काही नाही. त्यांचा नंबर सांगता का ?'

' तो तुम्हाला टेलिफोन विभागामधूनच घ्यायला हवा. ' आणि फोन बंद झाला !

चार्लसने न्यू हॅम्पशायरच्या टेलिफोन विभागाकडून सरकारी खात्याचा फोन नंबर मिळवला.

' तुम्हाला निनावी तक्रार द्यायचीय का ?'

प्रश्न ऐकून तो चकित झाला ! ' नाही. मी डॉ. चार्लस मार्टेल. ' असं म्हणून त्याने शाफ्ट्सबरीचा पत्ता दिला.

' ठीक आहे. ' ती काही तरी लिहून घेत असावी. ' बरं हा कारखाना कोणता आहे ?'

' शाफ्ट्स बरीमध्ये रीसायकल नावाची कंपनी आहे. ते लोक पॉटोमॅक नदीत रोज बेन्झिन फेकत असतात. '

' ठीक, आभारी आहे. '

' थांबा थांबा, ' चार्लस पटकन म्हणाला, ' आता तुम्ही काय करणार ?'

' आमच्या एका इंजिनियरला मी सांगेन. तो पाहून येईल. '

' केव्हा ?'

' ते नाही सांगता येणार. '

' पण काही अंदाज ?'

' सध्या आम्ही पोर्टस्माउथमधल्या एका अशाच प्रकरणाची चौकशी करतो आहोत. ते काम संपल्यावर पाहू. काही आठवडे तरी लागतील. '

'काही आठवडे ?' चार्लसची इतकं थांबायची तयारी नव्हती.

'तुमचे इंजिनिअर आहेत का तिथं ?'

'नाहीत. दोघेही बाहेर गेलेत. थांबा हं. एक जण इतक्यातच आलेत.'

'मी लॅरी स्पेन्सर बोलतोय.' थोड्या वेळानं आवाज आला.

चार्लसनं त्याला सगळं पहिल्यापासून नीट सांगितलं तेव्हा तो म्हणाला, 'आमच्याकडे खरं म्हणजे मनुष्यबळ नाही हो !'

'पण हे फार गंभीर आहे. बेन्झिन हे विष आहे आणि नदीकाठी किती तरी लोक राहतात.'

'ते खरं हो, पण...'

'लवकर काम करण्याकरता मी काही मदत करू शकतो का ?'

'तसं वाटत नाही; पण खरं तर तुम्ही परिसर-संरक्षण-मंडळाकडे जायला पाहिजे होतं.'

'मी त्यांच्याचकडे पहिल्यांदा तक्रार दिली; पण त्यांनी तुमच्याकडे बोट दाखवलं.'

'तेच म्हणतो मी. त्या लोकांना काही करायलाच नकोय. सगळी घाण आम्हीच काय ती काढायची.'

'शेवटी चार्लसनं इंजिनिअरचे आभार मानून फोन बंद केला. परिसर-संरक्षण-मंडळ सरकारी भागातील केनेडी इमारतीत होतं. आता फोन करण्यापेक्षा स्वतःच जावं हे बरं असा विचार करून तो निघाला.

कोट घालता घालता तो म्हणाला, 'मी आलोच इतक्यात.'

एलन बराच वेळ हलली नाही. चार्लस गेल्याची खात्री होताच तिनं डॉ. मॉरिसनला फोन लावला. मुलगी आजारी असली तरी चार्लसचं वागणं तिला योग्य आहे असं वाटलं नाही. मॉरिसननं सगळं ऐकल्यावर तो खाली आला.

खरं तर रीसायकल कंपनीविरुद्ध आपण काही करू शकू असं आतापर्यंतच्या अनुभवावरून त्याला वाटेना. मिचेलीची आठवण तर घडोघडी येतच होती. त्याला खात्री होती की, चालू असलेल्या उपचारांचा तिला उपयोग होणं शक्य नव्हतं. 'ल्युकेमिया व्हायचाच होता हिला तर लिम्फोसायटिक जातीचा झाला असता तर निदान ही औषधं तरी चालली असती,' त्याच्या मनात आलं.

तो केनेडी इमारतीत आला. परिसर-संरक्षण-मंडळाची कचेरी तेविसाव्या मजल्यावर होती. लिफ्टनं तो वर आला. संचालकांच्या कचेरीपाशी एक मुलगी आरशात पाहून चेहरा ठाकठीक करीत होती. तिच्याकडे जाऊन त्यानं म्हटलं. 'माफ करा. रीसायकल कंपनी नदीमध्ये बेन्झिन फेकत असते ती तक्रार कुठं द्यायची ?'

केस सारखे करता-करताच तिनं विचारलं, 'बेन्झिन हा धोकादायक पदार्थ आहे का ?'

'तर तर, भयानक.'

'तर मग त्यांची कचेरी एकोणिसाव्या मजल्यावर आहे.' कोण खुळा आहे कुणास ठाऊक अशा नजरेनं तिनं पाहिलं.

लिफ्ट करता न थांबता तो एकोणिसाव्या मजल्यावर आला. तिथं त्याला हवाप्रदूषण, ध्वनिप्रदूषण, जलप्रदूषण इत्यादि निरनिराळे विभाग आढळले. एके ठिकाणी 'विषारी पदार्थ विभाग' असं नाव दिसल्यावर तो त्या दिशेनं निघाला.

टेबलापाशी बसलेल्या माणसाला त्यानं सर्व तक्रार सांगितल्याबरोबर तो म्हणाला, 'तुम्ही चुकीच्या ठिकाणी आलात.'

'म्हणजे ? बेन्झिन तुमच्या कक्षेत येतं नाही ?'

'बेन्झिन आमच्या कक्षेत येतं हो; पण आम्ही फक्त बेन्झिन वापराचे परवाने देत असतो.

'मग, कुणाला भेटायला हवं ?' राग आवरीत चार्लसनं विचारलं.

'हं. मला तर त्याची काहीच कल्पना नाही. हे असलं प्रकरण पूर्वी कधीच आलेलं ऐकलं नव्हतं; पण थांबा आपण कुणाला तरी विचारू.'

तो उठून गर्दीत नाहीसा झाला. थोड्या वेळानं परत येऊन म्हणाला, 'दुर्दैवानं कुणालाच माहिती नाही ह्या विभागाची. तुम्ही बाविसाव्या मजल्यावर पाणी-विभाग आहे, तिथं चौकशी करून पहा. त्यांना एखादे वेळी माहिती असेल.'

पुन्हा जिने चढत तो बाविसाव्या मजल्यावर आला. एका टेबलापाशी त्यानं सगळी हकीकत सांगितली, 'ह्या असल्या तक्रारी तुम्ही आमच्याकडे कशा आणता ?' त्या माणसानं कुरकुरत म्हटलं.

'भले, अहो तुमचा पाणी-विभाग आहे ना ? मग विषामुळं पाण्याचं प्रदूषण होतंय ते पाहाचं काम तुमचं नाही ?' चार्लसनं म्हटलं.

'अहो शहाणे, आम्ही पाणीपुरवठा आणि सांडपाणी यांच्याशी संबंधित असलेलीच कामं पाहतो.'

'आता तुम्हाला कसं सांगू ? इतकी साधी तक्रार आहे. एक कारखाना नदीमध्ये विषारी पदार्थ सोडतोय हे मी कुणाला सांगायचं ?'

'मग तुम्ही धोकादाक पदार्थांच्या विभागात जायला हवं.'

'तिकडे आधीच जाऊन आलो.'

'मग तुम्ही तेविसाव्या मजल्यावरच्या कायदा विभागात जाऊन पहा.'

शिव्या पुटपुटत तो उठला आणि पुन्हा तेविसाव्या मजल्यावर आला.

तिथं एक मुलगी कादंबरी वाचीत होती. तिला चार्लसनं आपली अडचण सांगायचा प्रयत्न केला; पण तिच्या वाचनात व्यत्यय आल्यानं ती त्रासली.

**Shubhada Commercial Institute**

LEARN ENGLISH, MARATHI
HINDI TYPEWRITING

*Address* : — 8/4, Banali Apartments
Karve Road, Nal Stop
Pune - 411 009

'मला यातलं काहीएक माहीत नाही !' ती म्हणाली.

'मग कुणाला विचारू !'

'मला माहीत नाही !'

चार्लस टेबलावर वाकला आणि त्यानं तिच्या हातून पुस्तक हिसकावून घेतलं. पुस्तक टेबलावर आपटून तो म्हणाला, 'तुझी खूण घालवल्याबद्दल माफ कर; पण तुझे वरिष्ठ कोण आहेत ? त्यांना भेटायचंय मला.'

'कुमारी स्टीव्हन्स का ?'

'चालेल.'

'पण ती आज आलेली नाही.'

'नंतर कोण आहे ?'

'श्रीमती अमेन्डोला.'

'तिचं नाव काही का असेना ?'

मुलगी उठून आत गेली आणि एका प्रौढ बाईला घेऊन परत आली. चार्लसला तिनं काम विचारलं. त्यानं आतापर्यंत काय काय झालं ते सांगितलं. तिनं त्याला आत यायला खुणावलं.

'तुमची तक्रार कळली. पण आम्ही यात जास्त चौकशी करू शकत नाही. एखाद्या कारखान्यानं हानिकारक पदार्थांचे कागदपत्र भरून वेळेवर सादर केलेत की नाही नि योग्य तऱ्हेचे परवाने घेतलेत की नाही इतकंच फक्त कायदा–विभागाला पाहता येतं. ते नसेल तर आम्ही कोर्टात त्यांच्यावर खटले भरून दंड करतो !'

चार्लसनं तोंड झाकून घेतलं.

'तुम्हाला बरं नाही का ?' तिनं विचारलं.

'हे पहा', चार्लसनं विचारलं, 'तुम्हाला काय म्हणायचंय हे मी थोडक्यात मांडतो. कायदा विभागाचं मुख्य काम म्हणजे कागदोपत्री सर्व ठाकठीक आहे हे पाहणं; पण पाणी स्वच्छ राहतं की नाही हे पाहणं त्यांच्या अखत्यारीत येत नाही ? बरोबर.'

'एकदम. अजून हे सर्व विभाग नवीन आहेत. नियमावली तयार व्हायच्यायत. आहेत ते नियम आम्ही त्यांना पाठवतो. ते त्यांनी मोडले तरच मग आम्ही त्यांना जाब विचारू शकतो.'

'तोवर एखाद्या कारखान्याने निष्काळजीपणाने वागायला हरकत नाही.' चार्लसनं चिमटा काढला.

'असं नाही म्हणता येणार. आमचंही एक फिरतं गस्तीपथक असतं त्यांच्याकडे तुमची तक्रार खरं तर जायला हवी आणि आमचं सध्याचं बजेट इतकं अपुरं आहे की, इच्छा असूनही आम्ही अधिक काही करू शकत नाही. बरं, डॉ. मार्टल, कारखान्याचं नाव काय म्हणालात ?'

'रिसायकल कंपनी.'

'चला. आपण त्यांचे कागदपत्र तर पाहू या.'

चार्लसला तिनं आत कॉम्प्युटर विभागात नेलं आणि कॉम्प्युटरची बटणं दाबून क्षणभर वाट पाहिली.

'हा पहा. परिसर–संरक्षक–विभागानं त्यांना नंबर दिलाय U019 सगळं व्यवस्थित आहे. त्यानं कुठं नियमभंग केल्याचं दिसत नाही.'

'पण ते लोक विषारी पदार्थ नदीत सोडतात.' चार्लस टिपेमध्ये ओरडला. 'आणि तो तर कायदेभंग आहे ना ?' त्याचा आवाज ऐकून सगळे लोक चमकून त्याच्याकडे पाहू लागले. ते लक्षात येताच त्यानं स्वर खाली आणून म्हटलं, 'आपण तुमच्या कचेरीत बसून बोलू या का ?'

चार्लसनं तिला सविस्तर हकीकत सांगितली. बेन्झिनचे दुष्परिणाम समजावून सांगितले आणि मिचेलीला ल्युकेमिया झाल्याचंही सांगितलं. तो म्हणाला, 'बाई, तुम्हाला मुलं आहेत ना ? त्यांना असा त्रास झाला तर ?'

'बाई ग !' आता मात्र तिच्या आवाजात भीती डोकावली.

'आता तुम्हाला समजेल मी का इतकी धडपड करतोय. कोणत्याही मुलाला हा धोका संभवतो.'

'आमच्या विभागानं लक्ष घालावं असं तुमचं म्हणणं आहे तर !' तिनं म्हटलं.

'अर्थात.'

'मग तुम्ही लेखी तक्रार द्या, मला उद्देशून लिहा.'

'ठीक आहे.'

'पुरावे वगैरे ?'

'पाण्याचं विश्लेषण केलं आहे आम्ही.'

'आणखी काही ? कोणाचे जाब-जबाब ?'

'मी जमवतो.'

'मग जमेल.'

केनेडी इमारतीतून बाहेर पडताना तर त्याचा उत्साह जवळजवळ संपला. रिसायकल कंपनीविरुद्ध सरकारी अधिकाऱ्यांना हालचाल करायला लावणं शक्य नसल्याचं त्याला पटलं. तो इन्स्टिट्यूटकडे परत निघाला.

इन्स्टिट्यूटच्या दाराशी त्याला रक्षकानं अडवलं. ब्रिग्टन प्रकरणापासून सर्वत्र कडक बंदोबस्त होता. 'ओळखपत्र मागितल्यावर चमकून तो म्हणाला, 'अरे मला ओळखत नाहीस का ? मी मार्टल !'

'हुकूम आहे साहेब !'

ओळखपत्र दाखवून तो आत शिरला. प्रयोगशाळेत आल्यावर त्याला एलन दिसली नाही. 'अजूनही रागावलेली दिसतेय. प्राणि-विभागात गेली असणार.'

त्यानं ब्रॉयर केमिकल्सचा फोन फिरवला.

फोन केल्यावर त्याला वाटलं आपण उगीच फोन केला. आताच आलेला अनुभव खरं तर पुरेसा होता.

*With Best Compliments from*

**ALURKAR BROTHERS**

MITHAPELLI ESTATES,
SHANKARSHET ROAD,
PUNE 411 037
Tel. : 448633, 447651

**Refrigeration & Airconditioning Engineers.**

चार्लसनं तक्रार केल्यावर तिकडच्या माणसानं चार्लसलाच शिव्या द्यायला सुरुवात केली त्यानं त्याला, देशद्रोही, प्रगतिविरोधक अशी नाना नावं ठेवली. चार्लसनं शेवटी फोन बंद केला.

तेवढ्यात एलन आत आली. तिनं विचारलं, 'आपली सगळी लॅब-बुकं गेलेली तुझ्या लक्षात आलं का?'

चार्लसनं शोधाशोध करायला सुरुवात केल्यावर तिनं म्हटलं, 'शोधायची गरज नाही. ती सगळी वर गेली आहेत.'

'काय?' तो ओरडला.

'तू गेल्यावर मॉरिसन आला होता. कर्कपेशी टोचलेला उंदीर त्याला दिसला. त्यामुळं आपण कॅन्सरानचं काम करीत नाही हे त्याला कळलं. तू परत आल्यावर इबॅनेजनं तुला बोलावलंय असा निरोपही द्यायला सांगितलाय.'

'पण लॅबबुकं कशाकरता नेलीयत.' तो घाबरला. त्याला प्रशासनाचा रागही येई आणि भीतीही वाटे. आपल्याला त्रास देण्याकरता आपली पुस्तकं ओलीस ठेवली असावीत अशी त्याची खात्री झाली.

'हा प्रश्न तू त्यांनाच विचार ना?' असं म्हणून तिने सुस्कारा सोडला. 'मी म्हटलंच होतं.' ह्या आविर्भावात तिने मान हलवली. त्याला अगदी एकटं पडल्यासारखं झालं.

तो जिना चढून वर आला. इव्हान्सच्या टेबलापाशी आल्यावर जणू काही एक नोकरच उभा आहे अशा थाटात तिने विचारलं, 'काय पाहिजे?' आणि एका खुर्चीवर बसण्याची खूण केली. आपण किती क्षुद्र आहोत हे सुचवण्यासाठी हा प्रयत्न आहे हे त्याला जाणवलं.

'लॅबबुकं ही आपल्या मालकीची की इन्स्टिटयूटच्या? नियम काय म्हणतो?' त्याला काही कळेना. इथून बाहेर पडल्यावर दुसरी नोकरी मिळेल का? कारण इतका खंड पडल्यावर पुन्हा डॉक्टरकी करणं सोपं नव्हतं आणि आता लागलीच द्यायची देणी म्हणजे हॉस्पिटलची बिलं नि चकची फी!'

तेवढ्यात इव्हान म्हणाली, 'संचालकांनी आत बोलावलंय.'

टेबलाच्या इकडील बाजूला वाइनबर्गर पिता-पुत्र बसलेले होते. दोघेही त्याच्याकडे निरखून पाहू लागले. पलीकडे डॉ. मॉरिसन बसला होता. आपल्याला बसण्यासाठी खुर्ची ठेवली नसल्याचं चार्लसला जाणवलं.

'चला आता कामाकडे लक्ष देऊ,' इबॅनेज म्हणाला, 'आपलं कॅन्सरान हे औषध लेस्ली फार्मास्यूटिकल्सने घेतलं आहे आणि त्याचं उत्पादन थांबणं त्यांना गैरसोईचं आहे. संशोधकाच्या कामात अडथळे आणण्याचं इन्स्टिटयूटचं धोरण नसतं; पण आताची परिस्थिती वेगळी आहे. त्यामुळं याचं उत्पादन बाजारात लवकर येईल तेवढं बरं.'

आपल्याला काढण्यापेक्षा समजुतीनं वळवण्याचा यांचा विचार आहे हे त्याच्या लक्षात आलं. कॅन्सरानचे दुष्परिणाम कसे सांगावेत याचा विचार तो करू लागला.

'कॅन्सरानच्या विषारीपणाचा तुझा शोध आम्हाला कळला.' नकळत इबॅनेजने त्याची हवाच काढून घेतली. डॉ. ब्रिग्टनचे आकडे सर्वस्वी बरोबर नाहीत हे खरं आहे.'

'हे फार सौम्य वर्णन झालं. स्पष्ट बोलायचं तर ते सर्व आकडे बनावट आहेत.' त्याला वाटलं वाइनबर्गर मंडळीवर या माहितीचा चांगलाच परिणाम होईल; पण व्यर्थ!

'दुर्दैव!' इबॅनेज म्हणाला. 'पण प्रश्न असा आहे की, यातून मार्ग काय?'

'पण माझ्या मते कॅन्सरान हे जहाल विष आहे.' वैतागानं तो म्हणाला.

त्याच्याशी आमचा काही संबंध नाही.' वाइनबर्गर पुत्र म्हणाले. 'तो लेस्ली फार्मास्युटिकल्सचा प्रश्न आहे आणि विक्रयकलेत ते तरबेज आहेत. ते लोक एस्किमोंना बर्फ विकू शकतात.' असं म्हणून तो खिदळला.

चार्लस सर्द झाला. नीतिमत्तेचं ढोंग सुद्धा नव्हतं. केवळ धंदा!

'चार्लस,' मॉरिसन म्हणाला, 'परिणामांचा आणि विषारीपणाचा असे दोन्ही अभ्यास एकदम करता येतील का असं आम्हाला हवंय.'

'म्हणजे काल्पनिक संशोधनाकरता मूलभूत संशोधन बाजूला ठेवायचं!'

'त्याला तू नाव काहीही दे!' इबॅनेज म्हणाला. 'पण शक्य आहे की नाही हे सांग.'

'त्याकरता तू कितीही प्राणी वापरू शकतोस.' मॉरिसन म्हणाला 'निरनिराळ्या डोसांचा परिणाम अभ्यासायचा आणि विषाराचाही अभ्यास करायचा. म्हणजे डॉ. ब्रिग्टनचे आकडे दुरुस्त करता येतील. यामुळं वेळही वाचेल.' इबॅनेज म्हणाला.



'एक लक्षात ठेव.' मॉरिसन म्हणाला, 'तू जर नकार दिलास, तर इन्स्टिटयूटच्या हिताकरता आम्हाला दुसऱ्याची नेमणूक करावी लागेल.'

त्याची भीती आता नष्ट होऊन तिची जागा संतापानं घेतली. 'माझी लॅब बुकं कुठायत?' त्यानं त्रासल्या आवाजात विचारलं.

'आमच्या तिजोरीत सुरक्षित आहेत!' इबॅनेज म्हणाला. 'ती इन्स्टिटयूटची मालमत्ता आहे. कॅन्सरानचं काम संपल्यावर परत मिळतील. कारण तुझं लक्ष विचलित न होता केवळ कॅन्सरानचंच काम तू करावंस असं आम्हाला वाटतं.'

'आम्ही घाई का करतो आहोत हे उघड आहे!' धाकटा वाइनबुर्गर म्हणाला. 'पण तुम्ही जर हे काम पाच महिन्यात संपवलंत तर तुम्हाला दहा हजार डॉलर्सचा बोनस मिळेल.'

'हे फारच छान झालं.' इबॅनेज म्हणाला, 'तू विचार कर. आत्ताच उत्तर दिलं पाहिजे असं नाही. जबरदस्ती पण नाही. मात्र चोवीस तासात उत्तर हवं आहे. तोवर... अच्छा.'

चार्लस वैतागाने दाराकडे वळला. 'आणखी एक. तुझ्या मुलीबद्दल आम्हाला फार वाईट वाटतं; पण जोवर तू इन्स्टिटयूटमधे आहेस तोवरच इथल्या आरोग्ययोजनेचा फायदा मिळू शकेल.'

चार्लस धावतच निघाला. आपण असल्या संस्थेत काम करतो आहोत याची त्याला लाज वाटू लागली. मिचेलीच्या आजाराचा गैरफायदा घेऊन हे लोक आपल्याला मनाविरुद्ध वागायला भाग पाडताहेत.

प्रयोगशाळा आता त्याला परकी वाटू लागली. गेली आठ वर्षं ती त्याचं दुसरं घरच झाली होती. नाइलाजानं तो उठला. मिचेलीच्या ल्युकेमियाच्या पेशी वाढत असलेल्या तबकडीकडे त्याचं लक्ष गेलं. तो उठला आणि त्यानं निरीक्षण केलं. प्रगती समाधानकारक आहे असं त्याला वाटलं. आपल्याला यश येणार असं दिसू लागल्यामुळं त्यानं बाह्या सरसावून कामाला सुरुवात केली. 'अजून चोवीस तास आहेत निर्णयाला. घाई काय आहे? नंतर पाहू.'

## नऊ

बेथ इस्रायल हॉस्पिटलमधून मार्गीला पाहून परत येताना तिला वाटलं आता आपल्या सहनशक्तीची परिसीमा झाली आहे. मार्गीची अवस्था अत्यंत कठीण झाली होती. टॅडच्या मृत्यूचा धक्का तिच्या मेंदूला भलताच बसला होता. तिथून कॅथरिन बालरुग्णालयात परत आली तेव्हा तिला वाटलं एक संकट संपून दुसऱ्याला सुरुवात झाली आहे.

सहाव्या मजल्यावर जाता जाता तिला वाटलं की, मार्गीसारखीच आपली किंवा चार्लसचीही गत होऊ शकेल. खरं म्हणजे तो डॉक्टर आहे. त्याला ह्या परिस्थितीची जास्त माहिती आहे; पण परिस्थितीचं गांभीर्य त्याच्या फारसं लक्षात आलंय असं जाणवत नाही.

मिचेलीला भेटायची तिला घाई झाली होती. आधी मुळी ती तिला सोडायलाच तयार नव्हती. अर्ध्या तासात परत घेण्याचं वचन देऊन ती निघाली; पण तासभर होऊन गेला होता. सकाळी चार्लस निघून गेला त्याच वेळी मिचेली तिला चिकटली होती. चार्लस आपल्यावर रागावला आहे अशी तिची खात्री होती. कॅथरिननं तिची किती समजूत काढायचा प्रयत्न केला; पण व्यर्थ.

दार उघडताना तिला वाटलं मिचेली झोपली असणार; पण तिनं बघितलं तर पांघरूण अस्ताव्यस्त झालेलं. छाती धपापत होती आणि तोंड सगळं काळंनिळं पडलं होतं.

'मिचेली, मिचेली,' तिनं अधीरपणं हाका मारल्या; पण तिनं काही उत्तर दिलं नाही. नुसते डोळे इकडून तिकडे केले.

'धावा, धावा,' दरवाज्यातून बाहेर येऊन कॅथरिन ओरडली. ताबडतोब दोन नर्सेस धावत आल्या कॅथरिनला हातानं बाजूला करीत एकजण पुढे झाली.

'फोन कर, ताबडतोब,' असा दुसरीला हुकूम सोडला, मिचेलीच्या नाडीला हात लावला, तर ती थाडथाड वेगानं उडत असलेली जाणवली.

'तिला व्ही-टॅकचा (हृदयाचे ठोके अतिजलद पडणे) झटका आलेला दिसतोय.' पहिली म्हणाली.

'तोंडानं कृत्रिम श्वसन करावं काय?' असं म्हणून ती मिचेलीच्या अंगावर वाकली. आणि तिच्या तोंडाला तोंड लावून फुंका-

FOR
LINE, HALFTONE,
COLOUR
BLOCKS
STEREOS
and
MATS
contact
KHADILKAR
PROCESS STUDIO
COLOUR BLOCK MAKERS
461/1, SADASHIV PETH, TILAK ROAD,
POONA 411 030 PHONE : 44 30 59

यला सुरुवात केली. जरा वेळानं नाद सोडून ती म्हणाली, 'याचा उपयोग होण्याऐवजी तिला अडचणच होतेय. तू ब्लडप्रेशर घे.'

दुसरीनं ब्लडप्रेशर मोजलं. ती म्हणाली, 'फारच कमी आहे, ६०–४० सारखं बदलतं पण आहे!'

कॅथरिन गळाठून गेली. एका कोपऱ्यात उभी होती. काय चाललंय ते कळत नव्हतं; पण आहे ते फारच भीषण एवढं दिसत होतं. 'चार्लस कुठं असेल?'

तेवढ्यात निवासी डॉक्टरबाई धावत आली. 'तिला बहुधा व्ही–टॅक झालाय असं वाटतंय. तिला मायलोब्लास्टिक ल्युकेमिया झाला आहे औषधाचा दुसरा दिवस' नर्सनं सांगितलं.

'पूर्वी कधी हृदयविकार?' मिचेलीचे डोळे पहात ती म्हणाली. 'डोळे तरी ठीक आहेत अजून.'

'वाटत नाही तसं!'

'ब्लडप्रेशर?'

'साठ–चाळीस; पण सारख बदलतंय. बहुधा व्ही–टॅकच!'

आणखी दोन-तीन नर्सेसनी ढकलगाडीवरून अनेक उपकरणं आणली. तेवढ्यात पहिल्या नर्सनं डॉ. काइत्समानना फोन करून निरोप दिला.

सर्वांनी मिळून झटपट कामाला सुरुवात केली. EKG च्या तारा जोडून त्यांनी यंत्र चालू केलं. दरम्यान नर्सेसबरोबर चर्चा करून मिचेलीला काही इंजेक्शनं दिली. 'आता आपण तिला लहानसा शॉक देऊ.' ती म्हणाली आणि तिनं बटण दाबलं. मिचेलीचं शरीर एकदम उसळलं आणि स्तब्ध झालं!'

कॅथरिन भीतीनं अर्धमेली झाली. तिनं मिचेलीकडे पाहिलं तर तिची मान उशीवरून खाली घसरली होती. मात्र तिचा रंग पुन्हा लाल होऊ लागला, हीच समाधानाची बाब होती.

'वा: फारच छान!' EKG चा बाहेर आलेला कागद पाहून निवासी डॉक्टर म्हणाली.

डॉ. काइत्समान धावत आल्यानं त्यांना श्वास घेणं अवघड झालं होतं. ताबडतोब मिचेलीचे डोळे आणि नाडी पाहून त्यांनी सुटकेचा श्वास सोडला.

'काय बेबी बरी आहेस ना आता?' डॉक्टरांनी मिचेलीला विचारलं. तिने उत्तर न दिल्यानं तिच्या छातीला कान लावला. समाधानाने त्यांनी मग EKG चा कागद पाहिला. तेवढ्यात त्यांचं लक्ष कॅथरिनकडे गेलं. त्यांनी नर्सकडे प्रश्नार्थक नजरेनं पाहिलं.

'आम्हाला कल्पना नव्हती त्या इथं असल्याची.'

डॉ. काइत्समान कॅथरीनकडे गेले आणि त्यांनी तिच्या खांद्यावर हात ठेवला. 'कसं काय वाटतंय मार्टलबाई? ठीक आहे ना?'

कॅथरिनचा घसा दाटून आला त्यामुळं शब्द फुटेना तिने मानेनेच हो म्हटलं.

'तुम्हाला हे सगळं बघावं लागलं याचं वाईट वाटतं; पण आता मिचेली ठीक आहे. तसा शॉकमुळं तिला काहीही त्रास झालेला नाही. पण ते दृश्य मात्र पाहण्यासारखं नसतं. चला आपण थोडे बाहेर जाऊ जाता जाता नर्सला म्हणाले. 'कार्डिआक मॉनिटर लावा आणि डॉ. ब्रूवेकर, हिला पाहायला येतात का विचारा.'

एका खोलीत गेल्यावर त्यांनी कॅथरीनला एक खुर्ची देऊन बसवलं आणि काही हवं का विचारलं. तिनं नको म्हटलं; पण डॉ. काइत्समानच्या चर्चेवरून मामला गंभीर असावा असं तिला वाटलं.

'मार्टलबाई, एक गोष्ट स्पष्टपणं आपल्याला सांगितली पाहिजे. मिचेलीची तब्येत अजून ठीक नाही. आताच्या प्रसंगाबद्दलच नाही म्हणत मी; पण एकूणच म्हणावी तशी प्रगती नाही. औषधाला योग्य तो प्रतिसाद मिळत नाही.'

'आत्ता काय झालं होतं तिला?'

'तिच्या हृदयाची गती फार वाढली होती.'

त्यांनी तिला हृदयाचं काम वगैरे समजवायचा प्रयत्न केला; पण शेवटी नाद सोडला. 'पण औषधांचा काही उपयोग होत नाही हे मात्र खरं!' तेही निराशेनं म्हणाले.

'पण नुकतीच तर तुम्ही औषधं सुरू केलीत!' तिची उरली–सुरली आशाही जणू ते हिरावून घेत होते.

'ते खरं आहे; पण मिचेलीसारख्या ल्युकेमियामध्ये औषधांचा परिणाम सुरुवातीलाच दिसू लागतो. तिला काल मी डॉनोरुबीसीनचा मोठा डोस दिला होता नि आज तिचं रक्त पाहिल्यावर मला धक्का बसला. ल्युकेमियापेशींची संख्या मुळीच कमी झालेली नाही. असं कधी होत नाही. आता मी तिला पुन्हा थायोग्वानाइन आणि सिट्राबाईन देणार आहे!'

'हे सगळं तुम्ही मला का सांगताय?'

'कारण तुमचे पती औषधयोजनेमध्ये अडथळा आणून तो बंद करण्याची शक्यता आहे. काल आपण बोललोच आहोत.'

'पण त्यांचा उपयोग होत नसेल तर ती बंदच केलेली बरी नाही का?'

'पण ह्या औषधांशिवाय तिला दुसरी औषधं नाहीत. तिची जगण्याची शक्यता फार थोडी आहे हे तुमच्या पतीचं म्हणणं बरोबर आहे; पण औषधं दिली नाहीत तर काहीच सांगता येणार नाही.'

कॅथरिन काहीच बोलू शकली नाही

'तुम्ही धीर धरा. मिचेलीला तुमची जरुरी आहे. आणि आता पतींना इकडे बोलवा. त्यांना आजची हकीकत सांगितली पाहिजे.'

¤

किरणोत्सर्जन गणनयंत्र सुरू होण्याच्या आधीच चार्लसच्या लक्षात आलं की, मिचेलीच्या ल्युकेमिक पेशींमध्ये किरणोत्सर्गी कण शोषून घेतले जात आहेत. तिच्या रक्तातील निरोगी पेशी आणि ल्युकेमिक पेशी यांच्यातील फरक दाखवणारं प्रोटीन वेगळं करण्याच्या शेवटच्या पायरीपर्यंत तो आला; पण काही एका अज्ञात अशा कारणामुळं मिचेलीचं शरीर हा फरक ओळखू शकत नाही हे त्याला दिसून आलं. हा अडथळा कसा दूर करायचा हे त्याला समजेना. ते एकदा कळून आलं की, पुढचं काम सोपं होतं. आता ह्या पुढच्या संशोधनाकरता पाच वर्षं तरी पुरतील का? वैफल्यानं आणि असहायतेनं त्याला पूर्णपणे ग्रासलं!

टिशूकल्चर तबकडीवर झाकण घालून तो उठला. एलन अजून कशी आली नाही असा विचार त्याच्या मनात आला. कारण कॅन्सरानबद्दलची चर्चा तिच्याशी करायला हवी होती.

इवॅनेजबरोबरची भेट, सरकारी लाल फितीचा दणका, रीसायकल कंपनीच्या कामाचे पुरावे गोळा करण्यातील अडचणी यांचा विचार

करता करता तो निराश झाला.

'पुरावे गोळा करण्यापेक्षा थेट दावाच लावला तर?' त्याला कायद्यातलं फारच थोडं समजत होतं; 'पण वाइनबुर्गर इन्स्टिटच्यूटचे नेहमीचे विधिसल्लागार आहेतच की!' त्यानं खण उघडला. इन्स्टिटच्यूटची माहिती देणाऱ्या एका परिपत्रकात ह्यूबर्ट, ह्यूबर्ट, गाराविनक, आणि पियर्सन नावाच्या कायदेसल्लागार कंपनीचं नाव छापलेलं आढळलं. फोननंबरही होते.

त्यानं फोनच्या भल्या मोठ्या यादीतला पहिलाच नंबर फिरवला. श्री. गाराविनक आले असल्याचं सेक्रेटरीनं सांगितलं. चार्लसनं आपण कोण ते सांगितल्यावर त्यानं इन्स्टिटच्यूटचं काम असेल असं समजून लगेच मदत करतो असं म्हटलं; पण जेव्हा काम व्यक्तिगत आहे असं त्यानं म्हटलं त्या वेळी श्री. गाराविनक यांचा स्वर बदलला. ते म्हणाले, 'आमची फर्म इन्स्टिटच्यूटमधल्या लोकांची वैयक्तिक कामं करीत नाही!'

'ठीक आहे; पण पद्धत काय असेल ते तर सांगाल?' नुकसान-भरपाईचा दावा लावायचाय!'

चार्लससारख्या माणसासाठी आपण काम करायचं यात त्याला कमीपणा वाटला. तरीही त्यानं सांगायला सुरुवात केली, 'जर वैय-क्तिक काम असेल आणि नुकसान झालं असेल तर......!'

'नुकसान झालंच आहे. माझी मुलगी मिचेली हिला ल्युकेमिया झालाय!'

'डॉ. मार्टेल, एखादा रोग आणि त्याचं संभाव्य कारण यांच्यात निर्विवाद संबंध प्रस्थापित करणं किती अवघड असतं हे तुम्ही स्वत: डॉक्टर असल्यानं तुम्हाला कळायला हवं. हे सिद्ध करण्याकरता एक टयानं काही करून उपयोग नाही. तीस चाळीस लोकांनी मिळून करायला हवं. तुम्हाला मी टॉमस विल्सन याचं नाव सुचवतो. तरुण आहे आणि असल्या प्रकारात त्याला विशेष गोडी आहे!'

'बरं, पण कंपनी न्यू हॅम्पशायरमध्ये असली तर काही अडचण?'

'कारण नाही; पण खटला तिथल्या कोर्टात चालेल!' संभाषण चालू ठेवायचा गाराविनकला आता कंटाळा आला होता.

'आणि तिची मालकी न्यू जर्सीमधल्या कंपनीकडे असेल तर काही अडचण?'

'ते काही सांगता येणार नाही. परिस्थितीवर अवलंबून राहील!' गाराविनकला कसला तरी संशय आला. त्यानं विचारलं, 'कोणता कारखाना म्हणताय तुम्ही?'

'शाफ्ट्सबरीमधली रीसायकल कंपनी!'

'जिची मालकी न्यू जर्सीमधल्या ब्रॉयर केमिकल्सकडे आहे ती?'

'एकदम बरोबर!' चार्लसला आश्चर्य वाटलं. 'तुम्हाला कसं माहीतं?'

'कारण आम्ही पुष्कळदा त्यांचं काम केलंय आणि तुमच्या माहितीसाठी आणखी एक गोष्ट सांगतो. वाइनबुर्गर इन्स्टिटच्यूटसुद्धा ब्रॉयर केमिकल्सच्याच मालकीची आहे!'

चार्लस थक्क झाला!

'शिवाय पुढं, नंतर लेस्ली फॉमास्युटिकल हीसुद्धा ब्रॉयर केमि-कल्सनं विकत घेतली. तुम्ही वाइनबुर्गरमध्ये काम करता तेव्हा त्या दृष्टीनं पाहता दावा लावण्यापूर्वी दहादा विचार करावा हे चांगलं!'

जे काय ऐकलं त्यावर त्याचा विश्वास बसेना.

'म्हणजे एकीकडे कॅन्सर संशोधन संस्था चालवायची, दुसरीकडून कॅन्सरजनक अशी घाण नदीत सोडायची आणि तिसरीकडे कॅन्सरान-सारखी विषारी औषधं कॅन्सरवरील उपचार म्हणून विकायची! सोनेरी टोळीच म्हणायची ही. वाइनबुर्गर इन्स्टिटच्यूटला कॅन्स-रानचा इतका पुळका का ते आता कळलं.' तो संतापानं लाल झाला.

फोन वाजला. इन्स्टिटच्यूटपैकीच कुणाचा तरी असणार म्हणून त्यानं दुर्लक्ष केलं. तितक्यात त्याला मिचेलीची आठवण झाली. हॉस्पिटलमधूनच फोन असला तर? चटकन तो उठला नि त्यानं फोन कानाला लावला. 'बरोबर! कॅथरिनचाच आवाज.' त्याच्या काळजाचा ठोका चुकला.

'काय सगळं ठीक आहे ना?'

'नाही रे. तू लगेच इकडे ये. काही तरी बिघडलंय.'

कोट उचलून तो धावला.

तो धावत इन्स्टिटच्यूटच्या बाहेर पडला त्या वेळी तेथल्या लोकांनी एकमेकांना म्हटलं, 'याचं डोकं फिरलंय की काय? काय झालंय?

रस्त्यातल्या गर्दीमुळं त्याला गाडी चालवायला जसजसा जास्त वेळ लागत होता तसतसा तो जास्त जास्त अस्वस्थ होऊ लागला. 'मिचेली कुठल्या अवस्थेत दिसेल कुणास ठाऊक.' असं सारखं मनात येऊ लागलं. 'काही तरी बिघडलंय.' हे कॅथरिनचे शब्द सारखे त्याच्या कानात घुमू लागले.

मिचेलीच्या खोलीत शिरला तर एक नर्स तिच्या छातीला कान लावून ऐकत असल्याचं त्याला दिसलं. मिचेली दिसल्याबरोबर तिला उचलून घ्यावं असं त्याला वाटलं; पण ती फारच अशक्त झाल्यानं तिलाच त्याचा त्रास होईल असं लक्षात आल्यानं त्यानं मन आवरलं; पण तिची हालत फारच खालावली असल्याचं त्याच्या तज्ज्ञ दृष्टीला लगेच जाणवलं. मृत्यूपूर्वीची हिरवी छटा तिच्या चर्येवर भासली. गाल खप्पड वाटले. शिरेतून द्रव पदार्थ चालू असले तरी ती सुकलेली दिसत होती.

त्याला पाहिल्यावर तिनं स्मित करायचा प्रयत्न केला. 'मिचेली' त्यान हाक मारली. 'कसं वाटतंय तुला आता?'

तिच्या डोळ्यातून अश्रू पाझरू लागले. 'डॅडी, मला घरी जाय-


राहण्यासाठी व भोजनासाठीं
उत्कृष्ठ मध्यवर्ती स्थान
हॉटेल
तृप्ती
९७०, रविवार पेठ,
सतरंजीवाला चौक पुणे २
फोन–४७०९१६

चंय,' कसं वाटतं हे सांगायचं तिनं टाळलं.

तिच्या कपाळावर हात ठेवला तेव्हा तिचा ताप फारच असल्याचं त्याला जाणवलं. तिनं पटकन त्याचा हात पकडला.

'माफ करा,' त्या बाईनं म्हटलं. 'आपण डॉ. मार्टल दिसता. मी ब्रूबेकर, कार्डिऑलॉजिस्ट आणि हा निवासी डॉक्टर, जॉन हेशिंग. डॉ. काइत्समाननी मला हिला पाहायला सांगितलं.'

'काय झालं?'

'तिला तीव्र स्वरूपाचा व्हेंट्रिक्युलर टॅकिकार्डियाचा झटका आला होता. आम्ही मग शॉक देऊन हृदय मार्गावर आणलं.'

'पण तिला हा अरिद्‌मिया (हृदयाचं अनियमित स्पंदन) तरी का झाला असावा?'

'सांगणं कठीण आहे. तिच्यातल्या मूळच्याच एखाद्या विकृतीमुळं असेल किंवा डॉनोरुबीसीनचा दुप्पट डोस दिल्यानं झालेल्या अज्ञात अशा एखाद्या प्रतिक्रियेमुळंही असेल. बरं, पण मी तपासणी पूर्ण करते. डॉ. काइत्समान आणि तुमच्या पत्नी नर्सेसच्या खोलीत आहेत.'

'मी आलोच हं राणी,' मिचेलीकडे पाहात चार्लस म्हणाला.

'डॅडी, तुम्ही जाऊ नका. माझ्याजवळच रहा.'

'अग, आलो मी लगेच.' त्याचं डोकं डॉनोरुबीसीनचा दुप्पट डोस दिल्याच्या माहितीनं तापायला सुरुवात केली होती. 'विचित्रच.' रागानं तो थरथरू लागला.

कॅथरिननं चार्लसला प्रथम पाहिलं नि ती धावत आली. 'तू आलास, किती बरं झालं! मला एकटीला आता आवरत नाही.'

कॅथरिनला घेऊन तो पलीकडील खोलीत गेला. डॉ. विली आणि डॉ. काइत्समान बसले होते; पण कुणीही बोलत नव्हतं. त्यामुळं चार्लस अधिकच गळाठला. हे लोक आता काही तरी नाटकी भाषणं करणार याची त्याला कल्पना आली आणि त्याचीच त्याला चीड होती.

'ठीक आहे,' त्यानंच तोंड फोडलं, 'काय झालेलं आहे? स्पष्ट बोला.'

'अपेक्षेप्रमाणं तिची प्रकृती सुधारत नाहीये,' सुस्कारा टाकत डॉ. विली म्हणाले.

'डॉनोरुबीसीनचा दुप्पट डोस कशाकरता दिला?'

'काल संध्याकाळी एक दिला नि आज एक दिला.' डॉ. काइत्समाननं सुरुवात केली, 'तिच्या रक्तातल्या फिरत्या ल्युकेमिकपेशी हटवायच्या होत्या.'

'पण इतका मोठा डोस कधी दिला जात नाही.'

'पण मिचेलीची केसही वेगळीच आहे. मला एक प्रयोग करून पाहायचा होता...'

'प्रयोग?' चार्लस ओरडला. तो डॉ. काइत्समानकडे बोट रोखीत म्हणाला, माझी मुलगी तुमच्या प्रयोगासाठी नाही. उपचाराचा परिणाम होत नाही म्हणून तुम्ही तिच्यावर प्रयोग करणार!'

'चार्लस!' कॅथरिन म्हणाली, 'हे तुझं वागणं बरोबर नाही.'

तिच्याकडे दुर्लक्ष करीत तो म्हणाला, 'ती यातून वाचण्याची शक्यता नसल्यानं तुम्ही नेहमीचे मार्ग सोडून प्रयोग केलेत. त्यामुळं ही शक्यता आणखी कमी होईल की काय हे नाही सांगता येणार; पण हे व्हीटॅकच्या झटक्याचं काय? डॉनोरुबीसीन हे कारण असू शकेल की नाही? आजवर कधी तिला असा झटका आलेला नव्हता.'

'असू शकेल. तरी पण इतक्या लवकर नाही येणार. त्यामुळंच आता काय करावं असा प्रश्न पडला. म्हणून तर मी हृद्रोगतज्ज्ञांना बोलावलं.'

'म्हणजे तुमचं औषध हेच हृदयाच्या झटक्याचं कारण आहे. मी तुमच्या केमोथेरपीला संमती दिली; पण तीसुद्धा तुम्ही नेहमीचे डोस देणार ह्या कल्पनेनं; पण दुप्पट डोसाला मी मान्यता दिलेली नाही आणि देणारही नाही.'

'मग तुम्ही दुसऱ्या कर्कतज्ज्ञाला बोलवावं.' कागदपत्रं, स्टेथास्कोप गोळा करून डॉ. काइत्समान उठले. 'नाही तर तुम्ही स्वतःच पहा.'

'नाही,' काइत्समानचा हात पकडीत कॅथरिन ओरडली. 'आम्हाला सोडू नका हो. चार्लसची मनःस्थिती ठीक नाहीये. तुम्ही जाऊ नका.' पुन्हा चार्लसकडे वळून ती म्हणाली, 'चार्लस, औषधाशिवाय मिचेलीला तरणोपाय नाही.' पुन्हा काइत्समानकडे वळून म्हणाली, 'डॉक्टर, बरोबर ना?'

'बरोबर आहे नि कितीही विचित्र वाटलं तरी तिचा प्रतिसाद मिळेतो डोस वाढवण्याशिवाय मार्ग नाही.'

'तुझं काय म्हणणं आहे चार्लस?' डॉ. विली म्हणाले, 'काहीच करू नये?'

'तिला ह्या औषधांचा उपयोग होणारच नाही.' तो रागानं म्हणाला.


**शेतकरी सहकारी संघ लि., कोल्हापूर.**

आमच्या उत्पादनावरील विश्वासाचे प्रतीक.

**बैल छाप**

प्रगतशील शेतकऱ्यांमध्ये लोकप्रिय "मिश्रखते"
चवदार व रुचकर स्वयंपाकासाठी निर्मळ;
मिरची पूड, मसाल्याचे पदार्थ व "गोडे तेल"
आणि
**"ॲल्युमिनियम व स्टेनलेस स्टीलची भांडी"**

**वि. शं. शिंदे, नेसरीकर** मॅनेजिंग डायरेक्टर.
**बा. गो. देसाई, म्हसवे** अध्यक्ष.

'असं नाही म्हणता येणार,' विली.

'चार्लस, तोच एक उपाय आहे,' कॅथरिन म्हणाली.

'तिला कोणते उपचार करावेत असं तुला वाटतं?' डॉ. विलींनी पुन्हा विचारलं.

'आपण नुसतंच बघत नाही राहून चालणार,' कॅथरिननं चार्लसला म्हटलं.

'छे: काही सुचत नाही. जादा डोस देण्यानं तिचे हाल वाढतात. नाही दिले तर ती वाचण्याची संधीच रहात नाही. डॉ. काइत्समानच्या म्हणण्यात अर्थ आहे; पण उपचाराचा परिणाम होणारच नाही, मग जादा डोस देऊन तिला का छळायचं?' तो एकदम वळला नि खोलीबाहेर पडून चालायला लागला.

कॅथरिन धावत त्याच्या मागे गेली. 'चार्लस, अरे, मला सोडून कुठं चाललास? जाऊ नको ना.'

'मला इथं विचार करता येत नाही. कोणताही पर्याय तितकाच त्रासदायक नि धोकादाक आहे. मी जातो. माफ कर.'

अगतिकपणं, त्याला जाताना पाहात राहण्याशिवाय तिला गत्यंतर नव्हतं. 'छे: आपल्याला एकटीलाच हे निभावलं पाहिजे.' ती पुन्हा मागं आली.

'तुम्हा लोकांना कल्पना होतीच ना असं होणार याची?' तिनं डॉक्टरांना विचारलं.

'डॉक्टरांच्या कुटुंबियांच्या बाबतीत नेहमी असं होतंच. फारच कठीण असतं,' डॉ. काइत्समान म्हणाले.

'तुम्ही गेल्यावर आम्ही थोडंस बोललो. उपचार तर चालूच ठेवायला हवेत; पण त्याची खात्री हवी.'

'काय म्हणायचंय तुम्हाला?'

'वेळ महत्त्वाची आहे. कारण उपाय एक–दोन दिवस जरी थांबवले तरी अक्षरश: जमीन-अस्मानाचा फरक होऊ शकेल,' डॉ. काइत्समान म्हणाले.

'चार्लसची काळजीही बिनबुडाची वाटत नाही,' डॉ. विली म्हणाले.

'मुळीच नाही वाटत. मिचेलीच्या रक्तातल्या फिरत्या ल्युकेमिक-पेशी डॉनोरुबीसीनला दाद देत नाहीत हे तर खरंच आहे; पण दुसरा मार्गही नाही. तुम्हाला काय वाटतं मार्टलबाई? मिचेलीला संधी द्यायला हवी ना?'

ती पाहात राहिली. त्यांना नेमकं काय म्हणायचंय हे तिला कळेना; पण ती नकळत म्हणून गेली, 'अर्थात.' नाही तरी कसं म्हणायचं?' तिला काही समजेना.

'मिचेलीचे उपचार थांबवणं चार्लसला शक्य होणार नाही अशी व्यवस्था करता येईल,' डॉ. विली म्हणाले.

'अगदी गरज पडली तरच आपण ह्या व्यवस्थेचा उपयोग करायचा, अर्थात.' डॉ. काइत्समान घाईनं म्हणाले.

आपण काही तरी म्हणायला हवं हे कॅथरिनला कळलं; पण ते काय म्हणताहेत याचा तिला उलगडा होईना.

'तुला मी एक उदाहरण देतो. समजा एखादं मूल अत्यवस्थ आहे नि त्याला रक्त किंवा असंच काही तातडीचं औषध द्यायला हवं. नाही दिलं तर ते मूल दगावेल. आईवडिलांपैकी एखाद्यानं संमती दिली नाही तर डॉक्टरांनी काय करायचं? आईवडिलांपैकी ज्या व्यक्तींची संमती असेल त्या व्यक्तींला कोर्टाकडून अधिकृत पालकत्व मिळतं आणि मूल वाचण्याचा मार्ग खुला होतो.' डॉ. विलींनी तिला सावकाशपणे समजावून सांगितलं.

कॅथरिन भीतीनं डॉक्टरांकडे पाहू लागली. 'म्हणजे मिचेलीचं पालकत्व मी मिळवण्याचा प्रयत्न चार्लसच्या पश्चात करावा असं तुम्हाला म्हणायचंय का?'

'आपले उपचार चालू राहावेत इतक्यापुरतीच ही व्यवस्था करायचीय,' डॉ. काइत्समान म्हणाले, 'पोरीचा जीव वाचवायचाय. तुम्ही समजून घ्या. आम्ही तुमच्या मदतीशिवाय सुद्धा पुढं जाऊ शकतो. कोणीच तयार नसेल तर कोर्ट स्वतंत्रपणे पालकाची नेमणूक करू शकतं; पण तुम्ही सहकार्य दिलंत तर सगळं सोपं होईल.'

'पण तुम्ही मिचेलीला जादा डोस देताहात,' चार्लसचे शब्द आठवून ती म्हणाली.

'पण हा काही पहिलाच प्रसंग नाही. असं पुष्कळदा करावं लागतं.' डॉ. काइत्समान म्हणाले.

'शिवाय तो किती विक्षिप्तपणं वागतोय हे पाहिलंस ना!' डॉ. विली म्हणाले, कदाचित मानसिक ताणामुळं असेल; पण त्यामुळं योग्य निर्णय घेणं त्याला शक्य होत नसेल. मला वाटतं त्याबाबतीतही तुम्ही कुणाचा तरी सल्ला घ्यावात.'

'मानसोपचारतज्ज्ञांना दाखवावं असं म्हणताय का तुम्ही?'

'चांगलं होईल,' डॉ. विली म्हणाले

'मिचेलीचे डॉक्टर म्हणून आम्ही सांगतो आहोत की, आमच्या


*With Best Compliments from*

**EVER GREEN**

**OIL CORPORATION**

Dealers in Lubricating Oils,
Greases & chemicals.

B/56 Girdhar Nagar,
Jivdaya Lane, Agra Road,
Ghatkopar (W) Bombay – 400 086
Tel. RESI. – 5123202 - 5127509
OFFICE – 5128415 – 5127431

हातात आहे तेवढं सगळं आम्ही नक्की करू,' डॉ. काइत्समान म्हणाले.

'तुम्ही खूपच करता आहात. पण...'

'हे फारच विलक्षण आहे हे मान्य आहे; पण एकदा कायदेशीर कागदपत्र झाले की अत्यावश्यक झाल्याशिवाय त्याचा उपयोग करणार नाही आम्ही. मात्र जर चार्लसनं अडथळा आणला तर आमचे हात बळकट असावेत. आमचा एवढाच हेतू आहे,' डॉ. काइत्समान म्हणाले.

'मला कसं तरीच वाटतंय; पण चार्लससुद्धा बरोबर वागत नाही हे कळतंय मला,' कॅथरिननं म्हटलं.

'त्यामुळंच मगाशी मी तुम्हाला सूचना केली,' डॉ. विली म्हणाले.

'नर्वस ब्रेकडाउन नसेल ना?' तिनं काळजीच्या सुरात विचारलं.

'मला तसं सांगता येणार नाही; पण त्याला मानसिक ताण तर नक्कीच आहे.'

'पण शक्य आहे.' डॉ. विली म्हणाले, 'त्याच्या भावना आणि राग यात काही सुसंगती नाही दिसत.'

कॅथरिनला सगळं पटत होतं; पण चार्लस आणि त्याची स्वतःच्या रक्तामांसाची मुलगी यांच्यामध्ये आपण यायचं हे तिला पटेना. उलट त्यानं मिचेलीच्या उपचारात अडथळा आणावा हेही बरोबर नव्हतं.

'ठीक आहे. मी काय करायचं आता?' सरतेशेवटी तिनं विचारलं.

'थांबा. हॉस्पिटलच्या वकिलांना मी आताच फोन करून विचारतो,' डॉ. लाइत्समान म्हणाले.

आपण काय करतो आहोत, ते योग्य की अयोग्य इत्यादी कॅथरिनला कळायच्या आत सर्व कोर्ट–कागदपत्रं हे काम संपलंसुद्धा. पॅट्रिक मर्फी नावाच्या वकिलानं तिला सगळी कागदपत्रं घेऊन कोर्टात आणलं. तिथल्या लिपिकाला पॅट्रिकनं कामाची तातडी सांगितली. 'पालकत्वाचं प्रकरण आहे वाटतं? वैद्यकीय?' त्यानं पॅट्रिकला विचारलं. 'बरोबर आहे. सगळे फॉर्म भरून तयार आहेत,' त्यानं उत्तर दिलं. 'जज्जसाहेब आहेत का पाहतो हं,' लिपिक आत जाऊन आला. 'पिलिग्रिनोसाहेब आहेत. त्यांना मी सांगितलंय.' आल्यावर तो म्हणाला.

'आपण करतो आहोत ते बरोबर आहे ना?' कॅथरिननं पॅट्रिकला काळजीनं विचारलं.

'अगदी. तुम्ही मुळीच काळजी करू नका. शेवटी त्या मुलीकरताच करतोय ना सगळं!'

जज पिलिग्रिनो बाहेर आले. 'बोला श्री. पॅट्रिक मर्फी, काय आहे? तुमचं काम म्हणजे नेहमी तातडीचं असायचं!'

पॅट्रिकनं मोठ्या कौशल्यानं, मिचेलीचा आजार, डॉक्टरांचं म्हणणं, चार्लसचं वागणं, जजसाहेबापुढं मांडलं आणि कॅथरिनला पालकत्व का मिळायला हवं हे प्रतिपादन केलं.

'डॉ. विली आणि डॉ. काइत्समान यांची प्रतिज्ञापत्रं कुठं आहेत?'

पॅट्रिकनं नम्रपणे पुढं होऊन त्यांच्या पुढच्या कागदांतून ती काढून दिली.

'पण ह्या तर सावत्र आई आहेत, बरोबर ना?' जज्ज.

'पण त्यांना किती काळजी आहे हे आपण पाहिलंच आहे! मात्र एक गोष्ट निश्चित डॉ. चार्लस मार्टेल आणि श्रीमती मार्टेल यांच्यात दुसरा कोणताही विसंवाद नाही. फक्त मुलीच्या उपचाराबद्दलच त्यांच्यात मतभेद आहेत.'

'ते समजलं मला. पण खऱ्या बापाला आपलं म्हणणं मांडायची संधी का मिळू नये हे समजत नाही.'

'म्हणून तर तातडीचं आणि तात्पुरतं पालकत्व मिळावं अशी श्रीमती मार्टेल यांची विनंती आहे. शिवाय थोड्याच वेळापूर्वी डॉक्टरांबरोबर झालेल्या चर्चेच्या वेळी, सध्या चालू असलेल्या उपचारांशिवाय दुसरे उपचार नाहीत हे डॉ. मार्टेल यांनी मान्य केलंच होतं; पण मानसिक ताणामुळं त्यांचं चित्त ठिकाणावर नसल्यानं त्यांचे विचार घडोघडी बदलतात, नि ते उपचारांना विरोध करतात!'

'याचीही नोंद व्हायला हवी,' जजसाहेब.

'मान्य; पण त्यासाठी डॉ. मार्टेलना मानसोपचारतज्ज्ञांना दाखवायला हवं; पण ते कायमच्या पालकत्वाच्या अर्जाच्या वेळी पाहता येईल.'

'तुम्हाला काही म्हणायचंय श्रीमती मार्टेल?'

तिनं मानेनंच नाही म्हटलं.

'ठीक आहे. तीन आठवड्याच्या आत माझ्यापुढं पूर्ण माहिती यायला हवी. ह्या अटीवर मी श्रीमती मार्टेलना तात्पुरतं पालकत्व देण्याचा हुकूम देतो.'

'पण साहेब, तीन आठवड्यात कसं शक्य आहे? किती तरी अडचणी आहेत.' पॅट्रिकनं विनवलं.

'ते तुमचं तुम्ही पाहून घ्या. शिवाय तात्पुरत्या पालकत्वाकरता सुद्धा तुम्हाला तीन दिवसात डॉ. मार्टेलना माझ्यापुढं आणावंच लागेल नाही का? तेव्हा उद्याच त्यांना फर्मान काढायला हवं.'

'म्हणजे', कॅथरिननं घाबरून म्हटलं, 'चार्लसला हे सगळं सांगायला हवं?'

'उघडच आहे, जजसाहेब म्हणाले. 'एखाद्याला न कळवता त्याचं पालकत्व हिरावून घेणं अन्यायाचं आहे.'

असं म्हणून जजसाहेब उठले.

'म्हणजे चार्लसला कळणार मी इथं येऊन गेले ते, हे तुम्ही मला सांगितलं नाहीत. आता काय होणार?' ती पॅट्रिक मर्फीकडे वळून किंचाळली.

□

**....'या अटीवर मी श्रीमती मार्टेलला तात्पुरतं पालकत्व देण्याचा हुकूम देतो.'**

## दहा

रीसायकल कंपनीपासून थोड्याशा अंतरावर गाडी उभी करून चार्लस थांबला. अंधार पडायची तो वाट पहात होता. थंडी वाजू नये म्हणून त्यानं गाडीचं इंजिनही चालू ठेवलं होतं.

पुरेसा अंधार झालाय असं वाटल्यावर तो गाडीतून उतरला; डिकी उघडली आणि त्यानं आपला कॅमेरा व फ्लॅशगन काढली. काही बाटल्याही त्यानं खिशात घेतल्या.

मिचेलीला औषधांचा उपयोग होणं शक्य नव्हतं आणि औषधं थांबवणंही शक्य नव्हतं. कोंडीत सापडल्यासारखं झालं होतं त्याला.

तो दबकत दबकत कारखान्याच्या जागी आला. बाहेरच्या बाजूला अगदी मंद प्रकाश होता. फाटकाशी येता येता तो कशाला तरी अडखळून धडपडला. कुणी ऐकलं तर नसेल ह्या कल्पनेनं स्वस्त राहिला. पलीकडे थोड्याच अंतरावर पॉटोमॅक नदी होती. सगळीकडे बर्फ आणि चिखल माजला होता. इमारतीच्या ज्या बाजूला नदी होती त्या बाजूला तो आला. तेव्हा त्याला मोठ्या गोल अशा दोन टाक्या दिसल्या. आसपास टाकाऊ माल, जुनी यंत्रसामग्री पडली होती. टाकीपासून सांडपाण्याचे मार्ग नदीपर्यंत गेले होते. त्यानं ह्या सगळ्याची छायाचित्रं घ्यायला सुरुवात केली,

¤

वॅली ऱॅब आणि आणखी काही कामगार मधल्या सुट्टीत फराळ करून पत्ते खेळत बसले होते. पत्ते खेळता खेळता वॅली एकदम उठला आणि शिवी देत खिडकीपाशी आला.

'अरे यार, काय झालं,' दुसऱ्या कामगारानं विचारलं. पण काहीच उत्तर न देता तो स्तब्ध उभा राहिला. बराच वेळ काही दिसेना; पण तो खिडकीपासून हलला नाही. तितक्यात त्याला फ्लॅशगनचा झगझगाट दिसला.

बाकीचे कामगार त्याच्यावर रागावले आणि तेव्हा उठून खिडकीपाशी आले 'वादळ बिदळ होणार काय?' तो स्वतःशीच पुटपुटला. तेवढ्यात त्याला पुन्हा प्रकाश दिसला.

'कुणी तरी डांबीस इसम छायाचित्रं घेतोय आपल्या मागच्या सामानाची,' वॅली म्हणाला.

त्यानं फोन करून नॅट आर्चरला कळवलं. तो म्हणाला. 'मार्टल असणार लेकाचा तुझ्याबरोबर आणखी कोण कोण आहेत?'

'ब्रेझो नि ॲंजेलो.'

'जाऊन पहा तुम्ही. आणि जर तो मार्टलच असेल तर त्याला चांगला धडा शिकवा. डॉसननं मला सांगून ठेवलंच आहे की, मार्टल पुन्हा आला तर त्याला चांगली अद्दल घडवा. नाही तरी तो बेकायदेशीरपणंच आलाय.'

'चला रे पोरानो, थोडी मजा करायचीय.'

¤

मोठ्या भट्ट्या, नळया, यंत्र सगळ्यांची एकामागोमागएक छायाचित्रं घेत चार्लस हिंडत होता. पुरेशी छायाचित्रं झाली असं वाटल्यावर तो समाधानानं थाबला.

तेवढ्यात त्याच्या हातातला कॅमेरा जोरदार झटक्याने कुणी तरी हिसकून घेला आहे असं त्याच्या लक्षात आलं. त्यानं पाहिलं तर तिथे कामगार उभे होते. दोघांनी त्याला पकडलं. आता मात्र चार्लस घाबरला. पुढे जाता जाता त्यानं झटकून एकदम पळायचा प्रयत्न केला; पण एका कामगारानं त्याच्या नाकावर जबरदस्त ठोसा हाणला, त्याच्या नाकातून रक्त वाहू लागलं.

'वा: छान बक्षीस दिलंस.' दुसरा म्हणाला. चार्लसनं वॅलीचा आवाज ओळखला. तिघं जण त्याला पुढं घालून आत घेऊन आले. शेजारी रसायनचं पिप होतं.

'काय रे काढू या का ह्याला बुचकळून!' बाकीचे हसले.

तेवढ्यात चार्लसनं फ्लॅशगन धरलेल्या माणसाच्या हातावर फटका मारला. फ्लॅशगन खाली पडली. त्यामुळं अंधार पसरला. त्याचा फायदा घेऊन चार्लस सटकला. वॅलीनं त्याच्या मागं जाऊन पकडायचा प्रयत्न केला; पण तो सापडला नाही. चार्लस धावत धावत फाटकापाशी आला फाटकावरून तो चढून जाणार इतक्यात वॅलीनं त्याचा पाय धरला. पाय झटकायचा चार्लसनं प्रयत्न केला त्यामुळं वॅली णाणि त्याच्या अंगावर चार्लस दोघे खाली पडले. संरक्षणाकरता काही मिळतं का हे तो पाहू लागला. तेव्हा त्याला एक बूट मिळाला तो त्यानं वॅलीला मारला. त्यामुळं उठून पळायची संधी त्याला पुन्हा मिळाली. पळत पळत त्यानं टायर्सच्या ढिगावरून चढून उडी मारली. वॅलीला हे शक्य नसल्याचं त्याच्या लक्षात आलं. त्यामुळे तो त्वरेने नदीकाठी पोचला. काठाशी असलेल्या बर्फामुळं वॅलीला त्याच्या मागं झपाट्याने धावता येईना. त्याचे पाय घसरू लागले.

चार्लसनं मग त्याला दगड मारायला सुरुवात केली. बरेचसे त्याने चुकवले शेवटी एक त्याच्या खांद्यावर लागला. शेवटी डोक्यावर हात घेऊन तो मागं फिरला. आणि चार्लस गाडीकडे पळत जाऊ लागला. तितक्यात त्याच्या अंगावर सगळीकडूल सर्चलाईट पडू लागले. म्हणून गाडीकडे जाण्याऐवजी तो शेजारच्या दुसऱ्या इमारतीत शिरला.

आता त्याच्या मागे बरेच लोक लागले होते. त्यामुळं लपण्यासाठी चांगली जागा शोधणं जरूर होतं. जरी रीसायकल कंपनी विषारी पदार्थ नदीत सोडत होती हे खरं होतं तरी आता तो बेकायदेशीरपणं शिरला होता हेही खरं होतं.

इमारतीत मिट्ट काळोख होता. त्यामुळं कुठं जायचं हे त्याला कळेना. त्याचा हात एका दरवाज्याच्या मुठीवर पडला. दरवाजा उघडून तो आत आला. चाचपडत असता त्याच्या हाताला खरखरीत असं काही तरी लागलं त्यानं पाहिलं तर जुन्या घोंगड्या होत्या. त्या पांघरून तो गुपचूप पडून राहिला.

तेवढ्यात एक आवाज घुमला, 'चार्लस मार्टल, आम्ही तुझ्याशी बोलू इच्छितो.' पण चार्लस स्वस्थच राहिला. कारण आता बाहेर पडलो तर ते लोक आपल्याला ठार मारण्याशिवाय राहणार नाहीत याची त्याला खात्री होती.

**तेवढ्यात त्याचा कॅमेरा झटक्यानं कोणीतरी हिसकावून घेतला....**

कुणी तरी दार उघडलं. चार्लसचं काळीज गोठलं. बॅटरीचा प्रकाश सर्वत्र फिरू लागला आणि लगेच हसण्याचा मोठा आवाज आला आणि मागोमाग आणखी काही माणसं आली. त्याने उठून पळायला सुरुवात केली; पण समोरून येणाऱ्या माणसानं त्याला अलगद पकडला आणि त्याने दंडुक्याने चार्लसला तडाखा दिला. चार्लस कोलमडला.

आपल्याला कुणी मारलं हे पहाण्याकरता चार्लसने मान वर केली आणि तो चकितच झाला. फ्रँक नेल्सन, शाफ्ट्सबरीचा पोलीस प्रमुख होता तो.

'चला महाशय, तुमचा खेळ आता संपलाय. उठा,' आपला दंडुका पट्ट्यात अडकवता–अडकवता तो म्हणाला.

'तुम्ही भेटलात, बरं झालं.' चार्लस त्याला म्हणाला.

'तर, तर ? कुणाला खरंच वाटेल.' चार्लसची मानगूट धरून त्यानं त्याला ढकलायला सुरुवात केली.

'हातकड्या आणू ?' सहाय्यक पोलिसाने विचारलं.

'छे: काय करायच्यात ?' फ्रँक म्हणाला.

चालता चालता चार्लस विचार करू लागला. रीसायकल कंपनीने बहुधा पोलिसांना कळवलं असावं. इमारतीतून बाहेर पडून सर्व मिरवणूक पुढे निघाली. 'अहो, माझी गाडी तिकडे आहे पण !' सगळे लोक दुसरीकडे चाललेले पाहून चार्लस म्हणाला.

'आम्हाला माहितीय. चल मुकाट्यानं.' चार्लसचे पाय आता मात्र फार दुखू लागले. तो म्हणाला, 'हे पहा, मला तुमची मदत हवीय. रीसायकल कंपनी नदीच्या पाण्यात विषारी पदार्थ टाकते, त्याचा पुरावा हवाय. तेच काम मी आता करीत होतो. तेवढ्यात त्यांचे लोक आले आणि त्यांनी माझा कॅमेरा हिसकून घेतला !'

'तुम्ही इथं बेकायदेशीरपणं घुसलात अशी तक्रार आमच्याकडे आली. एका कामगाराला मारण्याचाही प्रयत्न केलात.

चार्लस स्वस्थ राहिला. फ्रँकला स्वतःच्या पद्धतीने काम करू देणं उचित आहे असं त्याच्या लक्षात आलं; पण त्याला सुटल्यासारखंही वाटलं. कारण तिथल्यापेक्षा पोलीसचौकीत जास्त सुरक्षितही होतं.

पण मिरवणूक रीसायकल कंपनीकडे जाऊ लागली. त्या वेळी त्याला भीती वाटली. कंपनीच्या आवारात आल्यावर त्यानं नॅट आर्चरला विचारलं, 'हाच माणूस का ?'

'बरोबर, हाच.' तो म्हणाला

'तुम्हाला काही तक्रार द्यायचीय ?'

काही उत्तर न देता नॅट आत निघून गेला. चार्लसला काही कळेना. तेवढ्यात चपळाईने ब्रेझो धावत आला नि त्याने चार्लसच्या पोटात जोरदार ठोसा हाणला. चार्लसचं लक्ष गेल्यामुळे त्याने चुकवायचा प्रयत्न केला. तरीही थोडासा फटका बसला आणि तो खाली कोलमडला. त्याच्या तोंडावर लाथेने बर्फ उडवून ब्रेझो आत पळून गेला.

पोलीसांनी त्याला उचलून गाडीत ठेवलं. डोकं टेकून त्याने डोळे मिटले आणि गाडी निघाल्याचं त्याला जाणवलं. जरा वेळाने गाडी थांबली, 'चला उतरा महाशय, नशिबानंच आज थोडक्यात वाचलात फ्रँक म्हणाला.

फ्रँकने त्याला त्याच्या गाडीपाशी आणून सोडलं आणि तो म्हणाला, 'ह्या रीसायकल कंपनीच्या वाटेला न जाणं तुमच्या हिताचं आहे, नि तुमच्या कुटुंबाच्याही. रीसायकलमध्ये इथले किती तरी लोक काम करताहेत. तेव्हा जरा सांभाळून.'

¤

कॅथरिन आणि गिना स्वयंपाकघर पुसत असतानाच त्यांना गाडीचा परिचित आवाज ऐकू आला. कॅथरिन खिडकीशी धावली. हॉस्पिटलमधून गेल्यापासून त्याचा पत्ता नव्हता. प्रयोगशाळेतही तो गेला नसल्याचं फोन केल्यावर कळलं. त्यामुळं ती काळजीत होती. आजचा कोर्टातला उद्योगही तिला त्याच्या कानावर घालायचा होता. सकाळी कोर्टात गेल्यावर मग त्याला ते कळणं बरोबर झालं नसतं.

कॅथरिननं गाडी अंधारातही ओळखली. 'आई, चार्लसच आहे बरं का ? आता तू जरा आत जाशील तर बरं. मला त्याच्याशी एकट्याशीच बोलायचं आहे. गिना नाइलाजानं गेली.

चार्लस जिना चढून येईतो तिने दार उघडलं. त्याला पाहताच तिला धक्का बसला. ओठावर सुकलेल्या रक्ताचे डाग होते. सगळा चेहराच काळा निळा पडला होता. कपडे फाटले होते आणि सर्वांत भयसूचक म्हणजे त्याच्या नजरेतला ताण आणि संताप.

'चार्लस !' ती ओरडली.

'थोडा वेळ काही बोलू नकोस' तो म्हणाला. नि अलगद कोट काढीत फोनपाशी गेला.

कॅथरिनने टॉवेल भिजवला आणि त्याच्या तोंडावरचं रक्त ती पुसू लागली. तेव्हा तो चिडला, 'क्षणभर थांबता नाही का येत ?' त्यानं तिला दूर ढकललं.

संतापाने तो फोनची बटणं दाबत होता. 'ब्रॅक्सन, तू आणि तुझ्या मुठीत असलेलं सगळं पोलीस खात जरी एकत्र आलात तरी मला पर्वा नाही !' इतकं बोलून त्यानं फोन आपटला.

फोन केल्यावर त्याचा राग काहीसा कमी झाला. 'आपलं हे सगळे शहर इतकं किडलेलं असेल असं वाटलं नव्हतं.' नेहमीच्या सुरात तो म्हणाला. कॅथरिनलाही हलकं वाटलं.

'तुला काय झालंय ? इतकं लागलं कसं ?'

'तसं काही फारसं लागलं नाही. एक वेळ अशी आली होती. मला वाटलं आता आपण संपलोच; पण सुटलो. बरं मला काही तरी प्यायला दे बघू. रस बीस.'

'तुझं जेवण तयार आहे.'

'जेवायला नको बुवा !' खुर्चीत बसत तो म्हणाला. 'काही तरी प्यायला दे. फार तहान लागलीय.'

कोर्टात पालकत्वाचा अर्ज केल्याचं चार्लसला आताच सांगू नये असं शेवटी तिनं ठरवलं. 'तुझ्या तोंडावर रक्त आहे.' तिनं निरखून पाहिल्यावर म्हटलं.

'लुच्चे, डांबीस, हरामखोर !' त्यानं तोंड पुसत म्हटलं.

'बरं, पण तू कुठं गेला होतास? काय झालं मला सांगणाराहेस का सगळं नीटपणी?'

'आधी मला मिचेलीची हकीकत ऐकायचीय !'

'नक्की ऐकायचंय का ?'

'म्हणजे ?' त्यानं चमकून विचारलं, 'नक्कीच ऐकायचंय !'

'घाबरू नको. तुला वाटलं तसं नाही मला म्हणायचं. तुला तिची

काळजी आहे हे माहिती आहे मला; पण तिच्या आजारानं तुला इतका ताण झालाय म्हणून म्हणतेय !'

'आता काय झालंय आणखी?' त्याच्या स्वरात आता चिंता डोकावली.

'शांत हो !'

'पण मिचेलीला काय झालंय ते आधी सांग मला !'

'काही नाही. तिचा ताप आणखी वाढलाय नि डॉक्टरांना काळजी वाटतेय !'

'बाप रे ! ताप वाढलाय म्हणतेस ?'

'बाकी सगळं ठीक आहे. हृदयाचे ठोकेही नियमित आहेत !' पण मिचेलीचे केस गळायला लागल्याचं तिच्याच्यानं सांगवेना. शिवाय डॉ. काइत्समाननी सांगितलं होतंच की, नंतर पुन्हा केस येतातसुद्धा!

'प्रकृतीला उतार ?'

'तसं दिसत नाही; पण डॉक्टर काही बोलले नाहीत !'

'ताप किती आहे ?'

'फारच आहे. एकशेचार होता मी निघाले तेव्हा !'

'तू परत का आलीस ? थांबली का नाहीस ?'

'मी म्हटलं थांबते म्हणून; पण डॉक्टरांनी मला जायला सांगितलं. एका मुलाच्या आजारामुळं सगळ्या कुटुंबाकडे दुर्लक्ष करू नये असं ते म्हणाले. मी थांबायला हवं होतं का ? मला कळत नाही. तू असायला हवा होतास रे !'

'अरे देवा ! तिच्या जवळ कुणी तरी पाहिजे. इतका ताप असणं चांगलं चिन्ह नव्हे. औषधांमुळं तिची प्रतिकारशक्ती खलास होतेय असा त्याचा अर्थ आहे नि ल्युकेमिकपेशी कमी व्हायचं तर नाव नाही. ताप म्हणजे दुसऱ्या कुठल्या तरी रोगामुळं आलाय !' ताडकन तो उठला. 'मी हॉस्पिटलमध्ये जाणार आत्ताच्या आत्ता !'

'पण का ? तू जाऊन काय करणार ?' तिचे पाय लटपटू लागले.

'मला आता तिच्याजवळ राह्यचंय. सगळी औषधं बंद करायला हवीत. निदान प्रमाण तरी नेहमीपेक्षा जास्त ठेवता कामा नये. त्यांचे प्रयोग पुष्कळ झाले. फिरत्या ल्युकेमिक पेशींचं प्रमाण कमी होतच नाहीये. वाढतंच आहे उलट !'

'पण बरे झालेलेही पेशंट आहेत !' आता कोणतं संकट येतंय ह्या कल्पनेनं कॅथरिन घाबरून गेली.

'केमोथेरपीचा उपयोग काही वेळा होतो हे मलाही माहितीय; पण दुर्दैवानं मिचेलीचा आजार निराळा आहे. नेहमीच्या प्रमाणाचा काहीही उपयोग झालेला नाही. आता काइत्समानचे प्रयोग पुरेत ! त्याला मी संधी दिली होती. माझ्या डोळ्यांदेखत मी पोरीचे हाल होऊ देणार नाही. इलिझाबेथचा मृत्यू मी विसरलो नाही !' तो उठला.

'अरे, पण तुझा अवतार काय झालाय !'

तो थांबला. 'कॅथरिनचं बरोबर आहे; पण कपड्यांचं काय विशेष !' तो वर धावला. घाईघाईनं नवीन कपडे करून खाली आला. कॅथरिन विचार करू लागली. आता हा हॉस्पिटलमध्ये अपरात्री जाऊन मिचेलीची औषधं थांबवणार आणि औषधं नाहीत म्हणजे आशाच नको ! डॉक्टरांचा अंदाज बरोबर होता तर. पालकत्वाचं त्याला सांगायलाच हवं. आता उशीर करून नाही चालणार !'

चार्लसनं गाडीच्या किल्ल्या जुन्या कपड्यातून काढून घेतल्या नि तो दाराकडे जाऊ लागला.

'चार्लस !' तिनं धीम्या सुरात बोलायला सुरुवात केली, 'तुला मिचेलीची औषधं थांबवता येणार नाहीत !'

'सहज येतील !' तो ठामपणे म्हणाला.

'तुला ते शक्य होऊ नये अशी व्यवस्था केली आहे !' तो थबकला. चकित होऊन त्यानं विचारलं, 'व्यवस्था केली आहे ?' त्याला वाईट शंका येऊ लागली 'काय म्हणतेयस तू, कळत नाहीये !'

'तू आधी आत येऊन कोट काढून इथं नीट बस !'

'आधी ही व्यवस्था म्हणजे काय प्रकरण आहे ते मला सांग !' तो उभ्या उभ्याच म्हणाला.

तो गेल्यानंतर काय काय घडलं ते तिनं त्याला सविस्तर सांगितलं. 'मनावरील असह्य ताणामुळं तुला योग्य निर्णय घ्यायला जमणार नाही. त्यामुळं मिचेलीच्या औषधयोजनेत तू व्यत्यय आणायचा प्रयत्न करू लागलास तर तुला थांबवता यावं यासाठी ही व्यवस्था केलीय. माझ्या सहकार्याशिवाय त्यांना हे शक्य नसल्याचं डॉक्टरांनी मला सांगितलं. मला वाटत होतं की, मी योग्य तेच करतेय !'

'मग काय झालं ?' त्याची चर्या लाल झाली होती.

'जज्जांपुढं तातडीनं मुलाखत दिली. त्यांना पटलं. तीन दिवसात आधी तात्पुरती चौकशी होईल आणि तीन आठवड्यात संपूर्ण चौकशी व्हायचीय. चार्लस, मी हे सगळं मिचेलीकरताच केलंय. तुझ्या नि तिच्यामध्ये येण्यासाठी नव्हे रे !'

त्याच्या चेहऱ्यावर संतापाशिवाय काही भाव न दिसल्यानं ती भिऊन गेली.

'चार्लस, माझ्यावर विश्वास ठेव. डॉक्टरांनी मला समजावून सांगितलं की, तुझ्यावर तीव्र मानसिक ताण आहे. तुझं चित्त ठिकाणावर नाहीये !' तिला आवरेना. तिनं रडायला सुरुवात केली.

'खरंच का तू असलं काही केलंयस ?'

'खरंच रे ! तू निघून गेलास नि मला काही सुचेना. तुला उद्या सकाळीच सूचना मिळेल !'

आता मात्र त्याच्या संतापाचा स्फोट झाला. टेबलावरच्या बशांची चळत उचलून त्यानं फेकून दिली. 'सगळे जण माझ्या विरुद्ध आहेत!

गिना दारात येऊन उभी राहिली.

'मिचेली माझी मुलगी आहे. माझ्या रक्तमांसाची. तिला माझ्यापासून कुणी तोडू शकणार नाही.'

'ती माझी सावत्र मुलगी असली तरी मला तिची तुझ्या इतकीच काळजी आहे.' तिनं त्याचा कोट हलवत म्हटलं, 'चार्लस, शांत हो.'

त्यानं तिला जोरात ढकलून दिलं. टेबलाला आपटत ती खाली पडली. तिच्या धक्क्यानं खुर्च्याही पडल्या.

**मिचेली माझी मुलगी आहे. तिला माझ्यापासून कोणी तोडू शकणार नाही**

गिनानं पुढं येऊन छातीवर हात घेतले नि ती प्रार्थना पुटपुटू लागली. तिला आतल्या बाजूला ढकलून त्यानं पुन्हा कॅथरिनकडं मोर्चा वळवला. बाहुलीप्रमाणं तिला उचलून धरलं आणि तो ओरडला, ' आताच्या आता कोर्टाचा निर्णय रद्द करण्याबद्दल फोन करा. ऐकलंस ?'

बाहेरच्या आरडाओरडा ऐकून चक जागा झाला नि बाहेर आला. त्यानं पाठीमागून चार्लसला पकडलं. तेव्हा चार्लसनं कॅथरिनला सोडलं आणि चकच्या पोटात जोरदारपणं कोपर मारलं. त्याबरोबर त्याची पकड सुटली. वळून त्यानं चकला पकडलं आणि भिंतीकडे भिरकावलं. त्याचं डोकं आपटून तो पडला.

चार्लस पुन्हा चकच्या अंगावर धावणार हे कॅथरिनच्या लक्षात येताच ती चकच्या अंगावर पडली. तेव्हा कुठं चार्लसच्या लक्षात आलं की आपण आपल्याच मुलाला मारणार होतो; पण तो पुढे झाला तेव्हा गिना मध्ये पडली नि ती पुन्हा प्रार्थना पुटपुटायला लागली.

दरवाज्यात जीन पॉल आलेला लक्षात येताच चार्लसनं त्याच्याकडे पाहिलं. आता वडिलांचा मोर्चा आपल्याकडे वळतोय असं लक्षात यताच, तो मागच्या मागं पळाला.

चार्लसला वाटलं हे सगळे लोक ओपले शत्रू आहेत आणि शत्रुत्वाच्या नजरेनंच आपल्याकडे पाहताहेत. तावडतोब तो घराच्या बाहेर पळाला.

कॅथरिननं चकला उचलून खुर्चीत बसवलं. तो चार्लसला शिव्या देऊ लागला. तेवढ्यात गाडीचा आवाज ऐकू आला आणि चार्लस कुठं तरी निघून गेल्याचं त्यांना कळलं.

' हे सगळं दुष्ट स्वप्न आहे उद्या सकाळी आपण उठलो ना, की नाहीसं होऊन जाईल.'

' अग, तुझा डोळा बघ केवढा सुजलाय !' गिना म्हणाली.

' काही विशेष नाहीये.' तिनं आरशात पाहिलं तेव्हा डोळ्याच्या खाली कापलेलं आढळलं नि सूजही आलेली दिसली. तेवढ्यात गिना बर्फ घेऊन आली.

जीन पॉल पुन्हा दरवाज्यात आला.

' जर त्यानं पुन्हा तुला मारलं तर मी त्यांना ठार मारीन,' चक कॅथरिनला म्हणाला.

' चक, पुन्हा तू असलं काही बोललास तर मला चालायचं नाही. त्याच्या मनावर केवढा ताण आहे ! आणि मला मारायचा त्याचा उद्देशही नव्हता. माझ्या पकडीतून तो सुटायला बघत होता.

' त्याच्या मानेवर सैतान बसला आहे,' गिना म्हणाली.

' पुरे आता. असलं काही बोलू नकोस पाहू.'

' मला वाटतं त्यांना वेड लागलंय,' चकनं पुन्हा सुरवात केली.

ती आता चकला पुन्हा फटकावणार होती; पण तिला वाटलं खरोखरच त्याला नर्व्हस ब्रेकडाउन झाला नसेल ना ?

त्यापेक्षाही तिला एकूण आता घराच्या सुरक्षिततेची चिंता वाटू लागली. तिनं डॉ. काइत्समानना फोन लावला.

डॉ. काइत्समानना तिनं काय काय घडलं ते सांगितलं आणि बहुधा मिचेलीची औषधं बंद करण्यासाठी तो हॉस्पिटलकडेच गेला असावा असं सुचवलं.

' बरं झालं. आपण वेळीच कोर्टात अर्ज केला ते. आता मला त्याच्यापासून धोका वाटू लागला आहे '

' मला नाही तसं वाटत.'

' पण ते एखाद्या तज्ज्ञानं पाहून ठरवल्याशिवाय समजायचं नाही; पण आता तुम्ही सर्वांनी दुसरीकडे कुठं तरी जावं हे चांगलं.'

' बरं, पण चार्लस आज हॉस्पिटलमध्ये गेलाच तर ?'

' त्याची नका काळजी करू. मी हॉस्पिटलात सूचना देऊन ठेवतो आणि अगदी स्वस्थ रहा. सर्व ठीक होईल.'

तिला मात्र डॉ. काइत्समानइतकी आशा वाटत नव्हती. परिस्थिती जास्तच बिघडतेय असं तिला दिसू लागलं.

थोड्या वेळानं स्टेशनवॅगनमधून सर्व जण बाहेर पडली.

( क्रमशः )


शुभेच्छा

**पेठकर सराफ**

**सोने, चांदी व मोत्यांचे व्यापारी**

गणेश चेम्बर्स, पेट्रोल पंपाजवळ, कर्वे रोड, पुणे ४११ ००४

**अल्प काळात प्रसिद्ध झालेली विश्वसनीय पेढी**

**द्वितीय वर्षात यशस्वी पदार्पण !**

MANOOS WEEKLY ( Licensed to post without prepayment of postage–No. 11 ) Regd. No. PNCW-

# माणुसकीचा झरा

कर्जाची मागणी घेऊन येणाऱ्या योग्य व्यक्तीला कर्ज देणे यात विशेष काही नाही. दारिद्र्याने करपून गेलेल्या ग्रामीण भागातील बांधवांना जीवन देण्यासाठी मिटीने आपला माणुसकीचा झरा आपल्या दोन " ग्रामीण बँकांच्या " सहाय्याने व पाच " कृषक सेवा सहकारी सोसायट्यांच्या " सहाय्याने ह्या दरिद्रीनारायणाच्या घरापर्यंत पोचविण्याची शर्थ चालविली आहे.

मराठवाड्यातील दोन ग्रामीण बँकांच्या शंभर शाखांमार्फत मिटीने आतापर्यंत **पस्तीस हजार** लोकांना **अकरा कोटी** रुपयांचे अर्थसहाय्य करून प्रगतीची नवी दिशा दिली आहे.

छोट्या शेतकऱ्यांच्या पाच " कृषक सेवा सहकारी सोसायट्या " स्थापून आठ हजार शेतकऱ्यांना ऐंशी लाख रुपयांचे आर्थिक सहाय्य करून नवजीवन दिले आहे.

**मिटी म्हणजेच महाबँक**

**महाबँक म्हणजेच माणुसकीचा झरा–**



**बँक ऑफ महाराष्ट्र**
[ भारत सरकारचा उपक्रम ]

मुख्य कचेरी : " लोकमंगल " १५०१, शिवाजीनगर, पुणे – ४११ ००५